म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५९२३



रा. भि. जो

REFBK-0022307

# उथव

रा० भि० जोशी

REFBK-0022307

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : २५७
पहिली आवृत्ती : जुलै १९७८
© १९७८, रा० भि० जोशी
मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे
मुद्रक : प्र० पु० भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४
प्रकाशक : श्री० पु० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४
किंमत : तीस रुपये

या पुस्तकासाठी वापरलेला कागद भारत सरकारतर्फे
सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# अनुक्रम


एक रस्ता—एक रात्र १

एक बस स्टॉप ११

जिथे उथव येतो १६

महाबळेश्वर : भिजरे आणि हसरे २५

मेघमेदुर दिल्ली ३०

त्रिपुर ३५

तत् चित्तपावन क्षेत्रम् ४३

तेप्पा देखून जा ५३

ते ऋद्धिपुर देखिले—पुनरपि ६२

हिरव्या आठवणी ६८

कांतिमत् स्वर्गखण्डम् ७५

पार्वतीचे क्रीडांगण ८२

वाराणस्या जननमरणम् ९२

त्रिविंक्रासाठी १००

मध्यरात्री वेगळ्या वाटेने ११०

मुइतु ओब्रिगाद ११८

एक आठवण आडबाजूची १२४

मातापुरा बीजें केलें १२९

अंधारातून अंधारात १३७

# पूर्वप्रसिद्धी

| | |
|---|---|
| एक रस्ता—एक रात्र | रहस्यरंजन, दिवाळी १९६० |
| काए बस स्टॉप | सारिका, दिवाळी १९६० |
| जिथे उध्व येतो | सत्यकथा, जानेवारी १९६६ |
| महाबळेश्वर : भिजरे आणि हसरे | भ्रमंती, नोव्हेंबर १९७० |
| मेघमेदुर दिल्ली | बागेश्री, दिवाळी १९७० |
| त्रिपुर | सत्यकथा, एप्रिल १९७१ |
| तत् चित्तपावन क्षेत्रम् | बागेश्री, दिवाळी १९७१ |
| तेप्पा देखून जा | राजश्री, दिवाळी १९७१ |
| ते ऋद्धिपुर देखिले—पुनरपि | सत्यकथा, एप्रिल १९७२ |
| हिरव्या आठवणी | बागेश्री, दिवाळी १९७२ |
| कातिमत् स्वर्गखण्डम् | सत्यकथा, जुलै १९७३ |
| पार्वतीचे क्रीडांगण | अर्चना, दिवाळी १९७४ |
| वाराणस्या जननमरणम् | रसिक, दिवाळी १९७४ |
| त्रिंबिकासाठी | मौज, दिवाळी १९७४ |
| मध्यरात्री वेगळ्या वाटेने | सत्यकथा, जानेवारी १९७६ |
| मुइतु ओत्रिगाद | तन्मय, दिवाळी १९७६ |
| एक आठवण आडबाजूची | दीपावली, दिवाळी १९७७ |
| मातापुरा बीजें केलें | तन्मय, दिवाळी १९७७ |
| अंधारातून अंधारात | मोहर, दिवाळी १९७७ |

# प्रस्तावना

हा माझ्या प्रवासलेखांचा तिसरा संग्रह. ह्यापूर्वीच्या 'वाटचाल' आणि 'मजल दरमजल' ह्या दोन संग्रहांप्रमाणेच हा तिसरा संग्रहदेखील मौज प्रकाशन गृहातर्फेच प्रकाशित होत आहे.

'मजल दरमजल' हा संग्रह १९६१ मध्ये प्रकाशित झाला. १९६० सालपासून १९७७ पर्यंतच्या अवधीत माझे जे प्रवासलेख प्रसिद्ध झाले त्यांपैकी एकोणीस लेख ह्या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत. हे लेख वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाले. ते प्रसिद्ध करणाऱ्या संपादकांचा मी आभारी आहे.

ह्या संग्रहाच्या प्रकाशनाचे काम फार थोड्या अवधीत करावे लागले. मौज प्रकाशन गृहाचे श्री० सुनील कर्णिक आणि मौज मुद्रणालयातले कामगार ह्यांनी अत्यंत तत्परतेने आणि दक्षतेने हे काम केले त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

श्री० श्री० पु० भागवत ह्यांचे आणि माझे संबंध इतके जुने आणि जिव्हाळ्याचे आहेत की, त्यांचे आभार मानणे हे त्यांना आणि मलाही संकोच वाटायला लावणारे होईल. पण एवढे नमूद केलेच पाहिजे की त्यांनी जर मनावर घेतले नसते तर हे काम इतक्या थोड्या अवधीत इतक्या चांगल्या प्रकारे पार पडले नसते. हीच गोष्ट श्री० पु० भागवतांची तीच मौज संस्थेतले त्यांचे बंधू आणि पुतण्ये ह्यांची. त्यांचे आणि माझेही तसेच जिव्हाळ्याचे संबंध आहेत. म्हणून त्यांचेही मी औपचारिक आभार मानीत नाही. पण ह्या संबंधांची मला जाणीव आहे एवढे नमूद करतो.

श्रीमती पद्मा सहस्रबुद्धे ह्यांनी वेष्टनासाठी जे आकर्षक आणि अर्थपूर्ण चित्र काढून दिले आहे त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

रा० मि० जोशी

२ 'अपूर्वा'
साहित्य-सहवास
वांद्रे (पूर्व), मुंबई ५१
१० जुलै १९७८

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २५ | ४ | निशाणीचे | निशाणाचे |
| २८ | ३ | पुन्हा मेलेल्या वेली | मेलेल्या वेली पुन्हा |
| २८ | ६ | जडकाळी | जड-काळी |
| २८ | १६ | जामळी झळाळणारी | जाभळी, पाढरी झळाळणारी |
| २८ | १७ | पाढरी, परस्परविरोधी | परस्परविरोधी |
| ३१ | २९ | वेळा | वेळ |
| ३३ | ३ | ठेवते | ठेवतात |
| ४४ | २२ | नानाने | नाळाने |
| ५३ | ९ | निशाणीचा | निशाणाचा |
| ७७ | २२ | तइर | इतर |
| ७९ | २ | एक रात्र | एकटाच |
| ७९ | १२ | वागले त्याची | वागले म्हणून त्यांची |
| ८१ | २ | ओगयलचा | ओगल्यांचा |
| ८३ | ३ | बुफर | बुदुर |
| ८५ | १६ | डोळ्यावरचा | डोक्यावरचा |
| ९३ | ३ | श्वौभः | श्वभिः |
| ९८ | २२-२३ | फुलांनी गामारा कुबट दर्पाने | फुलांच्या कुबट दर्पाने गामारा |
| १२१ | ६ | उत्मा मारीना | उत्ना मारीना |
| १२१ | १३ | क्रोटेन्स | क्रोटन्स |
| १३१ | २२ | घेतलेल्या, चक्रपाणींनी | घेतलेल्या चक्रपाणींनी |
| १३१ | ३१ | आबटले | आबले |
| १३२ | २५ | तिकडं तिकड जायचं | तिकड जायचं |
| १३५ | ११ | नारळाचीच | नारळाची |

# एक रस्ता
# एक रात्र

नुसत्या एका लंगोटानिशी आपल्यासमोर येऊन उभ्या राहिलेल्या दुर्योधनाकडे पाहून गांधारी जसे "तुला काळा भेटला." असे म्हणाली, तसेच देवनाथनी आणि मी मिळून रचलेला बेत ऐकून घरातली सगळी माणसे एकदम गिळा केल्यासारखे म्हणाली, "तुम्हाला माधव भेटला."

त्यानी तसे म्हणावे हे स्वाभाविक होते. कारण देवनाथ सरकारी नोकर होते, आणि मी शिक्षक होतो. सरकारी नोकराचा प्रतिष्ठितपणा स्वयसिद्धच आहे. शिक्षकालाही प्रतिष्ठा असते. (असे निदान त्या वेळी समजले जात असे.) अशा दोन प्रतिष्ठित इसमानी एका रात्री गिरगावातल्या नवी भटवाडीपासून ठाण्यातल्या पोखरण रस्त्यावरच्या एका घरापर्यंत चालत जायचा विचार करावा हे कोणाही सभ्य समंजस माणसाला विक्षिप्त वाटावे असेच होते. संपामुळे गाड्या बंद होत्या असे नाही, किंवा आमच्याजवळ गाडीभाड्यापुरते पैसे नव्हते असेही नाही तेव्हा आमचा हा विचार शुद्ध वेडेपणाचा होता ह्यात शका नाही. त्या लोकानी "तुम्हाला माधव भेटला." असे म्हणावे त्यालाही कारण होते. 'माधव' म्हणजे गांधीजींनी आपल्या आत्म-कथेत ज्याचा आत्मौपम्याने उल्लेख केला आहे ते माधव सदाशिव केळकर. ते त्या वेळी दर चारआठ दिवसानी सायकलीने पुणे-मुंबई प्रवास करीत. घरच्या मंडळींना वाटले, माधवरावानीच ह्या वेडाची कल्पना आमच्या मनात भरवली असावी. पण तसे नव्हते.

"रात्रीची वेळ आहे."; "तुम्ही दोघेच आहा ", "वाटेत काय होईल कुणी सागावं."; "विखरोलीच्या जंगलात खूनसुद्धा पडतात. परवाच नाही का वाचलं ?" असे नाना परींनी सांगून मडळी आम्हाला आमच्या बेतापासून परावृत्त करीत होती. पण ते जो जो तसे करीत तो तो आमचा बेत अधिक पक्का होत होता. शेवटी आम्ही ऐकत नाहीसे पाहून दादा वैतागाने म्हणाले, "जा, जाणार तर. तुम्ही ठाण्यालाच जाण्याच्या लायकीचे आहा." ठाण्याला जायला 'लायक' असणारे लोक बेत करून आणि आपण होऊन ठाण्याला जात नाहीत असे त्याना सांगावेसे मनात येऊन गेले, पण तसे करणे बरे झाले नसते म्हणून आम्ही गप्प बसलो.

रात्री दहाच्या सुमाराला आम्ही आमच्या बिऱ्हाडातून बाहेर पडलो. अंगात शर्ट-पॅंट, हातात काठी. माझ्या खांद्यावर एक हॅवरसॅक होती. देवनाथनी जातिवंत प्रवाशाप्रमाणे सामानाचे बोचके काठीला बांधून ती खांद्यावर घेतली होती. त्या काठ्यांचा आम्हाला काय उपयोग होणार होता ते आम्हाला माहीत नव्हते. कोणी मारायला आले असते तर आमच्या काठ्या आम्ही होऊन त्यांच्या हवाली केल्या असत्या, असे आमचे बळ होते. आता एखादे कुत्रे-बित्रे भुंकत अंगावर आले असते तर त्याला भेवडावायला आणि पळवून लावायला त्यांचा उपयोग कदाचित झाला असता. पण जी कुत्री काठीला भ्यायली असती ती नुसत्या "हुडुत"च्या आविर्भावालाही भ्यायली असती हे शक्य आहे. एतावता काय की, प्रवासात काठी असावी ह्या संकेतानुसारच आम्ही काठी घेतली होती असे म्हणावे लागते.

रस्त्याने दिवे होते. दहाच वाजले असल्यामुळे वर्दळही होती. त्यामुळे काही वेगळे असे वाटत नव्हते. आमच्याकडे कोणाचे लक्ष गेले असले तर आम्हीच त्यांना वेगळे वाटले असू. लॅमिंग्टन रोडने जेकब सर्कलला जायचे. तिथून आर्थर रोडने जाऊन चिंचपोकळीच्या पुलावरून लालबागला आणि मग पुढे शीवकडे, असा आमचा बेत होता. त्याप्रमाणे एन० पॉवेल आणि वाय० एम० सी० ए०चे हॉस्टेल ह्यांच्यामधून लॅमिंग्टन रोडने आम्ही निघालो. पण फ्रियर पुलापाशी आल्यावर आमचा बेत बदलला आणि आम्ही ग्रँट रोडला वळून चर्नीरोड जंक्शनजवळ बाळाराम स्ट्रीटमध्ये शिरलो. आम्ही कोणाचे दूत नव्हतो आणि "वक्रः पन्था यदपि भवतः" असे म्हणून आम्हाला कोणी सरळ जेकब सर्कलकडे जाणारा रस्ता सोडून इकडे वळायला सांगितले नव्हते. पण आम्ही विचार केला, आमच्यासारख्या दोन 'सभ्य' माणसांना कामाठीपुऱ्याचा हा इकडला भाग रात्रीच्या वेळी एरव्ही कधी कसा पाहायला मिळणार? म्हणून आम्ही वळलो होतो.

फोरास रोड जंक्शन गेले. ट्रॅमचा तबेला मागे पडला. जुने लाकडी जिने, दारे, खिडक्या, फळ्या, बल्ल्या, वासे—वगैरेंची दुकाने लागली. मग पुढे खाली मारवाड्यांची सराफी-सावकारीची दुकाने आणि वरती 'खास मालाची' दुकाने दिसू लागली. दिवसाच्या वेळी तिथल्या बायकांसकट सगळेच शिळे आणि ओंगळवाणे दिसते, तसे आता रात्रीच्या वेळी दिसत नव्हते. चांदण्याचा व दिव्यांचा प्रकाश आणि त्याच्यामुळे पडलेल्या सावल्या ह्यांनी बऱ्याच नेत्रपीडक गोष्टी झाकून टाकल्या होत्या. खोल्यांच्या भिंतींना दिलेल्या हिरव्या, निळ्या, गुलाबी रंगांच्या छटा घेतलेल्या प्रकाशांनी दारा-खिडक्यांचे चौकोन व्यापले होते. आणि खिडक्यांतून, सज्ज्यांतून डोक्यावर टांगलेल्या—कुठे झगझगीत तर कुठे मंद-पिवळसर—दिव्यांच्याखाली 'माल' बसलेला होता. कुठे एकेकटी बाई होती तर कुठे दोघीदोघी, तिघीतिघी होत्या. कुणी धड, कुणी लड्ड, कुणी हडकुळी, कुणी थलथलीत. कुणी एखादी विडी नाहीतर सिगरेट ओढीत होती, तर मध्येच सज्ज्यातली एखादी लखनौची बेगम

असल्याच्या आविर्भावात हुक्का पीत होती. काही अती गंभीरपणे बसल्या होत्या, तर काहींची थट्टामस्करी चालली होती. एखादीकडे पाहिले म्हणजे हिला केव्हातरी 'रूप' म्हणून म्हणतात ते असावे असे पुसटपणे वाटे, तर इतर बहुतेक जणींचे नाकडोळे ठिकाणच्या ठिकाणी होते एवढेच त्यांचे रूप. काळ्या-गोऱ्या, खप्पड-गोबऱ्या सर्व चेहऱ्यावरून फासलेले रंग, ओठाना लावलेले लाखेसारखे लाल रंग, आणि डोळ्यांना वेढणारे काजळ ह्यामुळे सगळे चेहरे भडक-भगभगीत दिसत होते.

ह्या माडीकडून त्या माडीकडे, कधी रोखून-वाकून तर कधी ओझरतेपणे नजरा टाकीत चालली होतो. साहजिकच, रस्त्यावर घराच्या सावल्यांच्या आधाराने घोटाळणाऱ्या लोकांचे लक्ष आमच्याकडे जाई. आमचा एकंदर वेष, ती खांद्या-वरची बॅग, आणि ते काठीला बांधलेले बोचके पाहून त्याना वाटले असावे की आम्ही कोणीतरी बाहेरगावचे पाहुणे मुंबई पाहायला आलो होतो. मध्येच एखादा मनुष्य आमच्या अगदी जवळ येऊन हलक्या आवाजात म्हणे, "काय शेठ! माल बघायचा आहे काय? नवीन आलेला आहे आताच." हे तो अशा पद्धतीने सांगे की, जणू देवगडाहून नुकतीच त्याच्या घरच्या हापूस आंब्याची नवी पेटी आली असावी. त्याच्याकडे लक्ष न देता, पण वर इकडे तिकडे पाहणे न थांबवता आम्ही पुढे गेलो म्हणजे "स्, स्, शेठ, इकडे या." असे शब्द आमच्या पाठीवर हलकेच आदळत. क्रॉफर्ड मार्केटात ज्याप्रमाणे "स्स्. स्स्. चिकू दाखवू का शेठ? पेरू घ्यायचे का? सफरचंद बघा साहेब! डाळिंबे फस्ट् कलास आहेत. इकडे या. बघा तर खरे." असे दोन्हीकडचे फळवाले म्हणत असतात. आणि त्यांचे ते विचित्र दबल्या आवाजातले प्रश्न आणि आश्वासने ऐकताना आपल्या खिशातले पैसेच नाही तर अंगावरची वस्त्रेदेखील ओढून काढली जाताहेत आणि आपण अक्षरशः नागवले जातो आहो असे वाटते, तसेच इथे वाटत होते. आणि शिवाय इथे वस्त्राबरोबर अब्रूही जाण्याचा प्रसंग होता. तरीदेखील आम्ही मख्खपणे तसेच चालत राहिलो. तेव्हा त्या लोकानी बहुतेक ठरवले असावे की, ह्याच्याजवळ एक पैसे तरी नसावेत किंवा अक्कल तरी नसावी. आणि काहींनी तर दोन्ही नसावीत असेच ठरवले असावे. कारण त्यांच्यापैकी एकजण आमच्याकडून तोंड फिरवून पलीकडल्या बाजूला एकदम पच्चकन थुंकला.

अशा रीतीने त्याच्या दृष्टीने टाकाऊ ठरलेले आम्ही चालता चालता अलेक्झांड्रा सिनेमापाशी आलो आणि बेलासिस रोडने भायखळ्याच्या बाजूला वळलो. तिथे आल्यावर देवनाथ म्हणाले,

"तुम्हाला ठाऊक आहे का, जोशी?"

"काय?"

"हा बेलासिस रस्ता म्हणजे जनरल बेलासिसने आपल्या घराकडे जाण्यासाठी कसातरी तयार करून घेतलेला रस्ता होता. आपण चाललो हा भाग भरतीच्या

वेळी पाण्याखाली जात असे. कारण वरळीचा बांध घालण्यापूर्वी तिथून भरतीच्या वेळी पाणी जे आत यायच ते ह्या भागातून थेट पायधुणीपर्यंत जायच, आणि आता जिथ हा कामाठीपुरा आहे त्या भागात होड्या चालायच्या."

"पण ह्या मोठमोठ्या तीन-तीन चार-चार मजली घराकडे पाहिल म्हणजे खर नाही वाटत हे."

"पण खर आहे ते. इथल्या जमिनी दहा-दहा वीस-वीस वर्षे काही पट्टी न आकारता सरकारनं लोकाना दिल्या, आणि त्यात भर घालून त्यावर घर बाधायला सागितलं. अर्थात वरळीचा बाध झाल्यानंतरच्या गोष्टी आहेत ह्या."

'पार्सनेज', टेलर मेमोरिअल चर्च, ख्राइस्ट चर्च, आणि काही बगले ह्याच्या भोवतालची ऐसपैस आवारे, ज्या काळी ह्या भागात जागेची टंचाई नव्हती त्या काळाची आठवण सागत होती. नाही तर एरव्ही मुंबईच्या रस्त्यावर घरे ओणवून अंगावर येतात.

'उभ्या पारशा'वरून क्लेअर रोडने येऊन भायखळ्याच्या पुलापाशी आम्ही भेंडी बाजाराकडून आलेल्या परळ रोडला मिळालो. भायखळ्याचे भव्य चर्च उजव्या बाजूला, आणि नंतर डाव्या बाजूला भायखळ्याचे स्टेशन, मागे टाकले. त्याच्या थोडेसे पुढे खूप उंच छप्पर गेलेली एक इमारत आहे. तिथे पूर्वी व्हिक्टोरिया ज्यूबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट होती. आणि त्याच्याही आधी एकदा एल्फिन्स्टन् कॉलेज होते. त्या इमारतीवरून जात असताना मला, मी एकदा इन्स्टिटयूटची प्रवेशपरीक्षा देण्यासाठी इथे आलो होतो आणि त्याच उंच छपराखालच्या हॉलमध्ये पेपर लिहायला बसलो होतो त्याची आठवण झाली. त्या परीक्षेचा निकाल इन्स्टिट्यूटने मला अजून कळवला नाही. पण मी इंजिनियर झालो नाही त्यावरून निकाल काय लागला तो मला कळला. समजा, मी जर इंजिनियर झालो असतो तर अशा रात्रीच्या वेळी भटकत इथे आलो असतो का, की वऱ्हाडातल्या एखाद्या जिनात किंवा तेलाच्या गिरणीत सेकंडक्लास इंजिनियर बनून राहिलो असतो, असे विचार माझ्या मनात चालले असतानाच देवनाथ म्हणाले,

"तो पाहा समोर राणीच्या बागेत व्हिक्टोरिया आणि ॲल्बर्ट म्युझियमच्या शेजारी घारापुरीच्या बेटावरून आणलेली हत्ती उभा केलेला आहे. ह्या हत्तीवरूनच त्या बेटाला एलिफण्टा नाव पडले. तुम्ही पाहिली आहेत ना तिथली लेणी?"

देवनाथ हे मुंबईत माझ्यापेक्षा जुने. ते मला मधूनमधून मुंबईची माहिती सागत होते.

लालबागजवळ आलो तसा परळच्या गव्हर्मेंट हाउसकडे जाणारा रस्ता उजव्या बाजूला सोडला आणि परळच्या पोयबावडीकडे जाण्यासाठी सुपारीबाग रोडने चाललो. जिथे रस्ते फुटतात तिथेच उजव्या बाजूला गव्हर्मेंट हाउस रोडवर सर

फेरोजशहा मेहताचा बंगला आहे. आणि त्याच रस्त्यावर थोडे पुढे गेल्यावर लवजी वाडियाचा 'लवजी कासल' आहे. हे काही काळ मुंबई सरकारचे अतिथिगृह होते. लवजी वाडियाला ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुरतेहून मुंबईला गलबते बांधण्यासाठी मुद्दाम बोलावून आणले होते. वाडिया घराण्याने मुंबईच्या गोदीत तयार केलेल्या गलबतांनी डौल आणि भक्कमपणा ह्या बाबतीत त्रिखंड कीर्ती मिळवली होती.

पोयबावडीच्या नाक्याकडून उजवीकडे शिवडीला रस्ता जातो त्याच रस्त्यावर सध्या जे हाफकीन इन्स्टिटयूट आहे तेच जुने गव्हर्मेंट हाउस "जो कोणु हुवि ए शासन लोपी तेया श्री वैद्यनाथदेवाची भाल सकुटुंबिया पडे" असा शाप देणारा, मराठी भाषेच्या इतिहासातला एक टप्पा झालेला, अपरान्ताच्या अपरादित्य राजाचा शिलालेख ह्याच गव्हर्मेंट हाउसच्या आवारात सापडला, आणि राजा अपरादित्याने शासन मोडणाऱ्याला ज्या श्री वैद्यनाथदेवाची शपथ घातली तो संगमेश्वर वैद्यनाथही त्याच रस्त्याच्या शेजारी सरकारी बंगल्याच्या समोरच्या अंगाला आहे. पूर्वी इथे एक मोठे तळे होते आणि त्या तळ्याच्या काठीच वैद्यनाथाचे जुने मंदिर होते. तळ्याची आठवण देणारा परळ टॅंक रोड अजून तिथे आहे.

एकमेकांना लागून असलेली घरे, दाट वस्ती आणि रस्त्यावरची वर्दळ संपली. कामाठीपुरा-नागपाड्यापर्यंत रात्र चढत चालल्याचे फारसे जाणवले नाही. तशी फारशी रात्र चढलेली नव्हतीही. भायखळ्यापासून त्याची थोडीथोडी जाणीव होऊ लागली कारण माणसे विरळ होत चालली होती. पोयबावडी सुटल्यावर ही गोष्ट विशेष जाणवू लागली. मधूनमधून इमारती दिसाव्या, आणि मधून मोकळी मैदाने किंवा माडाची झाडे, असे होऊ लागले. दादर स्टेशनचा भाग आणि कोहिनूर मिल आली तशी पुन्हा थोडी वस्ती लागली, आणि मग पुढे पुन्हा मोकळ्या जागा.

दादर गेले, माटुंगा गेले, किंगजवे पोलिस स्टेशन मागे पडले. इथून पुढे वस्ती जवळजवळ शून्य होती. आता आम्ही दोघेच त्या रस्त्याने चाललो होतो. वस्ती होती तोपर्यंत आम्ही त्या त्या भागातलेच कोणी तरी असू म्हणून आम्हाला कोणी हटकले नाही, आणि आता वस्ती नव्हती म्हणून. आम्ही दोन-अडीच तास चाललो असू. इतके एकसारखे चालायची आमच्यापैकी कोणालाच सवय नव्हती. पाय थोडेसे जड वाटू लागले होते, आणि ओढल्यासारखे पडू लागले होते---त्याचा आणि हातातली काठी सडकेवर टेकल्याचा आवाज आतापर्यंत कानावर पडला नव्हता तो आता पडू लागला, आमचे दोघांचे एकमेकांशी बेताने चाललेले बोलणेही खूप मोठ्याने बोलल्यासारखे वाटू लागले आणि बोलणे थांबल्यावेळची शांतताही अधिक जाणवू लागली.

होता होता शीवचे विठ्ठलाचे मंदिर मागे पडले. थोड्या वेळाने उजव्या अंगाला इम्प्रूव्हमेंट ट्रस्टचे पत्र्याचे बंगले दिसू लागले. पलीकडे शीवच्या किल्ल्याची टेकडी होती. पुढे मग स्टेशनाकडे वळणाऱ्या रस्त्याजवळच्या चाळी आणि वस्ती

सनिटेरियमकडे जाणारा पायऱ्यापायऱ्यांचा रस्ताही दिसू लागला. रेल्वे लाईन-वरच्या पुलावरून आम्ही पलीकडे गेलो आणि समोर धारावीकडे जाणारा रस्ता सोडून कुर्ल्याकडे वळलो. पण वळण्यापूर्वी थोडा वेळ बांधावर बसलो.

चालता चालता देवनाथचे बूट चावू लागले होते. त्यामुळे त्याच्या पायावर फोड आले होते. बूट घालून आणखी चालणे अशक्य होते. बुटाना इतके राबायची सवय नव्हती. पायाना इतके राबवून घ्यायची सवय नव्हती. घरापासून ट्रॅमपर्यंत, ट्रॅमपासून ऑफिसपर्यंत, आणि पुन्हा त्याच पद्धतीने परत घरी. एवढ्या बोलीवर ते पायावर चढले होते. ही त्याच्यावर जादा लादली गेलेली चाकरी करायची त्याची तयारी नव्हती. म्हणून त्यानी हा सूड घेतला होता. जोड्याने पाय झाकलेले असले म्हणजे सगळी पृथ्वीच चामड्याने मढवल्यासारखी असते हे सुभाषित अगदी खरे आहे. पण आता जोड्याने पाय झाकणे अशक्य असल्यामुळे सगळी पृथ्वी नाही तर नाही, पण निदान आपल्या पायाखालचा रस्ता तरी चामड्याने मढवला गेला तर बरे असे वाटू लागले.

थोडा वेळ आम्ही विचारविनिमय केला. मग थोडा वेळ प्रत्येक जण स्वतन्त्रपणे विचार करीत स्वस्थ बसला. मग वाटले, सरळ शीवच्या स्टेशनात जावे आणि पहिल्या गाडीने मुंबईला परतावे. ह्या वेळी मध्यरात्र उलटून एक वाजला असावा. स्टेशनात थोडा वेळ चांगली विश्रांतीही मिळेल. पण पुन्हा म्हटले, "नाही. ठरलंय एकदा तर जावंच ठाण्यापर्यंत." वास्तविक हाल देवनाथचे होणार होते. मला काय किंवा त्याना काय, अनवाणी चालायची सवय नव्हती. त्यातून चादण्याची झाली तरी रात्रच. काच, खिळा किंवा दुसरे काही लागले तर पंचाईत व्हायची. पण देवनाथ अनवाणी चालायला तयार झाले.

मग कृष्णाने जशी राधेच्या वेणीची आणि तिच्या नवऱ्याच्या दाढीची गाठ घातली तशी त्यानी दोन्ही बुटाच्या बंदांची गाठ घातली आणि बोचक्याच्या वर ते काठीला अडकवून टाकले. आणि आम्ही मुंबई आणि साष्टी ह्या बेटाना जोडणाऱ्या कॉजवेवरून कुर्ल्याच्या वाटेला लागलो. ह्या कुर्ल्याच्या कॉजवेमुळे मुंबई बेटाभोवती पाणी खेळायचे बंद झाले, त्यामुळे कुर्ल्यापाशी सतत दलदल साचलेली असते, आणि ते अतिशय घाणेरडे गाव आहे, वगैरे गोष्टी आम्ही ऐकत होतो. पण खरोखर ते किती घाणेरडे आहे ते तिथे गेल्यावरच कळले. डावीकडे खारखी दलदल तर होतीच. पण शिवाय—किंवा त्यामुळेच असेल—नाना प्रकारची घाणही येत होती. पण गाव इतके घाणेरडे असले तरी तिथली हवा दमेकऱ्यांना फार हितकारक आहे असेही आम्ही ऐकले होते. "प्रभूची लीला अतर्क्य आहे." एवढेच म्हणणे आम्हाला शक्य होते आणि तेवढेच आम्ही म्हटले.

देवनाथ एकवेळ घाटकोपरच्या गुरुकुल विद्यालयात राहत होते. कुर्ल्याची लहान-लहान घाणेरडी घरे मागे टाकून आम्ही घाटकोपरकडे जाऊ लागलो तसे ते आपले

पायाचे—जोड्यानी दिलेले—दुःख विसरले आणि त्यांची पावले तरतरीत (म्हणजे त्यातल्या त्यात) पडू लागली आणि ते आपल्या विद्यार्थिदशेतल्या गोष्टी सांगू लागले. त्यातून मग दोघांच्याही लहानपणच्या विद्यार्थिदशेतल्या गोष्टी सुरू झाल्या. त्या संपतात न संपतात तोवर आम्ही घाटकोपरच्या बाजारपेठेतून पोलिस चौकीपाशी येऊन पोचलो. एव्हाना रात्रीचे दोन-अडीच वाजले होते. बाजारात शुकशुकाट होता. गिरगावातली नवी भटवाडी सोडल्यापासून एकाही माणसाने आम्हाला "तुम्ही कोण? कुठं चालला? कशासाठी?" असे एकाही शब्दाने विचारले नव्हते. आम्ही तसेच पोलिस चौकीवरून पुढे चाललो. तोच चौकीच्या छपराखालून अचानकपणे, "कोण आहे? कुठं चाललात?" असा सवाल आला.

आम्ही म्हटले, "आम्ही वाटसरू आहो."

"इकडे या."

आम्ही गेलो. पायऱ्या चढून पडवीत पोचलो. तिथे दोनतीन शिपाई होते. त्यातल्या एकाने विचारले,

"कोण तुम्ही?"

"वाटसरू."

"इकडे कुठं चालला?"

"ठाण्याला."

"ठाण्याला? अन् एवढ्या रात्री? पायी चालत? आला कुठून?"

"मुंबईहून."

"मुंबईहून? ठाण्याला? पायी? गाडीनं का नाही गेला? कारण काय?"

"कारण तसं काही नाही. म्हटलं, रात्रीची थंड वेळ आहे. चांगलं चांदणं पडलं आहे. आपल्याला काही पोचायची घाई नाही. जाऊ चालत चालत."

"मुंबईला काय करता? राहता कुठं?"

"हे सरकारी नोकर आहेत. मी एका शाळेत मास्तर आहे. गिरगावात राहतो."

आमची उत्तरे सरळ, न चाचरता दिली होती. त्यामुळे त्यांचीही कदाचित थोडीशी पंचाईत झाली असावी. पण त्यांना त्यांची ड्यूटी करणे अवश्य होते. ते म्हणाले,

"बोचक्यात काय आहे?"

"आमच्या घरच्या आणि स्वतःच्या वापरण्याच्या वस्तू आहेत."

"उघडा बोचकी."

घरची माणसे आम्हाला नुसते वेडेच समजली होती. हे पोलिसचे लोक दुसरेच काही तरी समजताहेत, निदान त्यांना तसा संशय येतो आहे, हे आमच्या लक्षात आले. पण 'कर नाही त्याला डर कशाला?' ह्या तत्त्वावर आम्ही विसंबून होतो.

आम्ही बोचकी उघडली. माझ्या हॅव्हरसॅकमध्ये इतर सामानाबरोबर एक लुगडेही होते.

"हे लुगडं कुठलं ?"

"आमची काही माणसं ठाण्याला असतात त्यांच. मुंबईला राहिलेलं परत घेऊन चाललो आहे."

देवनाथाजवळच्या सामानात त्याचा दाढी करायचा 'गळेकापू' वस्तरा होता.

"हा कुठला ?"

"माझा रोज दाढी करायचा."

"हे बूट कुणाचे ?"

"माझे."

"तुमचे ? मग हातात कशाला घेतले ?"

देवनाथनी तिथल्या कंदिलाच्या उजेडात त्यांना आपल्या पायावरले फोड दाखवले.

"अहो, तुमचेच जोडे असले तर तुम्हाला ते चावतील कसे ?"

म्हणजे त्याच्या मते आम्ही ते चोरलेले होते. आणि नवेच पायात घातले होते. आमच्या प्रामाणिकपणाबद्दल त्याची खात्री कशी पटवावी, ते आम्हाला समजेना. जोडे जर चोरलेले असते तर ते आपलेच आहेत असे भासवण्यासाठी फोड आले तरी ते आपल्याच पायात नसते का ठेवले, असे त्यांना विचारावेसे वाटले. पण काही बोललो नाही. कारण माझे जोडे देवनाथच्या बुटाच्यासारखे तालेवार नसले तरी त्यानीही माझ्या पायाना चावायला सुरुवात केली होती. तरी ते मी पायातच ठेवले होते म्हणजे मी तसे बोलतो तर मीही चोर ठरलो असतो.

थोडा वेळ तसाच गेला. आम्हाला साव समजावे की नाही ह्यासंबंधी त्याचा निर्णय होईना. पण चोरच समजावे अशीही पक्केपणी खात्री वाटेना असे दिसले. थोड्या वेळाने आम्ही त्याच्या परवानगीने सामान आवरले. आणि त्यांना विचारले, "जाऊ आम्ही आता ?"

ते म्हणाले, "*विक्रोळी-भांडुपच्या जंगलात रात्रीच्या वेळी रहदारी बंद ठेवण्याची* ऑर्डर आहे. तिथं डाके, खून वगैरे पडतात. पाच वाजेपर्यंत आम्ही तुम्हाला पुढं जायला परवानगी देऊ शकत नाही."

पैसे देण्याखेरीज इतर सर्व प्रकारानी आम्ही त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. त्याचे उत्तर एकच : "ऑर्डर नाही."

थोड्या वेळाने त्याच्यापैकी एकजण बाहेर जायला निघाला. जाताना म्हणाला, "मी जरा गस्त घालून येतो, तोपर्यंत तुम्ही थांबा."

आम्ही चौकीत बसून राहिलो. मधून मधून शिपायाशी बोलत होतो. एकंदरीत ते आमच्याशी चांगले वागले. विक्रोळी-भांडुपच्या जंगलातल्या वाटमारीच्या त्यानी बऱ्याच गोष्टी आम्हाला सांगितल्या.

गस्त घालायला गेलेला शिपाई शेवटी परत आला. आणि आम्हाला म्हणाला, "चला माझ्याबरोबर."

आम्हाला वाटले हे काय नवीन आणली ? आमची समजूत होती की फार-फार तर आम्हाला पाच वाजेपर्यंत बसवून ठेवतील आणि मग पुढे जाऊ देतील. आम्ही विचारले,

"कुठं ?"

"साहेबाच्या बंगल्यावर. ते सांगतील तुम्हाला काय ते."

पुन्हा परतून बाजारात जाऊन रेल्वेवरच्या पुलावरून लाइनीच्या पलीकडे त्याच्या-बरोबर 'साहेबाच्या' बंगल्यावर गेलो. बंगल्याच्या पायऱ्याशी पोचल्यावर त्याने साहेबांना हाक मारली. आळोखेपिळोखे देत बाहेर येत त्यानी विचारले,

"काय आहे ?"

आमच्याकडे हात करीत शिपायाने त्याना आमच्यासबंधी काय सागायचे ते सांगितले. साहेबानी आम्हाला प्रश्न विचारायला सुरुवात केली. चौकीवरच्या सगळ्या प्रश्नोत्तराची कमीअधिक मानाने पुन्हा उजळणी झाली. आम्ही इंग्रजीत बोलायला सुरुवात केली होती. मध्येच शिपाई म्हणाला, "साहेब, मराठीत बोला." म्हणजे त्याच्या 'साहेबा'ला इंग्रजी येत नसावे. शेवटी आम्ही म्हटले,

"साहेब, आम्ही दोघेही नोकरीपेशाचे लोक आहो. आमची नावं आणि आमचा मुंबईतल्या नोकरीधंद्याचा आणि घराचा पत्ता आपल्याला देतो. आणि ठाण्याला ज्याच्याकडे जातो आहो त्याचाही पत्ता लिहून देतो"

आमचे बोलणे ऐकून घेतल्यावर साहेब शिपायाला म्हणाले, "जाऊ दे त्याना." आणि आम्हाला म्हणाले, "तुमच्यासारख्यानी असे रात्री-बेरात्री फिरणं बर नाही. अहो, मुंबईहून ठाण्याला रोज इतक्या गाड्या जातात. गाडीन जावं."

ह्या व्यवहारी सल्ल्याबद्दल आणि आम्हाला जायची परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्याचे आभार मानले. आणि निरोप घेऊन निघालो. तोच पाचचे टोले पडले.

आम्हाला वाटेला लावून देता देता तो शिपाई हसला असावा, अशी आम्हाला शंका आली.

दोन-अडीच तास थांबल्यामुळे विसावा मिळाला होता. पण त्यामुळेच पाय आखून ताठले होते. त्यामुळे पावले अधिकच जड पडू लागली. घाटकोपर मागे पडून विक्रोळी जवळ येत चालले तसे मन अस्वस्थ होऊ लागले पाच वाजले होते खरे. पण उजाडायला अजून चांगलाच अवकाश होता. विक्रोळीच्या जगलासबंधीच्या गोष्टी चौकीवरल्या शिपायानी सांगितल्या होत्या तशा आम्हीही ऐकल्या होत्या. आणि घाटकोपरच्या पोलिसाना जरी आम्ही "आम्हाला काही भ्यायचं कारण नाही." असे सागत होतो, तरी आता आम्हाला थोडीशी भीती वाटू लागली. कुठे काही सर्‌फर्‌ झाले की, आम्ही दचकून मागेपुढे पाहत असू. कुठे झाडाझुडपामागे कोणी लपलेले तर नाही ना अशी शंका वाटे. मोठमोठ्याने बोलत गेलो तर ते

जास्त सुरक्षितपणाचे होईल की अगदी गुपचूप एक शब्द न बोलता, ह्याचा निर्णय होईना. म्हणून आम्ही मधूनच मोठ्याने बोलत असू. आणि मग एकदम गप्प राहत असू.

विक्रोळी मागे टाकून भांडूपपर्यंत चाललो तशी वेगळीच भीती वाटू लागली. पवईचे तळे भांडूपपासून जवळ आहे. आम्ही ऐकले होते की, पवईच्या तळ्यात मगरी आहेत. आणि रात्रीच्या वेळी पुष्कळदा त्या भक्ष्य शोधीत मुंबई-ठाणे रस्त्यापर्यंत येतात. आम्हाला वाटे, आमच्या वाटेतच एखादी असायची, म्हणून आम्ही रस्त्यावर आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला बारीक लक्ष ठेवून चालत होतो. दोन्ही बाजूंना जंगलाची गर्द झाडी किंवा दाट आमराया होत्या. डावीकडे डोंगराची चढण होती. एव्हाना थोडेथोडे उजाडू लागले होते. आणि मुलुंड आले तसे चांगलेच उजाडले. मुलुंड आणि ठाणे ह्यांच्या मध्येच ठाण्याचे वेड्यांचे इस्पितळ आहे. ही गोष्ट लक्षात आल्यावर घरून निघताना दादा जे म्हणाले होते की, "तुम्ही ठाण्यालाच जाण्याच्या लायकीचे आहा," त्याची आठवण झाली. ठाणे जवळ येत चालले. आलेही. विठ्ठल सायन्नाचे दत्तमंदिर मागे पडले. काही वेळाने घंटाळीचे देऊळही येऊन गेले. कौपीनेश्वराच्या तळ्याकडे आणि जांभळी नाक्याकडे जाणारा रस्ता उजवीकडे सुटला. आणि आम्ही टेंबी नाक्याकडून इस्रायलाच्या मशिदीवरून जाऊन पोखरण रोडला लागलो. आणि थोड्याच वेळात, पावले ओढीत ओढीत घराच्या दारात जाऊन उभे राहिलो.

त्या अनपेक्षित वेळी आणि त्या अवतारात आम्हाला पाहून घरची सगळी माणसे अचंबा करू लागली. आम्ही मुंबईहून पायी आलो, आणि वाटेत घाटकोपरला पोलिस-चौकीवर दोन-अडीच तास विनाकारण अडकून पडलो, हे ऐकल्यावर तर सगळी जण एकच गिल्ला केल्यासारखे म्हणाली, "वेडे आहात की काय ? हे कुणी सांगितलं होत तुम्हाला ?"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

# एक
# बस स्टॉप

"हाजी अली, महालक्ष्मी" हा कंडक्टरचा पुकार ऐकला की, बसमधल्या उतारूंपैकी ज्याना तिथे उतरायचे असते ते उतरतात आणि जिकडे जायचे असेल तिकडे जाऊ लागतात. गुरुवारचा दिवस असला तर त्यापैकी बरेचसे लोक सडकेलगतच्या पायऱ्या उतरून हाजी अलीच्या दर्ग्याकडे जायला आरंभ करतात.

पीर हाजी अलीशहा बुखारींनी जेव्हा हे ठिकाण आपल्या राहण्यासाठी निवडले तेव्हा त्यांची इच्छा, लोकवस्तीपासून लांब कुठे तरी एकांतात, देवाचे नाव घेत राहता यावे हीच असली पाहिजे. पण लोकांच्या भक्तीपुढे त्यांच्या इच्छेची काय मातब्बरी! त्यांची इच्छा एकीकडे राहिली आणि भक्तांची वर्दळ वाढू लागली. इतकी की, पुढे अधिक भक्ताना अधिक सोयिस्करपणे त्यांच्या दर्शनाला जाता यावे म्हणून त्या लांबच्या बेटापर्यंत एक पाखाडी बांधण्यात आली. आणि आता तिथे भक्तांची रीघ लागलेली असते. जिथे भक्तांची रीघ लागली तिथे भिकाऱ्यांची रीघ लागल्यावाचून कसे चालेल! साहजिकच सडकेपासून तो दर्ग्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पाखाडीच्या दुतर्फा नाना प्रकारच्या रोगानी विद्रूप झालेले, नाना प्रांतांतील भिकारी बसलेले असतात. त्यांच्यामधून चालताना मन अगदी अस्वस्थ होते. अंगावर शहारे येतात. आणि आपली प्रकृती धडधाकट आहे, आपले अवयव जागच्या जागी आहेत, आपली नाके-बोटे शाबूत आहेत, हा जणू आपलाच अपराध आहे असे पावलोपावली आपल्याला वाटू लागते. आपण त्यांच्यापेक्षा अधिक भाग्यवान आहो ह्याचा आपल्याला गर्व होऊ नये, आणि झाला असला तर त्याबद्दल पश्चात्ताप वाटावा, आणि त्याचे प्रायश्चित्त घेता यावे म्हणून ते तिथे बसलेले असतात की काय असे वाटू लागते. आणि मनात येते की त्यांचे ते पुढे पसरलेले हात आणि त्यांचे ते, कोणाचे दीनवाणे तर कोणाचे मगरूर सवाल ऐकत पुढे जाण्यापेक्षा तसेच मागे परतावे. पण समोर उंचावर प्रवेशद्वार आहे ते बोलावीत असते, भोवतालच्या समुद्राच्या लाटा हाका मारीत असतात, दर्ग्याच्या बेटावरून पलीकडला समुद्राचा आणि इतर देखावा कसा दिसतो ते पाहण्याचे कुतूहल असते. आणि शिवाय शेकडो लोक जात असतातच. त्यात मुसलमानांच्या बरोबर हिंदू असतात, पारशीही असतात.

नारळ, फुलांचा पुडा आणि उदबत्त्या घेऊन घाईघाईने चाललेले असतात. त्यात पुरुष असतात तशा बायकाही असतात. कारण हाजी अली त्याना पावलेला असतो. कोणाला त्याने आजारातून उठवलेले असते. कोणाला उद्योगाला लावलेले असते. कोणाला कज्जे-खटल्यांत यश दिलेले असते. आणि कोणा निपुत्रिकाना संतती दिलेली असते. त्यांच्याबरोबरच आपणही जाऊ लागतो.

वर कबरीच्या भोवताली लोक प्रार्थना करीत असतात. कबरीच्या भोवताली आणि चौफेर भिंतींवर ठिकठिकाणी वीत दीड-वीत लांबीचे रंगीत लाकडी पाळणे टांगलेले दिसतात, ते ज्याना हाजी अलीच्या कृपेने मुले झाली त्यांनी आणून वाहिलेले आहेत. तुम्ही कबरीपाशी गेलात की तिथला मुजावर फुले वगैरे तुम्ही आणलेल्या वस्तू कबरीच्या पायथ्याशी ठेवील, कबरीवर वाहील. तुम्हाला तबर्रुक देईल, तुमच्या अंगावरून मोरचल फिरवील—त्या वेळी तुम्हाला कसेसेच होते—तो तुम्हाला कपाळाला लावायला अंगारा देईल. ती कबर आहे आणि तो मुजावर मुसलमान आहे एवढे सोडले तर एखाद्या हिंदू साधूच्या समाधीच्या दर्शनालाच आपण आलो आहो असे वाटेल. असे हे सगळे सोपस्कार असतात. चिरागीसाठी—म्हणजे दिवाबत्तीसाठी—काही द्यायचे असेल ते कुठल्या पेटीत टाकायचे तेही तिथे लिहून ठेवलेले दिसेल. अशा प्रकारचे हिंदू ठिकाण आणि हे ठिकाण ह्यांत काही फरक वाटणार नाही. पण एक फरक निश्चित वाटेल, इथे गोंधळ आणि गडबड कमी आहे. घंटा नाहीत आणि कोणीही मोठ्याने बोलत नाही.

हाजी अली कोण? कुठला? आणि त्याचे इतके माहात्म्य कशामुळे आहे? ह्याची चौकशी करून आपल्याला काय करायचे आहे? तो आपल्याला पावला, आपले काम झाले. तिथे आलेल्या भक्तांपैकी एखाद्याला तुम्ही असा काही प्रश्न विचारलात तर तो तुमच्याकडे चमत्कारिक नजरेने खालीवर न्याहाळून पाहील आणि तुम्ही कोणीतरी विचित्र माणूस आहा आणि तुम्हाला तिथे येण्याचा काही अधिकार नाही, असा त्याच्या चर्येवर भाव दिसेल. आणि तो तोंड फिरवून दुसरीकडे निघून जाईल. पण समजा, तुम्ही मुजावरला विचारलेत आणि त्याचे तुमच्याकडे लक्ष गेले, तर तो थोडासा कंटाळूनच पण सांगेल की, हाजी अलीशाह बुखारी हे समरकंदचे राहणारे होते, आणि कोणीतरी दुष्ट लोकानी त्याना एका पेटीत बंद करून समुद्रात टाकून दिले. ती पेटी वाहत वाहत येऊन ह्या खडकाला लागली. इथे त्यांच्यावर 'खुदाका फजल' झाला, आणि ते इथेच राहिले. "समरकंदपाशी तर समुद्र नाही. मग त्याना समुद्रात कुठं सोडलं—कुणी...कशासाठी...?" वगैरे प्रश्न त्याला विचारण्याचे तुमच्या मनात येईल. आणि तसे शब्द तुमच्या ओठाच्या दाराशी येऊन उभे राहतील. पण तो एव्हाना आपल्या हातातले मोरचल दुसऱ्या एखाद्या भक्ताच्या अंगावर फिरवू लागला असेल. ह्याचा अर्थ असा की, तुमच्या ह्या असल्या चांभार-चौकश्याकडे लक्ष द्यायला त्याला वेळ नाही. तुम्ही आता जाऊ शकता. तुमच्या

ओठाच्या दाराशी आलेले शब्द हिरमुसून मागे फिरतात.

असे म्हणतात की, अलीशाह बुखारी हा समरकदाचा एक मोठा धनाढ्य व्यापारी होता. आपल्या बहिणीबरोबर तो हजला गेला. तिथून परत आल्यावर त्याला विरक्ती प्राप्त झाली. इथे ह्या खडकावर बसला असताना त्याच्यावर परमेश्वराचा अनुग्रह झाला आणि ती भावंडे सर्व धनदौलत देऊन टाकून इथेच फकीरी वृत्तीने राहू लागली. आणि मग पूर्वीचा अलीशाह 'पीर हाजी अलीशाह बुखारी' झाला. आणि इथेच त्याने देहत्याग केला. आणि इथेच त्याची कबर बांधली गेली. आणि पलीकडे, वरळीच्या टेकडीच्या टोकावर, हत्तीच्या माथ्यासारखा दुहेरी घुमट दिसतो, त्याच्याखाली त्याच्या बहिणीची—मामा हाजियानीची—कबर आहे.

एक वेळ अशी होती की, हाजी अलीपेक्षा मामा हाजियानीचीच प्रख्याती अधिक होती. पण आता हाजी अलीपाशी माणसाची सतत वर्दळ असते तर हाजियानीपाशी जवळ जवळ शुकशुकाटच असतो.

हाजी अलीच्या दर्ग्याच्या मागच्या बाजूला जाऊन समुद्राकडे पाहिले म्हणजे महालक्ष्मी, हाजी अली आणि हाजियानी एकाच चंद्राकार रेषेत असलेली दिसतात. आणि चागली ओहोटी असली तर ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत जाणे शक्य असावे असे वाटू लागते.

म्हणूनच तर हाजी अलीने हे बेट फार पसंत केले. कारण असे की, शेजारच्या महालक्ष्मीचे आणि हाजी अलीचे फार मैत्र आहे. आणि रात्रीच्या शात वेळी ही दोन बहीण-भावंडे आणि महालक्ष्मी ह्यांच्या स्नेह-गोष्टी चालतात. त्याना हे मध्यवर्ती ठिकाण फार सोयीस्कर आहे. हे मैत्र केव्हा निर्माण झाले कुणाला सागता येत नाही. मुसलमानी राजवटीत महालक्ष्मी, महाकाली, आणि महासरस्वती ह्या तिघींनी आपली अप्रतिष्ठा टाळण्यासाठी शेजारच्या क्षीरसमुद्रात उडी घेतली होती. आणि त्या तिथेच राहिल्या होत्या. तिथून त्या ब्रिटिश अमदानीत, वरळीचा बांध बांधला जाण्याच्या वेळी, आधी सरकारी इंजिनियर रामजी शिवजी परभू ह्यांच्या स्वप्नात आणि मग सध्याच्या ठिकाणी आल्या. त्या अटीवरच त्यानी बांध उभा राहू दिला. त्याची मंदिरात पुन्हा प्रतिष्ठापना झाल्यावरच बहुधा हाजी अलीचे आणि महालक्ष्मीचे मैत्र सुरू झाले असावे.

पण त्याना आता पूर्वीसारखी शातता तिथे लाभत नसेल. कारण हाजी अलीच्या दर्ग्याची जागा चागली आहे असे पाहून तिथे लोकानी अनेक आरोग्यधामे बांधली आहेत. त्यात कुटुंबवत्सल माणसांचा सतत मुक्काम असतो. त्यामुळे शातता तिथून हुसकली गेल्यासारखीच झाली आहे.

पण दर्ग्याच्या आसपास घरा-माणसाची कितीही गर्दी असली तरी ते बेट किनाऱ्यापासून इतके लाब आहे की, बांधावरून त्याच्याकडे पाहताना त्या गर्दीची आपल्याला जाणीवही होत नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या अलिप्ततेमुळेच त्याला एक शाततेचे

वलय लाभलेले आहे. आणि त्यामुळेच त्याला आकर्षकपणा आला आहे. आणि त्या आकर्षकपणाला वेगवेगळ्या वेळी रूपे तरी किती येतात!

हिवाळ्याच्या दिवसांत बाघाखातच्या त्या करड्या-काळ्या ओलसर वाळूवर पाढऱ्या कमळाच्या शेकडो कळ्यांची दाटी दिसते. ह्या हिवाळ्याच्या दिवसांत ह्या ठिकाणी कमळे कशी? आणि काल नव्हती आणि आज एकाएकी कुठून आली? असे आपण आपल्या मनाशीच प्रश्न करतो. तेवढ्यात काही तरी होते. त्या कमळांच्या पाकळ्या उघडतात, पाकळ्यांचे पंख होतात, आणि हितोपदेशातल्या 'सभूय समुत्थान' करणाऱ्या त्या कबूतरांप्रमाणे त्या सगळ्या कळ्या एकदम झेप घेऊन उडतात आणि पलीकडे समुद्रातल्या पाण्यावर जाऊन बसतात. आणि मग आपल्या लक्षात येते की कमळाच्या कळ्या नाहीतच मुळी त्या. सी गल्स—ज्याना केगये म्हणतात ते—आहेत ते. ते समुद्राच्या पाण्यावर जाऊन बसतात, आणि बसतात न बसतात तो तिथूनही उठतात. त्याचे ते पाण्यावर बसणे आणि तिथून उठणे किती अलगद असते! गौरीसमोरच्या आराशीत शाडूची झिलईदार तकतकीत कबूतराची चित्रे कोणीतरी अदृश्य हातानी हलकेच ठेवावी आणि तशीच उचलावी तसे ते पाण्यावर बसतात आणि तिथून उठतात तेव्हा पाण्यावर हलकीशीसुद्धा सुरकुती पडत नसेल. आणि ते तसे बसले म्हणजे दिसतातही मातीच्या चित्रासारखे आटोपशीर, रेखीव, गुळगुळीत आणि तकतकीत. अगदी निश्चलपणे लाटावर खालीवर हेलकावत बसतात ते. आणि मग तिथून अलगद उठून दुसरीकडे जातात. त्यांनी पंख पसरले म्हणजेच त्यांची झेप किती आहे आणि त्यात जोम किती आहे ते कळते. तिथून ते मग आणखी पुढे जातात आणि तिथून मग हाजी अलीच्या दर्ग्यामागे जाऊन दिसेनासे होतात.

पावसाळ्यात हवा थोडीशी वादळी असली आणि वेळ भरतीची असली तर चारी बाजूनी समुद्राच्या लाटा आपल्या कमानदार पाढऱ्या आयाळी उडवीत, अरबी घोड्यांच्या ऐटबाज शिंगरासारख्या मानेला मान आणि डोक्याला डोके घाशीत धावत-पळत येतात आणि बेटाच्या खडकापाशी येताच त्यावर आदळून फुटण्याऐवजी एकदम विरतात. आणि त्या विरतात न विरतात तोच त्यांची जागा क्षितिजापासून धावत आलेली दुसरी शिंगरे येतात ती सारखी घेत असतात. त्याना गणती नाही आणि अंतही नाही.

किंवा एखाद्या वेळी निळ्या-हिरव्या समुद्रावर फेसाळ लाटा प्रचंड पाढऱ्याशुभ्र हारांचे रूप घेतात आणि त्या सरकत सरकत बेटाशी येऊन विलीन होतात. किनाऱ्यापासून क्षितिजापर्यंत असे असंख्य हार लोळत असतात आणि त्यामुळे चौफेर फुललेल्या फुलांच्या ताटव्यातच त्या दर्ग्याची योजना झाल्यासारखी दिसते. किंवा कधी त्या पाढऱ्याशुभ्र फेसाळ लाटा लांबट निमुळत्या होड्यासारख्या समुद्रावर सथपणे इकडून तिकडे तरगत जाताना दिसतात. तशात जर ती चांदण्याची रात्र असली तर त्या देखाव्याला अशी काही विलक्षण अपार्थिव तरलता येते की त्या प्रसंगी त्या होड्यातून

यक्षगंधर्व समुद्रविहार करीत असावेत असे वाटते. कधी कधी किनाऱ्याकडून क्षितिजा-कडे जाणारे पाणी तिकडून येणाऱ्या लाटेच्या पोटाखाली शिरून तिला वर उचलून धरते. आणि मग पाटासारखे पाणलोट समुद्राच्या पृष्ठभागावर खाडू लागतात.

एखाद्या वेळी समुद्र इतका शांत असतो आणि हवा इतकी स्वच्छ असते की क्षितिजावर समुद्राची निळी कड, वस्तऱ्याच्या धारेसारखी रेखीव दिसू लागते. तर दुसऱ्या एखाद्या वेळी समुद्र आणि आकाश ह्या दोहोंनाही गढूळ रंग येतो आणि दोन्ही एक होऊन जातात.

ऋतुमानाप्रमाणे सूर्यास्ताच्या आगेमागे तिथल्या आकाशाला आणि त्याच्यामुळे समुद्राला कधी गर्द जांभळा-किरमिजी रंग येतो, तर कधी गुलाबी, कधी पाणी घालून फिका केल्यासारखा पिवळट-सोनेरी, तर कधी हिरवट-पिवळा, कधी मनाला उसळ्या मारायला लावणारा उज्ज्वल रंग तर कधी त्याला अंग मुडपायला लावणारा उदास रंग. पण कोणताही रंग असला तरी त्याच्या भुईवर दर्ग्याचे ते दोन घुमट आणि त्यांना समतोल देणाऱ्या आडव्या रेषांच्या इमारती ही सिल्युएटसारखी रेखलेली दिसतात. आणि त्यांची छाया आणि मागले रंग ह्यांचा विरोध-संबंध मनावर ठसून जातो.

पावसाच्या रुपेरी तारा जेव्हा पृथ्वी आणि आकाश ह्यांना एका विणकामात गुंफून टाकतात त्या वेळी दर्ग्याच्या इमारती पडदानशीन कुलस्त्रियांप्रमाणे त्या जाळीदार पडद्यामागे अदृश्य होण्याचा प्रयत्न करताहेतसे वाटते. एखाद्या वादळी संधिप्रकाशात ते बेट आणि त्यावरच्या इमारती एखाद्या परीकथेतल्या राजकन्येच्या दुर्गम प्रासादासारख्या दिसतात. एखाद्या काळोखाच्या रात्री तिथल्या एखाद्याच दिव्याचा फिकटपिवळा ठिपका केवळ "मी इथे आहे, दिसतो आहे ना?" एवढेच विचारतो. तर दुसऱ्या एखाद्या रात्रीच्या अंधारात समुद्राच्या काळ्या पाण्यात तिथल्या पिवळ्या आणि निळसर-हिरव्या दिव्यांची प्रतिबिंबे टांगलेल्या हारासारखी लोंबू-हेलकावू लागतात. आणि ते बेट म्हणजे एखाद्या समारंभासाठी सजवलेला देवप्रासाद असावा असे वाटू लागते.

खरे म्हणजे माहीमचे फकी अली मखदूम हे 'कुतबे कोकन'. त्यांचा महिमा हाजी अलीपेक्षा कितीतरी जास्त आणि जास्त जुना. पण त्यांच्या दर्ग्याला ह्या आसमंत-विस्तार आणि हे वैभव नाही.

बसने जाणाऱ्या-येणाऱ्यांना वाटते की, 'हाजी अली' हे एक आपले नुसते बस थांबण्याचे सोयिस्कर ठिकाण आहे. आणि भाविकांना वाटते की, ते एक नवस करण्या-फेडण्याचे आणि दर्शनाचे ठिकाण आहे. पण खरोखर त्या दोहोंपेक्षा ते वेगळे आणि कितीतरी अधिक असे काहीतरी आहे. तसे म्हटले तर प्रत्येक दिवशी ते आदल्या दिवशीचेच ठिकाण आहे. पण ततोतंत दुसऱ्या कोणत्याही दिवसासारखे ते कधीच नसते. ते सनातन आहे तसेच नित्यनूतन आहे. दिवसा-दिवसालाच नव्हे तर तासा-तासाला ते नवे रूप धारण करते. म्हणूनच ते नित्य ताजे आहे. रमणीय आहे.

# जिथे उथव येतो

मी महाडात पहिल्यांदा प्रवेश केला तो एका अंधाऱ्या रात्री. त्यामुळे गावाचा पहिला ठसा उमटणे शक्य नव्हते.

मध्यरात्र उलटून गेली होती. कॉंक्रीटचा सपाट राजरस्ता सोडून खाली उतरून आमची गाडी एका खडीच्या रस्त्यावर खडखडू लागली, तेव्हा कोणीतरी म्हणाले, "चला, महाड आलं." त्याबरोबर, डोळे मिटून मागे रेललो होतो तो मी सरसावून बसलो, आणि बाहेर पाहू लागलो. उजव्या बाजूला लांबवर पसरलेला नदीच्या प्रवाहाचा पट्टा दिसत होता. आणि त्यात काठावरल्या दिव्यांची प्रतिबिंबे, खुंट्या-वरून लोंबत सोडलेल्या जरतारी हारासारखी हेलकावत होती. कौलारू घरांचे, झाडांचे, काळसर ठसे करड्या आकाशावर उठले होते. त्या काळ्या-करड्या प्रवाहाकडे, त्यात हेलकावणाऱ्या त्या सोनेरी हाराकडे आणि त्या घराच्या प्रकाशाकडे मी पाहत असतानाच मोटार जकातनाक्यापाशी आली. क्षणभर उभे राहिले न राहिलेसे करून गावात शिरली. थोड्या वेळाने आडवळणी बोळातल्या एका मोठ्या घरासमोर गाडी थांबली, आणि आम्ही उतरून आत शिरलो. ते नाना-साहेब टिपणिसांचे घर होते, असे मला कोणीतरी सांगितले. ओटीवर विजेच्या दिव्याची मोठी नळी लावली होती. तिचा झगझगीत निळसर पांढरा-स्वच्छ प्रकाश सगळीकडे पसरला होता. ओटीवर, पडवीतल्या तख्तावर, दहा-बारा लोक आमची वाट पाहतच बसले होते. उत्थापन झाले, आगत-स्वागत झाले. परस्पर-परिचय करून देण्यात आला. "प्रवास कसा काय झाला?" "ठीक झाला." वगैरे बोलणी चालू झाली. पडवीच्या एका भिंतीवर एक मोठे एन्लार्जमेंट टांगलेले होते. चेहऱ्या-वरून करारी आणि प्रभावी व्यक्तित्व दिसत होते. त्याकडे लक्ष जाऊन मी पाहू लागलो. नाना म्हणाले,

"हे आमचे वडील. प्रो० गोविंद गोपाळ टिपणीस."

'गोविंद गोपाळ टिपणीस!' एल्फिन्स्टन कॉलेजातले मराठीचे पहिले प्रोफेसर, 'महाराष्ट्रवेदा'चे संकलनकार, 'महाराष्ट्र साहित्य' मासिकाचे संपादक, गो० गो० टिपणीस, त्यांचे हे घर! म्हणजे हे घर सामान्य नव्हे! त्यावरून मला मग

महाडातल्या इतर मोठ्या लोकांचीही आठवण झाली. प्रि० गोविंद चिमणाजी भाटे, शिवरामपंत परांजपे, ना० भास्करराव जाधव.. माझे मन मग बराच वेळ असे आतच वळून राहिले. बाहेरच्या बोलण्यात मी 'हो-नाही' पुरताच होतो. आणि त्या असण्यालाही फारसे महत्त्व नव्हते.

जेवणेबिवणे झाली. आणि आम्ही निजण्यासाठी म्हणून शेजारच्याच देवळात गेलो, ते प्रभु राम-मंदिरात. 'प्रभु राम' म्हणजे मला वाटले, 'प्रभु' रामचंद्र. पण मला कळले की, 'प्रभू' म्हणजे सी० के० पी० आणि त्यांचा—चां० कां० प्रभूंचा—राम म्हणून 'प्रभू राम'. "असो," मी म्हटले, "रामाच्या प्रभुपणाला काही त्यामुळे मर्यादा पडत नाही." आमच्याबरोबरचे एक गृहस्थ म्हणाले, "हे मंदिर प्रभूंचे असले तरी त्यात महारा-मुसलमानांसकट सर्वांना मुक्तद्वार आहे." "गाव सुधारक आहे." मी मनात म्हटले. अंथरुणे पसरली होती त्यावर आम्ही आडवे झालो. झोपण्याच्यापूर्वीच्या गप्पा चालल्या होत्या. नाना टिपणीस मला सांगत होते, "'महाराष्ट्र नाटक मंडळी'ची स्थापना महाडात झाली हे आपल्याला माहीत असेलच."

"हो तर."

"ती स्थापना ह्याच मंदिरात झाली. हा सभामंडप त्या वेळचा नाही, पण जागा तीच आहे. इथेच त्या लोकांच्या शपथा झाल्या. यशवंतराव टिपणीस आणि माधवराव टिपणीस ह्यांची घरं ह्याच आळीत आहेत. दत्तोपंत देशपांड्यांचहीी इथेच आमच्या घरासमोरच आहे. आणि आमच्या शेजारी घर आहे ते, 'मनोरंजन' मासिकाचे कवी 'भालचंद्र', गणेश नारायण टिपणीस, यांचं. त्र्यंबकराव कारखानिसांचं इथून जवळच आहे."

रात्र वद्य पक्षातली होती. त्या सभामंडपात, त्या गवळीआळीत (खरे म्हणजे प्रभूआळीच होती ती) अंधार होता. पण नानांचे बोलणे जो जो मी ऐकू लागलो, तो तो ते देऊळ, ती आळी, ते महाड—किंबहुना माझ्या मनाचे क्षितिजच उजळत चाललेसे मला वाटू लागले.

महाडशी माझा संबंध आल्यापासून लोक मला साहजिकच विचारतात, "कसं आहे महाड ? कसं काय वाटलं ?" खरे खरे काय ते सांगितले तर महाडकरांना बरे वाटायचे नाही, आणि इतरांचे महाडासंबंधी चांगले मत व्हायचे नाही. आणि शिवाय ते 'खरे-खरे' खरेही असणार नाही. खरे म्हणजे महाडासंबंधी एका वाक्यात निःसंदिग्धपणे खरे सांगता येणार नाही. धीर धरून सांगायचेच म्हटले तर सांगावे लागेल .

महाड गाव फार प्राचीन आहे. शेजारची गांधार पाल्याची दोन हजार वर्षांपूर्वीची बौद्ध लेणीच सांगताहेत ते. शिवाय महाड इतिहासपावन आहे. रायगडाच्या शेजारी आहे. महाडच्या चवदार तळ्याने तर सामाजिक इतिहासच घडवला आहे. हे



२

चवदार तळे प्रसिद्ध, तसेच मोठे आणि सुंदरही आहे. तो महाडचा केवळ आरसा आहे. आणि त्यात पडणारे महाडचे प्रतिबिंब रमणीय आहे. तसे महाड आधुनिकही आहे. महाडातला मुख्य रस्ता काँक्रीटचा आहे. गावात वीज आहे. नळ आहेत. बहुतेक चांगल्या घरात सेप्टिक शौचकूप आहेत. गावात डास असले तरी रोगराई नाही. लोकांची वाणी शुद्ध आणि बोलणे प्रौढ आहे. गाव गजबजलेले आहे. जागते आहे एकंदरीत—पण महाड कोकणात आहे म्हणावे तर नारळीपोफळीच्या बागा नाहीत, आंबे, फणस, काजू, रातांबे नाहीत. सोडे प्रसिद्ध आहेत पण त्याचा आमच्यासारख्याना उपयोग नाही. कोकणात नाही म्हणावे तर आम्ही भूगोलात शिकल्याप्रमाणे घाट आणि समुद्र ह्याच्या मधल्या पट्टीत वसलेले आहे. खाडीकाठचे बंदर आहे. एकूण—पण—विशेष म्हणजे महाडची हवा अगदी वाईट आहे. दिवाळीपासून संक्रांतीपर्यंतचे दोनतीन महिने सोडले तर महाडात एकंदरीत उन्हाळाच असतो. एकसारखे घामाने अंग निथळत असते. कोकणातले लोक बाराही महिने नुसता पंचा नेसून का असतात ते महाडात राहिले म्हणजे कळते. अशा ह्या हवेत मनुष्य चिडचिडा होतो. त्याला सारखे आपल्याकडेच पाहावे लागते. स्वत:पुरते पाहण्याची आणि दुसऱ्याची पर्वा न करण्याची कोकणातल्या माणसात प्रवृत्ती दिसते ती ह्या हवेमुळेच असावी असे वाटू लागते. महाड समुद्रापासून तीस मैल आत म्हणून समुद्राच्या हवेचा ओला गारवा तिथे नाही. आणि समुद्रापासून फक्त अठराच फूट उंचीवर म्हणून उंच ठिकाणचा कोरडा गारवा नाही. सतत जो आहे तो ओला उष्मा. टर्किश बाथचा वाफारा. ही हवा नेचरोपॅथ्सना मात्र मनापासून आवडेल. त्यात पुन्हा चारी बाजूंनी डोंगराचा वेढा पडलेला. जणू वाऱ्याला यायला बुद्ध्या बंदी घातलेली. आणि एकदा का पावसाळा सुरू झाला म्हणजे एकसारखा पाऊस पडत असतो. सारखे गुदमरल्यासारखे होत असते. त्यातच पखांच्या मुंग्या, लहान-मोठे टोळ, जिऱ्यापासून जवसापर्यंतच्या आकाराचे बुळबुळीत शरीराचे किडे, पतंग, पाखरे, सारखी येऊ लागतात. रात्रीच्या वेळी त्यांचा दिव्याभोवती बुरूज उभा राहतो. दिव्याजवळ बसून काही लिहावे-वाचावे म्हटले तर ह्या नाकातोंडात शिरणाऱ्या, कपड्यात शिरून चावा घेणाऱ्या, किड्याचा उपद्रव होतो. लाब बसून लिहिता वाचता येत नाही. अशा ह्या परिस्थितीत महाडात राहून ज्यांनी ज्ञानसाधना आणि कलोपासना केली असेल त्याना मनोमन सहस्रशः वंदन करीत आणि महाडाला शिव्या देत पावसाळा काढावा लागतो. आणि प्रत्येक दिवशी 'कसे दिवस जातील ?' असा प्रश्न पडत असतो.

पण एकदा पावसाळा सुरू झाला म्हणजे महाड महाड राहत नाही. वर्षाऋतूचा आरंभ म्हणजेच महाडचा वर्षारंभ म्हणायला हरकत नाही. मे महिन्याच्या शेवटी-शेवटी केव्हातरी एखाद्या संध्याकाळी पावसाळा येणार ह्याची आगाऊ वर्दी येते. सोसाट्याचा वारा सुटतो, पालापाचोळा उडून सैरावैरा धावू लागतो, वाऱ्याच्या

भोवऱ्यात सापडून आभाळाला पोचू पाहतो आणि थकून पागून जातो. असे होता होता वाऱ्याचे वादळ होते. पिसाटल्यासारखे भरारते. घरावरची कौले, छपराचे पत्रे उडवून लावते. मेघाचा गडगडाट होतो, विजा तळपू लागतात आणि सपाटून पाऊस पडतो. पागोळ्या गळू लागतात, नाल्या वाहतात, डबकी साचतात, मुले अंगणात येऊन नाचतात, मोठी माणसे वरखाली इकडेतिकडे पाहू लागतात आणि तेवढ्यात पाऊस विसावतो. काही थोडे ढग मागे राहतात, एखाददुसरी सर सोडतात आणि दिसेनासे होतात. हुतूतूच्या खेळात बाकीचे गडी आपापल्या घरात परत गेल्यावर एखादाच मागे राहून कोणाला टाग मार, कोणाला टपली मार करतो आणि "तू तू तू" पुटपुटत माघारी जातो तसे.

मग हवा निवळते. सगळीकडे स्वच्छ होते. थोडे गारही वाटू लागते. असेच काही दिवस जातात.

मग दोनदोन चारचार लहानमोठे ढग येऊ लागतात. हळूहळू त्यांची संख्या आणि आकार वाढतात. मग त्यांच्यातला वेगळेपणा नाहीसा होतो. आणि मग एक दिवस सगळे आकाश ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत ढगांनी व्यापते. सगळे आभाळ म्हशीच्या पोटासारखे काळेजांभळे होते. जड-जड होत जाते. खाली-खाली उतरू लागते. पाऊस त्यात मावेनासा होतो. आणि तटतटलेल्या आचळातून पान्ह्याच्या चिळकांड्या उडाव्या तसा पाऊस कोसळू लागतो. तो नुसता खाली पडत नाही, तर वरून कोणी तरी दाबून फवारा मारावा तसा सहस्रधारांनी मारा करीत येतो. उघड्या अंगाने त्याच्या खाली उभे राहिले तर त्याच्या माराने 'नभ सडकवि द्रप्स—जशी कुणी सडकावी रेव' ह्याचा अनुभव येतो.

आणि असा पाऊस आला म्हणजे तो कधीकधी दहादहा बाराबारा तास कोसळत राहतो. त्यातच एखादी वेळ अशी येते की, नुसते ढग पाठवून, नद्यांना भेटीला बोलावून समुद्राचे समाधान होत नाही. तो स्वतः त्यांना भेटायला सरसावून येतो. त्या त्याला भेटायला अधिऱ्या आवेगाने निघालेल्या असतातच. मग समुद्राची आणि सावित्री-गांधारीची सगमावर भेट होते. ती त्यांची मिठी सुटायला पाचसात तास तरी ल.गतात. त्या अवधीत नद्यांचा फुगलेला आणि फुगत चाललेला देह गाव व्यापीत असतो. कधी गायमुख ओलांडून तर कधी गायमुख फोडून पाणी गावाकडे येऊ लागते. इथे घाव पडला, तिकडे घाव पडला असे लोक बोलू लागतात तो पाणी चढतच असते. चढता चढता ते पेठेतल्या घराच्या वळचणीला लागणार की काय, आणि पुढे वळचणीचे पाणी आढ्याला चढण्याचा विपरीत प्रकारही पाहायला मिळणार की काय, अशी धास्ती वाटू लागते. जुन्या पोस्टापासून पिंपळपारापर्यंत सगळे जलमय झालेले असते. पेठेतून होड्या चालू लागतात. लहान मुले उड्या टाकून डुबू-पोहू लागतात. पोक्त माणसे त्यांना आवरीत, सावध करीत त्यांची गंमत पाहत असतात.

कमरेपर्यंत, छातीपर्यंत चढलेल्या, वेगाने वाहणाऱ्या, त्या प्रवाहात घुसण्याची, त्याचा आवेग अंगावर घेण्याची इच्छा अगदी अनावर असते. आपले शिकलेले सावध मन म्हणते, "पाय घसरेल, पडशील. हे पाणी घाणेरडं आहे—त्यात जीवजंतू असतील. पाय नको टाकू त्यात." पण आपल्या सुधारलेल्या सुसंस्कृत रक्तातच कुठे तरी, इतिहासपूर्व कालातल्या, माणूस नुकताच माणूस झाला त्या कालातल्या, रक्ताच्या पेशी असतात. त्या आपल्याला म्हणतात, "चल, घूस आत. हायजीनिक-अनहायजीनिक ह्याचा कसला विचार करतोस? तू त्याच्या पलीकडे आहेस. इतर चार पंचमहाभूताचा तुझा नित्य संबंध आहे. पाण्याचा संबंध मात्र पिण्यापुरता आणि स्नानापुरताच काय तो येतो. त्याची मिठी घेण्याची ही संधी आहे. हो पुढे."

मग आपण त्यात शिरतो. पाणी गुडघ्यापर्यंत आले, कमरेपर्यंत आले, छातीपर्यंत आले ..पाय सुटतातसे वाटू लागते. चालताना सगळे अंग रेटावे लागते, खूप जोर करावा लागतो. वेग फार आहे. प्रवाहाबरोबर वाहून जाणे, त्याला आडवे जाणे, त्याच्या विरुद्ध जाणे म्हणजे काय ते सर्वांगाला जाणवू लागते. प्रवाहाचा चारी बाजूनी विळखा बसतो. 'लेऑकूअन'ची आठवण होते. पण आपण विव्हळत नाही. उलट आपल्याला अधिक जोर येतो. आता आपण महाडातल्या काँक्रीटच्या रस्त्यावर असतो आणि नसतोही. आपल्याला पाण्याखेरीज कशाचीही जाणीव राहत नाही. ते पाणी आणि ज्या रक्ताने आपल्याला त्या पाण्यात लोटले ते रक्त आपल्याला इतिहास-पूर्व कालात घेऊन जाते तिथे आपण वाऱ्यावादळाशी, प्रलयाच्या पुराशी झगडत असतो आणि त्याच वेळी काँक्रीटचा रस्ता चाचपीत चाचपीत, एकएक पाऊल पुढे सरकवीत आपल्या स्थलकालात येत असतो. त्याला लागली असतील पंधरावीस मिनिटे. पण तेवढ्या वेळात आपण सहस्रावधी वर्षांचा प्रवास करून आलेले असतो. आणि खरेच करून आलेले असलो तर थोडेसे बदललेलेही असतो.

ह्या पाण्याला महाडकर 'उथव' म्हणतात. ह्यात पाणी नुसते भरते. पुरासारखे लोटत नाही. त्यामुळे गावाची, मालमत्तेची, नासधूस होत नाही. महाडकर उथवाला सरावले आहेत. (न सरावून करतील काय म्हणा!) पाणी भरणार असे वाटू लागले की, घरातल्या, दुकानातल्या, सामानाची हलवाहलव होऊ लागते. महाडाच्या पेठेतल्या दुकानातले ते दोनदोन तीनतीन फूट उंचीचे, एकावर एक पायरीसारखे गेलेले ओटे पाहून बाहेरच्या माणसाला अचंबा वाटतो. अशी काय ही चढती रचना! पण हे सगळे उथवासाठी असते. पाणी चढेल तसे सामान वरवर चढवले जाते (आणि माणसेही) आणि उतरले की पुन्हा खाली येते. पण मग जमिनीला ओल आलेला असतो. मग चालणे-बसणे फळ्यावर, खोक्यांवर.

वर्षातून दोनचार वेळा तरी हा प्रकार होतो. आणि एकदाच जरी झाला तरी दर वर्षी नियमाने होणार. मग ह्या लोकांनी इथे घरे का बांधली? दुकाने का मांडली? आणि पिढ्यान पिढ्या हे असेच का चालू ठेवले? असा प्रश्न आपण

विचारतो आणि उत्तर शोधतो. महाडकर प्रश्नही विचारीत नाहीत आणि कोणी विचारलाच तर म्हणतात, "हे असच आहे. आम्हाला सवय आहे त्याची." बस. हे उत्तर.

पावसाळ्यात गावात हे असे चाललेले असते त्या वेळात महाडच्या परिसराचे सगळे रूप बदललेले असते. तांबुसपिवळे डोंगर हिरवेगर्द झालेले असतात त्यावरून जिकडेतिकडे लहानमोठे दूधसागर आणि गिरसाप्पा उतरत-कोसळत असतात. चाभारखिंडीकडल्या डोंगरावरून दोन मोठे धबधबे पडत असतात. पाऊस असेल त्या मानाने ते फोफावतात किंवा रोडावतात. पण ओघळत म्हणा, कोसळत म्हणा, पावसाळाभर ते असतात. शेते-झाडे पावसाचे पाणी पी-पिऊन आणि जमिनीतला रस शोषून काळी झालेली असतात आणि ढगासारखीच जीवनरसाने जणू ओथंबून जातात. शेतात पाणी साचून त्याचे आरसे झालेले असतात. आणि त्यात जातायेता ढग आणि पक्षी, चंद्र आणि सूर्य, तारका आणि नक्षत्रे आपली रुपडी पाहत असतात. सगळ्या मोकळ्या जागा हिरव्याहिरव्या गवताने आणि सखल जागा निळ्या पाण्याने धरलेल्या असतात. वाट सापडेल तिथे पाणी धावत असते आणि धावताना खळखळत असते. लहान मुलाच्या निर्मळ हसण्यासारखे महाड कसे आहे हे कोणाला पाहायचे असेल तर त्याने ह्या दिवसांत यावे. आणि आठवणीतून ओसंडतील इतकी दृश्ये साठवून घ्यावी!

सगळीकडे पसरलेल्या हिरव्यात असंख्य वेगवेगळ्या छटा असल्या तरी त्यात एक प्रकारचा तोचतोपणा असतोच. त्याची जाणीव होऊ लागते तोच झाडाझुडपांना फुले येऊ लागतात.

पारिजातावर मोती-पोवळ्याच्या राशी चढतात. हिरव्या-काळ्या मर्दानी सागाच्या माथ्यावर डौलदार शुभ्र तुरे डुलू लागतात. शेवग्यावर फुलाचे पांढरे घोस ओळंबू लागतात. कदंबांच्या फांद्यांना पालवीच्या चोची फुटल्या होत्या त्यांचे मोठे पंख होतात आणि हळूहळू त्यातून आधी 'निगूढ' आणि कालांतराने 'प्रकट' गेंद दिसू लागतात. त्यांचे ते सतेज पण फिकट पिवळेपण अधिक वेधक की त्याचा मखमली स्पर्श अधिक सुखावह असा पाहताना संभ्रम पडतो.

दृष्टिरेषेच्या वरच्या बाजूला ही अशी रंगाची विविधता उठून दिसू लागते त्याच वेळी जमिनीच्या अधिक जवळ झेंडूवर एकपदरी, अनेकपदरी गोंडे फुलू लागतात. पाढरा-जांभळा-तांबडा तेरडा पाकळ्या विखरू लागतो, आणि रानझुडपावर रंगीबेरंगी टिकल्या उमटू लागतात.

पावसामागोमाग महाडात नानाप्रकारचे पक्षी येतात आणि ते आल्याखेरीज वसंतापासून येऊन राहिलेले कोकिळ जात नाहीत. पाचूसारख्या हिरवळीवर, इंद्रनीला-सारख्या पाण्यावर, आणि म्हशींच्या काळ्याशार पाठींवर अलगद बस-ऊठ करणारे शुभ्र-शुभ्र बगळे आधी दिसू लागतात. त्यांच्या मागोमाग रात्रीच्या वेळी पाणथळ

जागी किर्र-किर् करणारे आणि झुडपा-कुंपणाच्या आडोशाला लपणारे पाणकोंबडे येतात. कोकिळाचे गाणे, जाणेयेणे, मंदावत जाते तसे बुलबुल येऊ लागतात त्यांच्या सोबतीने आणि त्यांच्या मागोमाग आणखीही पक्षी येत असतात. किती आकाराचे, किती प्रकाराचे, किती विविध रंगाचे ! मुठीत मावतीलशा हिरव्या-पिवळ्या, निळ्या-जांभळ्या, तांबुस-तपकिरी चिमण्यापासून तो भल्यामोठ्या भारद्वाजापर्यंत. आणि त्यांचे ओरडणेदेखील कानाला हळुवार स्पर्श करणाऱ्या शिळेपासून तो अंतःकरणाचा भेद करणाऱ्या भुभुःकारांपर्यंत विविध महाड कसे आहे हे आताही येऊन पाहावे.

पावसाळा ओसरून घटस्थापनेचे दिवस जवळ येत चालले की महाडात जी अनेक तळी आहेत त्यांत तांबडी-पांढरी कमळे झळाळू लागतात. ओसाडीतल्या रान-भेंड्यांवर फिकट पिवळे, गाभ्यात जांभळे, नाजुक पेले उभे राहतात. रानवेलींना पांढरी-जांभळी-पिवळी फुले येतात. घटस्थापनेपासून नऊ दिवस अंगण-ओटी सारवून मुली त्यावर रंगीबेरंगी फुलांची सुंदर रचना करून रानची शोभा घरात आणतात.

शेते पिकायला सुरवात झाली म्हणजे हळवी आधी पिकतात. तेव्हा शेतजमिनीवर हिरवे-पिवळे गालिचे पसरल्यासारखे दिसतात. भाते कापली गेली की शेते उघडी पडतात. त्यात मग दुसऱ्याच वनस्पती उगवतात आणि शेते पुन्हा हिरवी दिसू लागतात. त्यातच पुढे पिवळी, जांभळी, निळी, गुलाबी, अशी छोटी छोटी सुंदर नक्षीची वेगवेगळ्या आकाराची फुले फुलतात आणि शेताचा मळकटपणा झाकून टाकतात. ह्या फुलांचे आयुष्य संपते न संपते तोच रुपेरी-हिरव्या काटेरी झुडपावर नितळ पिवळा धोतरा फुलू लागतो. चोहीकडचे गवत वाळून त्याच्या पिवळ्या चोयट्या झाल्या आहेत, शेतातली काळपट माती उघडी पडली आहे हे माहीत असले तरी ही फुले तिकडे लक्ष जाऊ देत नाहीत. दृष्टी वर करून डोंगरांकडे पाहावे तर त्यांची अंगे तांबूस पडलेली असतात पण त्यावरच मधूनमधून पळसानी अंगभर भगवे शेले पांघरलेले असतात. सावरीवर लाल-किरमिजी फुलांचे पेले उभे असतात. पांगाऱ्यावर शेंदरी फण्या फुललेल्या असतात. आंब्याची झाडे पिवळट पांढऱ्या मोहोराने झाकलेली असतात. त्यातून मध झिरपत असतो आणि त्याचा तिखट जड गोड गंध रानोमाळ दाटून राहतो. आणि मधूनच आपण पुन्हा आलो असल्याची कोकिळ वर्दी देतात.

हळूहळू हवेत रूक्षता आणि उष्णता वाढू लागते. शेतातून आणि डोंगरांच्या अंगा-वरून भाजावळीच्या धुराचे लोट फिरू लागतात. तसे पिंपळ, सावर, साग, करजा वगैरेंना नवी पोपटी पालवी फुटून ती ताजीतवानी दिसू लागतात. डोंगरावरच्या झाडा-झुडपानाही हिरवी टवटवी येते. गुलमोहरावर तांबडा शिडकावा दिसू लागतो आणि बांबूच्या बेटातून कोवळी पोपटी कारजी उडू लागतात. अंगाची तलखी होत असते, पण डोळे निवत असतात.

उन्हाळा वाढत असतो, पण तसेच तो संपण्याचे दिवस जवळ येत असतात. पावसाळा संपल्याबरोबर वडार, कुंभार, बुरूड, लोहार ह्यांचे जथ्थे घाटावरून

गाढवासकट आलेले असतात. गावाजवळ मोकळ्या जागेतून त्यांची पाले पडलेली असतात. त्यांचा कलकलाट आणि त्यांच्या गाढवांचे खिंकाळणे रात्रंदिवस—रात्री विशेष—चाललेले असते. धनगरांनी आणलेल्या मेंढ्या शेतातून बसत-उठत असतात. हे सगळे आता कमी होऊ लागते. अक्षय्य तृतीया झाली की हे भटक्ये परत वाटावर जाऊ लागतात.

उन्हाळा वाढतच असतो. पुन्हा ढगांची ये-जा होऊ लागते आणि मे महिन्या-तल्या एखाद्या संध्याकाळी, मागून येणाऱ्या पावसाची वर्दी द्यायला वळीव येतो आणि ऋतुचक्राचा एक फेरा पुरा होतो.

महाड हे असे आहे.

मी महाडात आलो तेव्हा महाडाची माहिती देताना एक गृहस्थ मला म्हणाले, "आमच्या महाडावर पुण्याची छाप दिसेल तुम्हाला. महाडकरांचं बोलणं तुम्हाला रत्नागिरीकरासारखं किंवा मुंबईकरासारखं वाटणार नाही. ते पुणेरी वाटेल." ते खरेच दिसते. इतिहासकाळात महाडचे राजकारण हा पुण्याच्या राजकारणाचाच भाग होता. नाना फडणिसाने आपले महाडचे राजकारण आपल्या वाड्यातच केले असेल तर त्याचा साक्षी तो वाडा अजून महाडात उभा आहे. आणि दुसरा बाजीराव वसईला जाता जाता आला तो महाडालाच. शिवाजीराजांनी दुरुस्त केलेल्या कोटाचे काही भाग महाडात अजून आहेत. ज्या वीरेश्वराला, जाखमातेला आणि शाह वहिरी पीराला पेशवे सरकाराकडून वार्षिक नेमणुकी होत्या ती देवळे आणि तो दर्गा अजून महाडात आहेत आणि भक्तांची भाविकता पोसताहेत. ब्रिटिश अमलातसुद्धा प्रि० भाटे, प्रो० टिपणीस, शिवरामपंत परांजपे, ना० भास्करराव जाधव हे शिकायला पुण्याला गेले, मुंबईला नाही, आणि महाडात कॉलेज होईपर्यंत महाडचे लोक मुलांना कॉलेजात शिकायला पाठवायचे तर शक्य तो पुण्याला पाठवीत. त्यामुळेच महाडकरांच्या मनाची घडण पुणेकरांच्यासारखी झाली असावी हे स्वाभाविक आहे. तोच चिकित्सक-पणा, चोखंदळपणा, कसून पारख केल्याखेरीज पसंतीचा शिक्का न मारण्याची प्रवृत्ती, तेच बोलण्याचे चातुर्य आणि वादपटुत्व. इतर ठिकाणचे लोक म्हणतात, "महाडात भांडणं फार." हेही पुण्यासारखेच आहे. पुण्यात माणसा-माणसागणिक पुढारी तसे महाडात माणसागणिक मत आहे. आणि मताबद्दल पिळदार आग्रह आहे. आणि आग्रह आहे म्हणून भांडणे आहेत. पण म्हणूनच महाडाने मते बाजूला ठेवून मोठी कामे उठावाने केली, आणि म्हणूनच महाडाने महाराष्ट्राला कर्तबगार माणसे दिली. महाडकर हे महाडकर आहेत म्हणूनच चवदार तळ्याच्या सत्या-ग्रहाच्या वेळी स्पृश्यांनी अस्पृश्यावर हात उचलला, आणि त्यांनीच चंग बांधून तेच हात एकत्र आणून अस्पृश्यांच्या उद्धारकर्त्याचे स्मारक महाडात उभे केले. नुसत्या निश्चयाच्या बळावर संस्था उभी करणे हासुद्धा पुणेरी बाण्याचाच एक प्रकार आहे.

महाडात रूपाचे देखणेपण गावातून सहज एक फेरी मारली तरी नजरेत ठसेल असे आहे. म्हणूनच मला वाटते, महाडला चित्रकारांची आणि मूर्तिकारांची परंपरा लाभली आहे. रेखीव भुवया, तरतरीत नाक, पाणीदार डोळे, बाटदार चेहरा, आणि मध्यम पण प्रमाणशीर बांधा—कुणब्यापासून ब्राह्मणापर्यंत मुसलमानांसुद्धा सर्वत्र—दृष्टीस पडतो. हे मी पुरुषापुरते बोलतो आहे. इतराबद्दल बोलायचे—लक्ष्मणाने पर्णकुटीबाहेर सीतेसाठी जशी एक रेघ ओढली होती, तशी त्याने आपल्या मनाच्या उंबरठ्याबाहेरही ओढली होती, म्हणूनच त्याने सीतेच्या पावलांच्यावर दृष्टी उचलली नाही. तशीच रेघ त्याने सगळ्या सभ्य माणसाच्या मनाच्या उंबरठ्याबाहेरही ओढून ठेवली आहे. म्हणून इतराच्या रूपाबद्दल काही बोलता येत नाही. आणि तसे बोलण्याची आवश्यकताही नाही, नाही का?

कसे वाटले महाड?—काय उत्तर द्यायचे ह्या प्रश्नाचे? आणि तेही एका वाक्यात!

# महाबळेश्वर :
# भिजरे आणि हसरे

मे महिन्याचा शेवट जवळ येऊ लागला की, कोकणातून खोऱ्यांच्या वाटानी डोंगराच्या अंगावरून लहान-मोठे, विरळ-दाट, पांढरे, करडे, काळे ढग काही हत्तीसारखे, काही अजगरासारखे, काही नुसतेच कापसाच्या ढिगासारखे सरारून वर येऊ लागतात. मागून जी पावसाळी ढगाची स्वारी व्हायची असते तिचे ते निशाणीचे हत्ती असतात. उन्हाळ्याचे दिवस मजेत घालवण्यासाठी महाबळेश्वरला आलेल्या शौकीनांना ते इशारा देतात की, "आता तुम्ही गाशा गुंडाळा. ह्यापुढं इथं आमचं राज्य होणार आहे. चला, घाई करा." आणि सगळे शौकीन लोक बिचारे खरोखरच घाईघाईने हॉटेल, हॉलिडे कँपच्या खोल्या रिकाम्या करायला लागतात. तंबू-राहुट्या गुंडाळू लागतात आणि मग त्यांच्या मागोमाग घराची, दुकानांची खिडक्या-दारे बंद होऊ लागतात आणि गजबजलेले महाबळेश्वर सुने-सुने होते, ओकेबोके दिसू लागते.

उन्हाळ्याचे आठवडा-दोन आठवडे, महिना-दोन महिने घालवण्यासाठी म्हणून जे महाबळेश्वरला जातात, त्यांचे सगळे दिवस आज या पॉइंटवर आणि उद्या त्या पॉइंटवर जाण्यात, महाबळेश्वरचे पाणी जड असे कोणीतरी सांगितलेले असते म्हणून सकाळी उठून पायपीट करण्यात, फॅशनेबल, नेहमीपेक्षा वेगळा, कमी-अधिक भडक, पोषाख करून बाजारपेठेतून फेऱ्या मारीत इतर स्त्रीपुरुषांकडे पाहण्यात किंवा त्यांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यात, नाहीतर काठ्या, सांबराच्या चामड्याचे (म्हणून सांगितलेले) बूट-जोडे किंवा असेच काहीबाही खरेदी करण्याचे बहाणे करण्यात जातात आणि असे करता करता मुक्काम केव्हा संपतो ते त्यांना कळतही नाही. आणि 'महाबळेश्वर' पाहायचे राहूनच जाते.

त्यांनी पावसाळ्यात महाबळेश्वराला जावे. त्यांना एक वेगळेच महाबळेश्वर दिसेल. एकदा पावसाला तोंड लागले आणि ढगाचे आक्रमण सुरू झाले की ते दऱ्याखोरी, जंगले, पठारे, इतकेच काय घराची अंगणे आणि घरेसुद्धा व्यापून टाकतात. सगळीकडे अंधारल्यासारखे होते. कधी पाऊस कोसळतो, कधी बुरबुरतो, कधी आभाळाच्या चाळणीतून चाळून पडल्यासारखा हेलकावत, थरथरत उतरतो. कधी पाऊस पडतच नाही, तरी अंग ओलेचिंब होते. कारण ढग वरून कोसळत नसतात. आपणच

ढगांच्या पोटात वावरत असतो. आणि ढगाच्या वाफेचे पाणी कपड्यात घुसून आपल्या रोमरोमात शिरत असते. "सविता पुरस्तात्। सविता पश्चात्तात्। सवितोत्तरात्तात्॥ सविताधरात्तात्।" ह्याचा प्रत्यय कुणाला येवो न येवो, पण पुढे ढग, मागे ढग, वर ढग, खाली ढग असे सर्वतः ढगच ढग असतात. किंबहुना ढगांचा असा अनेकवचनी उल्लेख करणेच चुकीचे होईल. कारण खरोखर सगळा मिळून एकच ढग असतो. आणि तो एकच "स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठत्" असा साक्षात् प्रत्यय देतो. बाहेरून मजेसाठी आलेली माणसे तर त्या वेळीं महाबळेश्वरात नसतातच, पण गावातलीही कोणी बाहेर हिंडत-फिरत नाहीत. दुकानाचे मालक घरात असले तरी श्वासोच्छ्वासापुरती दारे उघडी ठेवून अंगाभोवती जाड पांघरुणे लपेटून शेजारी शेगड्या घेऊन बसलेली असतात. माणसे तर अंगाभोवती जाडजूड पांघरुणे लपेटून घेऊन बसतातच, पण पावसापासून आपला बचाव व्हावा म्हणून घरे-बंगलेही आपल्या डोक्यावरून आणि अंगाभोवती कारवीच्या किंवा तशाच दुसऱ्या काड्यांचे, वीत-वीत जाडीच्या चटयांचे लेप लपेटून बसलेले असतात. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात माना वर करून, डोळे उघडून, सगळ्या जगाकडे ऐटीने पाहणारी घरे पावसाळ्यात माना खाली घालून, डोळे मिटून घेऊन, मुकाट बसलेली पाहून त्याची दया येते. त्यातून त्याच्या अंगाखांद्यावरून, डोक्यावरून पाऊस कोसळत ओघळत, ठिबकत असतो. त्यामुळे तर त्याच्याबद्दल अधिकच वाईट वाटते. वाटते, ती टिपे गाळताहेत की काय? रस्त्यांच्या कडेकडेने, कंपाउंडाच्या भिंतीवर उगवलेले शेवाळ केसाळ पांघरुणासारखे दिसते. तेच शेवाळ मोठमोठ्या झाडांच्या बुंध्या-फांद्यावर म्हाताऱ्या माणसाच्या दंडा-मांड्याची सैल कातडी लोंबावी तसे दिसते. सगळे कसे जड, काळवंडलेले असते. त्यामुळे भर पावसाळ्यातले महाबळेश्वर दबलेले, भारावलेले, गारठलेले, रडवेले, म्हातारे वाटते. उन्हाळ्यातले त्याचे सगळे चैतन्य, सगळी टवटवी, सगळी प्रसन्नता ढगा-पावसाने गिळंकृत करून टाकलेली असते. त्यामुळे उन्हाळ्यात मौजेसाठी येणारा माणूस पुन्हा पावसाळ्यात महाबळेश्वरला आला तर त्याला ते ओळखूही येणार नाही. आणि तेच का हे असा त्याला प्रश्न पडेल.

पण हेही उदास, जड, ढगाच्या भाराने दबलेले, पावसाच्या पाण्याने जड झालेले त्याचे रूप पाहण्यासारखे आहे. किंबहुना उन्हाळ्यातल्यापेक्षा त्याचे हे रूप मनावर अधिक खोल ठसा उठवते. ह्या वेळी महाबळेश्वर पाहणाऱ्याचे लक्ष विचलित करणारे दुसरे तिथे काहीही नसते. ह्या दिवसात आधी बाजारच नसतो. मग तिथे फॅशनेबल पोषाख करून हिंडणारे स्त्री-पुरुष कुठले? पाचदहा फुटावरचेसुद्धा काही दिसत नसल्यामुळे रस्त्याने लागणारे प्रत्येक वळण हे नवे वेगळे वळण आणि प्रत्येक झाड हे नवे वेगळे झाड वाटते. इतकेच काय पण ओळखीचा माणूससुद्धा नवा वाटतो. कारण अगदी जवळ येईपर्यंत माणूस ओळखूच येत नाही. कुठल्याही पॉइंटवर जाऊन उपयोग नसतो. कारण त्या वेळी मुळी महाबळेश्वराला पॉइंट्सच नसतात. आणि

पॉइंट्सवरून पाहायला खोरी नसतात. पॉइंट सोडाच, पण एखाद्या उंचवट्याच्या नुसत्या कडेला गेलो तरी तिथे एकटे आपण आणि आपल्या मागे-पुढे, खाली-वर नुसते ढग असतात

आसमंताचे हे रूप भीषण नसते किंवा करालही नसते. पण गुदमरून टाकणारे, एकाकी वाटायला लावणारे असते. आणि त्या एकटेपणाचीच एक गूढ भीती वाटू लागते. मनात विचार येतो, उन्हाळ्यात जरी महाबळेश्वरावर माणसाची सत्ता दिसत असली तरी त्याच्यावर खरी सत्ता निसर्गाचीच आहे. महाबळेश्वराच्या नखाएवढ्या भागाची मोडतोड करून, त्यावर घरे-रस्ते बांधून माणसाने त्याचे एवढेसे रूप कालपरवा बदलले. पण हे डोंगर उभे राहिले तेव्हापासून आजपावेतो दर पावसाळ्यात दिसत आलेल्या महाबळेश्वराच्या ह्या रूपावर काही माणसाची सत्ता चालली नाही.

पण पावसाळ्याचेच महाबळेश्वराचे दुसरे रूप आहे ते प्रसन्न आहे. हसरे उत्फुल्ल आहे, आणि उत्फुल्ल करणारे आहे. ते पाहण्यासाठी महाबळेश्वराचे पठार सोडून पूर्वेला पसरणीकडे किंवा पश्चिमेला पारघाटाकडे जायला हवे. वेण्या तलाव मागे टाकून पाचगणीच्या वाटेला लागले की, बोगद्यातून उघड्यावर आल्यासारखे वाटते. दडपणातून मोकळे झाल्यासारखे वाटते. एकीकडे कृष्णेचे आणि दुसरीकडे वेण्णेचे अशा दोन खोऱ्यामधून गेलेल्या माळाच्या पट्टयावरून जाताना दोन्ही बाजूंना मोकळी मैदाने दिसतात. त्यावर चमकदार हिरवळ उगवलेली असते. दोहो बाजूला जिकडे तिकडे गुडघ्याएवढ्या उंचीची तवकिलीची झाडे, आणि त्यांच्या टोकाशी धोतऱ्याच्या फुलासारखी लांबट पण थोडीशी वेढब, फिकट गुलाबी छटेची, फुले दिसू लागतात. त्यातूनच फर्लांगच्या फर्लांग टणटणीच्या पिवळ्या केशरी फुलांचा तीव्र सुगंध दरवळलेला असतो. मधून पाण्याच्या लहान-मोठ्या आरशांत आभाळाची करडी-रुपेरी प्रतिबिंबे दिसतात. ती पाहत पाहत पाचगणीच्या झाडीतून बाहेर पडून पसरणीच्या घाटाच्या माथ्यावर आले की, डावीकडे खाली कृष्णेचे विस्तीर्ण खोरे आणि त्यातले भाताच्या शेताचे हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटांचे लहान-मोठे लांबट चौकोन जणू आपल्या स्वागतासाठी मखमली पायघड्या पसरल्यासारखे दिसतात. आणि महाबळेश्वराची ती कोंडमारा करणारी ओली-जड सृष्टी पार विसरून जातो आपण.

पण महाबळेश्वराच्या पश्चिमेकडच्या रडतोंडीच्या घाटाच्या वाटेने खाली उतरू लागले म्हणजे जो देखावा दिसतो तो पूर्वेकडल्या देखाव्यापेक्षा अगदी वेगळा असतो. इकडच्या बाजूला प्रचंड खोरी, मोठमोठे उंच उभे कडे आणि अनेक नागमोडी वळणे आहेत. त्यामुळे वळणावळणाला वेगळा देखावा दिसतो. प्रसन्नता आणि भीषणता ह्यांचा आलटून पालटून अनुभव येतो. शिवाय पावसाळ्याचा आरंभ, भर आणि उतार ह्या अवस्थांमधले सृष्टीचे बदलणारे रूपही इथे जास्त स्पष्टपणे जाणवते. खोऱ्यातून चढून ढग वरवर येऊ लागून पावसाळ्याला आरंभ झाला की, डोंगराच्या

अंगावरची उन्हाळ्याची तांबूस-पिंगट छटा जाऊन ते हिरवे दिसू लागतात. गवताची पाती जमिनीतून, कपारीतून, खडकांमधल्या फटींतून वर येऊन झपाट्याने तरारून उठतात. पुन्हा मेलेल्या वेली जिवंत होऊन आपले बाहू लांब पसरून खडकांना, झाडांना, मुळांना, मिळेल त्या आधाराला विळखे घालू लागतात झाडांची पालवी दाट आणि गर्द हिरवी होऊ लागते. इतकी की, पावसाळ्याला भर येतो तशी खोऱ्यातली झाडे जडकाळी दिसू लागतात. पालवी जणू पाणी पिऊन आतून ओथंबून जाते. वाटेच्या दोन्ही बाजूला जांभळी, पिवळी, पांढरी, गुलाबी फुले फुलू लागतात आणि हिरव्या काळ्या, तांबड्या पार्श्वभूमीवर उठून दिसू लागतात.

पाऊस वाढला की, वाटांत कड्यावरून धबधबे कोसळू लागतात. वरची माती वाहून आणणारे त्यांचे पाणी आरंभी भगवे-नारिंगी असते. ते पुढे पुढे निवळून पांढरे स्वच्छ होते. धबधब्याशेजारच्या काळ्या खडकावर जांभळी, पांढरी फुले हळू हळू दिसू लागतात आणि पाहता पाहता त्यांचे ताटवेच्या ताटवे पसरतात. भोवताली हिरवेगार रान आणि झाडे-वेली, मागे काळ्या खडकाचा कडा. त्याच्या समोर रुपेरी रसाचा धोधाटा आणि त्याच्या आत-बाहेर आजूबाजूला खाली-वर, जणू काय आपल्यासाठीच तो कोसळतो आहे अशा भावाने त्याच्याकडे डोकावून पाहणारी, वळून पाहणारी, माना वर करून पाहणारी हजारोहजार जांभळी झळाळणारी तेजस्वी फुले! पांढरी, परस्परविरोधी रंगांची ती अद्भुत चित्रसंगती त्याच्याकडे वळलेली दृष्टी खिळवूनच ठेवते आणि आपण पुढे जाऊ लागलो तर पुन्हा पुन्हा मागे खेचून घेते. आणि असे एक-दोन नाही तर अनेक धबधबे ह्या वाटेने लागतात.

पावसाळ्याचा भर असतो तोवर हे दृश्य असेच असते. पावसाळा ओसरू लागला की धबधबे रोडावतात. त्यांची रुपेरी धार क्षीण होत जाते. तिच्या कोसळण्यात आकर्षकता असली तरी पूर्वीचा आवेग राहिलेला नसतो. आणि मग भर पावसात त्यांची सोबत करणारी ती फुलेही कमी कमी होऊ लागतात. गवताचे पुंज पिवळे पडू लागतात. वेली काळवडतात. डोंगरांची वर आलेली उघडी अंगे हळूहळू पिंगट-तांबूस दिसू लागतात. पण सौंदर्याला लागू पाहणाऱ्या ओहोटीची भरपाई करण्यासाठीच की काय, जांभळ्या, पांढऱ्या फुलांची जागा रंगीबेरंगी तेरड्याची फुले घेतात. आणि ठिकठिकाणी नवीनच पिवळ्या फुलांच्या चादरी पसरू लागतात. आणि पावसाळा संपल्यावरदेखील कितीतरी दिवसपर्यंत पांढरी, जांभळी, पिवळी फुले डोंगराच्या उतारावर, कडे-कपारींवर, रस्त्याच्या कडेला हसत-डुलत असतात. डोंगराच्या उतरणींवर वऱ्याच्या शेतांत ताटांची माथी आपल्याच बीजभाराने वेलांटीसारखी वळलेली असतात. आणि सगळ्या शेतांत वळलेल्या मुठींच्या वेतांच्या छड्या उभ्या आहेत असे वाटते. पण आता थंडी येऊ म्हणू लागते. आणि महाबळेश्वरावर पुन्हा माणसांची वर्दळ सुरू होणार असते. प्रचंड पाऊस आपल्या बरोबर आणलेले वैभव मागे ठेवून जातो आणि ते उपभोगण्यासाठी माणसे येणार असतात.

महाबळेश्वराचा पावसाळा पाहायला शौकीन लोक तिथे जात नाहीत हे खरे आहे. पण ज्या पावसाळ्यामुळे महाबळेश्वराला त्याचे अवर्णनीय सृष्टिवैभव लाभलेले असते त्याच्याबद्दल कृतज्ञता म्हणून राहो, पण निदान जिज्ञासा म्हणून तरी त्यांनी महाबळेश्वराला पावसाळ्यात ओझरती भेट दिली तर महाबळेश्वराचे आणि त्याच्या परिसराचे एक वेगळेच आणि अविस्मरणीय दर्शन त्यांना होईल. इतकेच नाही तर पुन्हा जेव्हा ते नेहमीप्रमाणे उन्हाळ्यात महाबळेश्वराला जातील तेव्हासुद्धा त्याना महाबळेश्वर नेहमीपेक्षा वेगळे वाटेल.

# मेघमेदुर
## दिल्ली

"दिल्ली दूर अस्त" म्हणायची आता सोय राहिली नाही. कारण दिल्लीला आता दोन-अडीच तासात जाता येते आणि शेकडो लोक जात-येत असतात. त्यामुळेच दिल्लीबद्दल आता कौतुकही राहिले नाही आणि दिल्लीबद्दल कौतुकाने काही सांगण्यासारखेही राहिले नाही. खरे असेल. पण जो दिल्लीत काही वर्षे राहिला असेल, आणि वेगवेगळ्या ऋतूतली तिची उग्र-सौम्य, चचल-गंभीर, सुदर-असुदर रूपे ज्याने पाहिली असतील, त्याच्या रक्तात दिल्ली भिनूनच जाते. जिचा कधी राग येतो पण एरव्ही लोभ वाटतो, जी कधी नकोशी होते पण हवीशी वाटते तेव्हा खूपच हवीशी वाटते, अशा प्रेयसीच्या आठवणीसारखी दिल्लीची आठवण मनात घर करून राहते.

कुणालाही दिल्लीच्या हवामानाबद्दल विचारा. तिच्या आग ओकणाऱ्या उन्हाळ्या-बद्दल आणि अंगाचा चावा घेत हाडांपर्यंत शिरणाऱ्या थंडीबद्दल ते बोलतील. पण दिल्लीच्या पावसाळ्याबद्दल बोलणार नाहीत. जणू दिल्लीला पावसाळा नसतोच. मे-जून महिन्यात दिल्लीत उन्हाळ्याचा कहर असतो हे खरे आहे. आभाळातून आगीचा वर्षाव होत असतो. सगळे अंग भाजून निघत असते. वारा आला तरी भट्टीतून आल्यासारखा येतो. कधी 'आंधी' आली तर दाही दिशांत धूळ भरते. आणि आपण हवेचा नाही, तर धुळीचा श्वासोच्छ्वास करू लागतो. ती धूळ अंगाला चिकटून झोंबत असते, चरचरत असते, आपण शिव्या देत असतो आणि आग वर्षतच असते.

पण असे होताहोताच आभाळात धुळीची जागा ढग घेऊ लागतात. लहान-मोठ्या ढगांचे लोट येऊ लागतात. गडगडाट, चमचमाट होतो. आणि पहिल्या पावसाच्या सरी येतात. उन्हाळा मागे पडतो आणि हवेत हळूहळू गारवा येऊ लागतो. पावसाळा आला आणि स्थिरावला की आठ-आठ दिवस सूर्याचे दर्शन होत नाही. कधी सडसडून तास-दोन तास पाऊस कोसळतो. नाल्या, पन्हळे वाहू लागतात. पाणी साचू लागते. मुले त्यात नाचू लागतात. तर दिवसचे दिवस वातावरण गार धुद असते. चाळणीतून चाळलेले पीठ पडावे तसा हलके हलके, हेलकावत-हेलकावत कणाकणानी पाऊस खाली उतरत असतो. जणू आजी आभाळात

जे पीठ दळीत असते ते खाली पडत असते. लोक म्हणतात, 'इंग्लिश वेदर' आहे

पावसाळ्याला भर आला म्हणजे आकाश काळ्या-जांभळ्या ढगांनी व्यापलेले असते. जिकडे तिकडे गवते-वेली-झुडपे उगवलेली असतात. पाऊस पिऊन पाने तर्र झालेली असतात. सगळ्या सृष्टीला आणि वातावरणाला एक सुंदर सावळी कांती आलेली असते. 'मेघैर्मेदुरमम्बरम् वनभुवः श्यामाः' असे जयदेवाने पावसाळ्याचे वर्णन केले ते व्रजमंडळाचे. पण दिल्ली व्रजमंडळापासून फार लांब नाही. त्याने दिल्लीचा वर्षाऋतू पाहिला असता तर त्याचेही तसेच वर्णन केले असते. ह्या वातावरणाची मनावर एक प्रकारची धुंदी चढते. आणि स्त्रीपुरुषांच्या, मुलामुलींचा उत्साह उसळू लागतो. शहरा-खेड्यातून, अंगणातून-बागांतून, रस्त्याच्या कडेने झाडाच्या फांद्यांना दोर बांधून त्यावर मुलेमाणसे उचउंच झोके घेत असतात. गाणी गात असतात. उत्फुल्ल असतात. कारण सृष्टी उत्फुल्ल असते.

तेवढ्यात केव्हातरी यमुनेला पूर येतो. आणि येतो म्हणजे घरे-दारे, गुरे-ढोरे, छपरे-झोपड्या वाहून गेल्याच्या बातम्या घेऊनच येतो. पुरुष दोन पुरुष पाणी चढते. सगळीकडे हाहाःकार होतो. तरी पण पूर पाहावासा वाटतो. तसा तो यमुनेच्या काठावरून कुठूनही पाहता येईल. पण त्याचे भव्य-भीषण रूप डोळ्यात साठवायचे असले तर ओखल्याला जावे तिथे यमुनेला आडवा बांध घातला आहे. त्याच्या वरल्या अंगाला पाण्याचा तळ्यासारखा प्रशस्त विस्तार आहे. काठावर मोठी बाग आहे. आमराई आहे. पूर पाहायचा तर तिथे जाऊन पाहावा.

दिल्ली-मथुरा मार्ग सोडून ओखल्याकडे वळून चालू लागले की, पूर येऊन गेल्याची अनेक चिन्हे दिसू लागतात. मध्येच कुठेतरी बिळातून बाहेर फेकली गेलेली वीत-दीड वीत लांबीची सापाची पिवळी-काळी पिले वळवळताना दिसतील. तर आणखी कुठे तरी ताडफळाएवढी, ताब्यासारख्या तांबुस-मातट रंगाची, कासवाची पिले कवचाच्या टोपणाबाहेर डोकी काढून फिरताना आढळतील. सापाची पोरे उचलून हातात घेण्याचा धीर होणार नाही. पण कासवाची पिले हातात घेऊन खेळवण्यात गमत वाटेल. तुमचा हात लागला की, ती पाय आणि डोके पाठीखाली ओढून घेतील आणि तुमच्या हातातले खुषीचे खेळणे होतील. असे रमता-गमता आपण धरणाशी येऊन पोचतो आणि पाणलोटाचा घरघराट कानावर पडून दृष्टी वर करतो तर लाल-काळे मातट पाणी उसळत खळखळत, गरजत सरसरत, गिरक्या घेत फेसाळत धरणावरून उडी घेऊन धावताना दिसते आणि काही वेळा नजर त्यावर खिळून राहते. मग जरा वेळाने इकडे तिकडे पाहू लागले म्हणजे झाडाच्या लहान-मोठ्या फांद्या, एखादे छप्पर वाहत येताना, अडताना, पुन्हा सुटून वाहू लागताना दिसेल. आणि कदाचित तुम्ही जिथे उत्तावर उभे असाल तिथे तुमच्या पायाखालीच एखादे गाई-बैलाचे प्रेत प्रवाहाच्या कडेला लागून फुगलेले पडलेले दिसेल आणि गिधाडे तुटून पडावीत तशी चारी बाजूंनी कासवे त्याच्यावर तुटून पडत असतील आणि एकमेकांवर चढ-चढून

त्याचे मांस ओढून-तोडून गिळीत असतील. पाण्याचा रंग मातट, प्रेताचा मातट, आणि कासवाचाही मातटच. समोर पुराचे भव्य-भीषण दृश्य आणि पायाशी हे बीभत्स दृश्य. पण बीभत्स तरी का म्हणावे! एक जीव गेला होता त्यावर दुसरे पोसत होते. जीवो जीवस्य जीवनम्.

पिले कासवे, प्रौढ कासवे, पूर आणि प्रेत आठवीत घरी परत यावे आणि, कोणी सांगावे, रात्री त्याची स्वप्ने पाहावी.

हे पावसाळ्यातले एक दृश्य.

काश्मीरी दरवाज्यातून बाहेर पडून कुदसिया बागेतून सरळ उत्तरेकडे गेलो की आपण फ्लॅगस्टाफ टॉवरवर पोचतो. तो दिल्लीच्या पश्चिमेकडे दक्षिणोत्तर गेलेल्या डोंगराच्या किंवा उंचवट्याच्या धारेवर एका ठिकाणी आहे. त्याच्या चारी बाजूंना घनदाट नाही तरी चांगली गर्द झाडी आहे. टॉवरवर चढून ह्या झाडीतून दूरवर नजर टाकली तर एकीकडे काश्मीरी दरवाज्याकडला भाग. उजवीकडे त्याच धारेवरचा म्यूटिनी टॉवर, अशोकाची लाट, आणि पीर गैब दिसतो. टॉवरच्या दिशेने नजर अलीकडे ओढली तर एका तिवाठ्याशेजारी चौबुरजी मसजिद् दिसते. तिच्यावरच्या घुमटाची संख्या आणि त्याचा आकार पाहिला म्हणजे ती मुसलमानी अमलाच्या आरंभाच्या काळातली आहे हे स्पष्ट जाणवते नाही तरी इथे टॉवरवर आपण इतिहासाच्या थोडे मागेच आहो. मौर्यकाळातला अशोकाचा स्तंभ. (मूळचा इथला नव्हे. पण त्याची तिथे झालेली स्थापना आपल्याला मौर्यकाळात नेते.) मुसलमानी अमलाच्या आरंभीच्या काळातली चौबुरजी मसजिद. त्या अमलाचा अंत दाखवणारा म्यूटिनी टॉवर. आणि ब्रिटिशांची सत्ता पक्की झाल्याचे सांगणारा आपल्या मागल्या बाजूला असलेला जुना व्हाइसरीगल लॉज.

पावसाळ्याचा भर ओसरू लागला आहे. ढग हळूहळू विरळ होताहेत. आभाळाचा निळा रंग मधूनमधून दिसू लागला आहे. पण दिवस अजून पावसाळ्याचेच आहेत. अजून झाडावरची पालवी दाट आहे आणि तिचा रंग काळसर हिरवाच आहे. अजूनही मधूनच एखादी सर पडते. मधूनच झिमझिमते आणि वातावरण काळे-सावळे होते. तसे ते आताही आहे. त्यातून संध्याकाळ होत आली आहे. झाडीतून दिसणाऱ्या चारी बाजूंच्या वस्तीत आणि लहान-मोठ्या जुन्या-नव्या इमारतींत आपली नजर गुंतली आहे. इतक्यात कुठूनतरी (जवळून की लांबून?) 'म्याहाव' असा आर्त-कर्कश आवाज येतो. टाहोच. कुठून आला म्हणून पाहावे तर आपल्या मागच्या बाजूच्या झाडीतल्या मोकळ्या जागेत एक मोर, राजपूत शैलीच्या चित्रातल्यासारखा पिसारा ओढीत हवेतून तरंगत जाताना दिसतो. त्याला खाली उतरताना आपण पाहतो आहो, एवढ्यात दुसरा, तिसरा, असे होता होता पाचा-सातांचा थवा खाली उतरून भक्ष्य टिपू लागतो, आणि त्याबरोबरच त्याच्या

खालीवर होणाऱ्या पिसाऱ्यातून निळे-जांभळे डोळे झळाळू लागतात. त्याचा तो लयबद्ध पदविन्यास आणि त्याला साथ देणारी मानेची डौलदार आंदोलने दृष्टी खिळवून ठेवते. इतके रंग-वैभव आणि डौल लाभलेल्या शरीराला आवाज मात्र कर्णकटू लाभावा ह्याचे वैषम्य वाटते. पुन्हा वाटू लागते, माणसाच्या जातीतसुद्धा स्त्रियात रूपसौंदर्य आणि स्वरमाधुरी किंवा पुरुषात बुद्धिवैभव आणि शरीरसामर्थ्य ही कितीशी एकत्र आढळतात? एक अधिक दिले तर दुसरे कमी करून समतोल राखावा, असा सृष्टीचा नियमच दिसतो. आपल्याला अन्यायाचा वाटणारा! असा काहीसा तात्त्विक विचार करीत आपण त्याचा संचार पाहत आहो, तोच ते झेपा घेऊन जिकडून आले तिकडे जाऊन अदृश्य होतात; आणि मग क्रमाक्रमाने क्षीण होत चाललेले टाहोच तेवढे कानावर येतात. पण ते जेवढा वेळ दिसतात तेवढ्यातच पावसाळ्याची एक झळाळती झाकी दाखवून जातात.

पावसाळा संपत आला. शरदाची चाहूल येऊ लागली. ओढ्या-ओहोळाचे पाणी निवळ होत चालले. त्याच्या काठांनी सरकंड्यावर आणि शेतामाळावर काशावर पांढरेशुभ्र चकचकीत तुरे डुलू लागले. आभाळ स्वच्छ होऊन त्याचा रंग अगदी काळसर वाटावा इतका गर्द निळा झाला. ह्या निळेपणाचा अगदी वेध लागतो. त्याच्याकडे कितीही वेळ पाहिले तरी दृष्टी तिथून काढावीसे वाटत नाही. निळा रंग शांततेचा म्हणतात. हा रंग शांतवतो. प्रसन्न करतो आणि त्याबरोबरच थोडासा उत्तेजितही करतो. म्हणूनच तर कृष्णाला त्याच्या भक्तांनी घननीळ रंग दिला नसेल? त्याचे भक्त प्रेमाने वेडे होतात; बेभान होतात. स्त्रियांना, पुरुषांना सगळ्यानाच हा रंग वेड लावतो. हे शरदाचे आकाश रात्री अधिकच काळे, काळे-निळे होते, त्यावर लक्षावधी तारकांचे पुंज लकलकू लागतात, तेव्हा निसर्गाच्या प्रसादाची परमावधी झाल्यासारखे वाटते. त्यातच आणखी शुक्ल पक्षातला वाढता चंद्र असला म्हणजे तर चांदणे अमृतात न्हाल्यासारखे वाटते.

शरदातल्या ह्या चांद्ररसात मनसोक्त डुंबायचे असेल तर यमुनेवर जायला पाहिजे. मेटकाफ हाउसच्या मागच्या बाजूने यमुनेच्या काठाकाठाने बेला रोड जातो. तिकडे वर्दळ कमी. यमुनेचा प्रवाह कोसी-ब्रह्मपुत्रेसारखा लहरीच. तिच्या विशाल पात्रात एखाद्या वर्षी तो अलीकडल्या तीराशी घसट करतो, तर दुसऱ्या वर्षी पलीकडल्या. पण प्रवाह कोणत्याही तीराशी असला तरी प्रशस्त वाळवंट असतेच. वाळू कोरडी झालेली असते. वारा गार झालेला असतो, पण मंद वाहत असतो. आणि अजून झोंबू लागलेला नसतो. धीरसमीर असे ह्या वेळी यमुनातीर असते. कृष्णाने बालवयात सवंगड्यांबरोबर आणि वयात आल्यावर गोपींबरोबर क्रीडा केल्या त्या गोकुळ-वृंदावनात, अशाच वाळवंटात, अशाच चांदण्यात केल्या असतील. त्यांना त्या वेळी कशी धुंदी चढली असेल हे कल्पनेनेसुद्धा कळू शकते.

जणू काय आपल्याच मालकीच्या अशा त्या वाळवटात तशा रात्री अंग झोकून, चांदण्याची चादर अंगावर घेऊन, नक्षत्रे निरखीत पडून राहावे असे वाटते. पण उत्साह तसे करू देत नाही. इथून तिथे जावे, तिथून दुसरीकडे. पायतणे काढून टाकून पायांच्या तळव्यांना वाळूचे शीतल स्पर्शसुख घेऊ देत हिंडावे, फिरावे, नाचावे, धावावे असे वाटते. आणि मग काही न बोलता, न करता, स्वस्थ बसावे. मुठीत वाळू भरून घ्यावी आणि हळूहळू खाली निसटू द्यावी. इतका वेळ लक्षात न आलेली गोष्ट आता लक्षात येते. वाळू स्पर्शाला रेशमासारखी मऊ, सुखकर, आहेच; पण तिचा प्रत्येक कण चांदण्याचे प्रतिबिंब घेऊन चकचकतो आहे. आपण, वाळू नव्हे तर हिऱ्याचा चुरा हातात घेऊन, लहान मुलासारखे खेळतो आहो. आपल्या आजूबाजूला पाहावे तर सगळीच वाळू तशी चकाकत असते. स्पर्शसुखाचा आणि दृष्टिसुखाचा हा सोहळा संपू नये असे वाटत असते. पण रात्र कलते. चांदणेही मदावते आणि पाय कष्टानेच पण परतीच्या वाटेला लागतात.

शरदातल्या शुक्ल पक्षातल्या चांदण्या रात्री यमुनेवर जायचे तर कृष्ण पक्षातल्या काळोख्या रात्री का नको ? रात्र काळी, यमुनाजळे काळी, वाळू काळी आणि आभाळ तर कुट्ट काळे. पण त्यात नक्षत्रे किती खचून भरली आहेत आणि किती ठळक दिसताहेत. तशी चांदण्या रात्री दिसली नव्हती. काळोख्या रात्रीत त्याचाही एक प्रकारचा सावळा प्रकाश भरलेला असतो. आपल्या भोवतालचे जग आपल्या भोवती आहे इतके फक्त जाणवून देण्यापुरता. आपण आपल्यातच वळतो. आताही हातात वाळू भरत असते आणि सरकत असते. भरत असते आणि सरकत असते ..हे वाळवट इथे किती वर्षे असेल ! हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणाऱ्या मुसलमानांची पावले त्याच्यावरून फिरली. कृष्णाची आणि पांडवांची फिरली, त्याच्या आधी वेदकालीन ऋषीमुनींची फिरली असतील. त्याच्या आधी...त्याच्या आधी...मागे ? किती मागे !

ह्या आठवणी जुन्या आहेत. इंद्रप्रस्थाच्या पलीकडे वस्ती झालेली नव्हती, सफदरजंगच्या अलीकडे पलीकडे नुसती मैदाने आणि त्यात मध्येच कुठेतरी जुन्या इमारतींच्या उद्ध्वस्त अवशेषाचे ढीगच दिसत असत, इतकेच काय पण करोल बागेतसुद्धा माणसांना डसून त्यांच्या अंगावर गळवे आणणाऱ्या माश्यांचीच वस्ती होती, त्या वेळच्या आहेत. आता जिथे मोकळी जागा मिळेल तिथे माणसानी वस्ती केली आहे. बऱ्याबाईट, लहानमोठ्या इमारती बांधल्या आहेत. त्याना पार्के-नगरे अशी नावे दिली. पण माणसानी दिल्लीत आणि आसपास कितीही आणि कशीही वस्ती केली असली तरी त्यानी दिल्लीचे हवामान बदलले नसेल असे वाटते. दिल्लीचा पावसाळा अजून पूर्वीसारखाच 'सुहाना' असेल. पूर्वीसारखेच आकाश मेघ-मेदुर आणि वनभूमी श्यामल होत असतील आणि दिल्लीबाहेरच्या झाडीत मोराचे पिसारे फुलत असतील आणि केका कानावर पडत असतील. अजूनही शरदाच्या चांदण्यात यमुनेची वाळू पूर्वीसारखीच चकाकत असेल आणि काही लोकांना तरी ती हातात भरून घेऊन खेळवावी असे वाटत असेल.

# त्रिपुर

आम्ही मुरूड-फाट्यापाशी उतरलो तेव्हा रात्रीचे साडेनऊ झाले होते. त्यामुळे आम्ही थोडेसे चिडल्यासारखेच झालेले होतो. शिणलेले तर होतोच. रत्नागिरीहून सकाळी साडेसाताला निघणारी हर्णैची ठेपी गाडी आम्हाला मिळाली असती तर दुपारी चार वाजताचा महर्षी कर्व्यांचा शताब्दिसमारंभ साधला असता. त्यासाठीच तर मुरुडाला आलो होतो. पण साडेसाताच्या बसमध्ये आम्हाला जागा मिळाली नाही. साडेआठाची रत्नागिरी-खेड बस घ्यावी लागली. तिथपासून वेळेचे गणित चुकत गेले ते चुकतच गेले, आणि मुख्य समारंभ हुकला. बसमधून उतरलो. हातात, खांद्यावर सामान घेतले आणि पाना-फुलांच्या तोरणांच्या कमानीखालून 'महर्षी कर्वे' मार्गाने चालू लागलो विजेच्या झगझगाटात वाटेने जाणाऱ्या-येणाऱ्या गर्दीतून वाट काढीत, चौकशी करीत करीत शताब्दि-समारंभाच्या कार्यालयात पोचलो. आणि आम्हाला मुक्कामासाठी कोणाकडे जायचे आहे ते सांगण्यात आले.

मुद्दाम डायनामो आणून विजेचा झगझगाट केला होता तो मुरूड-फाट्यापासून समारंभाच्या मांडवापर्यंतच होता. तिथे काहीतरी कार्यक्रम चालला होता तो पाहत पाहत चाललो होतो तो आम्ही आमच्या मुक्कामाच्या वाटेला लागताच प्रकाशाची हद्द संपली आणि अंधाराची सुरू झाली. स्वयंसेवक म्हणाला, "नीट पाखाडीवरून चला. अंधार आहे. पण वाटेत ठिकठिकाणी त्रिपुर लावलेले आहेत. वाट दिसेल." अंधारात बेताबेताने पावले टाकीत चालू लागलो.

आम्ही ज्या फरसबंद रस्त्यावरून चाललो होतो ती 'पाखाडी'. खालच्या अंगाला शेजारीच एक कच्चा गाडीरस्ता समांतर होता. तो 'विंदी'. पेंडशाच्या कादंबऱ्यातल्या शब्दांचे अर्थ देशावरल्या मला मूर्त होऊन दिसू लागले. ('कोंड', 'पऱ्ह्या' वगैरेचे दिसायचे होते.) 'त्रिपुर'ने मी गोंधळलो. मी विचारले, "'त्रिपुर' कुठे आहे?" स्वयंसेवक म्हणाला, "हा काय." कंबरेएवढ्या केळीच्या खांबात चारपाच ठिकाणी पोफळीची टोकदार फळकुटे टोचून त्यांवर तेवत्या पणत्या ठेवलेल्या होत्या. मिनिएचर दीपमाळच. तोच 'त्रिपुर'. कोकणात आल्यासारखे माझ्या संग्रहात एकएका नव्या शब्दाची आणि त्याच्या मूर्त अर्थाची भर पडत होती.

मागली मांडवातली गर्दी आणि डोळ्यावर आक्रमण करणारा झगझगीत प्रकाश सोडून, पाखाडीवरचा शांत अंधार आणि त्यात तितक्याच शांतपणे वाट दाखविणारा तो त्रिपुर, ह्याच्या सहवासात आल्यावर दमलो-थिडलो होतो ते सगळे गेले आणि विसावल्यासारखे, सैलावल्यासारखे वाटले. दमलो होतो हे खरेच, कारण मुक्कामावर पोचताच कार्यालयातून सामान आणवले आणि हातपाय-तोंड धुऊन मांडवाखाली जे निजलो ते चांगले उजाडल्यावरच उठलो. समारंभात रात्री योगिनी जोगळेकरांचे गाणे झाले त्याची अंगाई आम्हाला लाभली.

रात्री आम्हाला आधी अतिप्रकाशामुळे आणि नंतर अंधारामुळे मुरूड कसे ते दिसलेच नव्हते. ते सकाळी दृष्टीस पडले. आमच्यासमोरच्याच घरात अण्णासाहेब कर्वे आणि रँग्लर अप्पासाहेब परांजपे उतरले होते. कर्व्यांच्या मूळ घराची वास्तू उजव्या बाजूला एक घर सोडून होती. तीही आमच्या अंगणातून दिसत होती. म्हणजे ज्यासाठी आम्ही मुद्दाम आलो होतो ते असे आमच्यासमोर, जातायेता दिसेलसे होते. समारंभाच्या मांडवात व्यासपीठावर बसलेल्या त्यांना दुरून कुठून तरी पाहावे लागले असते, ते असे अगदी जवळून पाहता आले, त्यामुळे लहान मुलाला वाटावा तसा आनंद मला वाटला. आणि थोड्या वेळानंतर त्यांच्या घरी जाऊन पायावर डोके ठेवून त्यांना मी नमस्कार केला. आणि त्यांची आणि अप्पासाहेब परांजप्यांची माझ्या डायरीत, एखाद्या शाळकरी विद्यार्थ्यासारखी सहीसुद्धा घेतली.

अण्णासाहेबांचे दर्शन घेतले आणि मुरूडचे दर्शन घ्यायला निघालो. मुरूडवर आणि मुरूडकरांवर अण्णासाहेबांचे किती प्रेम होते आणि त्यांचा त्यांना किती अभिमान होता, हे त्यांच्या आत्मवृत्ताची पाने चाळली तरी दिसून येते. आणि त्यासंबंधीच्या त्यांच्या भावनांची परमावधी, पुनर्विवाह करून मुरुडाला आल्यानंतर त्यांना त्यांचा जो अनुभव आला, त्यावर त्यांनी जे लिहिले आहे त्यात दिसून येते. आपल्यामागे मुरुडाला आपले कोणी येणार नाही हे दिसून आल्यावर त्यांनी आपल्या वडिलार्जित मालमत्तेची जी व्यवस्था लावली, त्यावरूनही त्यांचे मुरुडावरचे प्रेम दिसून येते. आणि शताब्दीच्या वर्षीही ते तसेच होते. शताब्दीच्या समारंभासाठी वर्गणी गोळा करण्याचे काम चालले होते तेव्हा एका मुरुडकराने असे म्हटल्याचे मी ऐकले होते, "कशाला द्यायची वर्गणी? केलाय् काय त्याणे मुरुडासाठी?" तेव्हा मला धक्काच बसला होता. पण असा प्रकार दुसऱ्याही एका कोकणच्याच मोठ्या माणसाबाबत कोकणातच मी ऐकला आहे.

अण्णासाहेबांनी आपल्या आत्मवृत्तात मुरुडाचा सगळा इतिहास (बखरीसह) दिला आहेच, पण गावाचे आणि देवळाचे इतके विस्ताराने आणि बारकाईने वर्णन केले आहे की, गाव पाहताना त्यांनी केलेले वर्णनच रूप घेताना दिसत आहेसे वाटते. शून्यालयापासून आम्ही गाव पाहायला सुरुवात केली. नागलेश्वर पाहिला. वरच्या

आळीला कर्व्यांच्याखेरीज इतर कोणा मोठ्या माणसाचे घर नाही. तेही त्यांनी १९०६ सालीच विकून टाकले होते, आणि "आता आमचे मुरुड गावी काहीएक राहिलेले नाही" असे म्हटले होते. दुर्गादेवीचे उंच दगडी जोते, पायऱ्या चढून गेल्याबरोबर डावीकडे टांगलेली प्रचंड घंटा, सभामंडपाचे, कलाकुसरीचे कोरीव काम केलेले, घाटदार खांब, मागल्या बाजूच्या खांबावरच्या वाघ, सिंह, पोपट, सर्प, हत्ती ह्यांच्या रेखीव आकृती, हे सर्व लक्ष देऊन पाहण्यासारखे आहे. काळ्याकुळकुळीत दगडाची देवीची मूर्ती सुंदर आणि प्रसन्न आहे. परचक्राचे निवारण करण्यासाठी हातात शस्त्र घेऊन स्वतः लढल्यामुळे थकवा येऊन ती जी थोडीशी उजवीकडे कलली, ती अजून कललेलीच आहे. देवी गावासंबंधी किती दक्ष आहे, ह्याची मुरुडकरांना ती कायमची आठवण आहे.

मुरुडाला ज्यांच्यामुळे मोठेपणा आला त्यांची, म्हणजे व्याकरणकार आणि कर्ते सुधारक रामचंद्र भिकाजी जोशी, रा० ब० विश्वनाथ नारायण मंडलिक, वामन आबाजी मोडक, शंकर बाळकृष्ण दीक्षित ह्यांची घरे खालच्या आळीत, दुर्गादेवीकडून डुऱ्याकडे जाताना ह्याच क्रमाने आहेत. त्यात मंडलिकांचे (साहजिकच) सगळ्यात मोठे आहे.

मुरूड जसे अण्णासाहेबांचे आणि ह्या थोर लोकांचे आहे, तसेच ते पेंडश्यांच्या कादंबऱ्यांचेही आहे. त्यातला बापू, अण्णा खोत, विठोबा, राजे मास्तर, यशोदा, राधा, ही कुठे दिसतात का ? आसपास दिसतात त्यांतला अमूक म्हणजे 'तो' किंवा अमकी ती 'ती' हे जाणण्याची इच्छा होतीच. कादंबऱ्यातल्या पात्रांचा असा शोध घेणे मूर्खपणाचे आहे, हे मला कळत होते. पण मूर्खपणाची इच्छा माणसाला होत नाही असे थोडेच आहे ! मग मी कादंबरीतल्या वर्णनावरून मनात चित्र रंगवले असेल त्याप्रमाणे एखाद्याला 'बापू', दुसऱ्या एखाद्याला 'अण्णा खोत' समजायचा. ते अर्थात उगीचच.

एकदा एका ठिकाणी चहाला गेलो होतो. फणसाचे गरे, हापूस आंब्याच्या फोडी, कोकमाचे सरबत, 'हातखुरपे शहाळे' (म्हणजे काय हे तिथेच पहिल्यांदा कळले.) ह्यांचा समाचार घेत होतो. बरीच परिचित-अपरिचित मंडळी होती. इकडच्यातिकडच्या ऐसपैस गप्पा चालल्या. 'पात्रजिज्ञासा' माझ्याप्रमाणेच इतरांनाही होतीच. कोणाला तरी कुजबुजताना ऐकले, "अरे तो आहे ना ? तो नाही रे 'तो'. तो 'अण्णा खोत'. 'बापू' मग दाखवीन. आहे इथेच." नंतर पाहिले तर आणखीही काही लोक, हा 'अमका', तो 'तमका' असे पटवून देत होते. तेव्हा मी मनाशी म्हटले, ह्यातले कोणीही एक माणूस अमकेतमके नसावे. आणि माझी जिज्ञासा तिथेच निमाली.

कादंबऱ्यातले मुरूड म्हणजे मुरुडाची पंचक्रोशी. तिच्या यात्रेचा आरंभ गारबीपासून करायला पाहिजे. गारबी हे छोटेसे असेना, पण एखादे गाव असेल, असे वाटले

होते. पण गारबी हा गावाच्या पूर्वेकडल्या डोंगराच्या उतरणीवरचा एक झरा आहे. त्याच्याभोवती कुंड बांधलेले आहे. आसपास गर्द झाडाची गार सावली आहे गावाकडून तांबडीच्या कोंडाच्या वाटेने चढून वर आले म्हणजे खरोखरच गार वाटते. वादळ्याचा पऱ्हा ('वादळा' हे एक ठिकाण आहे.), बहिरीचा कोंड, सिद्धपुरुषाची समाधी वगैरे ठिकाणे पाहायची तर डोंगरमाथा ओलांडून दुसऱ्या बाजूला जायला हवे. जायलाच हवे होते. कारण ती ठिकाणे पाहायची होती. डोंगरमाथ्यावर उभे राहून गावाकडे पाहिले. डोळे तृप्त झाले. दीड मैल लांब आणि अर्धा मैल रुंद माडा-पोफळीच्या गर्द झाडीत लपलेले गाव. क्षितिजापासून गावापर्यंत निळाकरडा समुद्र, गावाच्या मागल्या बाजूला किनारपट्टीला केतकीचे वन. चारपाचशे वर्षांपूर्वी आसूद गावाच्या स्मशानातच सिद्धपुरुषाने गाव वसवले तेव्हा जसे होते, तसेच ते आजही आहे. त्या वेळी झाडी नसेल ती आज आहे. त्या वेळी काही घरे-देवळे नव्हती, ती आज असतील. पण त्याने स्थापलेली मुख्य-मुख्य देवळे, त्याने नेमून दिलेल्या मुख्य-मुख्य वस्त्या, त्याने आखून दिलेले उभेआडवे रस्ते आजही तसेच आहेत. चारपाचशे वर्षांपूर्वी एका नव्या गावाची संपूर्ण रचना करणाऱ्या सिद्धपुरुषाची कल्पनाशक्ती, दूरदृष्टी आणि योजकता अद्भुतच म्हणावी लागतील. त्याने गावचे वेगळे-वेगळे विभाग पाडले. त्यांच्या सीमा निश्चित केल्या. प्रत्येक विभागाला एक-दोन देव दिले. त्यांच्या पूजेअर्चेसाठी ब्राह्मण नेमले. सर्व जातींच्या लोकांच्या राहण्याची वेगवेगळी सोय केली. मुसलमानांसुद्धा. आणि देवाच्या आणि गावाच्या कारभारात सर्व जातींना मानापानाचे काम देऊन गोवून टाकले. एक उभा रस्ता आणि तीनचार ठिकाणी आडवे रस्ते, अशी गावाची नेमस्त रेखीव रचना केली. ती सगळी डोंगरमाथ्यावरून चित्रासारखी दिसत होती. गावातल्या काही लोकांची गुरे पावसाळ्यात डोंगरावर असतात. त्यांच्यासाठी 'वाडे' बांधलेले आहेत आणि प्रत्येकाचा गुरेचरणाचा 'दस्त' आखून दिलेला आहे. वरून निघाल्यापासून वाटेने डोंगरातल्या उतारावर, डोंगरावर, जिकडेतिकडे पिटकुळीचे शेंदरी, कुड्या-कुदाचे पांढरे, लहानमोठे झुपके फुललेले असल्यामुळे, आणि त्या झाडाझुडुपांची हिरवळ असल्यामुळे कुठेही रूक्ष वाटत नव्हते. डोंगरावरून खाली उतरून वादळ्याच्या पऱ्हाच्या वाटेने बहिरीच्या कोंडावरून, बहिरीच्या देवळाशेजारून खाली सपाटीवर सिद्धपुरुषाच्या समाधीपाशी गावाच्या दक्षिण टोकाकडे आलो. गावाची अर्धी प्रदक्षिणा झाली.

तिथे लक्ष्मीनारायणाच्या उत्तराभिमुख देवळाच्या शेजारी बाहेरच्या बाजूला होऊन गेलेल्या कुडात एका मोठ्या भग्न मूर्तीचा कमरेपासून वरचा भाग (त्याचे उत्तमांगच) उताणा पडलेला दिसला. विविध अलंकार बारकाईने कोरलेली हिरवट-काळ्या दगडाची ती मूर्ती अतिशय प्रमाणबद्ध आणि सुंदर आहे. ती तशी उन्हा-पावसात उकिरड्यावर टाकल्यासारखी पडलेली पाहून वाईट वाटले. पण आपल्या लेली

मूर्तीला महत्त्व देव म्हणून. भंगली म्हणजे ती दगडच. म्हणून तिच्याकडे लक्ष द्यायचे नाही. इतकेच नाही तर देवळाच्या आतल्या भागातही ती ठेवायची नाही. (आता ती शेजारच्याच देवळात बाहेरच्या अंगाला पण निवाऱ्याच्या जागी ठेवली आहे म्हणतात. जिवंत सौंदर्याची कदर करणारा मुरुडात कोणीतरी निघाला असे दिसते.)

गारबीच्या डोंगरातच एका अंगाला 'मढी' आहे. (काय विचित्र नाव!) दोन्ही अंगानी डोंगर येऊन मिळाले आहेत. तिथे वरून पऱ्ह्या येतो. त्यावर एकाच कमानीचा, जाम्या दगडाचा, पूल बांधलेला आहे. शेजारी प्रशस्त पारावर प्रचंड पिंपळ आहे. त्याच्या शेजारीच एका गोमुखातून बारीक धारेने पाणी येत होते. गोमुख खालच्या अंगाने झिजले आहे म्हणून धार नीट पडावी ह्यासाठी गोमुखात वडाच्या पानाची पन्हळ करून घातली होती. सगळे दृश्य बालकवींच्या कवितेसारखे किंवा थोड्या रेषात खूप सूचित करणाऱ्या जपानी चित्रासारखे रमणीय होते. उन्हाळ्यात जर ते इतके चित्तवेधक होते, तर पावसाळ्यात कितीतरी अधिक रमणीय दिसत असेल.

"केशवराज पाहिल्याखेरीज जाऊ नका हो. फार रमणीय स्थान आहे." आम्हाला सल्ला मिळाला. मी मनात म्हटले, "काय रमणीय नाही?" एक गोष्ट रमणीय नव्हती. मे महिन्याचे ऊन आणि त्यातून तांबड्या धुळीच्या कच्च्या रस्त्यातून पायी जाणे-येणे. पण स्थान 'रमणीय' म्हणतात तर गेले हे पाहिजेच.

मुरुडापासून आसूद बागेपावेतो चालणे नकोसे झाले. पण आसूद बागेत शिरलो मात्र, तिथल्या पोफळीच्या आणि राताम्याच्या गर्दीत आणि सावलीत सगळा शीण पार गेला. (गुहागरात जसे जो पाहावा तो 'खरे', तसे आसुदात जो पाहावा तो 'दाबके'. कोकणात आपले एकेका आडनावाचे एकेक गाव नेमून दिलेले असावेसे दिसते.) आम्ही पोफळीच्या ताफ्यातून वाट काढीत चाललो होतो. मध्येच एका ठिकाणी कुठूनतरी, समुद्राच्या लाटा मागे-पुढे होताना व्हावा तसा 'घर्रर्र-खळ्ळ्' असा आवाज कानांवर आला. पण लाटांचा आवाज सुस्कारल्यासारखा दीर्घ आणि सम लयीचा असतो, तसा हा नव्हता. आणि थोडा, थोडाच, कर्कश होता. कसचा आवाज ते पाहावे म्हणून इतराना सोडून मी आवाजाच्या दिशेने गेलो. दहा-पाच पावलांवर एका मोकळ्या जागेत सुपारी चाळण्याचे काम चालले होते. चार-पाच हात लांब आणि दोनअडीच हात रुंद अशा पत्र्याच्या चाळणीत सुपारी होती आणि दोन माणसे चाळणी मागे-पुढे ओढून सुपारी चाळीत होती. चाळणीत सुपारी घरंगळत होती. तिचा तो आवाज होता. चाळणीच्या भोकातून बारकी खाली गळत होती, मोठी मागे राहत होती. आणि असे एकाच ठिकाणी नाही, तर दोन-चार ठिकाणी चालले होते. त्यांचा तो एकत्रित लयबद्ध आवाज होता. नवे शब्द, नवे अर्थ, नवे दृश्य, नवा अनुभव—सगळे नवेनवे होते.

आसूद बागेतून बाहेर पडून डोंगर उतरून, आसूद नदी साकवावरून ओलांडून पलिकडल्या डोंगरावर गेलो तेव्हा केशवराज दिसला. पाठीकडून. मंदिर प्राचीन आहे म्हणतात. पण प्राचीन वाटले नाही. काळवत्री (कोकणातला शब्द) दगडाचे पक्के आहे. मूर्ती सुंदर आहे. देवापुढे नंदादीप नाही. ("सार्वजनिक काड्यापेटी कोपऱ्यात आहे...काम झाल्यावर जागच्या जागी ठेवावी" अशी सूचना मात्र आहे. ही खरी कोकणी वृत्ती!) देवळाचा सभामंडप, देवळाचे आवार आणि सभोवतीची पोफळीची बाग अगदी स्वच्छ आहे. बागा आणि रानझाडी ह्यांच्या परिसरातले केशवराजाचे ठिकाण खरोखरच रमणीय आहे. ज्यांनी ते पाहण्याचा सल्ला दिला, त्यांनी तो उगीच गावाच्या अभिमानाने दिला नव्हता.

आसूद बागेतून बाहेर पडून पुन्हा नदी ओलांडून व्याघ्रेश्वराला गेलो. व्याघ्रेश्वर उघड्या मोकळ्या जागेत. केशवराजासारखे त्याचे आवार बागा-झाडांनी व्यापलेले नाही. पण पेंडश्यांच्या कादंबऱ्यातल्या कितीतरी घटनांशी व्याघ्रेश्वर निगडित आहे. यशोदेचा तर तो आधारच आहे. त्या मानाने दुर्गादेवीचे देऊळ त्यांच्या कादंबऱ्यात येत नाही. बाकी मुरुडापासून लांब आणि थोडेसे एका बाजूला असल्याचा व्याघ्रेश्वराला जो फायदा मिळतो, तो गावाच्या दोन बाजूंच्या मिठीत सापडलेल्या दुर्गादेवीला कसा मिळणार! देवीच्या मागे समुद्रापर्यंत बाग आहे. तिथे एकांत आहेसे वाटेल, पण दोन्ही बाजूंच्या घराची परसावे तिकडेच आहेत. ह्या परसावात वावरणाऱ्या बायकांच्या डिटेक्टिव्ह नजरेतून बागेत चाललेले गूज निसटायचे नाही. किंवा गावाच्या पटांगणाकडेच तोंड करून उभ्या असलेल्या देवीपुढे बसून कोणालाही मन मोकळे करता यायचे नाही. त्यासाठी व्याघ्रेश्वरच सोयीचा.

देवळाच्या जोत्यावर आणि इतरत्र ज्या दगडी मूर्ती आहेत, त्या रेखीव किंवा प्रमाणशीरसुद्धा नाहीत. पण त्यावरूनच देऊळ जुने असावेसे वाटते. इतर देवळांतून दगडी खांबांना लाकडी खांबाचा आकार देतात आणि त्यावर लाकडातल्यासारखे कोरीव काम करतात. पण व्याघ्रेश्वराच्या देवळात मात्र लाकडी खांबांना दगडी खांबाचा आकार देऊन, त्यावर दगडातल्यासारखे कोरीव काम केले आहे. त्यावरूनही मूळ वास्तू प्राचीन असावीसे वाटते.

शताब्दिसमारंभाचे कार्यक्रम पाहता-पाहताच आमची ही पंचक्रोशीची पदयात्रा चालली होती. समारंभात जे करमणुकीचे कार्यक्रम झाले त्यात 'डेरा' आणि 'काटखेळ' हे डोळ्यात आणि मनात भरण्याइतके उत्तम झाले. 'डेऱ्या'बरोबरचे जे नृत्य झाले त्याची लय आणि समकाल होणारी हालचाल फारच डौलदार होती. 'काटखेळ' हा टिपऱ्यांचा खेळ आहे. त्यात दहाबारा लोक भाग घेत होते. डोक्याला जरीकाठी चौकड्याचा रुमाल, अंगात काळे जाकीट, त्यावर कमरेजवळून पाठीमागून पुढे आणून डावे टोक उजव्या आणि उजवे डाव्या खांद्यावर असे सोडलेले रेशीमकाठी उपरणे आणि काचा मारलेले धोतर, असा त्यांचा पोशाख

होता. उजव्या हातात दोन टिपऱ्या, आणि डाव्या हातात टोकाने धरलेला रुमाल, हे खेळाचे साहित्य. वाद्याच्या साथीवर आधी संथ आणि नंतर हळूहळू द्रुत लयीत पडणारी त्याची पावले, त्यांनी घेतलेल्या गिरक्या, टिपऱ्यांची देणीघेणी, रुमालाचे फलकावणे अतिशय गुंतागुंतीचे पण लयबद्ध आणि प्रेक्षणीय होते. असले खेळ मुंबईसारख्या ठिकाणी पद्धतशीरपणे, योग्य साज-साथीसह दाखवले गेले तर महाराष्ट्रातल्या ह्या सात्त्विक नृत्यप्रकाराला अधिक जिवंतपणा येईल, त्याचे अधिक चीज होईल, नाहीतर हा असाच अदृश्य होईल असे पाहताना मनात आले.

तीन दिवसाचा शताब्दि-समारंभ संपला. लोक आपापल्या ठिकाणी परतू लागले. जेवढी नेहमीची वस्ती तिच्या तिप्पटचौपट तरी माणसे त्या तीन दिवसासाठी मुरुडाला आली असतील. कदाचित अधिकच. त्यात बाहेरगावी असलेले मुरुडकर (ग्वाल्हेर-इंदूरपासूनचे) होते (ते घरचेच), तसेच मुरुडाशी काही संबंध नसलेले आमच्यासारखेही होते. सगळ्यांची सोय गावकऱ्यांनी सगळी घरची असल्यासारखीच केली होती.

लोक भराभर आले तसे गेले आणि गाव ओके-ओके दिसू लागले.

नेहमीचे मुरुड कसे दिसते ते पाहावे म्हणून काही वर्षांनी पुन्हा मुरुडाला गेलो. पुन्हा एकदा शून्यालयापासून सिद्धपुरुषाच्या समाधीपर्यंत पाखाडीवरून गेलो. मंडलिक-मोडक-जोश्यांची घरे पाहिली. लक्ष्मीनारायणाशेजारच्या होरलेल्या कुंडात पडलेली भग्नमूर्ती पुन्हा जवळून-लांबून इकडून-तिकडून सावकाश निरखून पाहून मनात साठवली. पुन्हा एकदा कर्व्यांच्या तळ्याकडेच्या रस्त्याने जाऊन नदीजवळचा तो चित्रासारखा दिसणारा देखावा पाहिला. गारबीवर गेलो आणि गावाकडे पाहिले.

केळशी, आजर्ले, मुरुड आणि गुहागर ह्या चार गावांची रचना सारखी आहे. समुद्राला समांतर जाणारा एक उभा रस्ता (पाखाडी आणि बिदी) आणि त्याला आडवे जाणारे रस्ते. प्रत्येक गावाचे काहीतरी वेगळेपणही आहे. गुहागर मुरुडापेक्षा लांबीला अधिक आहे. रुंदीलाही असेल. अधिक हिरवे आहे. तिथले देवीचे देऊळ वस्तीपासून जरा लांब, आखीव-रेखीव बागेत आहे. पण मुरुडातल्यासारखे वास्तू म्हणून प्रेक्षणीय नाही. गुहागरात आता पाखाडी राहिली नाही. आंजर्ल्याला कड्याचा गणपती आहे. पाखाडीतले चिरे निखळत चालले आहेत. ती उंच-सखल झाली आहे. केळशी प्रशस्त आहे, स्वच्छ आहे. तिथे अजून पाखाडी-बिदी आहे. याकूत सरवर आहे. मोकळ्या जागेत देवीचे देऊळ आहे. पण एकट्या मुरुडाला आणि त्याच्या आसमंतातल्या निसर्गाला जितकी विविधता आहे, तितकी ह्या गावांना नाही. त्यातूनही विशेष म्हणजे एकट्या मुरुड गावाने जितकी अलौकिक बुद्धिमत्तेची आणि कर्तबगारीची माणसे दिली तितकी, आणि तितक्या योग्यतेची, दुसऱ्या कोणत्याही एका गावाने दिली असतील काय, ह्याची शंका आहे. अण्णासाहेब कर्व्यांनी आपल्या आत्मवृत्तातच मंडलिक, दीक्षित, आणि त्याबरोबरच 'ज्ञानप्रकाश'चे

संस्थापक हरी नारायण गोखले ह्यांचा उल्लेख केला आहे. स्वतः अण्णासाहेबही पुढे त्याच्याच पक्तीत बसले. मुरुडचे हे महापुरुष 'त्रिपुर'च आहेत. सामान्य माणसाचे कर्तृत्व चेतवणारे आणि त्यांना जीवनाच्या मार्गावर प्रकाश देणारे किंबहुना मुरुडलाच ह्या भागातला 'त्रिपुर' म्हणता येईल. त्यावर कधी दिवे पेटलेले असतील, कधी नसतील. पण त्रिपुर आहे. त्याच्यावर कधीतरी काही दिवे तरी पेटतीलच.

# तत्
# चित्तपावनं
# क्षेत्रम्

“भॉं” असा भोंगा वाजवत लॉंचीने भरतिकेला सुरुवात केली तेव्हा मी भानावर आलो. मागे वळून धक्क्याकडे पाहिले, लॉंच बरीच लांब आली होती. लॉंचीत आल्यावर बंदराकडे पाठ करून मी समोरच्या किनाऱ्याकडे पाहत बसलो होतो. किनाऱ्यावर आणि खाडीच्या पाण्यातसुद्धा झाडाझुडपाची गर्दी होती. पाण्यावर वाफेची हलकीशी वलये उदबत्तीच्या धुराच्या वलयासारखी हेलकावत तरळत होती. त्या झाडाझुडपाच्या गर्दीतून पाण्यातूनच एक निसुळती नागमोडी वाट गेली होती. त्या वाटेने एका छोट्या होडक्यात बसून काही दिवसापूर्वी मी तिकडच्या गावाना गेलो होतो. कुमळे, तुडील वगैरे. महाडाहून दासगाव आणि दासगावहून कुमळे-तुडील म्हणजे काही फार अंतर नाही. पण तीन तास लागले होते. समोर झाडाझुडपाच्या प्रतिबिंबातल्या आठवणीही तरळत होत्या. त्याबरोबरच दोन दिवसांपूर्वीचा एक संवादही मला आठवत होता.

मला महाडाहून आंजर्ल्याला जायचे होते. तेव्हा माझे एक मित्र म्हणाले, “तुम्ही आंजर्ल्यापर्यंत जाणारच आहा तर केळशीलाही जा. फार सुंदर गाव आहे. आणि केळशीला जायचं तर आंजर्ल्याकडून जाऊ नका. बाणकोटकडून वेळासला जा आणि तिथून केळशीला जा. वेळासहून केळशीला जाताना एक पाखाडी लागत. तिच्या माथ्यावरून चारीकडचा देखावा इतका सुंदर दिसतो की तुम्ही तो कधी विसरणार नाही.”

मला तो सल्ला बरा वाटला. अनायासे नाना फडणिसाचे गाव पाहायला मिळाले असते. पण तिथेच बसलेले केळशीचे एक गृहस्थ म्हणाले, “तुम्ही त्या वाटेनं जाऊ नका. पाखाडीचा चढ तुम्हाला झेपणार नाही. आणि शिवाय ह्या दिवसांत पाखाडीच्या दुशीकडे ढोपरावेरी गवत वाढलेले असते. एखादवेळी जनावर आडवं जातं. शिवाय तुम्ही मुंबईचे. तुम्हाला इतकं चालायची सवय नसणार. तुम्ही आंजर्ल्याकडूनच केळशीला जा.”

मी म्हटले, “बघू.”

आणि मी आता बाणकोट-वेळासच्या वाटेनेच केळशीला जायला निघालो होतो. नवरात्राचे दिवस होते. दोन्ही बाजूचे डोंगर हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटांनी गच्च

भरले होते. भेंडाच्या झाडावर पिवळीधमक फुले फुलली होती आणि त्याच वेळी त्याची फुलासारखीच पिवळी पाने गळून वाऱ्याबरोबर झोके घेत हलके हलके पायऱ्यावरून उतरल्यासारखी खाली येत होती. शिमग्या-पाडव्याच्या वेळी लाल-शेंदरी दिसणारे पांगारे आता गर्द हिरवे दिसत होते. तीच स्थिती वसंतऋतूत केशरी-भगव्या शाली पांघरणाऱ्या पळसाची. आणि ही हिरवी शोभा डोंगर व्यापून उतरत उतरत पाण्यापर्यंत आली होती. रानफुलाच्या भोवती-भोवती घिरट्या घालणाऱ्या पिवळ्या-पांढऱ्या फुलपाखरांपैकी एखादी जोडी खाडीच्या ह्या किनाऱ्याकडून त्या किनाऱ्याकडे आपले चिमुकले, दुबळे दिसणारे, पंख हलवीत, हेलकावत, झोकांडत जाताना पाहिली तेव्हा वाटले. केवढासा जीव आणि काय हे साहस! ही अशी फुलपाखरे दरवर्षी फुलांच्या, मधाच्या शोधात इकडून तिकडे, तिकडून इकडे जात येत असतील. आणि दर वर्षी नवी पाखरे, नवी फुले! किती वर्षे ही ऋतूंची आवर्तने चालली असतील! आणि माझ्यासारख्या माणसाची ह्या खाडीच्या वाटेने जा-ये! ह्या सावित्री नदीच्या आसपासच्या डोंगरातली लेणीच दोन हजार वर्षांची जुनी आहेत. वाण्यांनी, सोनारांनी, सुतारांनी, माळ्यांनी, कारकुनांनी, कारभाऱ्यांनी, शेतकऱ्यांनी, सावकारांनी, स्त्रियांनी, पुरुषांनी, विरक्तांनी आणि सांसारिकांनी—अशा सर्वांनी पुण्य लागावे म्हणून कोरवलेली आहेत ती! आणि ही सगळी माणसे काही ह्या खोऱ्यातल्या गावाची रहिवासी नव्हती. कऱ्हाडपासूनची होती. मालाने लादलेल्या मोठमोठ्या मचव्यांची, शिडाच्या गलबतांची महाडापर्यंत ह्या खाडीने जा-ये होत असे. कोचीन-बंगळूरपासूनचे मचवे अजूनही ह्या खाडीने येतात. पण आता खाडी होरली आहे. मोठी गलबते गेलीच. पण एकूणच राबता कमी झाला आहे. आता तर आमची एकच एक लॉंच खाडीत आहे.

ती समोरच्या नाकाने पाणी कापीत चालली आहे. मागे फेसांच्या माळा रुंदावत, रुंदावत विरून जाताहेत. आजूबाजूच्या पाण्यात दोहीकडल्या डोंगरांचे आणि वरच्या स्वच्छ निळ्या आकाशाचे प्रतिबिंब, कधी रंगीबेरंगी आडव्या पट्ट्यांच्या पडद्याचे रूप घेऊन, कधी रुंद जाळी होऊन तर, कधी जुळणाऱ्या-तुटणाऱ्या दुव्यांच्या साखळ्या होऊन पडते आहे.

त्या सबंध खाडीत आमचीच तेवढी एकटी एक लॉंच, कधी ह्या किनाऱ्यावरचे तर कधी त्या किनाऱ्यावरचे बंदर घेत घेत "भक्-भक् भक्-भक्" करीत चालली आहे. लॉंचीत लोक आहेत. पण ते डोंगर, ते पाणी, आणि ते आकाश पाहाताना मध्येच केव्हा तरी आपण एकटेच आहो असे वाटते.

ही बाणकोटची खाडी. मला आठवते, पूर्वी कथा-कादंबऱ्यातला घरगडी नेहमी बाणकोटचा असायचा. "बाणकोटी बाळ्या". बाणकोटचा कुठला? बाणकोटच्या बंदरात बोटीने चढायचा-उतरायचा म्हणून बाणकोटी.

लोकांची चुळबूळ सुरू झाली. "बाणकोट आलं. चला उतरा." उतारू

एकमेकाना सागू लागले. माझे पाहणे अजून संपले नव्हते. पण उतरणे भाग होते. दासगाव सोडल्याला चार तास झाले होते. पण मला वाटले, किती थोडा वेळ लाँचीत होतो आपण. समोर बागमांडले आणि तिथून पलीकडे पेशव्याचे कुलदैवत हरिहरेश्वर. मी त्या बाजूला नजर टाकीतटाकीतच लाँचीतून उतरलो. आणि वेळासच्या वाटेने चालू लागलो.

खाडीच्या कडेला दगडधोंडे अस्ताव्यस्त पडले होते. त्यातूनच बाणकोट गावाची गधवती खाडीला मिळायला अनेक वाटानी आली होती. दगडावरून उड्या मारीत मारीतच ती ओलाडावी लागली शेपन्नास पावले गेल्यानतर स्वच्छ वाळूचा किनारा लागला तेव्हा बरे वाटले. डावीकडे बाणकोटच्या किल्ल्याचा कोट. उजवीकडे हिरवा-निळा समुद्र आणि मध्ये पिंगट वाळूचा पट्टा. मध्येच एखाद्या ठिकाणी पिंगट वाळूवर पसरलेली सिपीची हिरवीगार वेल आणि तिच्यावर फुललेली जाभळी फुले दिसली म्हणजे किनारपट्टीच्या पिंगट एकेरीपणात गडद रग भरून डोळ्याना विसावल्यासारखे वाटे.

वेळास गावात डोंगराच्या बाजूबाजूने रस्ता जातो. गाव जवळ आले तसे डोंगराच्या कपारीला बिलगलेली माकडे दिसू लागली. नंतर एक छोटासा धबधबा लागला आणि एक देऊळ. समुद्राला समातर असा एक रस्ता. त्याला आडवे जाणारे चारदोन रस्ते आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आब्या-फणसाच्या बागा, माडाच्या राया, आणि त्याच आवारांत घरे. कोकणातल्या समुद्रकाठच्या गावासारखे गाव. तासभर विसावा घेतल्यावर गाव पाहायला निघालो. पाहायचे म्हणजे नाना फडणिसांचे स्मारक. दुपारची वेळ होती. गाव अगदी शांत-सुप्त होते. स्मारकापाशी मी एकटाच होतो. एका चौखाबी मेघडबरीखाली नानाचा अर्ध-पुतळा बसवला आहे. आधीच नानांचे शरीर किरकोळ, मान उभट. वृंदावनासारख्या चौरस-उभट बाधकामावर तो अर्धपुतळा बसवल्यासारखा दिसत नाही. त्यातून वर आल्यासारखा—किंवा त्यात चिणून बसवल्यासारखा—दिसतो. पुतळ्याची—म्हणजे ज्याचा पुतळा आहे त्याची—देहयष्टी आणि पुतळ्याची बैठक ह्यात काही नाते असते, त्यात काही प्रमाण पाहिजे, ह्याची कोणी जाणीवच ठेवलेली नाही. ते बाहुले उभारले आहे (किंवा बसवले आहे) आणि नानाची आठवण जागत ठेवली आहे एवढेच समाधान. एरवी बरे वाटले नाही.

केळशीकडे जाण्यासाठी दुपारी तीन-साडेतीनच्या सुमाराला वेळास सोडले, आणि वीस-पचवीस मिनिटात ज्या पाखाडीची मला भीती घातली होती त्या पाखाडीशी आलो. "पाखाडीचा चढ उभा आहे.", "चढायला निदान पाऊण तास तरी लागतो.", "उगीच त्या वाटेने जाऊ नका." वगैरे वगैरे मित्रत्वाच्या सूचना कानात घणघणत होत्या. त्या ऐकून घेत पण त्याची पर्वा न करता चढायला आरभ केला.

दहा मिनिटातच चढण सपली आणि माथ्यावर आलो. ढोपरावेरी किंवा अधिकच उंच गवत दुशीकडे होते. पाखाडीच्या फरशीचे दगड मधे-मधे निखळले होते. पण जनावर वगैरेची दृष्टादृष्ट न होता, सुखरूपपणे वर आलो होतो. वर आल्यावर क्षणभर थाबलो आणि चौफेर पाहिले. एका बाजूला शरदृतूच्या वैभवाने संपन्न झालेले, दूरवर पसरलेले, डोंगरांचे चढ-उतार आणि दुसऱ्या बाजूला, तसाच दूरवर पसरलेला, निळा-करडा समुद्र. एकाच ठिकाणाहून असे दोन विस्तार क्वचितच दिसत असतील. दृश्य खरोखरच डोळ्यात पुन्हा पुन्हा साठवून घ्यावे असे होते. ज्यानी मला ह्या वाटेने केळशीला जायला सागितले होते त्याचे मनातल्या मनात आभार मानले. आणि "त्या वाटेने जाऊ नका." असे बजावून सागितले होते त्याचेही मानले. कारण त्याच्या बोलण्यात जरासा जोर दिसला म्हणून मी थोड्याशा हट्टानेच इकडून यायचे ठरवले होते. पुन्हा एकदा आपल्याभोवती फिरून सगळीकडे नजर टाकली आणि पाखाडी उतरायला आरभ केला.

केळशीला यायचे मी आपण होऊन ठरवले होते. गावाशी काही संबध नसताना इतक्या आडबाजूच्या ठिकाणी मी बाणकोटाहून चालत आलो याचेच यजमानाना मोठे कौतुक वाटले. त्यानी माझे फार आनदाने मनापासून आगतस्वागत केले. चहा वगैरे चालला असताना जवळच बसलेले एक गृहस्थ म्हणाले,

"इतक्या आडबाजूला मुद्दामसे आलात?"

कोकणात असा प्रश्न कोणी विचारला म्हणजे सावधपणाने उत्तर द्यावे म्हणतात. कारण कोणाच्या प्रश्नाचा काय रोख असेल सागता येत नाही. पण सावधपणाने उत्तर द्यायचे म्हणजे काय करायचे हे मला कुठे ठाऊक होते!

मी म्हटले, "या भागात आंजर्लेपर्यंत यायचच होतं, तर तुमचंही गाव पाहावं म्हणून आलो. ऐकल होतं की, पाहण्यासारख गाव आहे. स्वच्छ आहे. प्रशस्त आहे. ब्राह्मण-बस्ती बरीच आहे. महाराष्ट्रातली बरीच प्रसिद्ध माणसं तुमच्या गावची आहेत—"

"पुण्याचे डॉ० लागू—कॉंग्रेसचे, आणि आताचे तुमचे प्रसिद्ध नट डॉ० श्रीराम लागू—केळशीचेच. तसेच कॅमल इकचे दांडेकर इथलेच. आता बराच व्याप वाढवलाय् त्यांनी!"

"आणि सुप्रसिद्ध कानडी कवी द० रा० बेंद्रेसुद्धा केळशीचेच असं ऐकलंय्."

"होय. होय. बेंद्रे इथलेच मूळचे. आता खुद्द त्याचं इथे काही नाही. पण बेंद्र्याची काही घर आहेत अजून."

"मग नको होतं मुद्दाम येऊन पाहायला तुमचं गाव!"

गावातल्या एका पाखाडीवरून देवीच्या देवळाकडे चाललो होतो. तांबड्या मातीचे स्वच्छ रस्ते दोहो बाजूंना. नारळी-पोफळीच्या, आंब्या-फणसांच्या गर्द हिरव्या बागा.

त्यामुळे अगदी प्रसन्न वाटत होते. वस्ती मागे टाकतो न टाकतो तो लांब एका बाजूला मोठा डेरेदार घुमट असलेले दर्ग्यासारखे काहीतरी दिसले. तेच देवीचे देऊळ. इकडली बरीचशी देवळे मध्ये मोठा घुमट, चार कोपऱ्यावर चार लहान-लहान घुमट असलेले मनोरे अशी चौरस असतात, त्यामुळे लांबून पाहताना देऊळ पाहतो आहो की दर्गा ते कळत नाही. देवळाभोवती खूप मोठी मोकळी जागा आहे. पिपळाचे-उंबराचे मोठमोठे वृक्ष आहेत. त्याच्या प्रशस्त पाराची पडझड पाहिली की त्या स्थळाचा जुनेपणा जाणवतो. ते पाहताना मला हरिहरेश्वराच्या देवळाच्या वाटेवरच्या तशाच वृक्षांची आणि त्याच्या पाराची आठवण झाली.

देशावरच्या मानाने कोकणच्या लोकांना आपल्या गावाची ओढ जास्त असते. तिथे घर असले तर विशेषच. तिथे एखादे बाईमाणूस, नाहीतर चुलत किंवा चुलत-चुलत असे कोणीतरी असते. त्याच्याकडे मनीऑर्डर जात असते. वर्षा-दोन वर्षांनी ते स्वतः जातात. आणि गावाचा जो कोणी मुख्य देव किंवा देवी असेल त्याच्या उत्सवाला शक्य तर जातातच. केळशीच्या देवीचा उत्सव विशेष मोठा असतो आणि बाहेर गेलेले लोकसुद्धा बहुतेक येतात असे म्हणतात.

त्याच बाजूला थोडेसे लांब एका टेकाडावर याकूतसरवरचा दर्गा आहे. हे ह्या भागातले महत्त्वाचे स्थान आहे. हिंदू-मुसलमान सगळे त्याला भजतात, नवस करतात. एकदा एका मोहिमेवर जाण्यापूर्वी शिवाजी महाराजदेखील याकूतसरवरचा आशीर्वाद घ्यायला आले होते अशी आख्यायिका आहे.

केळशीहून आंजर्ल्याला बैलगाडीने गेलो. वाटेत उटंबळे नावाच्या गावापाशी खाडी लागली. होड्यावर गाडी ठेवली आणि बैल सोडवून पाण्यातून चालत नेले. होड्यावर गाडी घालीतो वेळ होता. खडकाळ ठिकाण. कोळ्याची बरीच वस्ती होती. ठिकठिकाणी कोळणी मासे वाळत घालीत होत्या. त्याचा दर्प हवेत पसरला होता. ब्राह्मणी गावातून आल्यानंतर तो नाकाला जरासा झोंबला.

मला आंजर्ले माहिती ते "कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० पो० आंजर्ले" ह्या औषधाच्या जाहिरातीमुळे. आणि तितक्यापुरतेच. ते कसे आहे ते आता पाहत होतो. तशी कोकणातली समुद्रकाठची सगळी गावे सारखीच! पण अगदी एकसारखी नाहीत. केळशी गाव आंजर्ल्यापेक्षा अधिक प्रशस्त तर वाटलेच, पण अधिक स्वच्छ आणि नेटके वाटले. आंजर्ल्याची पाखाडी अगदी खडबडीत वाटली चिरे खालीवर झालेले. काही उखळलेले. सरळ चालता येत नव्हते. पण गावाला बागा केळशी-सारख्याच गर्द हिरव्या. "आंजर्ल्याला काय पाहिलंत?" असे कोणी विचारले, (आणि विचारतातच) तर सांगता आले पाहिजे ' "कड्यावरचा गणपती पाहिला." आणि खराच पाहिला पाहिजे. कडा म्हणजे सह्याद्रीच्या कड्यासारखा उंच उभा कडा नाही. पण सह्याद्रीचाच आहे आणि आहे कडाच. देवळाच्या प्रशस्त आवाराच्या

कडेला जाऊन पाहिले म्हणजे मोवतालचा देखावा चांगला दिसतो. अर्थात् आसूद-जवळ केशवराजावरून दिसतो तसा नाही. किंवा केळशीच्या देवीच्या देवळा-जवळच्या सारखाही नाही. पण गावाला अभिमान वाटावा असा आहे.

आंजर्ल्याला आल्यावर मला खरी उत्सुकता होती मुर्डीला जायची. कारण ते रँग्लर परांजप्यांचे गाव. त्यानीच स्थापन केलेली गोखले प्राथमिक शाळा पाहून मुर्डीच्या वाटेला लागलो, आणि आजूबाजूला पाहतच राहिलो. इतके लक्ष्य वेधून घेणारे दृश्य होते. एका अंगाला डोंगरी उचवट्याची हिरवी भिंत आणि दुसऱ्या अंगाला नदीचे निळे पाणी आणि अधेमधे कुठे हिरवीपिवळी भातशेते, कुठे जंगली झाडे, कुठे फळझाडे, त्यात संध्याकाळची सूर्यास्तापूर्वीची वेळ. सगळ्या हिरव्या-पिवळ्यावर सोन्याचे पाणी चढले होते. जीवनाच्या सळसळत्या, रसरसत्या उत्साहाला मृदू प्रसन्नता आली होती. पण क्षणात अकल्पितपणे जीवनाचा आवेग उफाळला. रस्त्याच्या कडेला एका मोकळ्या जागेत दोन मस्त बैल एकमेकांसमोरून एकमेकांवर शिंगे रोखून आले आणि लगेच त्यांची साठमारी सुरू झाली. कसे पुष्ट, दगडातून कोरून काढल्यासारखे होते! पुठ्याच्या, खांद्याच्या, मानेच्या प्रत्येक स्नायूचा उठाव रेखलेला दिसत होता. ते जेव्हा मागे-पुढे पवित्रे घेऊन एकमेकाना भिडत तेव्हा अजिंठ्याच्या लेण्यातल्या तशाच एका साठमारीच्या चित्रासारखे दिसत. एक-दोन करता करता पाचपचवीस लोक ती झुंज पाहण्यासाठी शेताच्या बांधावर गोळा झाले. मी उभाच होतो.

त्याची ती झुंज पाहताना मला रँग्लराच्या पहिलवानी देहाची आठवण झाली. आणि त्याबरोबरच पूर्वी रँग्लर व्हायचे म्हणजे शाब्दिक 'कुस्ती'च करावी लागत असे असे ऐकल्याचे आठवले. होता होता एका बैलाची सरशी झाली. दुसरा मागे हटत गेला आणि मग दोन्ही बैल दोन दिशाना निघून गेले. पाच-सात मिनिटेच पण सगळे वातावरण चैतन्याने भरून गेले. मी मग पुढे जाऊन रँग्लराचे घर पाहिले आणि परत आंजर्ल्याला आलो. ह्या भागात आल्याचे सार्थक झाले.

खाडी ओलांडून दापोलीकडे जाताना, मराठी शिक्षण संपल्यानंतर काही दिवस वामन आबाजी मोडक हर्णैच्या कोर्टात उमेदवारी करीत होते, ही आठवण बरोबर घेतली. तसे आडे, हर्णै, मुरूड, दापोली, लाडघर, जालगाव आणि गव्हे ह्या सग-ळ्याच गावांशी मोडकांचा संबंध होता. आणि त्यांची सासुरवाडी पालगडची म्हणून पालगडशीदेखील. आणि साने गुरुजीही पालगडचेच. मला वाटते कोकणातले कोणतेही गाव उचलावे आणि मागे-पुढे फिरवून पाहू लागावे. तिथल्या कमीत कमी एका तरी माणसाने बाहेर जाऊन गावाचे नाव उजळलेले दिसेल. ह्या भागातून प्रवास करताना आपण जसे नारळ-सुपारी, आंबे-फणस पिकवून बाहेर पाठवणाऱ्या भूमीतून जात असतो, तसेच विलक्षण कर्तृत्वाची आणि बुद्धिमत्तेची माणसेही पाठवणाऱ्या

भूमीतून जात असतो हे गावोगावी जाणवते. पण मला पुष्कळदा नवल वाटते की, कोकणच्या लोकांची बुद्धी आणि कर्तृत्व जसे मोठे तसे मनही मोठे का नसावे! दापोलीला ऐकलेली हकीकत सांगतो. त्या वेळी नुकतीच म० म० पा० वा० काण्यांना 'भारतरत्न' पदवी मिळाली होती. काणे दापोलीचे त्यांचे शिक्षण तिथे झाले. तिथे ते शिक्षक होते. तिथे काही दिवस त्यांनी वकिलीही केली. त्यांच्या सत्काराचा प्रश्न निघाला तेव्हा कोणीतरी म्हणाले असे ऐकले, "कशासाठी? त्यांनी केलंय काय दापोलीसाठी? इथे त्यांच्या कर्तृत्वाला आरंभ झाला म्हणून खर तर त्यांनी आभार मानायला हवेत दापोलीचे." छान! मुरुडाला कर्व्यांची शताब्दी करायचे प्रयत्न चालले होते, तेव्हाही काही मुरुडकरांनी असेच उद्गार काढले होते. कोकणाने महाराष्ट्राला कर्तबगार आणि बाणेदार माणसे दिली पण साधुपुरुष दिला नाही. त्याचे कारण हेच असावे.

दापोलीहून दाभोळला (दाभोळेस म्हणायला हवे.) कोणत्याही दिवसात जावे, रस्त्याच्या दुतर्फाचा भूभाग मनोवेधकच दिसेल. पण पावसाळ्यात किंवा पावसाळ्या-नंतर डोंगर-माळ पिवळे-तांबडे होण्याच्या आधी जावे. दृष्टी तृप्त होते. डावी-उजवीकडे पाहावे, जमिनीचे प्रचंड वहिर्गोल विस्तार एकाखाली एक उतरत पसरत जाताना दिसतात. तुरळक झाडी, मोठे जंगल नाही. सगळा विस्तार हिरवागार. मध्येच एखादा काळा-तांबडा खडक डोके वर काढतो आणि आपल्या काळेपणाने त्या हिर-व्यात उठून दिसतो. पावसाची झिमझीम असो की सरींची सरसर असो, त्या हिरव्या उतरत्या विस्तारावरून नजर नाचत जाते. आणि तिच्या पाठोपाठ आपण धावू लागावे असे वाटते.

दृष्टीचे हे असे लाड चाललेले असतात. आणि आपण दाभोळकडे चाललेले असतो. आणि मग दाभोळ आणि दाभोळची खाडी आपल्या दृष्टीच्या टप्प्यात येतात ती एकदम आपल्या पायाशी. जणू आपण गरुडाच्या पंखावर असतो. किंवा त्या क्षणी टेनिसनच्या कवितेतला 'ईगल'च असतो. टेनिसनच्या 'ईगल'ला दिसला असेल तसाच तो समुद्राचा देखावा आपल्याला दिसतो. अलिकडे डोंगराच्या पायथ्याशी माडाच्या झाडांची हिरवी कारंजी फवारत असतात आणि झेप घेऊन सूर मारल्यासारखे आपण त्या फवाऱ्याच्या पोटात शिरतो. झाडी इतकी की भर दुपारी अंधार असल्यासारखे वाटते.

पण गाव किती जुने आहे! काही काही गावांचा जुनेपणा त्यांच्या मातीतच दिसतो. खालाटीत डोंगराला अगदी लागून वसले असल्यामुळे असेल किंवा झाडांच्या गर्दीमुळे असेल, गाव मोकळे, प्रसन्न वाटले नाही. आणि खरोखर गाव आहेच जुने. हजार-दीड हजार वर्षांचे. एका काळचे कोकणातले अगदी महत्त्वाचे बंदर. देश-परदेशचा माल नेणारी-आणणारी शेकडो गलबते ह्या बंदरात नांगरून पडलेली

असत. ह्यातून जात-येत असत. देशातले सोने, चांदी, तांबे, कापड, सुगंधी द्रव्ये चिपळूणच्या वाटेने इथे यायची. आणि परदेशातले घोडे, मदिरा आणि राजासाठी गोऱ्या भोगदासीसुद्धा इथे यायच्या. ह्या सगळा माल दाभोळच्या पेठेत उतरत असे देशोदेशीच्या व्यापारी सावकारांच्या इथे पेढ्या असत. मलिक काफूरसारख्याला म्हणून भरपूर लूट मिळत असे. ते गजबजलेले गाव आज झोपल्यासारखे दिसते. त्या बाजारपेठेत आज फार तर जवळपासची नारळ-सुपारी आणि मंगलोरची कौले विकत असतील. त्या बंदराच्या धक्क्यावर आज बोटीची वेळ नसली तर चार माणसेही फिरकत नाहीत.

दाभोळच्या जुन्या वैभवाची एकच खूण आज उभी आहे, ती बंदराशेजारची, विजापूरच्या साहेबजादीने—आयेशाबीबीने—सोळा लक्ष रुपये खर्चून बांधवलेली 'मा साहेबाची मसजिद'. इतकी भव्य आणि सुंदर वास्तू आज ह्या भागात दुसरी नाही. दाभोळमधल्या काजींनी आणि मौलवींनी तिला खास विनंती केली नसती तर ही मसजिदही बांधली गेली नसती आणि निळ्या आकाशाच्या आणि हिरव्या झाडीच्या पार्श्वभूमीवर तो पांढुरका भव्य डेरेदार घुमटही दिसला नसता आणि आतल्या भागात दगडावरचे कोरीवकाम दिसते तेही दिसले नसते.

मी ऐकले होते की, बसमधून उतरून कोणी गावात येऊ लागला की, गुहागरचे लोक डोळ्यावर हात धरून, येणाऱ्या माणसाकडे डोळे किलकिले करून पाहत दारात उभे राहतात आणि "कोणाकडे जायचँय्?" असे विचारून आपल्या घरावरून पुढची वाट दाखवतात. गुहागरला बसमधून उतरताना त्याच्याबद्दलचा हा लौकिक माझ्या मनात होता पण मला गुहागरकराची सत्त्वपरीक्षा करायची नव्हती तसेच खरे, परचुरे, फडके, ओक वगैरे जे कोणी आजचे, कालचे किंवा मूळचे गुहागरचे असतील त्यांच्या कुळाचे संशोधनही मला करायचे नव्हते त्यामुळे "तुमचँ इथँ कोणी नाही." असेही त्यांच्या तोंडून वदवायचे नव्हते. ज्या सिद्ध-पुरुषाने मुरूड वसवले होते त्याने आपल्या भावाला—पद्माकर भट्टाला—'गोहागर' वसवायला तिथे ठेवले होते. आणि मुरूडाच्याच धाटणीवर त्याने ते वसवले होते आणि मुरूडाप्रमाणेच वसवतेवेळी ते जसे होते तसेच जवळजवळ आजही आहे. म्हणजे समुद्राला समांतर उभा रस्ता आणि त्याला आडवे जाणारे चार-दोन रस्ते, शिवाय हरिपंत फडक्याचा वाडा (म्हणजे त्याचे जोते), त्यांनी बांधलेले लक्ष्मीनारा-यणाचे मंदिर, आनंदीबाई पेशव्याचे 'देवघर' तिथे आहे. आणि विशेष म्हणजे वासुदेवशास्त्री खऱ्यांनी "राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव" असे ज्या भूमीबद्दल म्हटले होते त्या कोकणभूमीचा हा एक नमुनेदार तुकडा आहे. हे सगळे मला पाहायचे होते. त्यासाठी आम्ही आलो होतो.

बसमधून उतरतो तो उजवीकडे व्याडीश्वराचे देऊळ दिसले. सहज जोडा काढून

आत गेलो. मध्ये शंकर आणि चार कोपऱ्यात देवी, विष्णू, सूर्य आणि गणपती असे शिवपञ्चायतन आहे. सभामंडपात भव्य नंदीचे दर्शन झाले. तिथेच सभामंडपात शांत, गभीर स्वरात रुद्राचे आवर्तन चालले होते. क्षेत्रांच्या ठिकाणी यात्रेकरूकडून पैसे घेऊन भाडोत्रीपणे कसेतरी ओढून काढतात तसे इथे नव्हते. त्यामुळे म्हणणे स्पष्ट आणि एक प्रकारच्या एकतानतेने चालले होते. ते ऐकत राहावेसे वाटले. त्याच वेळी आतल्या बाजूला किंचित सखल गाभाऱ्यात पिंडीजवळ बसून एक गृहस्थ सथ लयीत मंद स्वरात दक्षिणामूर्ति-स्तोत्र म्हणत होते. त्यामुळे सगळीकडे गंभीर वातावरण निर्माण झाले होते आणि तिथून हलू नयेसे वाटत होते. पण घड्याळाने बाहेर ओढले.

हरिपंत फडक्याच्या वाड्याचा चौथरा दगडी, मोठा आणि मजबूत आहे. त्यावर वाडा असेल तेव्हा तो खूपच भव्य दिसत असेल. वाड्याच्या आवारात नारळी-पोफळींची बाग आहे, ती मागे समुद्रापर्यंत गेली आहे. आवारभर फिरून बाहेर येतो तो कवाडीशीच एक गृहस्थ सामोरे आले आणि कोण, कुठून आलात वगैरे आमची चौकशी केली. आणि मग म्हणाले,

"ग्वागरासालेतहा. तसे जाऊ नका. घरी येऊन काही तरी घेतलँ पाहिजे."

आणि आम्ही नको-नको म्हणत असताना त्यांनी आम्हाला आपल्या घरी नेले. दहीपोहे, पापड, लोणचे असे आम्हाला खायला दिले, आणि आग्रहाने खायला लावले मधूनमधून "ग्वागरासालेतहा. तसँ कसँ जाऊ दऊ तुम्हाला!" असे म्हणत होते. सगळे खाणेपिणे झाल्यावर गड्याला पाठवून माडावरून नारळ काढायला लावले आणि ओंजळभर पोफळे आणवली. म्हणाले, "नारळ फोडून बघू. असलँ नशिबात तर मोहाचे उतरतील. नेहमीच उतरतात असँ नाही. पोफळँ घेऊन जा देशावर मिळायची नाहीत."

असे म्हणून नारळ फोडायला लावले ते आमच्या नशिबाने मोहाचे उतरले. आम्हाला तर आनद झालाच, पण त्यानाही झाला.

ह्या आदरातिथ्याने आम्ही अगदी भारावून गेलो. म्हटले, गुहागरकराबद्दल ऐकले होते काय आणि प्रत्यक्ष अनुभवतो आहो काय! ("ग्वागरासालेतहा" "ग्वागरासालेतहा" असे ते सारखे म्हणत होते ते काय ते बराच वेळ आधी कळले नाही. पण मग एकदम लखकन् प्रकाश पडला, "गुहागरास आलेत आहा" असे ते म्हणत होते). वेळास आणि केळशी इथेही माझे असेच भरगच स्वागत झाले होते. एकूण कोकणस्थाच्या प्रत्यक्ष कंजुषपणापेक्षा कंजुषपणाचा दुर्लौकिकच जास्त असावा!

हरिपत फडक्यानी बांधलेले लक्ष्मीनारायणाचे मंदिर लहान पण सुंदर आहे. समोरच तळे असल्यामुळे त्याची शोभा वाढली आहे. मदिर दाखवणारे गृहस्थ म्हणाले, "फडक्यांचे मातुल घराणं खऱ्याकडलं." देवळाची पूजा-अर्चा, व्यवस्था खऱ्याकडेच आहे. पण कुटुबाचा विस्तार होताहोता, सोयर-सुतकामुळे पूजेत खड पडू लागला तेव्हा पिढ्या तोडल्या.

२२३०७ प्रवास

फडक्याचा एक वाडा वरच्या आळीला देवीच्या देवळाकडल्या बाजूला आहे आणि अजून उभा आहे असे त्यांनी सांगितले. तोही आम्ही पाहिला. पण तो वाडा म्हणजे कोकणातल्या ठराविक पद्धतीचे पण मोठे घर आहे तिथे जी माणसे होती त्यांनीही आमच्यासाठी नारळ मुद्दाम काढले आणि तेही मोहाचे उतरले.

आनंदीबाईंचे देवघर म्हणतात ते अगदी समुद्रकाठी आहे. ते एखाद्या दिवाण-खान्यासारखे आहे. त्यात सुरूच्या खांबाचा आणि मेहरपी कमानींचा एक लाकडी सभामंडप आहे. त्यातला नाजुकपणा, रेखीवपणा पाहण्यासारखा आहे. ज्या घरात आनंदीबाईंचे देव ठेवले होते तो आता डाकबंगला आहे.

गुहागरातले देवीचे देऊळ मुरुडातल्या देवीच्या देवळापेक्षा अगदी वेगळे आहे. त्याला उंच दगडी जोते नाही. नक्षीकाम केलेले खांब नाहीत. ते एखाद्या घरासारखे दिसते. देवळापर्यंत एका लांब पाखाडीने जावे लागते. वाटेने दोन्ही बाजूंना बागा आहेत. देवळासमोर खूप मोठी जागा आणि तळे आहे. त्यामुळे तिथे गेल्यावर गोव्यातल्या एखाद्या देवळात गेल्यासारखे वाटले.

मुरुडाच्या बरोबरीने वसलेले गुहागर मुरुडापेक्षा लांबीला पुष्कळच अधिक आहे. जवळजवळ तीनचार मैल आणि घराभोवतीच्या बागाइतीचा पट्टाही अधिक रुंद आणि अधिक गर्द वाटला. गाव अधिक समृद्ध आणि त्यात गजबजही जास्त दिसली. मुरुडासारखी परिसराची विविधता गुहागराला नाही. पण गुहागरातल्या काही वास्तू आपल्याला पेशवाईत घेऊन जातात. मुरुड आपल्याला एकोणिसाव्या शतकात तर गुहागर अठराव्या शतकात घेऊन जाते.

गुहागराहून वेलंदूरला जाऊन डगर उतरून खाडीच्या काठी आले की समोर दाभोळ दिसते. आणि काळ्या-हिरव्या झावळ्याच्या गर्दीत मासाहेबाच्या मसजिदीचा भव्य डेरेदार घुमट हिरव्या मखमलीने मढवलेल्या तबकडीवर ठेवलेल्या मोत्यासारखा दिसतो. दापोलीहून येताना डोंगराच्या माथ्यावरून दाभोळ पाहिले होते त्यापेक्षा हे अगदी वेगळे होते. पण तितकेच किंबहुना अधिक वेधक, कारण आता त्या चित्राला खाडीचा पुरोभाग लाभला होता. आणि त्यात दाभोळचे प्रतिबिंब पडले होते.

कोकणातल्या कोणत्याही गावी जावे. डोंगर, नदी, खाडी ह्यांपैकी काही किंवा ही सगळी असायचीच. डोंगर देशावरल्यासारखे तापत नाहीत, कुठे धूळ उडत नाही. मळकटपणा, कळकटपणा नाही. पाणी आणि झाडी सदैव असल्यामुळे मन प्रसन्न होते. म्हणूनच परशुरामाच्या ह्या भूमीला 'तत् चित्तपावनं क्षेत्रम्' म्हटले असावे.

# तेप्पा देखून जा

'उयाग नी म्हूण एक पायार उभारली पापऽ—'

'अत्त सरि, स्वल्प हिंदे-मुंदे नोडु.'

मराठीसारखे काहीतरी कानावर आले म्हणून मी मागे वळून पाहिले. दुकानाच्या फळीवर एक पोक्त बाई उभी होती. आणि तिच्या शेजारी सात-आठ वर्षांची एक मुलगी होती. दोघींचीही उभे राहण्याची पचाईत होती. कारण गर्दी अतोनात होती. सगळयाना दसऱ्याची मिरवणूक पाहायची होती. मीही म्हैसूरचा दसरा पाहायलाच आलो होतो. स्टॅच्यू स्क्वेअरपासून बन्नि मंडपापर्यंत माझ्यासारखेच हजारो लोक रस्त्याच्या दोन्ही बाजूला एकमेकांना रेटीत, चवड्यावर उभे राहून, माना ताणून-उंचावून म्हैसूरची दसऱ्याची स्वारी पाहत होते. निशाणीचा हत्ती येऊन गेला. त्याच्या मागून घोडेस्वार, सांडणीस्वार, पायदळ, ह्याच्या पलटणीमागून पलटणी चालल्या होत्या. प्रत्येक दलातल्या शिपायाचा एकसारखा एक, पण इतर दलातल्या शिपायापेक्षा निराळा पोशाख, त्यांच्या हातांतल्या तळपत्या तरवारी, भाले, बंदुकीची बागनेटे, चकाकणारी बटणे, बकले, ह्यांच्यावरून सध्याकाळचे सूर्याचे किरण परावर्तित होत होते त्यामुळे नक्षत्राचीच मिरवणूक चालल्यासारखे वाटे. पलटणीच्या मागून सरदार, दरकदार, मानकरी पायीच गटागटाने आले. डोक्यावर म्हैसुरी पद्धतीचे आयते बाधलेले जरीकाठी पांढरे रुमाल, काळ्या अल्पाकाच्या शेरवान्या, खाद्यावर परीट-घडीची जरीकाठी उपरणी, ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणे, दर्जाप्रमाणे कमरेला जरीचे किंवा चामड्याचे बगलूस, पांढऱ्या शुभ्र इस्तरी केलेल्या विजारी आणि पायात...पायात काही नाही! हे काय? हे एवढे मोठे सरदार-अंमलदार रस्त्याने पायी जाताहेत, पण कोणाच्याही पायांत पायतणे नाहीत. मला वाटले होते, पेटट लेदरचे चकचकीत पंप शू तरी असतील. पण नाही. सगळे अनवाणी. मला मोठे आश्चर्य वाटले. दुपारी मी पाहिले होते तेव्हाही मला असेच नवल वाटले होते! दोन-दोनशे रुपयाची जरीकाठी रेशमी लुगडी नेसलेल्या, दोन्ही नाकपुड्यात, कानांत, हिऱ्याचे दागिने, कमरेला सोन्याचे कंबरपट्टे, हातात गोटपाटल्या, तोडे (काहींच्या बड्याळे), दडांत वाकी अशा सजलेल्या, गजगतीने चाललेल्या स्त्रिया, घरंदाज असतील, श्रीमंत तर दिसतच

होत्या पण पायात काही नाही! भर दुपारच्या उन्हात डांबरी रस्त्यावरून अनवाणी चालल्या होत्या. मुंबई-पुण्याकडे असे दृश्य दिसायचे नाही. तसेच हे सरदार मानकरी! पेशव्यांच्या स्वारीबरोबर शिलगणाला जाणारे सरदारदेखील असेच अनवाणी जात असतील का? असे मी मनाशी विचारीत होतो, पण माझे लक्ष होते महाराजांची स्वारी येणार होती तिच्याकडे. पायी चालणाऱ्या सरदार-अंमलदाराच्या मागून मोठमोठ्या घोड्यांच्या गाड्यात, शृंगारलेल्या छत्राखाली, खुर्च्यांवर आणखी सरदार वगैरे लोक बसलेले होते. पायी चालणाऱ्यांना चालण्याचा उद्योग तरी होता. एकाएका गाडीत बसलेल्या त्या आठ-आठ, दहा-दहा लोकाना तोही उद्योग नव्हता. ते दुतर्फा उभ्या असलेल्या गर्दीकडे पाहत होते. आपापसात बोलल्यासारखे करीत होते. आणि वेळ काढीत होते. एवढे बरे होते की गाड्या चालत होत्या. एक गेली, दोन गेल्या, तीन, चार—बऱ्याच गेल्या. महाराजांची स्वारी येते आहे. जवळ आली. आलीच. धीरे धीरे, एकएक पाऊल टाकीत, महाराजांना घेऊन स्वारीचा हत्ती आलाच.

पहाडासारखा भव्य—काळाकभिन्न, नखे, पाय, सोंड, कान, डोळ्याच्या आसपासचा भाग, कपाळ वेगवेगळ्या रंगानी, रंगीबेरंगी वेलबुट्टयानी सुशोभित केलेले. पायात चांदीच्या साखळ्या, पुढे आलेल्या लांब बाकदार सुळ्यावर अंतरा-अंतरावर चांदीचे पट्टे घातलेले, आणि त्याना रेशमी जरतारी गोंडे लावलेले, पाठीवर भरजरी मखमली झूल घातलेली, असा तो हत्ती एखाद्या राजासारखा रुबाबदार दिसत होता. गजराज-वर सोन्याच्या अंबारीत महाराज बसलेले. भव्य मूर्ती. डोक्याला भरजरी रुमाल, त्यावर हिरे-मोती, पाचू-माणके जडवलेला शिरपेच. उजव्या बाजूला टपोऱ्या पाणीदार मोत्यांच्या सराचा घोस. अंगात भरजरी शेरवानी. गळ्यात हिऱ्यामोत्यांची पेंडे, दंडावर रत्नजडित बाजूबंद, कानात हिऱ्याची कर्णभूषणे, कपाळावर गंधाचा टळक टिळा. सगळे तेज पुंजाळून त्या अंबारीत एकत्रित झाले होते. हे सगळे लक्षावधी लोक आपल्या महाराजांना (आणि आपल्यालाही) पाहण्यासाठी 'उत्कंठ' झालेले आहेत हे माहीत असल्यासारखा तो गजराज थबकत-थबकत, थांबत-थांबत, चालला होता.

हे सगळे लक्षावधी लोक खरोखरच नुसते दसऱ्याच्या मिरवणुकीचे वैभव पाहायला आलेले नव्हते. किंवा नुसते आपल्या महाराजांचे अलंकार पाहायला आलेले नव्हते. ते आपल्या महाराजांना पाहण्यासाठी आलेले होते. उत्तरेकडे जसे बडोदे तसे दक्षिणेकडे म्हैसूर हे एक आदर्श राज्य होते. एकामागोमाग दोन महाराजांनी आणि त्यांच्या कारभाऱ्यानी प्रजेच्या कल्याणासाठी, आणि समृद्धीसाठी, तळी, कालवे, पाट, खाणी, कारखाने, इस्पितळे, शाळा, कॉलेजे काढली होती. सगळीकडे वीज खेळवली होती. राज्यकारभार प्रजेसाठी चालवला होता. गांधीजींनी म्हैसूरच्या राज्याला 'रामराज्य' म्हटले होते. अशा दोन प्रजाहितदक्ष महाराजांनंतर

महाराज जयचामराज सिंहासनावर आले होते. तेही तसेच प्रजाहितदक्ष होते. म्हणूनच ते लोकप्रिय होते. विद्याची, कलाची कदर करणारे, स्वतः विद्वान होते. त्या आपल्या महाराजांना पाहण्यासाठी लक्षावधी प्रजाजन आलेले होते. आणि माझ्यासारखे बाहेरचेही हजारो लोक आलेले होते. गर्दी करून दुतर्फा उभे राहिलेल्या त्या लोकांच्या चेहऱ्यावर आनंद, प्रसन्नता, आदर, कृतज्ञता, उत्कंठा ह्यांची गर्दी झालेली दिसत होती. ठेक्यात पावले टाकीत हत्ती पुढे पुढे चालला. त्याबरोबर लोकाचे नमस्कार, धन्यवाद आणि जयघोष स्वीकारीत महाराजाची स्वारीही पुढे पुढे गेली.

स्वारी पुढे गेली, आणि फुटपाथवरचे लोक रस्त्यावर बरंगळू लागले. माझ्या कानावर मराठी शब्द पडले होते ते मी झेलून धरून ठेवले होते. ती बाई तिथून जायच्या आत तिच्याशी बोलायला मिळावे म्हणून मी तसाच मागे तिच्याकडे वळलो आणि म्हणालो,

"बाई, तुम्ही मराठी का?"

ती म्हणाली, "हो, का?"

मी म्हटले, "मला सुब्बरायन् केरेचा रस्ता सांगा."

तिने सांगितला आणि मला विचारले, "पुण्याहून आले काय हो! दसरा देखाला? कस्लेतो आमचे रावराजा?"

त्या बाईच्या मनातली महाराजाबद्दलची भक्ती, अभिमान आणि कौतुक पाहून मी हेलावलो आणि म्हणालो,

"फार चांगले आहेत तुमचे महाराज. त्यांची कीर्ती ऐकूनच मी म्हैसूरचे महाराज आणि म्हैसूरचा दसरा पाहायला आलो."

"चामुंडी दर्शन केलात की! तेप्पा देखून जा."

मी बरे म्हटले.

आदला दिवस आयुधपूजेचा होता. आयुधपूजेच्या दिवशी पाऊस पडलाच पाहिजे म्हणतात. त्याप्रमाणे पडला होता. आधीचेच स्वच्छ वातावरण आणखी धुतल्यासारखे झाले होते. मी सकाळीच नंजनगुडला जाऊन आलो होतो.

'नंजु' म्हणजे विष आणि 'गुडी' म्हणजे देऊळ. नंजनगुडला नंजुडेश्वराचे शंकराचे देऊळ आहे. देऊळ भव्य आहे. देवळातला काळ्याकुळकुळीत घोटलेल्या दगडाचा भव्य नंदी ऐटबाज आणि फार प्रेक्षणीय आहे. देवळात सगळीकडे लिंगायतांची गर्दी होती. देवळाच्या रस्त्यावर दुकाना-दुकानातून भस्माचे लहानमोठे, लांबोळके गोळे आणि शंकराची लहानमोठी लिंगे विकायला ठेवली होती. देवळासमोरच्या दोन लाकडी रथावरचे कोरीव कामही फार रेखीव, सुबक आणि कुसरीचे होते.

परत येताना मी टांगेवाल्याशी सहज हिंदीत बोलायला सुरवात केली. मला वाटले,

मुसलमान असेल, आणि हिंदी कुठेही परठिकाणी बोलायला बरी म्हणून त्याला त्याचे नाव विचारले. म्हणाला, "खंडेराव".

मी म्हटले, "तू मराठी आहेस!"

तो म्हणाला, "हो: खंडेराव महाडिक."

"इथे बरेच मराठी लोक आहेत का?"

तो म्हणाला, "लय हायत्. पोलिसात हायत्, मिलट्रीत हायत्. माझा भाऊ महाराजाच्या पॅलेसमध्ये शिपाई हाय."

दुपारची वेळ झाली होती. मी टांगेवाल्याला म्हटले, "मला एखाद्या चांगल्या मराठी हॉटेलकडे ने. आहे ना चांगलं हॉटेल?"

"हाय की." असे म्हणून एका हॉटेलसमोर आणले. समोर पाटी होती. "मिलिटरी हॉटेल".

मी म्हटले, "हे काय? हे तर मिलिटरी हॉटेल आहे."

"मिलिट्री म्हणजेच मराठी." असे सांगून पैसे घेऊन तो निघून गेला.

ते 'मिलिटरी हॉटेल' मराठी म्हणजे मराठ्याचे होते. जेवण कोल्हापूरच्या सारखे तिखट होते.

दिवेलागणीनंतर चामुंडी टेकडीवरून खाली पाहिले. शहराचा देखावा कल्पनेतल्या एखाद्या यक्षनगरीसारखा दिसत होता. सगळे शहर, रस्ते, घरे तर विजेच्या प्रकाशाने उजळली होतीच. त्यात राजवाडे रत्नपुंजासारखे उभे राहिले होते. आणि महाराजांचा राहता राजवाडा तर नाना रत्नांच्या विविध अलंकारांच्या प्रदर्शनात एखादाच दागिना आपल्या वेगळ्या वैभवाने उठून दिसावा तसा दिसत होता.

मला आज रात्री सुब्बरायन् केरेला जायचे होते. म्हैसुरात आल्यासारखे एखादे जुन्या परंपरेतले कानडी नाटक—शक्य तर 'यक्षगान'—पाहायचे असे मी आधीपासूनच ठरवले होते. आमच्या हॉटेलवाल्यांना त्याबद्दल विचारले. तेव्हा ते म्हणाले,

"तुम्ही सुब्बरायन् केरेला जा. तिथे गुब्बी वीराण्णाच्या कंपनीच दशावतारी नाटक चालू आहे ते पाहा. फर्स्ट क्लास कंपनी आहे."

रात्री जेवण झाल्यावर मी सुब्बरायन् केरेच्या वाटेने निघालो आणि डावे-उजवे, डावे-उजवे अशी वळणे घेत घेत सुब्बरायन् केरेला पोचलो. खूप मोठा तंबू उभा केलेला होता. नाटक सुरू झालेले होते. तिकीटऑफिस बंद होते! तिकीट मिळणे शक्य नव्हते. दारावरचा माणूस साहजिकच तिकिटावाचून आत सोडीना. शेवटी मी मॅनेजरना भेटलो आणि "मी मुंबईचा माणूस आहे. मला कसही करून तुमच्या कंपनीच नाटक पाहायचय. फार कीर्ती ऐकली आहे." असे सांगितले!

त्यांनी पाच रुपयांच्या रांगेत एक खुर्ची टाकली आणि तीन रुपये घेऊन मला बसायला दिली.

नाटक नव्हतेच ते! विष्णूच्या प्रत्येक अवतारातली दृश्ये दाखवली जात होती. मी गेलो तेव्हा वराहावतार संपत आला होता. आणि नरसिंहावतार सुरू व्हायचा होता. दृश्य, पोषाख, दिवे वगैरेचा खूप झगझगाट होता. बदुकीचा बार होऊन झटपट देखावे बदलत होते. अभिनय कृत्रिम, ठोकळेबाज आणि अतिरंजित होता. गाण्याच्या चाली मराठी नाटकातल्यासारख्याच होत्या. भाषणे आवाजाचा लयबद्ध चढउतार करून कृत्रिमपणे म्हटली जात होती! भाषा अत्यंत संस्कृतप्रचुर. हिरण्यकश्यप कयाधूला म्हणत होता, "ई शब्दगळनु केळि नन्न हृदयल्लि झंझावातवुत्पन्नवागिदे" (शब्द, हृदय, झंझावात, उत्पन्न=अर्थ कळायला काही अडचण पडू नये). पण एकदर प्रयोगात सफाई होती आणि नटनटींचे रूप अत्यंत देखणे होते.

रात्री दोन-अडीचच्या सुमाराला नाटक संपले. लोक पांगू लागले. वाहन एकही मिळेना. येताना रस्त्यावर झगझगाट होता. आता अंधार. आभाळात ढगही गोळा झाले होते. रस्ता माझ्या जेमतेमच लक्षात होता. स्टॅच्यू स्क्वेअरची वाट कोणती! म्हणून कोणाला विचारण्याचा धीर होत नव्हता. कारण मी परका आहे हे त्यामुळे आपोआपच उघड होणार होते. सारखी धाकधूक वाढत होती. तसाच भीत-भीत, दिशेचा अदमास लक्षात ठेवून कसा तरी हॉटेलवर येऊन पोचलो. 'यक्षगान' पाहायला मिळाले नव्हते. पण गुब्बी वीराण्णाच्या प्रसिद्ध कंपनीचे नाटक पाहायला मिळाले होते. तेवढेच समाधान.

लांब टेकडीवर गोमटेश्वराचे खांदे आणि मस्तक दिसू लागले. श्रवण बेळगुळा (श्रमणाचे रुपेरी जलकुंड) आलेच. म्हैसूरपासूनचा रस्ता खडी उखळलेला, खडबडीत, अगदी वाईट होता. पण दसऱ्याचे दिवस होते. वनश्री वैभवात होती. ठिकठिकाणी तळी, कालवे, पाट आणि त्याच्या आसपास बागा होत्या. झाडे, वेली असल्यामुळे प्रसन्न होते.

गोमटेश्वराच्या पायथ्याशी उतरल्यावर समोर तो पाच-सहाशे फूट उंचीचा उघडा-बंब खडक पाहिल्यावर छातीत धडकीच भरली. अकरा-साडेअकरा वाजलेले, वरून ऊन तापते आहे. आणि समोर तो नुसता दगड आणि त्यातून खोदून काढलेल्या त्या पायऱ्या. त्या चढून वर जायचे कसे? पण जायचे तर होतेच. वरून गोमटेश्वर म्हणत होता, "इतका दूर माझ्यासाठी आलास आणि आता दारापर्यंत येऊन परततोस. तुझ्यापेक्षाही लाबून, तुझ्यापेक्षाही थकलेले स्त्री-पुरुष यात्रेकरू येतात ते कटाळत नाहीत. ते श्रद्धेने येतात. तुला श्रद्धा नसेल, पण मला पाहण्याची इच्छा आहे ना? मग तू का कटाळतोस?"

खरे होते. आणि तो प्रचंड खडक तसा खराच उघडा असला तरी त्याला मध्ये मध्ये फटी पडल्या होत्या. त्यातून लहानमोठ्या खडकाच्या खालून गवत उगवले होते. त्याची वेगवेगळ्या आकाराची पोपटी पाती आणि रानझुडपाची पिवळी-जांभळी फुलेही

सांगत होती की "खडक काही इतका ओकाबोका नाही. आम्ही आहोत की इथे!"

आणि मी टेकडी चढायला सुरुवात केली. अगदी लांबून पुतळ्याचे खांदे आणि मस्तक दिसते आणि अगदी जवळ पायथ्याशी आल्यावरही तेवढेच दिसते. कारण त्याच्या भोवती बांधलेल्या ओवऱ्यानी मुळी खालचा भाग सगळा झाकूनच टाकला आहे. त्यामुळे सगळ्या पुतळ्याचे दर्शन घ्यायचे तर त्या सहाशे पायऱ्या चढून गेलेच पाहिजे. पण वर आवारात गेल्यावरसुद्धा सत्तावन फूट उंचीची ती मूर्ती एका दृष्टिक्षेपात सगळी कुठे सामावून घेता येते? पहिल्याने तिचे रुंद खांदे, भव्य मस्तक, क्षितिजाकडे लागलेली शांत, स्थिर दृष्टी, आणि किंचित स्मित करणारे ओठ दिसतात. आणि आपण थक्क होऊन पाहत राहतो. दोनचार वेळा डोक्यापासून पायापर्यंत आणि पायापासून डोक्यापर्यंत दृष्टी फिरवावी तेव्हा कुठे सगळी मूर्ती डोळ्यांत ठसते. मूर्तीच्या आकाराच्या मानाने भोवतालची सोडलेली जागा इतकी लहान आहे —तिचीही मूर्ती पाहायला अडचण होते.

आपण फार जवळून पाहतो म्हणून असेल, पण मूर्ती ताठर वाटते. आणि थोडी आखडल्यासारखी. पण एक प्रकारे ते साहजिकही आहे. आपल्या भावाला—भरताला—पराजित करून, पुन्हा त्यालाच राज्य देऊन टाकून गोमटेश्वर तपश्चर्येला म्हणून निघाला तो इथे इंद्रबेटावर गुप्त झाला. पुढे सुमारे हजार वर्षांपूर्वी गंगाराजा राजमल्लाच्या प्रधानाने, चामुंडरायाने, समोरच्या चंद्रबेट्टाच्या शेजारून मारलेला सोन्याचा बाण ह्या इंद्रबेट्टाच्या शिखरावर पडला तेव्हा गोमटेश्वराचे मस्तक प्रकट झाले. आणि मग वज्राच्या छिन्नीवर रत्नजडित हातोड्याचे घाव पडत गेले तशी त्याची सबंध मूर्ती प्रकट झाली. पण मागल्या बाजूने कंबरेखाली आधारासाठी खडक राहिला तो राहिलाच.

तपश्चर्येला उभा राहिलेल्या गोमटेश्वराचे शरीर ताठर व्हावे हे म्हणूनच स्वाभाविक आहे. त्याच्या पायाशी वाढलेली वारुळे, त्यातून बाहेर पडलेले साप आणि त्यातूनच बाहेर पडून गोमटेश्वराच्या पायांना-हातांना विळखे घालीत घालीत वर चढत चढत खांद्यापर्यंत पोचलेल्या वेलीही सांगताहेत की तो तपश्चर्या करीत उभा आहे.

जवळजवळ हजार वर्षे झाली. आपण ही मूर्ती प्रकट करवली हे चामुंडरायाने 'चामुंडराये करवियले' हे (मराठी भाषेतले बहुधा पहिलेच) वाक्य मूर्तीच्या पायाशी हातभर मोठ्या अक्षरात कोरून नोंदून ठेवलेच आहे. मराठीतले पहिले संपूर्ण वाक्य, कर्नाटकाच्या अगदी गाभ्यात, उजव्या पायाशेजारी कोरलेल्या तशाच अर्थाच्या कानडी भाषेतल्या वाक्याच्या समोर पाहून मन क्षणभर थबकले, दृष्टी थबकली, शरीरही थबकले. मनात काहीतरी उचंबळून आल्यासारखे वाटले. डोळेही बहुधा डबडबलेच. मनात आले, "मराठीच्या पहिल्या प्रकट रूपासमोर आपण उभे आहो." आज कानडी-मराठी शेजारी राजकीय भांडण भांडत असले (शेजारी आहेत म्हणूनच) तरी ते सदैव राहणार आहेत शेजारीच. ह्या दोन वाक्यांच्या सारखे.

आज दहा शतके ही मूर्ती उन्हाचे, पावसाचे, थंडीचे तडाखे अंगावर घेते आहे. तिच्या मस्तकाभोवती शेकडो वेळा विजा कडाडल्या, वादळे घोंगावली, पण त्यावरच्या केसांची वलये कोरल्यावेळी जशी रेखलेली होती तशीच आज आहेत. तिच्या वरच्या वेलींच्या पानांचा ताजेपणा होता तसाच आहे. जणू नुकती-नुकतीच ती कोरली असावी. बारा वर्षांतून एकदा गोमटेश्वराला महामस्तकाभिषेक होतो. त्या वेळी पाण्याबरोबरच दूध, दही, मध, तूप, साखर, केळी, बदाम, केशर आणि अनेक वस्तूंचा त्याच्यावर अभिषेक होतो. पण त्यामुळे मूर्ती कुठेही ओशट, कळकट झाली नाही. मूर्ती प्रकट झाल्यावर चामुंडरायाने पहिलाच असा महामस्तकाभिषेक करू घातला. सगळी तयारी झाली. अभिषेकाला विधिपूर्वक आरंभ झाला. पण कितीही घागरी ओतल्या तरी दूध-पाणी कंबरेच्या खाली जाईना. सगळ्यांना चिंता पडली, काय झाले ? कुठे काय कमी पडले ? आणि एकदम पुरोहिताच्या लक्षात आले की, एक बाई कित्येक महिने बाहेर तिष्ठत बसली आहे, आपल्या लोटीतले दूध गोमटे-श्वराच्या पायांवर घालावे म्हणून. कोणी तिच्याकडे लक्ष दिले नव्हते. कोणी तिला गोमटापाशी आणले नव्हते.

सगळे लगबगीने तिच्याकडे धावले आणि तिला जवळ घेऊन आले. तिच्या लोटी-तले दूध मूर्तीच्या मस्तकावर ओतले तेव्हा सबंध मूर्तीला न्हाऊ घालीत ते पायांपर्यंत वाहत गेले. तेव्हा मग चामुंडरायाचाही अभिषेक पार पडला. चामुंडरायाला आपल्या मोठेपणाचा—गर्वाचा—पश्चात्ताप झाला. आणि त्याने त्या भक्त स्त्रीचा—पद्मा-वतीचा—पुतळा समोरच काही अंतरावर उभा केला.

गोमटेश्वराचे अजस्र पण शांत-प्रसन्न रूप मनात साठवीत तो पद्मावतीचा रेखीव सुडौल पुतळा पाहत खाली उतरू लागलो. समोर चंद्रबेट्टा दिसला. सम्राट अशो-काचा आजा सम्राट चंद्रगुप्त मौर्य आपल्या आयुष्याच्या शेवटी जैन झाला आणि इथे येऊन त्याने देहत्याग केला म्हणतात. तिकडे पाहत पाहतच खाली उतरलो आणि गोमटेश्वराबरोबरच गवताच्या पात्याचा आणि रानफुलांचा निरोप घेतला.

श्रवण बेळगुळ्याहून बेलूरपर्यंतचा प्रवास सडकेने पन्नास मैलांचा तसाच शिल्पाच्या दृष्टीने अजस्र अनलंकृत स्थिर मूर्तीपासून बांधेसूद, घोटीव, अटकर बांध्याच्या अत्यंत अलंकृत आणि नृत्यमग्न मूर्तीपर्यंतचा म्हणजे बराच लांबचा आहे.

म्हैसूरपासून श्रवण बेळगुळ्यापर्यंतच्या प्रवासात जसे ठिकठिकाणी तळी, कालवे, आणि पाट आहेत, तसेच ह्याही वाटेने आहेत. आणि तशीच शेते, बागा आणि तऱ्हेतऱ्हेच्या फुलांनी सजलेले वृक्ष आहेत. त्यामुळे दृष्टी संतुष्ट होते.

बेलूरच्या चेन्नकेशवाच्या आवारात प्रवेश केल्याबरोबर आधी त्याचे प्रशस्त पटांगण लक्ष वेधून घेते आणि समोर मंदिर दिसतच असते. खांबाच्या वरच्या बाजूच्या आणि देवळाच्या भिंतींवरच्या मूर्तींचे प्रमाण, त्यांचा डौल, त्यांचा बांधेसूदपणा

आणि त्यांची उभे राहण्याची पद्धती आणि विशेष म्हणजे त्याच्या अंगावरच्या अलंकाराचे आणि त्याच्या भोवतालच्या लतावेलींचे नाजूक, वळणदार गुंतागुंतीचे कोरीव काम इतके कौशल्याने केलेले आहे की ते कठीण काळ्या दगडात केलेले नसून हस्तिदंतात किंवा चंदनात केले असावे असे वाटते. संबंध मंदिर म्हणजेच नक्षीकाम केलेला एक करंडा वाटतो. इतका सहजपणा त्यात आहे. आणि घोटले गेल्यामुळे त्या काळ्या दगडांना जी चमक आली आहे तिच्यामुळे मूर्तींचे अवयव उठून दिसतात आणि त्यांची गोलाकार पुष्टता डोळ्यांत ठसते. नृत्यात किंवा वेशभूषेत मग्न असलेल्या मदनिकाच्या, तसेच लक्ष्मी, सरस्वती इत्यादी देवतांच्या मूर्तींनी देऊळ इतके खचून भरले आहे की काही वेळा ते अतिरिक्त वाटते. तसेच त्या मदनिकांचे देह कमी पुष्ट आणि अधिक सडपातळ असते तर त्यांचे अंग-सौष्ठव दृष्टीला अधिक सुखद झाले असते असेही वाटते. मात्र ते जसे आहे तसे ते छायाप्रकाशाच्या खेळाला अनुकूल आहे. आणि दुसरे म्हणजे फोटोत ती गर्दी जशी जाचक वाटते तशी प्रत्यक्ष पाहताना वाटत नाही. फोटोत प्रकाश जिथे पडतो तिथेच स्थिरावलेला असल्यामुळे आपले लक्षही तिथेच स्थिरावते. प्रत्यक्ष पाहताना दृष्टी सगळीकडे फिरत असते त्यामुळे लताकुंज आणि मूर्ती जिवंत वाटतात. नर्तकीने एक पाऊल उचललेले आहे ते ती पुढल्या क्षणाला खाली टेकील आणि दुसरे उचलील, मृदंगावर धरलेल्या हाताची थाप क्षणभराने मृदंगावर पडेल, आरशात पाहत असलेली तरुणी चटकन वळून आपल्याकडे पाहील, असे वाटते. आणि वाटते की, त्या पुढे काय करतील ते पाहण्यासाठी तिथेच आणखी थांबावे.

हळेबीडची मंदिरे होयसळेश्वर आणि शांतलेश्वर ही बेलूरमधल्या मंदिराच्याच काळातली—बाराव्या शतकातली—आहेत. आणि तिथल्याही मूर्ती बेलूरच्या चेन्न-केशवाच्या मंदिरातल्या सारख्याच, किंबहुना थोड्या अधिकच अलंकृत आहेत. नाना-प्रकारच्या लहान-मोठ्या पशुपक्ष्यांच्या, माणसाच्या आकृतींनी सर्व बाजू अगदी भरून गेल्या आहेत. हळेबीडमधल्या मंदिराच्या आवारातल्या महाकाय गणपतीचा भला मोठा उघडाबंब देह आणि त्याच्या डोक्यावरचा अतिरिक्त अलंकृत आणि कोरीव कामाने गच्च भरलेला किरीट पाहिला म्हणजे लंगोटी लावलेल्या मुंजा मुलाच्या डोक्यावर तुरा लावलेला भरजरी टोप घालावा तसे वाटते. कदाचित तसेच असेल. नुकतीच मुंज झालेला बटु-गणपतीच असेल तो.

हळेबीड ही होयसळ राजांनी बाराव्या शतकाच्या आरंभी आपली राजधानी केली. शेजारी समुद्रासारखा अफाट खंदक केला. म्हणून त्या राजधानीला दोर-समुद्रही म्हणत. तिथून जवळजवळ दीडशे वर्षे ते भरभराटत होते. पण त्याचे वैभव उत्तरे-कडल्या मुसलमान सुलतानाच्या डोळ्यांत खुपू लागले. मलिक काफूरने देशभर जो लढायांचा आणि लुटीचा दौरा काढला त्यात दोरसमुद्र—हळेबीड—सापडले आणि तिथून त्याने अनेक उंटांवर लादून द्रव्य नेले. त्यानंतर मुहम्मद तुघलकनेही ते

उद्ध्वस्त केले. आणि त्यानंतर त्याची कला जी गेली ती गेली.

जे वैभव राहिले आहे ते होयसळेश्वर, शातलेश्वर आणि केदारेश्वर ही मंदिरे आणि जैन वस्ती ह्याच्या रूपाने. त्यावरून त्या प्राचीन वैभवाचा अदाज करायचा. बेलूरच्या आणि हळेबीडच्या ह्या सुदर मदिरांना आता शिखरे नाहीत. ती पडून गेली. त्यामुळे ती पसरट आणि थबकडी वाटतात. तसे शिखर त्याच राजवटीतल्या सोमनाथपूरच्या मदिरावर आहे. सोमनाथपूर म्हैसूरजवळच आहे. पण ते पाहायचे राहिले. तसा तेप्पाही पाहायचा राहिला. त्या बाईने इतक्या कौतुकाने सागितले असून. सबध तळे विजेच्या प्रकाशाने उजळून निघाले आहे. विजेच्या दिव्यानी आणि लतापुष्पानी शृगारलेल्या एका नावेत देवीची मूर्ती बसवली आहे. आणि दुसऱ्या तशाच सजवलेल्या नावेत सुस्वर वाद्ये वाजताहेत. ही नावांची जोडी तळयात प्रदक्षिणा करते आहे आणि त्याची केशरी, तांबडी, पिवळी प्रतिबिंबे पाण्यात हेलकावत हेलकावत त्याच्याबरोबरच चालली आहेत. आपल्याचपैकी काही नक्षत्रे पृथ्वीवर का उतरली आहेत ते आकाशातली नक्षत्रे नवलाने पाहताहेत, हे कल्पनाचित्र माझ्या मनात तरळते आहे. पण प्रत्यक्ष पाहायचे राहिले आहे. पाहू पुन्हा केव्हा तरी जमले तर!

# ते ऋद्धिपुर देखिले —पुनरपि

काही निमित्ताने चांदूरबाजाराला गेलो होतो. साहजिकच तिथून दीड-दोन कोसावर असलेल्या ऋद्धिपुराला पुन्हा एकदा जावे असे ठरवले. मागे गेलो होतो त्याला अठरा-वीस वर्षे झाली होती. राजमठ चांगला बांधून काढला आहे, बरीच सुधारणा केली आहे, असे ऐकले होते. आणि काहीही नवी कामे झालेली नसली तरी इतक्या जवळ गेल्यानंतर ऋद्धिपुराला गेलो नसतो हे शक्यच नव्हते. महानुभावांची ती काशी. मराठी गद्यपद्य-साहित्याच्या निर्मितीचे आणि, अल्पस्वल्पशा का होईना, सामाजिक पाखंडाचे मूळपीठ. इतक्या जवळ येऊन मी तिथे गेलो नसतो तर तो त्या स्थलाचा अपमान झाला असता आणि आपण चूक केली ही टोचणी माझ्या मनाला लागून राहिली असती. महारा-मांगाच्या, तेल्या-तांबोळ्यांच्या, बरात शिरून त्यांच्या ताट-वाट्यातले अन्न उचलून घेऊन खाणारे, पोरात पोर होऊन खेळणारे, त्यांच्या खोड्या काढणारे 'वेडे-पिसे' राऊळ गावातल्या ज्या हाटा-चौहाटातून हिंडले-फिरले ते पुन्हा पाहावे आणि जुन्या आठवणी उजळाव्या ही इच्छाही होतीच.

मागल्या वेळी टांग्याने गेलो होतो. आता मोटर होती. मागल्या वेळी रस्ता खडी वर आलेला, खडबडीत होता. आता चांगला पक्का होता. थोडेसे इकडले तिकडले बोलणे होते न होते तो सडकेच्या डावीकडे ऋद्धिपुराची वाट दाखवणारी पाटी दिसली. मला वाटले मोटर वळणार. पण पुढेच चालली आणि "आपण इकडे पुढे कुठे चाललो?" असे मी विचारतो, तो गावाला वळसा घालून पलीकडच्या बाजूने गावात शिरलीदेखील आणि खडबडीत चढउताराच्या खडकाळ रस्त्यावरून डावी-उजवी वळणे घेत, धुळीचा लकाणा उडवीत, एका जुनाट घरासमोरच्या मोकळ्या जागेत येऊन उभी राहिली.

"इथे कुठे आलो आपण? आपल्याला तर राजमठात जायचं आहे." मी म्हटले.

"येथ दत्ताचं स्थान आहे. प्रसाद भेटते. चला."

"चला."

आम्ही आवाराच्या दारातून आत शिरलो. समोर कंबरेएवढे उंच जोते होते ते चढून, ओटी ओलांडून आत गेलो. आत गेल्याबरोबर माझे लक्ष समोरच्या खांबाकडे

आणि तिथून वरच्या तुळयांकडे गेले—आणि मी पाहत उभाच राहिलो! लाकडी खांब, लाकडीच तुळया. अगदी जुने लाकूड. औरस-चौरस सातआठ हाताचे खण असतील. लाकडांना मधूनमधून उभ्या चिरा पडल्या होत्या. पण कोरीव काम इतके विलक्षण वेगळे, सुंदर की, मी तसे दुसरीकडे पाहिले नव्हते. इतर ठिकाणी खांब सुरूचे, कमानी मेहरपी असतात. इथे तसे नव्हते. चौकोनी खांब, चौकोनीच तुळया. त्यावरचे आणि खांबावरच्या अडवटावरचे कोरीव काम हेमाडपती दगडी देवळातल्यासारखे. त्याला तेल-पाणी काहीही केलेले नव्हते, त्यामुळे त्याला एक रूक्ष-मातट कळा आली होती. पण त्यामुळेच ते दगडी कामासारखे दिसत होते. हे घर किती जुने असेल—शेदीडशे-दोनशे वर्षांचे तरी—असा मनाशीच मी अंदाज करीत होतो. पण आम्ही आलो होतो दत्ताचे दर्शन घ्यायला. प्रसाद घ्यायला. बरोबरची मंडळी पलीकडल्या ओसरीमागच्या खोलीकडे गेलीदेखील होती.

हे दत्ताचे मंदिर नव्हते. वाड्याच्याच एका खोलीत खूपशा मूर्ती ठेवलेल्या होत्या. टेंबेस्वामींच्या तसबिरी होत्या. आणि पद्मासन घालून कोणी संन्यासी बसला असावा असे दाखवण्यापुरती पांढरी जागा मोकळी सोडून निळ्या-गुलाबी रंगाचे फवारे उडवून चितारलेली काही चित्रे होती. मी विचारले,

"हे—कोणाच?"

"नरसिंहसरस्वतींच."

"म्हणजे गाणगापुराचे?"

"होय. हल्ली त्यांचा येथ निवास आहे."

"प्रसाद कुठे मिळतो?"

"येथच मिळतो. पण त्याच्यासाठी येकदोन रोज राहून जप-अनुष्ठान करावं लागते. गुरू प्रसन्न झाले तर प्रसाद मिळतो."

नृसिंहसरस्वती निवासासाठी स्थान निवडीत, ते नेहमी निवांत, रमणीय आणि प्रसन्न असे. भिलवडीजवळ भुवनेश्वरीसमोरचे औदुंबर, अमरापुराजवळचा कृष्णा-पचगंगा संगम आणि गाणगापुराजवळचा भीमा-अमरजा संगम ही अतिशय रमणीय स्थाने आहेत. त्यांनी हे असे धूळभरले रखरखीत स्थान थोड्या दिवसांकरता तरी का निवडावे, ह्याचे नवल वाटले. आणि गाणगापुराहून श्रीशैल्याला जाताना "आम्ही असतो याचि ग्रामी" असे भक्तांना आश्वासन दिले होते त्याचे काय? तिथले भक्त आता काय करीत असतील? पण "भक्ताधीन आपण असती। जैसा संतोष त्यांच्या चित्तीं। तेणेपरी राहटती॥" असा त्यांचा बाणा असल्यामुळे इथल्या भक्ताची आर्त पुरवण्यासाठी ते इथे आले असावेत असे मीच माझ्या शंकेचे समाधान करून घेतले.

मागे परसात एक उंबराचे झाड होते. तेवढी तिथली हिरवी रंगच्छटा आणि तेवढ्या हिरव्यावरच नृसिंहसरस्वतींना आपली सृष्टिसौंदर्याची आवड भागवावी लागली असेल. परसाच्या एका टोकाला आणखी एक खोली होती. तिथेही त्याच तसबिरी

आणि तशाच मूर्ती होत्या. तिथे जाऊन आम्ही त्याही तसबिरींना नमस्कार केला. तिथे आम्हाला कळले की, प्रसादाबरोबर थोर-थोर साधुसंतांचे संदेशही येतात. (मात्र सगळ्यांसाठी नाही. ज्याच्यावर मर्जी होईल त्याच्यासाठी.)

"संदेश? ते कसे येतात? ते साधुसंत येऊन सांगतात का?"

त्यांनी आमच्यापुढे दोन मोठी रजिस्टरे ठेवली. त्यात जनरल आणि पर्सनल, असे दोन वेगवेगळ्या प्रकारचे संदेश लिहिलेले होते. जनरल संदेश जनरल होते. तमाम जनतेसाठी. पर्सनल संदेश हे दर्शनासाठी आलेले पोलिस ऑफिसर, रेव्हेन्यू ऑफिसर, अबकारी अधिकारी, वकील, डॉक्टर, इतकेच काय, पण महाराष्ट्र राज्याचे एक मंत्री, ह्यांच्यासाठी खास आलेले होते. त्यातले काही चार-चार, पाच-पाच पाने भरून होते. बरेचसे संदेश वाचून पाहिल्यावर मी विचारले,

"हे एवढे मोठमोठे संदेश तुम्ही लिहून कसे घेता?"

"हे तर काहीच नाही. कधीकधी एकेक वीस-वीस पानांचा असतो. संदेशाचे कागद येतात! असे आपल्या समोर जमिनीवर दिसतात! त्यांच्यावर स्पष्ट संदेश लिहिलेला असतो."

"ते कागद कुठे आहेत? तेच का नाही एकत्र करून ठेवले?"

"ते असे राहतात काय? एकेका कागदावरचा संदेश लिहून झाला की, कागद अदृश्य होतो. हां. अगदी डोळ्यांदेखत एकदम नाहीसा होतो!"

ज्ञानदेव-नामदेवांपासून तो विवेकानंद, रामतीर्थ, साईबाबांपर्यंत अनेकांकडून संदेश आलेले होते. इथे येऊन दोन दिवस राहून जप-अनुष्ठान केले, अनुग्रह झाला, तर संदेश येतो. प्रसादही मिळतो. द्रोणातून, पानावर, कागदावर पेढे, केळी, साखर-फुटाणे; जशी मर्जी होईल तसा. ती द्रोण-पानेही तशीच आपण प्रसाद घेतला की अदृश्य होतात.

हे सगळे ऐकून मी थक्क होत होतो, पण संदेश वाचून मात्र वाटले की, हे सगळे संदेश आपल्याला घरी बसूनसुद्धा लिहून काढता येतील. साधु-संतांनी ते पूर्वीच आपल्या ग्रंथांत लिहून ठेवले आहेत. त्यांना पुन्हा पुन्हा आपल्यासाठी येण्याचा त्रास देण्याची आवश्यकता नाही, आणि अशा आडगावात तर नाहीच नाही. शिवाय हे सगळे थोर महात्मे जर मुक्त असतील तर परब्रह्मात कायमचे विलीन झाले असतील. मग ते स्वतंत्रपणे संचार कसा काय करतात आणि कशासाठी? आणि मुक्त नसतील तर? पण हा विचार तरी त्या महात्म्यांसंबंधी कसा करावा?...

आम्हाला संदेश किंवा प्रसाद मिळण्याची आशा नव्हतीच. तेव्हा नुसता नमस्कार करून रिकामेच बाहेर पडलो. इतर काही स्त्री-पुरुष मंडळी सुग्रास जेवण करून, विडे चघळीत, प्रसन्नपणे हसत-बोलत बाहेर पडत होती. त्यांना बहुधा संदेश आणि प्रसाद दोन्ही मिळाले असावेत! कोणीतरी आमच्याकडे पाहून विचारले,

"चालले काय?"

“हो.”

“पलीकडल्याच घरात गुलाबमहाराजांचा दरबार आहे. तिकडही हाजरी लावा. थोर पुरुष आहेत.”

माझी समजूत होती की, ऋद्धिपुर हे केवळ महानुभवाचे पवित्र क्षेत्र. पण आता पाहतो तर ते हिंदूंचेही पुण्यक्षेत्र झाले आहे.

वाड्यातून बाहेर पडण्यापूर्वी आतले लाकूडकाम पुन्हा एकदा पाहावे म्हणून पायऱ्या चढून वर गेलो. ओटीवरच घरमालक विड्याच्या पानाच्या शिरा काढीत गप्पा मारीत बसले होते. त्याना विचारून मी आत गेलो. सगळीकडून नजर फिरवली. पाहिलेले डोळ्यात साठवले. आणि घराच्या जुनेपणाचा विचार करीत ओटीवर परतलो.

“आपला हा वाडा किती वर्षांचा जुना आहे?” मी मालकाना विचारले.

“काय सांगावं! आमच्या वाडवडलांचा आहे. पिढीजाद. खूपच जुना आहे.”

“आपल्याकडे देशमुखी किती पिढ्या आहे?”

एव्हाना त्यांनी विडा दाढांमध्ये सरकावला होता तो चघळायला सुरुवात केली आणि माझ्याकडे अशा नजरेने पाहू लागले, जणू म्हणत होते, “काय मूर्ख प्रश्न!”

“खांबावरचं कोरीव काम फार चांगलं आहे.”

माझे शब्द त्याच्या डोक्यावरून जाऊन हवेत विरले. डोके पुढे करून ते पिंकाची पिचकारी अंगणात टाकीत होते.

“आज घर नव्यानं सारवलेलं दिसतंय” असे मी म्हटले असते तर त्याना जितकी आस्था वाटली असती, तितकीच ह्या माझ्या अभिप्रायाने वाटली. मी पायऱ्या उतरून बाहेर पडलो. वाटले, मी प्रसादासंबंधी आणि संदेशासंबंधी बोललो असतो तर त्याना उचंबळून आले असते.

मला राजमठाकडे जायचे होते, म्हणून मी रस्ता विचारू लागलो. मागल्या वेळी आलो तेव्हा ह्या भागात आलो नव्हतो. अनोळखी वाटत होते. जणू हे वेगळेच गाव होते! एक-दोघाना विचारले, ते माझ्याकडेच प्रश्न विचारल्यासारखे पाहू लागले. म्हाइंभटाला भेटला तसा कोणी मातांग भेटतो का, पाहत होतो. मातांग नाही, पण एक वाटाड्या भेटला. त्याने भगतराजबुवाच्या मठापाशी आणून “नीट जा” म्हणून सांगितले. रस्ता सरळ होता. आठवत होता. भगतराजबुवाचा मठ, गोपीराजबुवाचा मठ, तळेगावकराचा मठ, ह्यावरून महानुभावपुऱ्यातल्या रस्त्याने थेट राजमठाच्या महाद्वाराशी आलो.

पूर्वीपेक्षा खरोखरच खूप सुधारणा झालेली आहे. बाजूला खूप मोठा फरसबंद सभामंडप बांधला आहे; चांगले पाचचारशे लोक बसू शकतील असा. मागे आलो होतो तेव्हा जेमतेम कापुरखांबीपर्यंत जाता येत असे. बाकीचे सगळे आवार बोरी-

बाभळीच्या काटेरी झुडपानी, पिवळ्या-पाढऱ्या धोतऱ्यानी व्यापलेले होते. सगळीकडे राखट धूळ होती. खोलातला खोलेश्वर आणि दर्ग्यासारखा दिसणारा त्रिपुरुषाचा मढ लाबूनच पाहावा लागला होता.

आता सगळे आवार फरसबद केले आहे. स्वच्छ आहे. जिथे कदाचित गोविंद-प्रभूंच्या घराचा राहता भाग असेल, तिथे जोते बांधले आहे. त्रिपुरुषाचा मढ म्हणजे आज शून्यालयच आहे. पण आतपर्यंत जाऊन आता पाहता येतो. पूर्वी केव्हा तरी त्यात ब्रह्माविष्णुमहेशाच्या मूर्ती असतील. "हरिहर ब्रह्मादिक तीन्ही देव होऊनि एक : जे स्थान सेविता आद्यापि त्रीपुरुष : म्हणिजताती ||" असे ऋद्धिपुराचे वर्णन करताना वहाळिये नारायण व्यासानी लिहून ठेवले आहे.

राजमठ पाहून झाल्यावर राधवण-हाटात जिथे श्रीगोविंदप्रभू आणि हरपालदेव ह्याची भेट झाली, तिथे जायचे होते एका माणसाला बरोबर घेऊन निघालो. मुसलमानपुरा, मांगपुरा ह्या वाटेने जाताना वेदशाळेच्या पुढे तिकोपाध्याचे आवार पाहिलेले आठवत होते. वाटाड्याला विचारले. "हे काय समोरच आहे." तो म्हणाला. मी पूर्वी पाहिले तेव्हा तिथे जुनाट वास्तू होती. आता पाहतो तो एखाद्या खेड्यात जितपत 'मॉडर्न' घर बांधता येईल, तितपत मॉडर्न वास्तू तिथे उभी होती.

मराठीचा आद्य चरित्रकार म्हाइंभट आणि श्रीगोविंदप्रभू ह्याची पहिली भेट झाली ती ह्या ठिकाणी. इथे पटिशाळेत श्रीप्रभू बसले होते. त्याना त्याने दडवत घातले. त्याच्यासाठी आणलेली गुळाची पाटी त्याच्यासमोर ठेवली. श्रीप्रभूनी गूळ श्रीमुखी घातला आणि "आवो भेला जाय म्हणे . गोड आहे म्हणे ." असे म्हणून बालभावाने गुळाची भेली दुसऱ्या हातात घेतली आणि गूळ 'आरोगू' लागले. तो त्याच्या चिकट ओघळाने त्याच्या दाढीमिशा बरबटल्या आणि ब्रिचारी आबाइसे जेवीत होती तिला धाईधाईने जेवण आटपून, आचवून "जी : जी ' पुरे कीजो ' पोट दुखैल" असे म्हणून गुळाची दुरडी घरात न्यावी लागली. आणि एखाद्या लहान मुलाचे हात-तोंड पुसावे तसे श्रीप्रभूचे हात-तांड, दाढीमिश्या पुसाव्या लागल्या ह्या नव्या वास्तूत त्या घटनाचे चित्र मला उभेच करता येईना. एखादी वास्तू जुन्या काळाची स्मारक म्हणून उभी करायची असेल तर ती शक्य तितकी त्या काळाला साजेशी असायला पाहिजे. हे काहीतरीच होते.

राधवण-हाटाकडे जाणारा रस्ता वीस वर्षांपूर्वी होता तसाच होता. उच-सखल, दगडाळ, धुळीने भरलेला. सरळ काही चालता येत नव्हते. मला वाटले, हा रस्ता आज सातशे वर्षे असाच असावा. श्रीप्रभू, श्रीचक्रधर, म्हाइंभट, भटोबास, महदा-इसा ह्याच रस्त्याने गेले-आले असतील. आज पुन्हा जर काही चमत्कार घडून हे लोक ऋद्धिपुरात प्रकट झाले आणि त्याच वाटेने जाऊ लागले तर वाट चुकणार नाहीत. पण जुनी ओळखीची ठिकाणे कुठे दिसतात का म्हणून पाहू लागले तर मात्र

गोंधळल्यावाचून राहणार नाहीत. आणि कोणी जर "हे तिकोपाध्याचे आवार" म्हणून दाखवले तर श्रीगोविंदप्रभू "आवो हें तें नव्हे म्हणे नव्हेचि म्हणे :" असे म्हणून अंतराळात बोटे नाचवीत "गगनाची वास" पाहत चालू लागतील.

राधवण-हाटात पोचलो. तसेच उजाड. वीस वर्षांपूर्वीसारखे.

"पूर्वीली ओळी श्रीप्रभुसर्वज्ञ" आणि "पसीमीली ओळी 'आमुचे' सर्वज्ञ" जिथे उभे होते, तिथे ओटे होते ते कुठे आहेत म्हणून पाहू लागलो तर तिथे पक्क्या बाधणीच्या दोन देवळ्या उभ्या केलेल्या दिसल्या. त्या दिसल्या आणि धक्काच बसला. तिकोपाध्याचे आवार पाहून बसला तसा. पूर्वी नुसते ओटे होते तेच किती बरे होते! श्रीगुडमप्रभूनी सेंगुळे-बुडुडे खात-खात, त्याच्याशी खेळत-खेळत प्रसाद म्हणून त्यातले एक "आरे : घे घे : घे गा :" म्हणून सर्वज्ञाकडे टाकले आणि सर्वज्ञानी ते 'वरिच्यावरि' झेलण्यासाठी हात वर केले, अशी त्या महान घटनेची मी कल्पना केली तर सेंगुळे-बुडुडे देवळीच्या दाराच्या गणेशपट्टीला लागून खाली पडले आणि सर्वज्ञाने ते झेलण्यासाठी म्हणून वर केलेले हात वरच्यावरच रिकामे राहिले, असे मला दिसू लागले. ओटे उघडे होते तेव्हा ही क्रीडा आणि 'लीळा' कल्पनेने पाहणे शक्य होते. आता ते शक्य नाही. त्या देवळ्यानी ती क्रीडा आणि ती 'लीळा' खंडित केली.

म्हाइभटाने 'लीळाचरित्रा'त शब्दानी उभे केलेले ते जिवंत चित्र आता तिथे त्या जागेवर जाऊनसुद्धा कल्पनेने उभे करता येत नाही, ह्याचे वाईट वाटले. स्मारके उभारायची ती स्मृती जिवंत राहावी म्हणून की थिजून जावी म्हणून? केसोबास संस्कृतात रचना करू लागले तेव्हा नागदेवाचार्यांनी त्यांना, "नको गा केसवदेया! येणें माझा परिवारु नागवैल की" असे कळवळून सांगितले, तसेच हल्लीच्या एखाद्या आचार्याने ह्या स्मारक-संरक्षकाना "नका महत हो! येणें प्रभुचे ओटे दृष्टीआड होतील की" असे कळवळून सांगितले असते, तर किती बरे झाले असते!

असे मनाशीच म्हणत आल्या रस्त्याने गावाबाहेर पडू लागलो! भैरवबुरूज दिसतो का म्हणून पाहिले. पूर्वी पाहिला तेव्हा चांगला उभा होता. आता खचला होता. जमिनीला टेकू पाहत होता. श्रीचक्रधराच्या नाका-कानाला, डोळ्याना हात लावून श्रीगोविंदप्रभूनी "हा देवो" म्हटले होते. आणि अशा रीतीने 'देवो प्रकाशिला' होता ते इथेच. हा बुरूज अगदी भुईसपाट झाल्यावर तिथे महत कसले स्मारक उभे करतील असा प्रश्न मनात आला आणि काही समाधान, काही असमाधान अशा थोड्याशा अस्वस्थ मनःस्थितीतच मी ऋद्धिपुराचा निरोप घेतला. पण तो घेताना ऋद्धिपुराच्या देशमुखाच्या वाड्यातल्या लाकूडकामाची एक कोरीव आठवण बरोबर आणली आता ती माझ्या मनात राजमठाच्या आठवणीला बिलगून राहील.

# हिरव्या आठवणी

सकाळची नऊ-दहाची वेळ. डिसेंबर-जानेवारीचे दिवस लख्ख ऊन पडले होते. तिरुअनंतपुरम्-त्रिवेंद्रम शहराबाहेरच्या महात्मा गांधी कॉलेजच्या गच्चीवर उभा राहून खाली पाहत होतो. चारी दिशांना क्षितिजापर्यंत माडाचा हिरवा महासागर पसरला होता. काळसर-हिरव्या लवलवत्या पात्यांवरून सूर्यकिरणांच्या राशी परावर्तित होत होत्या. वाऱ्याचा मोठा झोका आला म्हणजे महासागराच्याच लाटांप्रमाणे त्या उसळत, लोळत आणि एकमेकींना ढकलीत. नाही तेव्हा जागच्या जागी सळसळत. ह्या महासागरात मध्ये मध्ये लहान-मोठ्या घरांची तांबडी-पांढरी छपरे बेटांसारखी दिसत होती आणि झावळ्यांचा हिरवेपणा अधिकच गडद करीत होती. एकमेकींवर मात करणाऱ्या, एकमेकींना ढकलणाऱ्या आणि एकमेकींत मिळणाऱ्या समुद्राच्या लाटा-लहरींच्या खेळावरून जशी दृष्टी बाजूला करावीशी वाटत नाही तशीच ह्या हिरव्या महासागराच्या लाटांच्या खेळावरूनही करावीशी वाटत नव्हती.

आत कॉलेजच्या सभागृहात लेखक परिषदेची बैठक चालली होती. मी तिच्यासाठीच आलो होतो. पण सगळी चर्चा मल्याळीत चालली होती आणि त्या अपरिचित भाषेतल्या शब्दांचा कल्लोळ मला रिझवू शकत नव्हता. त्यापेक्षा इथेच बाहेर मी अधिक रमलो होतो.

आदल्या दिवशी शेनकोट्याहून येताना ह्या समुद्राच्या पोटातून प्रवास केला होता. शेनकोटा सोडल्यावर, सह्याद्रीने करून दिलेल्या वाटेने गाडी केरळात शिरली आणि सगळे दृश्यच बदलून गेले. हिरवळ वाढत चालली. रस्त्याच्या दोन्ही अंगांना टॅपिओकाची लागवड, भाताची शेते आणि माडाच्या राया दिसू लागल्या. आढ्याची दोन टोके वर नेलेली केरळातली विशिष्ट पद्धतीची घरे दिसू लागली. आपल्याच देशात असून दुसऱ्या देशात आल्यासारखे वाटू लागले.

अगदीच दुसरा देश नाही तरी वेगळा प्रदेश खासच आहे हा. देशातल्या कोणत्याही भागापेक्षा ख्रिस्ती लोकांची वस्ती ह्या प्रदेशात सगळ्यात अधिक. शिक्षणाचे प्रमाण पुरुषांतच नाही तर स्त्रियांतदेखील इथे सगळ्यात अधिक. आणि शिवाय कुटुंबपद्धती मातृसत्ताक. वारशाची परंपरा मुलाची नाही, मुलींची. साहजिकच मला

वाटले होते, इतके शिक्षण, स्त्रियाना इतके महत्त्व असल्यामुळे देशातल्या इतर समाजांच्या मानाने इथल्या समाजात स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने, निदान अधिक प्रमाणात दिसतील. चर्चांत, सभात, संमेलनात भाग घेत असतील. आजपासून पन्नास वर्षांनी आपला समाज कसा दिसेल ते मला इथे पाहायला मिळेल.

लेखक परिषदेच्याच वतीने संध्याकाळी टाउन हॉलमध्ये एक सभा होती. सात-आठशे लोक आले होते. त्यात स्त्रिया मोजून पाच. सभा सपल्यानतर मी एका गृहस्थाना त्याबद्दल विचारले. म्हटले, "आमच्याकडे एखाद्या मोठ्या गावी अशी साहित्यिकाची किंवा कोणतीही सभा झाली, तरी शंभरात निदान पंचवीस-तीस तरी स्त्रिया असतात. तरुण, वयस्कर सर्व. तुमच्या इथे स्त्री-शिक्षणाचे इतके मोठे प्रमाण, खिस्ती लोकाचीही संख्या इतकी मोठी, खिस्ती आणि मुसलमान लेखक मल्याळीतूनच लेखन करतात, त्यात पुन्हा ही अखिल-केरळ लेखक परिषद. ह्या त्रिवेंद्रम् शहरात वाङ्मयाबद्दल आस्था असलेल्या कोणी विद्यार्थिनी, प्राध्यापिका किंवा इतर सुशिक्षित स्त्रिया नाहीत का ? सभेला इतक्या कमी स्त्रिया कशा ?"

थोडा वेळ ते काही बोलले नाहीत. मला वाटते, त्याना असा प्रश्न अपेक्षित नसावा. मग थबकत थबकत म्हणाले, "तसं नाही. आज शहरात दुसरे काही कार्यक्रम असतील."

आपण सागतो हे काही पटण्यासारखे नाही असे त्यानाच वाटत असलेले त्याच्या स्वरावरूनच दिसत होते. मी आणखी प्रश्न विचारले नाहीत. नतर दोन दिवसांनी मी केरळातच एका सुशिक्षित नायर कुटुंबात राहिलो. तेव्हा मला तसाच अनुभव आला. घरचे यजमान निवृत्त प्रोफेसर. पत्नी बी० ए०, एल० टी०, निवृत्त हेडमिस्ट्रेस. घरात माणसे ती दोघेच. पण मी त्याच्याकडे होतो त्या चोवीस तासात बाई माझ्याशी एक अक्षर बोलल्या नाहीत. कॉफी वगैरे देताना टेबलाशी उभ्या राहत. कॉफी घ्यायला, जेवायला आमच्याबरोबर बसल्या नाहीत. सगळे वागणे जुन्या वळणाच्या कुलीन, शालीन बाईसारखे. मी सहज म्हटले, "तुम्हीही बसा की कॉफी घ्यायला." खरे म्हणजे माझे चुकले. पाहुण्या माणसाने घरच्या यजमानीण बाईला असे म्हणणे म्हणजे अधिक प्रसगच. पण त्या शिकलेल्या म्हणून मी मोकळेपणाने बोललो. बाई काही बोलल्या नाहीत किंवा बसल्याही नाहीत. प्रोफेसरसाहेब म्हणाले, "आमच्याकडे बायका पुरुषाच्या बरोबरीनं बसत नाहीत. आम्ही दोघे कामावर जात असू तेव्हा-सुद्धा माझं जेवण झाल्यावर त्या जेवीत आणि मग कामावर जात."

सर्व गोष्टींचा उलगडा झाला. प्रदेश वेगळा आहे, पण देश एकच आहे. आपलाच आहे.

त्रिवेंद्रमहून कन्याकुमारी जवळजवळ पन्नास मैल. जाताना वाटेत तक्कलैला उतरून पद्मनाभपुरम्चा राजवाडा पाहायचा होता. पद्मनाभपुरम् ही त्रावणकोर

सस्थानाची जुनी राजधानी. उत्तम रस्ता, दोहो अंगांना माडांच्या राया. टेपिओकाची लागवड आणि भातशेती, आणि वर निळे निरभ्र आकाश. अधूनमधून गावे. निवडणुका जवळ आल्या होत्या. सगळीकडे उत्साह होता. पुढाऱ्यांच्या स्वागता-साठी रस्त्यावर जागजागी माडाच्या झावळ्यांच्या कमानी उभारल्या होत्या. लाब बाम्बूच्या भोवती पेंढा बांधून त्यात मिरमिरी खोचतात तसे वेगवेगळ्या पक्षांनी आपले ध्वज खोचलेले होते आणि ते गुळ्यांसारखे उभारले होते. सगळीकडे उत्साह ओसडत होता. पाहता पाहता तक्कले आले आणि आम्ही खाली उतरून चालू लागलो.

गाव मागे टाकले आणि पद्मनाभपुरम्च्या वाटेकडे वळणार तोच 'तिरुविदाकोडु' अशी एक पाटी दिसली. 'तिरुविदाकोडु' हे त्रावणकोरचे मूळ नाव. पण तेही 'त्रिदिवांकुर'चे अपभ्रष्ट रूप आहे. त्रिदिवाकुर म्हणजे स्वर्गाचा अंकुर.

पद्मनाभपुरम्चा रस्ता थोड्याशा सखल भागातून जातो. त्या रस्त्याला लागलो मात्र, दृश्य पाहून थबकलो. किंचित अरुंदसाच रस्ता. दोहो बाजूला पाचूसारखी झळाळणारी भाताची शेते, त्याच्या तळाशी निळे-निळे पाणी. त्यात मध्ये मध्ये उभे असलेले पाढरेशुभ्र शंखाकृती बगळे. चहूकडे आभाळाला टेकलेले जाभळे-निळे डोंगर आणि वर गर्द निळे आकाश. समोर पद्मनाभपुरम्चा राजवाडा. एखाद्या चित्रात असावी तशी रगसगती होती. आणि पुन्हा सगळे जिवंत. सुदैवाने दोन हातानी नाही तरी दोन डोळ्यानी खूप घेता येते आणि साठवताही येते. पण किती घ्यायचे आणि किती साठवायचे? केरळात आल्यापासून साठवीतच होतो. त्रिदिवाकुर! स्वर्गाचा झळाळणारा तुकडा आहे खरा. डोळ्यानी पाहिलेले आठवणीत साठवून ठेवायच्या शक्तीवर विसंबूनच पुढे चालू लागायचे.

आढ्याची टोके पुढे आणण्याची केरळातल्या घराची शैली असते तसाच राजवाडा आहे. वाड्याचे बहुतेक काम लाकडी आहे. बाहेरून आटोपशीर वाटतो. पण खरोखर खूप प्रशस्त आहे. महाराष्ट्रात किंवा इतरत्र पाहतो त्यापेक्षा अगदी वेगळा आहे. आत गेल्यावर समोरच राजाचे सभागृह आहे. सपूर्ण लाकडी आहे. त्याची रचना, सज्जे वगैरे पाहताना मला गोव्यातल्या म्हारदोळच्या महालक्ष्मीच्या आणि वेलिंगाच्या लक्ष्मी-नृसिंहाच्या मदिरातल्या सभामंडपाची आठवण झाली. वरच्या मजल्यावर राजाचे शयनमंदिर आहे आणि त्याच्याही वर देवघर आहे. त्याच्या भिंतींवर तीनशे वर्षांपूर्वी रगवलेली चित्रे अजून ताजी टवटवीत आहेत. देवघरात दोन लामणदिवे सतत तेवत असतात. त्यातले तेल लाकडी जमिनीवर ठिपकू नये म्हणून खाली पराती ठेवलेल्या आहेत. राणीवशातून हिंडत असताना रस्त्याच्या अगाला अभ्रकाची रगीबेरगी तावदाने लावलेल्या सरकझडपांच्या खिडक्या दिसल्या. त्यातून डोकावून बाहेर पाहिले तो खाली आवारात राण्याच्या स्नानासाठी प्रशस्त पुष्करणी दिसली. खरीच पुष्करणी. कारण तिच्यात असख्य लाल कमळे फुललेली होती. काळसर-हिरव्या

पाण्यावर दुपारच्या वेळी ती माणकासारखी झळाळत होती. वाटेने येताना जे विलक्षण दृष्टिवेधक दृश्य पाहिले होते त्याच्यावर हे जणू 'आणखी घ्या' म्हणून ठेवून दिले होते. मापे मोजून झाल्यावर उणे-पुरे करण्यासाठी वर आणखी एक मूठ टाकतात तसे.

राजपरिवाराच्या जीवनाची कल्पना करीत, राजवाड्याच्या वेगवेगळ्या भागाचे ठसे मनात साठवीत बाहेर पडत होतो तेवढ्यात आणखी काही माणसे वाडा पाहायला आत येताना दिसली. त्यात राजा रविवर्म्याच्या चित्रातूनच बाहेर पडल्यासारखी दिसणारी एक लावण्यवती होती. गोरा रंग. किती गोरा? ज्यातून प्रभा फाकते आहे असा. मधाच्या रंगाचे टपोरे डोळे, त्याच रंगाचे व्यवस्थित रचलेले विपुल केस. मध्यम उंची, डौलदार बांधा आणि पंचविशीच्या आसपासचे वय. 'तिरुविदांकोडु' ही पाटी वाचून पद्मनाभपुरम्च्या वाटेला लागल्यापासून जे सौंदर्य पाहत आलो होतो त्यात एवढीच जणू उणीव होती. ती पुरी झाली. केरळात येताना वाटले होते की, रविवर्म्याच्या चित्रातल्या स्त्रिया इथे ठिकठिकाणी दिसतील. मला कोणी तरी तसे सांगितलेही होते. स्वर्गाचा अंकुरच ना तो! पण केरळाच्या संबंध प्रवासात त्रिवेंद्रमच्या चित्रालयामधल्या रविवर्म्याच्या चित्रातच काय त्या दिसल्या. जिवंत चित्र दिसले ते पद्मनाभपुरम्च्या राजप्रासादाच्या पायऱ्यावर. पद्मनाभपुरम्च्या परिसराच्या सौंदर्याला जर कोंदण म्हटले तर त्यातले हे रत्न होते.

गेल्या वाटेने पुन्हा तक्कलैला आलो. दुपार झाली होती. भुकेने पोटात पोकळी केली होती. ती भरायला हवी होती. बाजारपेठेत इकडेतिकडे पाहिले आणि समोर एक हॉटेल दिसले त्यात शिरलो. कोणाचे आहे काही विचार केला नाही. तसा विधिनिषेध नव्हताच आणि वेळही नव्हता. रिकामी जागा पाहून बसलो. काउंटरच्या मागे 'शास्ता' देवाची तसबीर दिसली. (मोहिनीरूपातला विष्णू आणि शंकर ह्यांचा हा मुलगा.) म्हटले, हिंदूच आहे. बरे झाले. जरा स्वच्छता अधिक असेल. ऑर्डर दिली. केळीचे पान समोर आले. पेल्यातले पाणी शिंपडून इकडल्या पद्धतीने ते निपटून टाकले. नंतर मीठ-लोणचे वगैरेच्या मागोमाग भात आला. त्याची रास पानावर उभी राहू लागली मात्र, त्या उकड्या तांदळाचा उग्र दर्प नाकात असा धक्का मारून शिरला की श्वास कोंडला आणि घशात गोळा उभा राहिला. त्याचे एकेक शीत बारशाच्या घुगरीसारखे टरटरीत आणि तसेच कोरडे भातामागोमाग त्या राशीवर रसम्च्या तिखट-आंबट (हे रंगावासावरूनच कळले.) पाण्याची धार पडू लागली ती त्या घुगऱ्याच्या राशीतून थेट तळाशी जाऊन अंगावर येऊ लागली. स्वतःला सावरले म्हणून वाचलो. हाताने वाटीचा आकार करून "द्रोण, वाटी वगैरे नाही का?" असे खुणेने विचारले त्याने खुणेनेच नाही म्हणून सांगितले. त्या भाताचे आणि रसम्चे एकमेकाशी पटेना आणि त्याच्या उग्र वासामुळे आधीच गुदमरलेल्या माझे आणि त्या दोघांचेदेखील पटेना. जेमतेम एकदोन घास घशाखाली ढकलले आणि पोटातल्या परमेश्वराला तेवढ्यावरच संतुष्ट राहायला सांगून पानावरून

उठलो आणि बाहेर पडलो. सुदैवाने जवळच एका दुकानात केळी दिसली. ती खाऊन तोंडाची आणि पोटाची भगभग थोडीशी शांत केली.

नागरकोइलहून कन्याकुमारीला जाताना शुचीन्द्रम् वाटेत लागते एवढ्यासाठीच तिथे उतरायचे होते असे नाही. तर त्याचे स्वतःचे तसेच माहात्म्य आहे म्हणून. अनसूयेच्या पातिव्रत्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याच्या प्रयत्नात स्वतःचे प्रौढ रूप गमावून ब्रह्मा-विष्णु-महेशाना बालरूप घ्यावे लागले ते इथेच. त्यांची मंदिरे इथे आहेत. अहल्येशी विश्वासघाताने रतिकर्म केल्यामुळे इंद्राच्या देहाला सहस्र भगे पडली होती. बालरूपातल्या ब्रह्मा-विष्णु-महेशाचे त्याने इथेच दर्शन घेतले आणि तो 'शुचि' झाला, म्हणून ह्या स्थानाला शुचीन्द्रम हे नाव पडले. देवी कुमारीशी विवाह करण्यासाठी कैलासाहून निघालेल्या शंकराला येता येता उशीर होऊन उजाडल्यामुळे इथेच थांबून स्थाणुरूप घ्यावे लागले. त्या स्थाणुस्वामींचे मंदिरही इथेच आहे. दत्तात्रेयाचे दर्शन घेण्यासाठी आणि शंकराची पूजा करण्यासाठी इंद्र दररोज रात्री इथे येतो. अंतराळातून जाणाऱ्यायेणाऱ्या त्याच्या रथाच्या घंटा इथल्या भाविकाना ऐकू येतात. आपल्याला घंटा जरी ऐकू आल्या नाहीत तरी त्या कथाशी निगडित झालेली मंदिरे पाहता येतात.

उतरून मंदिराकडे जाऊ लागल्याबरोबर प्रथम लक्ष वेधते ते समोरच्या तेप्पाकुलम्-मधल्या दगडानी बांधलेल्या मंडपाकडे. बांधकाम आणि कोरीवकाम एखाद्या दागिन्यासारखे सुबक आहे. आणि तेप्पाकुलम्च्या आरशासारख्या स्थिर पाण्यात पडलेल्या त्याच्या प्रतिबिंबामुळे त्याचे सौंदर्य दुणावले आहे.

आपण मंदिरात प्रवेश करू लागलो की, रती आणि मदन ह्यांच्या अत्यंत रेखीव, बाटदार आणि अलंकृत मूर्ती आपले स्वागत करतात. दक्षिणेतल्या इतर काही मंदिरातल्याप्रमाणेच ह्याही मंदिरात जलतरंगाचे, सतारीचे, तबल्याचे बोल काढणारे दगडी खांब आहेत. आणि दक्षिणेतल्या इतर काही ठिकाणातल्याप्रमाणेच एकाचा दुसऱ्याशी प्रमाणसंबंध नाही अशी एकमेकाना चिकटलेली लहान-मोठी मंदिरेही आहेत. त्यामुळे एकेक मंदिर सुंदर असले तरी त्या सर्वांचा एकत्रित परिणाम गर्दीचाच होतो.

शुचीन्द्रमहून कन्याकुमारीकडे जाताना अगोदर थोडा चढ लागतो, तो चढून उतरू लागले की, समोर एकदम सागराचा विस्तार दिसू लागतो आणि मनच विस्तारल्यासारखे होते. सूर्यास्ताच्या आधी कन्याकुमारीला पोचून सूर्यास्त साधायचा होता. त्याप्रमाणे साधला. इतर ठिकाणी पश्चिम किनाऱ्यावरून समुद्रात होणारा सूर्यास्त दिसतो त्यापेक्षा इथे वेगळा दिसतो असे नाही. किंबहुना, सूर्यास्ताची वेळ जवळ येत चालली म्हणजे क्षितिज अधिकाधिक धूसर होत जाते आणि समुद्रात बुडण्यापूर्वीच सूर्यास्त झाल्यासारखे वाटते. पण कन्याकुमारीचे खरे वैशिष्ट्य हे आहे की पूर्व-पश्चिम-दक्षिण अशा तीनही दिशाना क्षितिजापर्यंत समुद्र पसरला आहे. असे दुसरे ठिकाण भरतखंडात नाही. त्यामुळे चैत्री आणि अश्विनी पौर्णिमाना ह्या ठिकाणी उभे राहून

एकाच वेळी पूर्व सागरातून वर येत असलेला चंद्र आणि पश्चिम सागरात खाली जात असलेला सूर्य पाहता येतात. असे दृश्य इतरत्र कुठेही दिसत नाही.

आपल्या देशाच्या अगदी दक्षिणेकडल्या ह्या टोकावर उभे राहून तीनही दिशांना क्षितिजापर्यंत पसरलेल्या समुद्राकडे पाहिले की मन क्षणभर गांभीर्याने स्तब्ध होते. परशुरामाने समुद्रापासून भूमी मिळवण्याकरिता आपला परशू दक्षिणेकडे फेकला. तो जिथे पडला ते हे कन्याकुमारीचे टोक. इथून उत्तरेला सह्याद्रीच्या पश्चिमेकडे मागे सरकून समुद्राने जी भूमी दिली ते केरळ आणि कोकण.

पुराणकथानी आपला सगळा देश भारून टाकला आहे. त्या खऱ्या-खोट्या कशाही असल्या तरी त्यांनी त्या त्या स्थानाला जिवतपण आला आहे. तिथे मंदिरे निर्माण झाली आहेत आणि त्यानी देशभरच्या माणसांना खेचून आणले आहे. इथे कन्याकुमारीपाशी उभे राहिले म्हणजे उत्तरेला कैलासापर्यंत आपले मन धावते. ह्या दोन टोकांच्या मधला देश आपला आहे. आपण त्याचे आहो. अनादिकाळापासून आजपर्यंतच्या ह्या देशाच्या इतिहासाचे आर्य-अनार्य, वैदिक-अवैदिक संस्कृति-परंपरेचे आपण वारस आहो ह्या विचाराने मन भारावते.

कन्याकुमारीच्या आरतीची वेळ होत आली होती. शुचीन्द्रमप्रमाणेच इथेही कपडे बदलले, धोतर गुंडाळले आणि अभिषेकासाठी गुलाबपाण्याची बाटली घेऊन, दगडी खांब टाळीत, अंधारातून वाट काढीत आत गेलो. गर्दी होती, पण मूर्ती दिसत होती. देवीचे सौंदर्य अप्रतिम आहे. किंचित उभट चेहरा, सरळ नाक, छोटीशी जिवणी, टपोरे डोळे, गोंडस हात, केळफुलातल्या फणीसारखी निमुळती, एकमेकांना चिकटलेली नाजूक बोटे, उजव्या हातात अक्षमाला आणि डावा लोंबत सोडलेला, भोवताली लामणदिव्याची प्रभावळ, तोंडावर चंदनाचा लेप दिलेला, हनुवटीवर, गालावर, कपाळावर हिरे जडवलेले पण त्यामुळे विरूपता मुळीच आलेली नाही. संमुख समचरण ती उभी आहे. कौमार्याचा विनय आहे. मुखावर हलकेसे स्मित आहे. मुद्रा प्रसन्न आहे. सस्मित, एकाग्र, निग्रही पण विनयशील अशी ती मूर्ती पाहू लागले म्हणजे दृष्टी काढून घ्यावीसे वाटत नाही.

देवी कुमारी शंकराची वाट पाहत उभी आहे. आणि कल्पातापर्यंत उभी राहणार आहे. तिला शंकराशी विवाह करायचा होता. गर्गाचार्यांचा मुहूर्त ठरला होता. कारण देवदेवतांना रात्रीच्या वेळीच भूतलावर येता येते सगळी सिद्धता झाली होती. मध्यरात्र उलटून गेली तशी कुमारी अधीर होत चालली. रात्रही पहाटेकडे सरकत चालली. तिला वाटले, शंकराला किती उशीर होतोय हा! ती त्याला सामोरी जायला निघाली. दोन कोसावर पोचली. आणि कोंबडा आरवला. तिचा धीर सुटला. तिला वाटले आता उजाडणार. म्हणून ती तशीच परत फिरली आणि इथे येऊन शंकराची वाट पाहत उभी राहिली. जिथून ती परत फिरली होती तिथे तिच्या एका पावलाचा ठसा उमटला तो अजून आहे.

महाराष्ट्रात अंब्याच्या योगेश्वरीचे लग्न परळीच्या वैजनाथाशी ठरले होते. तेही गर्गाचार्यांच्याच मुहूर्तावर व्हायचे होते. पण ते लग्न तिला नको होते. म्हणून तिने वेणी-फणी, वस्त्रे-प्रावरणे ह्यात वेळ घालवला आणि मुहूर्त टाळला. ती तिथे अंबेजोगाईला एकटीच आहे.

इथे देवी कुमारीला शंकराशी लग्न करायची इच्छा होती, तर त्यालाच कैलासाहून दक्षिणेकडल्या ह्या टोकापर्यंत यायला उशीर झाला. म्हणून कुमारीही इथे एकटीच आहे. बहुधा मुद्दामच पूर्वेकडे तोंड करून उभी आहे. पुन्हा जेव्हा लग्नाची वेळ येईल तेव्हा शंकराने स्वतः होऊन आपली मनधरणी करावी अशी तिची अपेक्षा असेल.

लग्नासाठी सिद्ध केलेले साहित्य सगळे समुद्रार्पण करावे लागले. वेगवेगळ्या रंगाच्या, आकारांच्या, वाळूच्या कणाच्या रूपाने ते अजून तिथे दिसते. त्यातलेच मूठभर वाळूचे कण मी बरोबर आणले आहेत. त्याच्याकडे जेव्हा जेव्हा पाहतो तेव्हा तेव्हा कन्याकुमारीची मूर्ती डोळ्यापुढे उभी राहते आणि केरळच्या हिरव्या आठवणीही जाग्या होतात.

# कांतिमत्
# स्वर्गखण्डम्

त्रिवेंद्रम ते कन्याकुमारीपर्यंतचा केरळाचा दक्षिणेकडला भाग पाहून झाला होता. परत जाताना त्रिवेंद्रमवरूनच पुढे उत्तरेकडे कोचीला जायचे आणि कोची पाहून केरळाचा निरोप घ्यायचा, असा प्रवास आखला होता. थेट कोचीला घेऊन जाणारी टॅक्सी कन्याकुमारीलाच मिळाल्यामुळे काम सोपे झाले होते. सामान टॅक्सीत टाकले आणि कन्याकुमारी सोडले.

टॅक्सी नागरकोइलच्या मार्गाला लागली तरी मन थोडेसे मागे घोटाळतच होते. कन्याकुमारीची अटकर बांध्याची, प्रसन्न मुद्रेची, वेल्हाळ मूर्ती डोळ्यासमोरून हलत नव्हती. गांधीस्मारकाच्या विरूप, विसंगत वास्तूची आठवण मध्येमध्ये येत होती. विवेकानंदस्मारकाची वास्तू तशी भव्य आणि सुसंगत. पण मनात येत होते, त्या खडकावर एवढे मोठे मंदिर बांधण्याऐवजी विवेकानंदांचा एखादा उभा किंवा ध्यानस्थ बसलेला पंचधातूचा भव्य पुतळा उभारला असता तर ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि परिसराच्या विशालतेला अधिक शोभून दिसले असते. आणि जाता-येता माणसे सहज त्याच्याकडे पाहू शकली असती. पण—

ही आठवणींची प्रतिबिंबे एकमेकांत मिसळत मागेपुढे होत आहेत तोच नागरकोइल आलेच. नागरकोइल म्हणजे नागाचे देऊळ. पन्नास-पाउणशे मैलांच्या ह्या परिसरात कन्याकुमारी, शुचीन्द्रम; तिरुनेलवेली, तिरुचेंदूर, नागरकोइल अशी अनेक प्रसिद्ध हिंदू मंदिरे आहेत. इथेच जवळच मारुती लंकेकडे नेत असलेल्या द्रोणागिरीचा तुकडा—मरुत्तमलै—आहे. साहजिकच ह्या परिसराचे हिंदूंच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. पण खिस्त्यांच्या दृष्टीनेही त्याला फार महत्त्व आहे; आणि हिंदूंनी विचार करावा असे आहे. तिरुचेंदूरच्या जवळच लहानसेच पण नाझारेथ नावाचे एक गाव आहे.

खुद्द कन्याकुमारीला खिस्ती केंद्र आहे आणि ज्या खडकावर विवेकानंद स्मारकमंदिर बांधले आहे त्यावर खिस्ती मिशनरी आपला हक्क सांगत होतेच. त्यामुळेच तर हिंदूंचा हक्क शाबीत होऊन स्मारक उभे राहायला अनेक वर्षे लागली.

हा सगळा भाग सेंट फ्रान्सिस झेवियरची कर्मभूमी होती. तिरुनेलवेली येथे त्याने आपल्या धर्मप्रसाराच्या कार्याला आरंभ केला आणि तिथूनच पश्चिमेकडे त्रावणकोर

संस्थानचा सगळा दक्षिण भाग आपल्या कार्याने व्यापून टाकला. अंगावर धड वस्त्र नाही, पायात पायतणे नाहीत, असा तो सारखा फिरत होता. त्याच्या कामाचा झपाटा असा की, कन्याकुमारीपासून कोळ्ळमपर्यंतच्या शंभर मैलाच्या पट्टयात हिंडून केवळ तीन महिन्यात त्याने हजारो लोकाना बातिस्मा दिला. एकेका महिन्यात दहा-दहा हजार लोकाना तो ख्रिस्ती धर्माची दीक्षा देई. एखाद्या खेड्यात जायचे, तिथल्या लोकाना गोळा करायचे, ख्रिस्ती धर्माचे रहस्य आणि माहात्म्य त्यांच्या मनावर बिंबवायचे—ते बिंबत असेच—आणि त्याना बातिस्मा द्यायचा, ही त्याची पद्धत. पुरुषानी बातिस्मा घेतला की त्याच्यामागून त्याची बायका-मुले येत. बातिस्मा दिल्यावर त्याच लोकाना तो आपली जुनी मंदिरे उद्ध्वस्त करून त्यातल्या मूर्ती फोडून तोडून टाकायला सांगत असे आणि ते त्याप्रमाणे करीत. ते पाहून त्याला फार आनंद वाटे. तो म्हणतो, "ज्यानी त्या मूर्तीची पूजा केली त्यानीच आपल्या हातानी त्या फोडलेल्या पाहताना मला जो आनंद होतो त्याचे वर्णन करणे माझ्या शक्तीपलिकडचे आहे."
ख्रिस्ताच्या बारा शिष्यापैकी सेंट टॉमस हा पहिल्या शतकात केरळात आला आणि त्याने ह्या भागात ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराला आरंभ केला, अशी समजूत आहे. तिला आधार असेल किंवा नसेल, पण सेंट फ्रान्सिस झेवियरने केलेल्या कार्याला इतिहासाची साक्ष आहे. आणि त्याचा पुरावा म्हणजे आपल्या संबंध देशात इतर राज्यांच्या मानाने ह्या भागात ख्रिस्त्यांची संख्या सगळ्यात अधिक आहे.

कन्याकुमारीपासून थेट कोचीपर्यंत जायला टॅक्सी मिळाली होती, त्यामुळे प्रवास सुखात चालला होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत दोनशे मैल प्रवास करीत होतो. डिसेंबर-जानेवारीचे दिवस. हवेत गारवा, तांबडा रस्ता, हिरवी शेते-झाडे, निळे आकाश. कुठेही रखरखीत नाही, भगभगीत नाही—आणि वस्ती नाही असा मैलभराचासुद्धा टापू नाही. दिवस कसा गेला, आणि प्रवास कसा झाला ते कळलेही नाही. एक गाव संपते कुठे आणि दुसरे सुरू होते कुठे ते समजत नाही. घर, भोवतालच्या मोकळ्या जागेत भाताची शेते, माडाची, आंब्या-फणसाची झाडे, मधूनमधून सडपातळ एरंडासारख्या दिसणाऱ्या टॅपिओकाची लागवड. ह्या सर्वांच्या मागे समुद्राचा निळा-करडा न संपणारा पट्टा. सगळीकडे हिरवे-निळे, निळे-हिरवे घराची थोडीशी दाटी दिसू लागली की समजावे, हे एक वेगळे गाव आणि त्याची ही बाजारपेठ. पेठेतून बाहेर पडता पडता घरे विरळ व्हायची. हा विरळपणा जाणवतो न जाणवतो तो पुढल्या गावाची बाजारपेठ यायची. सकाळी मुले-मुली खांद्यावर दप्तर अडकवून शाळेला जाताना दिसली, दुपारी घरी परतताना आणि पुन्हा शाळेत जाताना. एखादा सरकता चित्रपट पाहिल्यासारखे वाटत होते. सगळ्या लोकाचे कपडे बहुतेक पांढरे. एकंदरीत माणसे स्वच्छ. पाणी विपुल. सगळीजणे दिवसातून दोनदा स्नान करतात. बहुधा त्यामुळेच स्त्रियांचे केस मोकळे किंवा सैलसर बांधलेले दिसत. माणसे काळी. रूप फारसे नाही. पण कामकरी लोकाचे तुळतुळीत काळ्या

रंगाचे, दणकट, पिळदार देह पंचधातूच्या ओतीव पुतळ्यासारखे रेखीव बांधेसूद दिसत होते. कालिदासाने रघुवंशाच्या तेराव्या सर्गात वर्णन केलेला हा प्रदेश. त्या वेळी वस्ती कमी दाट आणि झाडी अधिक दाट असेल. त्या वेळी समुद्राच्या वेळेवरची हवा खायला साप येऊन पसरलेले असत. आता साप नाहीत पण समुद्राची वेळा तीच आहे तशीच पिगट-पांढरी.

दुपार उलटल्यावर अलेपी गाव लागले. मोठी बाजारपेठ. दुकानांची दाटी, गिऱ्हाइकांची गर्दी, घासाघिशीचा कोलाहल. शेजारीच समुद्राचा आत आलेला कालव्यासारखा फाटा. त्यातून तट्ट्याने शाकारलेल्या मचव्यातून मालाची आणि माणसांची वाहतूक चाललेली. शहर नुसते रसरसत होते. चहाची वेळ होत आली होती. कॉफी घ्यावी, काही तरी खायला घ्यावे, चटया, टोपल्या वगैरे खास केरळी वस्तू बऱ्याच दुकानातून दिसत होत्या, त्यापैकी काही विकत घ्याव्या म्हणून टॅक्सीतून उतरलो. पण दक्षिणेत इतर ठिकाणी जाणवलेली पुन्हा तीच भाषेची अडचण. हिंदी, इंग्रजी काही कोणाला कळत नाही. केळी दिसली त्याच्या किंमतीची चौकशी केली. बोलणे काही कळत नव्हते. पण एका केळ्याचे आठ आणे सांगतो आहे असे वाटले. मी रागावल्यासारखे त्याच्याकडे पाहिले. त्याने तुच्छतेने माझ्याकडे पाहिले. बहुधा, "हे कसले भिकारडे गिऱ्हाईक!" असे त्याला म्हणायचे असावे. तोच अनुभव इतर दुकानातदेखील आला. अखेर सगळी खरेदी मनातल्या मनातच मनपसंत भावाने केली, एका हॉटेलात कॉफी घेतली, आणि निघालो.

कधी केरळात गेलो तर आतल्या जलमार्गाने मचव्यातून प्रवास करावा असे योजले होते. कारण, त्याचे फार कौतुकाने केलेले वर्णन वाचले-ऐकले होते. आणि कालव्याची सुंदर रंगीत चित्रेही पाहिली होती. पण कालव्याच्या पाण्यातली घाण, त्या घाणेरड्या मचव्यातली माशांची, मडक्यांची आणि तड्‍र मालाची गर्दी पाहिली आणि मन फिरले. सगळे दृश्य डोळ्यांना अतिशय संतोषजनक, पण नाकाला तितकेच संतापजनक. त्याच पाण्यात भिजत-कुजत टाकलेल्या काथ्याची प्रचंड वर्तुळे त्रिवेंद्रमला जाताना पाहिली होती आणि त्याची दुर्गंधी सोसली होती. तेव्हा, बरे झाले आपण मचव्यातून प्रवास केला नाही, असे वाटले.

"तुम्हांला नाची (म्हणजे बाई) पाहिजे असेल तर कोचीला जा." अशी मल्याळी भाषेत एक म्हण आहे, असे आम्हाला कोणीतरी सांगितले होते. 'नाची' आणि 'कोची' ह्यांचे यमक जुळवण्यासाठीच बहुतेक ही म्हण तयार झाली असावी; किंवा कोचीची बदनामी करण्यासाठी. एरव्ही 'नाची' कोणत्याही लहानमोठ्या गावात मिळण्यासारखी असतेच. पण मी 'नाची'साठी कोचीला चाललो नव्हतो. मला कोचीचे अफाट पसरलेले बंदर, कोचीच्या राजाचा राजवाडा, यहुद्यांची मशीद, जुन्या यूरोपियन कंपन्यांच्या वखारी आणि जुनी चर्चेस पाहायची होती.

कोचीचा राजवाडा मटनचेरी भागात आहे. आणि त्याच भागात कोचीचा सगळा व्यापार आहे. मराठी मनाला कोचीबद्दल एक आपलेपणा आहे. कारण इथे गोव्यातली बरीच सारस्वत कुटुंबे व्यापारात आहेत आणि आणखी विशेष म्हणजे 'केरळकोकिळ'कर्ते कृष्णाजी नारायण आठल्ये कोचीमध्येच एका पेढीवर कामाला होते.

मटनचेरीचा राजवाडा पाहायचा तो त्यातल्या चित्रांसाठी. पद्मनाभपुरमच्या राजवाड्याच्या देवघरातल्यासारखीच ह्या वाड्यातली सोळाव्या शतकातली चित्रे अजून ताजीतवानी टवटवीत आहेत. पण इथल्या चित्रांत विविधता अधिक आहे. रामायण-कथेसंबंधीची चित्रे पुष्कळ आहेत. दशरथ पुत्रकामेष्टी यज्ञ करतो त्याचे चित्र आहे. आणि पुढे एका चित्रात त्याच्या तीनही राण्यांना मुले होताना दाखविली आहेत. शिव आणि मोहिनी ह्यांच्या प्रणयाची चित्रे आहेत. शास्ता किंवा ऐय्यपन ह्या देवाचे केरळात फार माहात्म्य आहे. शिव आणि मोहिनीरूपातला विष्णू ह्यांच्या संबंधा-पासून त्याचा जन्म झाला असे मानतात. शिवाला बदनाम करण्याकरता वैष्णवांनी ही कथा दुष्टाव्याने रचली आहे, असेही सांगतात. पण केरळात अनेक हॉटेलात आणि दुकानात ऐय्यपनची चित्रे दिसतात. इतके त्याचे माहात्म्य आहे.

शिव-मोहिनी-प्रणयाप्रमाणेच कृष्ण-गोपींच्या प्रणयक्रीडांचीही चित्रे आहेत. पण माझ्या मनावर सर्वांत जास्त ठसली ती शिवपार्वतीपरिणयाची चित्रे. चुन्याच्या पांढऱ्या गिलाव्यावर नुसत्या गेरूच्या रंगाच्या रेषा आहेत. पण त्यांची लय, जोम आणि जिवंतपणा मनावर ठसतात. कदाचित त्यांत रंग भरलेले नाहीत म्हणूनही ती अधिक वेधक वाटत असतील.

कोचीचा किल्ला ही हिंदुस्थानातल्या युरोपियन वसाहतींपैकी सगळ्यात जुनी वसाहत. किल्ल्याच्या उत्तरेच्या बाजूला समुद्र आणि कोचीचे अफाट वाटणारे बंदर आहे. किनाऱ्याकिनाऱ्याने वळण घेत घेत मी सेंट फ्रान्सिस चर्चकडे जाऊ लागलो. दुपारची बारा-एकची वेळ होती. डावीकडे मोठमोठ्या यूरोपियन कंपन्यांची ऑफिसे आणि मालाची कोठारे होती, पण सगळी बंद होती. रस्ता जवळजवळ निर्मनुष्य होता इतका की, मला विसाव्या शतकातून एकदम सोळाव्या शतकात गेल्यासारखे आणि एकटे-एकटे वाटू लागले. आज दिसणाऱ्या मोठ्या बोटी सोडल्या तर कोचीचे बंदर साडेचारशे वर्षांपूर्वीदेखील असेच दिसत असेल. १५०३ साली पोर्तुगीजांनी हिंदु-स्थानाच्या भूमीवर बांधलेला हा पहिला किल्ला, आणि हिंदुस्थानात यूरपियनांची पहिली वखार स्थापन झाली तीही इथेच. अल्बुकर्कबरोबर आलेल्या फ्रान्सिस्कन पाद्र्यांनी इथे छोटेसे चर्च बांधले होते. त्याच जागेवर सेंट फ्रान्सिसचे चर्च उभे आहे. अशा त्या ऐतिहासिक भूमीवर, त्या चर्चमध्ये मी उभा होतो आणि एका अडीचशे वर्षांच्या जुन्या रजिस्टरात, कोचीच्या राजघराण्यातला कोणीतरी ख्रिस्ती झाला त्याची नोंद आहे ती पाहत होतो. तिथला एक पाद्री मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने ती मला दाखवीत होता. हिंदुस्थानात पोर्तुगीज आले आणि गेले, पण इतिहास

राहिलाच आहे. तो तिथे मूर्तिमत नोंदला होता.

चर्चेमधून बाहेर पडून मी बंदरावर आलो आणि तिथे बसून राहिलो. एक रात्र होतो अगदी एकटा. मासे पकडण्यासाठी टाकण्याची दोनचार मोठीथोरली चौकोनी जाळी छत्र्यासारखी पाण्यावर अधांतरी टांगलेली होती. पण जवळपास कोणी माणसे नव्हती. काही अंतरावर एका झाडाखाली एक बकरी बसली होती. मालक असेलच कुठेतरी, पण दिसत नव्हता. बकरी पोटातले चाऱ्याचे घास तोंडात आणून रवंथ करीत होती. माझ्याही आठवणीतून आपल्या इतिहासाचे तुकडे वर येत होते आणि त्यावर मी रवथ करीत होतो रवंथ करताना बकरीच्या चित्तात काय चालले होते ते तिला माहीत. पण माझे चित्त मात्र फारसे स्वस्थ नव्हते. कोचीच्या राजघराण्यातला एकजण ख्रिस्ती झाला. कोलीकोडच्या झामोरिनच्या घराण्यातला कोणीतरी मुसलमान झाला. आरंभी आलेल्या ख्रिस्त्याशी आणि मुसल्मानाशी केरळातले राजे फार औदार्याने वागले त्याची अजून प्रशंसा होते. औदार्याबरोबरच त्यानी थोडा सावधपणा आणि मुत्सद्दीपणा दाखवला असता तर! किती वेळ हा रवंथ करीत बसलो होतो, कोण जाणे. एकदम वाटले, बराच उशीर झाला. आणि झटकन उठून चालू लागलो.

यूरपियनाची हिंदुस्थानातली पहिली वसाहत जशी कोचीमध्ये झाली, तशी यहुद्यांचीही पहिली कायम वसाहत कोचीमध्येच झाली त्यांची स्वतंत्र वस्ती मटनचेरीतच आहे. अरुंद रस्ता, घराला घर लागून, दाराच्या चौकटीला उजवीकडे पितळी नळकांडे—'शद्याय'—लावलेले दिसत होते, म्हणून ते घर यहुद्याचे म्हणून ओळखायचे. एरवही इतर घरासारखेच. त्या घराच्या दारात यूरोपियन पोशाख केलेल्या गोऱ्या बायकाना एकमेकींशी मल्याळीत बोलताना पाहून गमत वाटली.

"जवळच सिनॅगॉग आहे तो पाहा ना. फार इंटरेस्टिंग आहे." मी कोणीतरी नवखा आहे हे ओळखून एक गृहस्थ म्हणाले.

सिनॅगॉग म्हणजे एक प्रशस्त हॉल आहे. खूप सुशोभित आहे. वेगवेगळी आकृति-चित्रे असलेली चिनी मातीची कौले फरशीत बसविली आहेत. कोचीच्या राजाने यहुदी लोकाना दिलेला एक ताम्रपट, एक मुकुट, अशा शेकडो वर्षांच्या जुन्या वस्तू तिथला मनुष्य मोठ्या आस्थेने दाखवीत होता. सुदैवाने तो मुंबईत राहिलेला होता. इंग्रजीत बोलत होता.

कोचीमधून हिंडताना ठिकठिकाणी मोकळ्या जागेत मोहरीसारख्या काळपट रंगाचे काहीतरी खूपसे पसरून वाळत घातले आहे आणि माणसे त्यातून फिरत खराटासारखे अवजार फिरवून ते खालीवर करताहेत, असे मी पाहत होतो. मला कळेना, काय आहे. यहुद्यांच्या मशिदीशेजारी एका मोकळ्या जागेतही मला तेच दिसले. माझे कुतूहल आवरेना. धीर धरून मी पुढे झालो आणि जवळ जाऊन वाकून पाहू लागलो. तो सगळा काळसर विस्तार म्हणजे वाळत घातलेली काळी मिऱ्ये होती. ती चारी बाजूंनी चांगली वाळावी म्हणून माणसे ती वर-खाली करीत होती. दहा-पाच

तोळे मिऱ्ये पाहणाऱ्या माझ्या दृष्टीला खंडीभर मिऱ्ये अशी ठिकठिकाणी पसरलेली पाहणे हे एक अद्भुत दृश्य होते.

सांगली-मिरजेच्या बाजूला एकरच्या एकर जमिनीवर तकतकीत तांबड्या मिरच्यांचे गालिचे पसरलेले पाहिले होते, त्यांची मला ही मिऱ्ये पाहून आठवण झाली.

कोचीचा मुक्काम संपत आला होता. संध्याकाळी हॉटेलात जेवणाऱ्या हॉलमध्ये पंचवीस-तीस लोक एकदम आले. अंगाने मजबूत, रंगाने काळेकुळकुळीत, दाढीमिश्या वोट-वोट वाढलेल्या आणि कपडेही काळे—लुंगी आणि शर्ट. वेष, आकार आणि रूप ह्यामुळे इतके भयानक दिसत होते की, जणू भूत-वेताळाचे गणच रात्रीचा संचार करण्यासाठी बाहेर पडले असावेत. मी आपल्याशीच अंग सावरून घेतले आणि शेजारी बसलेल्या एका गृहस्थाला विचारले,

"हे कोण लोक आहेत? आणि त्यांनी असा पोशाख का केला आहे?"

सुदैवाने त्याला इंग्रजी कळत होते. तो म्हणाला,

"इथून दीडशे मैलांवर शबरी मलै नावाचा पर्वत आहे. (मलै म्हणजे पर्वत.) तिथे संक्रांतीच्या वेळेला शास्ता देवाची यात्रा असते. त्या यात्रेला हे लोक चालले आहेत. हा त्यांचा यात्रेचा पोशाख आहे. यात्रा फार कठीण असते. डोंगरात खूप चढण चढून जावे लागते."

"हे कोणत्या जातीचे लोक आहेत?"

"बहुतेक खालच्या जातीचे हिंदू आहेत. पण त्या यात्रेला बरेच खिस्ती आणि मुसलमानदेखील जातात, कारण त्यांच्यात शास्ताचे भक्त आहेत."

एकंदरीत शास्ता हे बरेच उग्र दैवत दिसले. केरळात हिंदू, खिस्ती, मुसलमान ह्या सगळ्यांचा पोशाख जवळजवळ सारखाच—लुंगी आणि शर्ट किंवा बुशशर्ट. सगळ्यांची भाषाही एकच आणि रंगरूपही. त्यामुळे आपल्यासारख्या माणसाला कोण कोणत्या धर्माचा आहे हे ओळखणे कठीण जाते. लेखक परिषदेच्या निमित्ताने झालेल्या त्रिवेंद्रमच्या मुक्कामात प्रोफेसरांच्या घरी मराठी साहित्यासंबंधी माझ्याबरोबर चर्चा करण्यासाठी दहा-बारा मल्याळी लेखक आले होते. त्यांच्यातले काही लेखक मुसलमान आणि खिस्ती होते हे त्यांनी नावे सांगितली म्हणून कळले. एरवी कळले नसते. इतके ते मल्याळी समाज आणि साहित्य ह्यांच्याशी एकरूप होते. महाराष्ट्रात आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रात असे दिसत नाही.

शेनकोट्याच्या मार्गाने केरळात प्रवेश करताना पिवळा पोशाख केलेले श्री नारायण गुरुस्वामींचे ईळवा जातीचे अनुयायी पाहिले होते. आता काळ्या पोशाखातले शास्ता देवाचे भक्त पाहिले. केरळामध्ये हिरव्या-निळ्या रंगाच्या अनंत छटा आहेत, पण दुसरे रंग फारसे दृष्टीस पडत नाहीत. त्यामुळे हे रंगांतर बरे वाटले.

केरळाचा निरोप घ्यायला कोचीला गाडीत चढलो. रिझर्व्हेशन केले तेव्हा डब्या-

बाहेर 'एस-ओ-एम-ए-एन' असे नाव पाहून बरे वाटले. म्हटले, आलवायेला ओगयलचा काचकारखाना आहे. तिथले कोणी तरी 'सोमण' आपल्याच गाडीने जाणार असतील. बरे झाले. कोणीतरी मराठी बोलणारे भेटेल आणि गाडीत वेळ बरा जाईल. मद्रास सोडल्यापासून मी आपल्या मनाशीच जे काय मराठी बोलली असेन तेवढेच. पण हाय! ते गृहस्थ कोणीतरी 'सोमन्' म्हणजे 'सोम'च्या शेवटी 'न्' जोडणारे द्राविड गृहस्थ होते. ह्या प्रवासातला भाषेने दिलेला हा शेवटला धक्का.

शेनकोट्याजवळ सह्याद्रीने करून दिलेल्या वाटेने केरळात—भूतलावरच्या त्या स्वर्गखंडात—प्रवेश केला होता. त्याच वाटेने बाहेर पडून आंब्याची-फणसाची, माडांची-टेपिओकांची झाडे, भाताची शेते, शिंगासारखी दोन टोके वर काढणारी घरे पाहत पाहत त्या स्वर्गखंडाचा निरोप घेतला.

# पार्वतीचे क्रीडांगण

पार्वतीला एकदा अशी इच्छा झाली की आपण पाण्याचे रूप घ्यावे आणि नदी होऊन जिथे जिथे जाऊ तिथला प्रदेश सपन्न, समृद्ध आणि सुखी करावा. तिने आपली इच्छा शंकराजवळ प्रकट केली. शंकरच तो, "तथास्तु" असे म्हणून त्याने आपला त्रिशूळ पृथ्वीत जोराने खुपसला, तो वीतभर रुंदीचे विवर पडून त्यातून पार्वतीचे जलरूप उसळून वर आले आणि त्या वीतभर रुंदीच्या विवरातून जलरूप पार्वती बाहेर आली म्हणून तिला 'वितस्ता' नाव पडले. पार्वतीच्या पाठोपाठ तिच्या सख्यानाही वाटले की, आपणदेखील नद्याची रूपे घ्यावी. आणि मग तिच्या त्या सख्या हिमालयाच्या कुशीतून बाहेर पडल्या आणि त्याही भराभर धावत येऊन तिला मिळाल्या. मोठ्या उतारावरून सरसरा धावत सुटायचे, सपाटी लागली तर संथपणे पुढे सरकायचे. दगडा-धोंड्यांतून खळाळत फेसाळत त्यावरून उड्या मारायच्या. डोंगर-टेकाडे वाटेत आली तर त्याना वळसा घालायचा. सखल भाग लागला तर तिथे थबकायचे. लहान-मोठी तळी करायची. ती भरली की पुढे जायचे. अशी जलक्रीडा करीत त्या सगळ्या जलरूप पार्वतीला येऊन मिळाल्या. आपल्या ह्या मुलींचा सांभाळ करण्यासाठी, त्याचे क्रीडांगण सुरक्षित ठेवण्यासाठीच, जणू हिमालयाने आपले बाहू पसरून ते बंदिस्त केले आणि असे ठरवले की, आपली सगळी विविधता आणि आपल्या सौंदर्याची सगळी रूपे एकत्र दिसतील असा प्रदेश आपल्या जलरूप कन्यकासाठी निर्माण करायचा आणि त्याप्रमाणे निर्माण केला तो प्रदेश म्हणजे काश्मीरचे खोरे. 'वितस्ते'ला काश्मिरी लोक 'वियाथ' म्हणतात आणि बाहेरून आलेल्यानी तिला 'जेहलम' म्हटले. काश्मीरचे खोरे—जेहलमचे खोरे—हे पार्वतीचे, तिच्या सख्यांचे क्रीडांगण आहे. ऐंशी-पंचायशी मैल लांब आणि वीस-पचवीस मैल रुंद अशा ह्या खोऱ्यात हिमालयीन प्रदेशाचे सर्व विविध सौंदर्य एकवटले आहे. जिकडे पाहावे तिकडे गवताची हिरवी चमकदार आणि वेगवेगळ्या रंगाच्या फुलाचा शिडकावा असलेली मैदाने आहेत. जिथे जावे तिथे झरे, नद्या, ओहोळ, कालवे ह्यांचे जाळे आहे. लहान-मोठी तळी आहेत. पाणी नाही असे कुठे ठिकाण नाही. मैदानी भागात सफरचंदे, बदाम, अक्रोड, जरदाळू, पीचेस, शहतूत, चेरी

ह्याचे मळ्याना लागून मळे आहेत. आणि सफेदा, चीनार, कीकड हे शोभेचे वृक्ष आहेत. कालव्याच्या, नद्याच्या, तळ्याच्या काठावर ओथंबून वाकलेले वेद (विलो) आहेत. पर्वताच्या पायथ्याशी आणि अंगावर देवदार, चीड, आणि बुफर (फर) हे प्रचंड उंचीचे, निमुळते टोकदार होत गेलेले काळे-हिरवे वृक्ष आहेत. त्याची इतकी दाटी आहे की पडदाच उभा असल्यासारखा वाटतो. आणि ह्या सगळ्याच्या मागे हिमाच्छादित पर्वतांची शिखरे आणि रांगा आहेत.

शाहजहानने दिल्लीतल्या आपल्या दीवाने खासमध्ये दोन ओळी लिहून पृथ्वीवरचा स्वर्ग इथे आहे असे म्हटले, आणि आपल्या सगळ्या महालाखालून वाहणारा साठवलेल्या पाण्याचा एक पाट वाहवून त्याला 'नहरे बहेस्त' असे नाव दिले. पण त्याच्या आधीच जहांगीर बादशहाने श्रीनगरजवळ शालीमार बाग निर्माण करून जिवत पाण्याचा मोठा प्रवाह सबंध बागेत खेळवला आणि तिथल्या बारादरीत पृथ्वीवरचा स्वर्ग इथे आहे अशा ओळी लिहून ठेवल्या. स्वर्गाच्या एखाद्या कोपऱ्यात नखाएवढा एक चौकोन आखून घेऊन त्याला 'स्वर्ग' म्हणणे हे काश्मीरचा उपमर्द करण्यासारखे आहे. कारण सबध काश्मीर म्हणजेच 'फिर्दौस बरूए जमीन' आहे. सबंध काश्मीरभरच झाडे, फुले आणि सर्वत्र खेळते पाणी आहे.

काश्मीरमधल्या वृक्षाच्या आणि पाण्याच्या ह्या विपुलतेचा प्रत्यय आम्ही काश्मीरात जातानाच बनिहाल खिंडीतून खाली उतरून व्हेरनागला जेहलम्‌च्या उगमापाशी—म्हणजे जिथे जलरूप घेऊन पार्वती बाहेर पडली तिथेच—पहिल्यादा पाहिला. चाळीस-पन्नास फूट खोल अष्टकोणी कुंडातून पाटाने बाहेर येणारा आणि आसपासच्या दुसऱ्या झऱ्याचे पाणी आपल्यात घेऊन बागेच्या बाहेर पडणारा पाण्याचा स्वच्छ प्रवाह. चीड, सफेदा, चीनारचे प्रचंड वृक्ष पहिल्यादा तिथे पाहिले. त्या झाडाचा वेगळेपणा, प्रचंडपणा, उंची आणि विस्तार पाहून आपण एका वेगळ्याच प्रदेशात आलो आहो हे तत्काळ जाणवले. आणि नतर काश्मिरात जिथे जिथे गेलो तिथे तिथे अशी दृश्ये दिसली.

खुद्द श्रीनगरमध्ये तर नागिणीसारखी वळणे घेत जाणारी जेहलम्, तिच्यातून काढलेले अनेक कालवे, शेजारचे अतिविस्तीर्ण 'डल' सरोवर (खरे म्हणजे 'डल'चा अर्थच 'सरोवर' असा आहे.) आणि त्याची जणू पिले असल्यासारखी अनेक लहान-मोठी तळी—त्यामुळे इतके पाणी आहे की कोणत्याही दिशेने दहापाच मिनिटे चालत गेले तरी नदी, कालवा, तळे ह्यापैकी काही ना काही तरी दिसल्यावाचून राहत नाही. आणि चीनार, सफेदा, बन-अखरोट, कीकड हे वृक्ष तर जिकडे-तिकडे आहेतच.

प्रवासी म्हणून काश्मीरला गेल्यावर श्रीनगरजवळच्या शालीमार वगैरे बागा पाहणे आणि शिकाऱ्यात बसून डलमध्ये जलविहार करणे ह्या मुळी प्रवासी यादीतल्या पहिल्या आणि आवश्यक गोष्टी असतात.

काश्मीरमधल्या बहुतेक बागा मुगल बादशहांनी, त्यांच्या नातेवाइकांनी किंवा सरदार-मानकऱ्यांनी निर्माण केलेल्या आहेत. आणि सगळ्यांची रचनाही जवळजवळ एकसारखीच आहे. मागे बहुधा डोंगर आणि त्याच्या पोटातून—पायाखालून—बाहेर पडणारा पाण्याचा लोंढा. डोंगराची बाजू सोडून इतर तीन बाजूंनी भिंती आणि त्यात दरवाजे. उतारावर पायऱ्यापायऱ्यांनी सपाटी करून त्यावर गवत, फळा-फुलांची झाडे, आणि फुलांचे ताटवे लावलेले. उगमापासून प्रवेशद्वारापर्यंत पाटाने पाणी खेळवलेले आणि टप्प्या-टप्प्याने उतरताना धबधबे केलेले आणि त्यांच्या वरच्या बाजूला पाटावरच मंडप. बारादऱ्या बांधलेल्या. ह्यात फरक जो काय असेल तो क्षेत्रफळाचा, झाडांच्या संख्येचा, आणि पाणी कुठून कसे येते ह्याचा. त्यातही पुन्हा श्रीनगरजवळच्या तीनही मुख्य बागा डलच्या एका बाजूलाच आणि त्याच्या काठाशेजारीच असल्यामुळे पूर्वी त्या कालव्याने डलला जोडलेल्याच होत्या. त्यांचा आसमंतही फारसा वेगळा नाही. यामुळे बागा पाहत पाहत चालले म्हणजे आपण तेच तेच पाहत आहो असे वाटू लागते आणि पाहण्यातली चव बरीचशी कमी होते.

बागातल्या फुलांच्या ताटव्यांत सुंदर सुंदर गुलाब असतात. अगदी ओंजळ भरेल एवढ्या आकाराचे. पांढरे, तांबडे, पिवळे, केशरी, अगदी झळाळणाऱ्या रंगांचे गुलाब. पण ते सगळे कलमी गुलाब आहेत. जुन्या भाषेत सांगायचे तर विलायती. आणि त्यांच्या जोडीला पॉपी, झीनिया, डेलिया, डॅफडिल, आयरिस, फ्लॉक्स वगैरे आणखी विलायती फुले असतात. इथल्या ह्या गुलाबांना काश्मिरी म्हणायचे ते आपण ते काश्मीरमध्ये पाहतो म्हणूनच. एरव्ही असे 'विलायती' गुलाब आपल्याला इतरही ठिकाणी दिसतात. ते लाहोरच्या शालीमार बागेत आहेत. दिल्लीच्या बागात आहेत. बंगलोर-उटकमंडमध्येही आहेत.

काश्मीरच्या ज्या गुलाबाचे कौतुकाने केलेले वर्णन आपण वाचतो ते काश्मीरचे अस्सल गावरानी गुलाब आपल्याला तिथल्या बागात दिसत नाहीत. ते श्रीनगरच्या बाहेर प्रवास करताना रस्त्याच्या कडेला कुंपणात किंवा मोकळ्या जागेत दिसतात. त्यांना रंगाचे सौंदर्य वेगळेच असते, कारण ते सगळे कमीअधिक गडद गुलाबी रंगाचेच असतात.

काश्मीरमधल्या गुलाबांच्या सादृश्याप्रमाणेच काश्मिरी स्त्रियांच्या अलौकिक सौंदर्याची तारीफही आपण वाचलेली असते. उभट चेहरे, गोरी गुलाबी कांती, लांब, सरळ तरतरीत नाक, गोल निमुळती हनुवटी, विशाल तेजस्वी डोळे, बाकदार भुवया वगैरे वगैरे. पण अशा काश्मिरी रूपवती आपल्याला फक्त प्रवाशांनी विकत घ्यावीत म्हणून जी गुळगुळीत चकचकीत रंगीत कार्डे छापलेली असतात, आणि ज्यावर 'ॲपलगर्ल', 'फ्लॉवरगर्ल', 'काश्मिरी ब्यूटी' असे छापलेले असते, त्यावरच दिसतात. श्रीनगरमध्ये किंवा इतर ज्या गावात आम्ही हिंडलो तिथे रस्त्यावर किंवा बाजारपेठात आम्हाला कुठेही त्या दिसल्या नाहीत. पण दहा-बारा वर्षे वयाच्या मुली

अधूनमधून दिसल्या त्यांचे रंगरूप पाहून मात्र त्या वयात आल्यावर किती सुंदर दिसतील—किंवा वयात आलेल्या काश्मिरी स्त्रिया किती सुंदर दिसत असतील—ह्याची कल्पना करता आली. पण श्रीनगरातच पाहिलेला एक चेहरा मात्र माझ्या मनावर पक्का रेखला गेला आहे. सबंध अंगावर काळा बुरखा, तोंडावरचा पडदा तेवढा वर उलटलेला. साठ-पासष्ट वर्षांचे वय असेल. सबंध चेहऱ्यावर सूक्ष्म सुरकुत्यांचे जाळे. पण रंग अगदी स्वच्छ गोरा गुलाबी. कातडी नितळ, चेहरा उभट, जिवणी लहान, नाक धारदार, डोळे निळसर, केस पिंगट सोनेरी, आणि मुद्रा प्रसन्न-गंभीर. तरुणपणी ती अगदी लखलखीत सोन-पुतळीच दिसत असेल ह्यात शंका नाही आणि तीच काश्मिरी स्त्रियांची प्रतिनिधी समजायला हरकत नाही. काश्मीरचा प्रदेश जसा आपल्या देशातल्या इतर प्रदेशांपेक्षा वेगळा, तसे ते रूपही आपल्या देशात इतरत्र दिसणाऱ्या रूपापेक्षा अगदी वेगळे होते.

पण ही झाली काश्मीरची नागर स्त्री. काश्मीरचे गावरानी गुलाब जसे शेताच्या कुंपणावर किंवा जंगलात दिसतात तशा काश्मीरच्या अ-नागर स्त्रिया शेतातल्या चिखल-पाण्यात ओणवून कामे करताना, डोक्यावरून ओझी वाहून नेताना, किंवा श्रीनगरातच कालव्याच्या काठावर धुणी-भांडी करताना दिसतात. पण त्यांच्या एकरंगी करड्या तपकिरी किंवा निळ्या रंगाच्या सलवार-फेरन आणि डोक्यावरचा रुमाल ह्यामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व संपूर्णपणे झाकोळलेले असते. त्यामुळे राना-शेतातले एकरंगी काश्मिरी गुलाब जसे आपले लक्ष वेधून खिळवून ठेवू शकत नाहीत, तसेच मळखाऊ एकरंगी पोषाखांतल्या ह्या काश्मिरी स्त्रियाही आपले लक्ष वेधून खिळवून ठेवू शकत नाहीत. राजस्थानच्या किंवा माळव्याच्या शेतात काम करणाऱ्या, पिवळ्या, तांबड्या रंगांचे घागरे-चोळ्या, ओढण्या वापरणाऱ्या स्त्रिया लांबूनसुद्धा लक्ष वेधून घेतात. तसे काश्मिरात होत नाही.

श्रीनगरातला दुसरा प्रवासी कार्यक्रम म्हणजे शिकाऱ्यात बसून डलमध्ये जलविहार करणे. डलच्या काठाकाठाने हाउसबोटी आणि अगदी किनाऱ्यापर्यंत येऊन पोचणारी श्रीमंत व्यापारी-कारखानदारांची घरे दिसतात. ती इतकी जवळ आहेत की दिवाण-खान्यातले भरगच्च श्रीमंती फर्निचरसुद्धा दिसते. आधी आपण 'लोकुट' डल (लहान डल) मध्ये जातो आणि मग 'बड' (मोठ्या) डलमध्ये. डलमध्ये रूपा (रुपेरी) लंक (बेट) आणि सोना (सोनेरी) लंक (बेट) आहे. सोना लंकवर अकबराने लावलेले चार प्रचंड चीनार आहेत. म्हणून त्याला 'चार चीनार'च म्हणतात. तिथे चहा घ्यायचा एक कार्यक्रम असतो.

चारी बाजूला हिरवी झाडी, मधूनमधून तरत्या बागा, सोनेरी कमळांची बेटे, वर निळे आकाश आणि खाली ज्यात दाटीने वाढलेल्या पाणवेली डुलत असतात असे हिरवे-निळे पाणी सर्व संथ, शांत, प्रसन्न वाटते. पण नाही म्हटले तरी त्यात एक

प्रकारचा तोचतोपणा जाणवतोच.

प्रवासासाठी आखलेले हे ठराविक ठशाचे कार्यक्रम. ही स्थलदर्शने करीत असताना मनात येत होते, हे कार्यक्रम ठीक आहेत. पण ह्या कार्यक्रमांत नसलेली श्रीनगरमधली काही ठिकाणे आपण पाहिली पाहिजेत. मुख्य म्हणजे निदान शाह-हमदानचा खानका (मठ), जामे मसजिद, आणि जमले तर बडशाहचा मकबरा.

बाराव्या शतकापर्यंत हे काश्मीर संस्कृत विद्येचे आगर होते. लोल्लट, रुद्रट, मम्मट, कल्लट, आनंदवर्धन, अभिनवगुप्त, कल्हण, बिल्हण, क्षेमेन्द्र, ह्यांच्यासारखे पंडित, शास्त्री, काव्यमीमांसक, शैवागमाचे सूत्रकार आणि दार्शनिक ज्या काश्मिरात होऊन गेले त्या काश्मिरात पन्नासपाऊणशे वर्षांच्या अवधीत काही थोडी ब्राह्मण कुटुंबे सोडता बाकीच्या सर्व जातींचे सगळेच्या सगळे (म्हणजे जवळजवळ नव्वद टक्के) लोक मुसलमान कसे झाले ह्याचे आश्चर्य वाटते. बंदुकीचा बार होताच नाटकातला देखावा बदलावा तसे हे झाले. ह्या सार्वत्रिक धर्मांतरातूनच काश्मीरचे आजचे पेच आणि प्रश्न निर्माण झाले आहेत.

तिबेटहून येऊन काश्मीरची गादी बळकावणारा बौद्धधर्मीय रत्नशाह चवदाव्या शतकात मुसलमान झाला नसता तर कदाचित काश्मिरात धर्मांतरे होऊ लागली नसती. काश्मीरचे पूर्वीचे राजे हिंदू होते म्हणून त्यालाही हिंदू व्हावे असे वाटले. पण आमच्या हिंदू पंडितांनी म्हटले, "ते शक्य नाही." तेव्हा तो आणि त्याच्या बरोबर अनेक जण मुसलमान झाले. पण पुढे जे सार्वत्रिक इस्लामीकरण झाले त्यांत इराणातून आलेला सय्यद मीर शाह हमदान, नंतर त्याचा मुलगा सय्यद महमद मीर, काश्मीरचा सुल्तान सिकंदर आणि आधी ब्राह्मण असून नंतर मुसलमान झालेला त्याचा मंत्री सिंहभट्ट ह्यांचा मोठा हात होता. सय्यद महमद मीर, सुलतान सिकंदर आणि सिंहभट्ट ह्यांनी इस्लामीकरणाचा असा सपाटा लावला की, पंधरा वर्षांत काश्मीरची सर्व प्रजा मुसलमान झाली त्यात त्यांनी बाटवलेल्या ब्राह्मणांच्या जानव्यांचे वजन सात मण भरले म्हणतात.

ह्या धर्मांतरसत्राचे मूलस्थान म्हणजे शाह हमदानचा खानका. सय्यद मीर शाह हमदान हा श्रीनगरात आला तेव्हा श्रीनगरातल्या अत्यंत भव्य अशा कालिकेच्या मंदिरातल्या पुजाऱ्याशी त्याचा धर्मसंबंधी वाद झाला. त्यात पुजाऱ्याचा पराभव झाला आणि त्याने इस्लामचा स्वीकार केला. ते मंदिर पाडण्यात आले. त्याच्याच जोत्यावर शाह हमदानचा खानका उभा आहे. काश्मीरचा सगळा इतिहासच बदलून टाकणारे हे ठिकाण पाहिले नाही तर काश्मीरच पाहिले नाही असे होईल. म्हणून आम्ही ते पाहायचे ठरवले.

उभ्या-आडव्या रस्त्या-बोळांतून नेऊन आमच्या टॅक्सीवाल्याने आम्हाला खानका-समोर उभे केले. शहराच्या ऐन दाट वस्तीत, नदीच्या काठी उभ्या असलेल्या ह्या भव्य आणि उंच इमारतीचे बांधकाम हिंदुस्थानातल्या इतर ठिकाणच्या बांधकामापेक्षा

अगदी वेगळे आहे. संपूर्ण इमारत लाकडाची आहे आणि एखाद्या चिनी इमारतीसारखी दिसते. केरळात पद्मनाभपुरमला पाहिलेल्या राजवाड्याचीही मला आठवण झाली. वर घुमटाच्या ऐवजी चर्चच्या स्पायरसारखे निमुळते होत गेलेले लाकडी फळ्यांचेच शिखर आहे. आत खाली जमीन आणि चारी भिंती लाकडी फळ्यांच्याच आहेत. सगळे काम उत्तम पॉलिश केलेले चकचकीत आहे. जागा स्वच्छ आहे. शांत आहे. आतल्या खांबांपैकी एक बदरच्या लढाईच्या वेळी महमद पैगंबराच्या तंबूला लावलेल्या खांबापैकी आहे म्हणतात. त्यामुळे हे स्थान अधिकच पवित्र झाले आहे. एक हजरत बल सोडले तर काश्मिरी मुसलमानांचे हे सगळ्यांत पवित्र स्थान आहे. इथे उभे राहिलो तेव्हा काश्मीरच्या इतिहासाच्या महत्त्वाच्या वळणावर उभे राहिल्यासारखे वाटले.

याचे मशीदही अशीच देखणी लाकडाची आहे. तिचेही शिखर शाह हमदानच्या खानकाच्या शिखरासारखेच आहे. आतली नमाजाची जागाही उच्च भव्य आहे.

*काश्मीरच्या संपूर्ण इस्लामीकरणातून निर्माण झालेल्या प्रश्नासंबंधी आपण वर्तमानपत्रातून वाचतोच, पण आम्हांला त्याचा प्रत्यक्ष प्रत्ययही आला. वूलरचा वळसा घालून आम्ही बारामूलाकडे चाललो होतो. वाटेत बांडीपुरला तास-दीड तास मुक्काम* होता. आम्ही पोचतो तो पाचपंचवीस लहानमोठी मुले-मुली—कडेवरच्या मुलापासून तो अठरा-वीस वर्षांपर्यंतची—आमच्याभोवती गोळा झाली. घोटाळू लागली. त्यांतल्या लांबट चेहरे, नाजुक जिवण्या, धारदार नाके, बाकदार भुवया, आणि टपोरे पाणीदार डोळे असलेल्या बारा-तेरा वर्षांच्या गोऱ्या-गुलाबी मुली फार देखण्या होत्या. तशीच सातआठ वर्षांपर्यंतची मुलेही.

त्यांच्यात अठरा ते वीस वर्षांचे जे पाचसात तरुण होते ते माझ्या भोवती उभे राहिले आणि माझ्याकडे निरखून पाहू लागले. कफनीसारखा सैल आणि पायघोळ असा 'फेरन्' नावाचा झगा मी श्रीनगरला विकत घेतला होता. तो मी माझ्या सुटावरून घातला होता. आणि डोक्यावर काश्मिरी पांढरी टोकदार टोपी होती. त्यामुळेच ते माझ्याकडे तसे पाहत असावेत.

मी त्यांना विचारले, "तुम्ही माझ्याकडे असे काय पाहता?"

ते म्हणाले, "हे तुम्ही काय घातले आहे? हे आमच्याकडले गरीब लोक घालतात. भले लोक घालीत नाहीत. हे ओल्ड फॅशण्ड आहे."

मी म्हटले, "त्यात वाईट काय आहे? गरिबांशी हमदर्दी दाखवण्यासारखेच नाही का हे? शिवाय काश्मीरची आठवण माझ्याजवळ राहील."

मी चौकशी केली तेव्हा कळले की ते सगळे कॉलेजचे विद्यार्थी होते. त्यांनी मला अनेक प्रश्न विचारले. काश्मीरच्या प्रश्नावर तुमचे काय मत आहे? बांगला देशाबद्दल

तुम्हाला काय वाटते ? पूर्व पाकिस्तनात भारताने आपले सैन्य का पाठवले ? भारतात उर्दूची गळचेपी होते की नाही ?

फार वादात न शिरता आणि त्याना न भडकवता मी उत्तरे देत होतो. त्यांच्या सर्व बोलण्यात हिंदुस्थानाबद्दल राग आणि अविश्वास दिसत होता. सगळ्याचे तात्पर्य असे की "आम्हाला आझादी पाहिजे. हिंदुस्थानची ताबेदारी नको."

मी म्हटले, "पाकिस्तानची चालेल ?"

"वह सवाल ही नहीं उठता."

खरी गोष्ट अशी आहे की, काश्मिरात साक्षरतेचे प्रमाण वाढते आहे. आम्हाला गावोगावी शाळा दिसल्या. सर्व मोठ्या गावांत कॉलेजे आहेत. खालपासून वरपर्यंत सर्व शिक्षण मोफत आहे. इतर राज्याच्या मानाने करांचे प्रमाण काश्मिरात सगळ्यात कमी आहे. आणि पचवार्षिक योजनात केंद्राचे साहाय्य नव्वद टक्क्यापेक्षा अधिक आहे. हे सर्व त्याना सागण्याचा मी प्रयत्न केला, पण त्यांचे तुणतुणे चालूच राहिले देशातल्या इतर ठिकाणच्या मुसलमानाप्रमाणेच त्यांचीही मते एका विशिष्ट प्रचारावर पोसली जात आहेत हे उघड दिसत होते.

ह्याच मनोवृत्तीचा प्रत्यय बारामूलाला गेलो तिथेही आला. बारामूलाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा अतराअतरावर सफेद्याची झाडे लावलेली आहेत त्यांचे खांबासारखे सरळ उभे पाढरे-शुभ्र बुंधे आणि वरती चढत गेलेल्या गर्द हिरव्या फाद्या ह्यांच्या मधून जाताना त्यांच्याकडे सारखे पाहत राहावेसे वाटते.

बारामूला हे महत्त्वाचे लष्करी ठाणे आहे. तिथे भारतीय लष्कराची छावणी आहे आणि जागोजाग सैनिक दिसतात. १९४७ च्या आक्रमणाच्या वेळी पाकिस्तानी टोळीवाले बारामूलापर्यंत येऊन पोचले होते आणि त्याना पुढे श्रीनगरला जायचे होते. त्या वेळी शेख अब्दुलाचे त्या वेळचे एक सहकारी मकबूल शेरवानी ह्यानी, श्रीनगरकडे जाणारी जवळची वाट दाखवतो असे सांगून, पाकिस्तान्यांना तीन रात्री झुलवले होते. शेवटी पाकिस्तान्याच्या हे लक्षात आले तेव्हा शेरवानींची परीक्षा पाहण्याकरता त्यानी त्याना तीन वेळा 'पाकिस्तान ज़िंदाबाद !' असे म्हणायला सांगितले. पण मकबूल शेरवानी ह्यानी 'अल्ला हो अकबर', 'शेरे कश्मीर ज़िंदाबाद' आणि 'हिंदु-मुस्लिम-शिख इत्तिहाद ज़िंदाबाद' असे म्हटले तेव्हा पाकिस्तान्यानी त्यांच्या छातीवर चवदा गोळ्या झाडल्या. गावातल्या मुख्य रस्त्याला लागूनच एका शिळेवर ही सगळी हकीकत कोरलेली आहे. तो मजकूर मी वाचू लागलो तर वीसबावीस वर्षांचा एक तरुण आमच्या आणि शिलालेखाच्या मध्ये येऊन उभा राहिला. त्याला टाळून मी वाचू लागलो तर मी जसा वळे तसा तो जागा बदलू लागला. बाजूला व्हायला सागितले तर ऐकेना. शेवटी जरा दरडावून सागितले तेव्हा मोठ्या नाखुषीने बाजूला झाला.

असाच अनुभव शालिमार बागेत 'साउंड ॲंड लाइट' ह्या कार्यक्रमाच्या

शेवटी आला. केवळ आवाज, प्रकाश आणि धावते निवेदन ह्यांच्या साहाय्याने शालिमारच्या निर्मितीपासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा इतिहास त्यात फार प्रभावीपणे उभा करण्यात येतो. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीताची ध्वनिमुद्रिका लावली गेली. त्या वेळी सगळे लोक उभे राहिले. पण दोन-तीन काश्मिरी माणसे बसूनच राहिली. ही गोष्ट तिथे असलेल्या पोलिसाच्या लक्षात आणून दिल्यावर ते त्या माणसाना पोलिस चौकीवर नेऊ लागले. तेव्हा त्यानी अशा माना उडवल्या की जणू म्हणत होते, "चल चौकीवर. तू काय आमच वाकड करणार आहेस?" हा रोजचाच प्रकार आहे असे नंतर कळले.

श्रीनगरात आम्ही एक गालिच्याचा कारखाना पाहिला. काश्मीरच्या प्रवासातला तोही एक कार्यक्रम असतोच. शंभर-दीडशे रुपयापासून तो सातआठ हजार रुपये किंमतीपर्यंतचे वेगवेगळ्या डिझाइनचे गालिचे आणि त्याची कलाकुसर पाहून मन थक्क होते. गालिचे पाहून झाल्यावर आम्ही विणकाम विभागात गेलो. तिथे शंभर-दीडशे माणसे दाटीवाटीने काम करीत होती. त्यात गोरी, नाजूक, नाकी डोळी रेखीव, नीटस अशी आठ-आठ, दहा-दहा वर्षांची बरीच मुले होती. त्याची निर्जीव शरीरे आणि निस्तेज डोळे पाहून कीव आली. गाण्याच्या नोटेशनसारख्या खुणा केलेला एक कागदाचा कपटा प्रत्येक गटाच्या प्रमुखाच्या हाती असतो. त्याच्याकडे पाहून तो स्तोत्र म्हटल्याप्रमाणे काहीतरी गुणगुणतो. आणि ते ऐकत त्याच्या हाताखालची माणसे यंत्राप्रमाणे धागे मागेपुढे सरकवीत असतात. शाळेत जाण्याचे वय असणाऱ्या मुलाना तिथे तसे राबताना पाहून वाटले, ह्यापुढे केव्हाही एखाद्या किंमती गालिच्यावर पाय ठेवायची वेळ आली तर त्याच्यावर नकशीच्या जागी त्या मुलाचे टपोरे निस्तेज डोळे दिसू लागतील आणि पाय पुढे होणार नाही.

असाच एकदा अमीराकदल भागातल्या बाजारातून हिंडत होतो. फळांची, भाज्याची, किराणामालाची आणि त्यातच मधूनमधून मासाचीही दुकाने होती. एका दुकानात भाज्या रचून ठेवलेल्या तर शेजारच्याच दुकानात मुडके तोडलेल्या, कातडे सोलून काढलेल्या बकऱ्या उलट्या टांगलेल्या. गिऱ्हाईक मागेल त्याप्रमाणे बकरीच्या अंगाचा तो तो भाग कापून द्यायचा. भर बाजारात मासाची अशी उघडी दुकाने मी फक्त हैदराबादेत लहानपणी पाहिली होती.

एका दुकानात मला मातीची भांडी दिसली. एक-दोन भांड्याचा आकार आवडला घ्यायचा विचार केला. पण दुकानात मोठे माणूस कोणी नव्हते. दहाबारा वर्षांची एक मुलगी होती. तिला हिंदी-उर्दू मुळीच कळत नव्हते. त्यामुळे मला काहीच करता येईना. हाच अनुभव मला इतर ठिकाणीही आला. मोठी माणसेसुद्धा आपल्यासारख्या तिऱ्हाइताशी उर्दूत बोलतात; पण आपसात काश्मिरीतच बोलतात. काश्मिरी हीच त्याची स्वतःची भाषा आहे. उर्दू त्याना शिकावी लागते. किंवा अशिक्षितांना ऐकून ऐकून येऊ लागते.

श्रीनगरहून गुलमर्ग-खिलनमर्गला गेलो तेव्हा गालिच्याच्या कारखान्यातले ते दृश्य मनात रेंगाळतच होते. तिथले ते गर्दीचे दाटीचे दालन आणि इथला हा चारी बाजूला लांबवर पसरलेला प्रसन्न देखावा ह्यातला विरोध आतल्या आत बोचत होता. पण त्या वेळी तरी गुलमर्गच्या दृश्याची सरशी झाली. मे महिन्याचे दिवस, पण हॉटेलच्या जोत्याशी, डोंगराच्या पायथ्याशी झाडाच्या बुंध्याशी कबरेएवढे बर्फ जमलेले होते. चारी बाजूला लांबवर गेलेले उच्च-सखल मैदान, पलीकडे चीड आणि फरची झाडी, आणि त्याच्यामागे बर्फाने आच्छादलेली पर्वताची शिखरे.

गुलमर्गहून खिलनमर्गकडे जाताना आजूबाजूला अधून-मधून बर्फ दिसते. पण खिलनमर्गला आपण प्रत्यक्ष बर्फावरच जाऊन पोचतो. डलच्या विस्तीर्ण पृष्ठभागावर शिकाऱ्यात बसून सहल करणे आणि खिलनमर्गला प्रचंड चीड वृक्षाच्या गर्दीतून बसरगाडीवर बसून फिरणे हे दोन अनुभव अगदी वेगळे. दोन्ही अविस्मरणीय आहेत; पण हा अधिक थरारून टाकणारा. बसरगाडीवाला खांद्यावर पट्टा घेऊन गाडी ओढीत असतो. आपण जीव मुठीत धरून, पाय थोडेसे पुढे करून ढुगणावर बसलेलो असतो. आधारासाठी हातात लगामासारखा पट्टा असतो. चीड वृक्षाच्या गर्दीतून वाट कशी काढायची ते गाडीवाल्याला माहीत आहे. आपण मात्र भीत असतो, गाडी कुठे घसरणार तर नाही! आपण पडणार तर नाही! मध्येच एखाद्या ठिकाणी पाच-सहा फूट खोल आणि पाच-सहा फूट रुंद ओहोळातून स्फटिकासारखे स्वच्छ पाणी खळाळत धावत जात असते आणि त्याच्यावरून बर्फाच्याच पुलावरून गाडीवाला आपल्याला ओढीत नेत असतो. आपल्याला वाटते, समजा, पूल खचला तर! खचत नाही. पण आपल्याला वाटते खचेल. बर्फ पांढरा स्वच्छ आहे. चकाकतो आहे. हातात घेतला तर रव्यासारखा कोरडा भुगा लागतो. हातात धरून दाबला तर गोळा होतो. सगळीकडे पांढरा-पांढरा शुभ्र बर्फ आणि काळे-हिरवे चीड वृक्ष. प्रत्येक वृक्षाखाली बुंध्याभोवती बर्फातच खळगा पडून पचपाळ्यासारखे पात्र तयार झाले आहे. जणू काय त्या पाच पाकळ्याच्या कुंडीतच ते झाड लावले आहे असे वाटते. आपण ज्या प्रदेशातून आलो तिथे कधीही न दिसू शकणारे किती विलक्षण वेगळे दृश्य आहे हे! आणि तरीही आपल्याच देशात! बर्फ उचलावे, गोळा करावे, एकमेकांवर फेकावे. हा खेळ पोरकट खरा. पण अशा ठिकाणी माणूस वय विसरतोच मुळी. कोणताही विलक्षण अनुभव असाच वय विसरायला लावणारा नसतो का?

शेवटचा टप्पा पहलगावचा. लीडर नदीचे खोरे आणि पर्वताच्या पायऱ्या ह्याच्या-मधल्या सपाटीवर गाव वसले आहे. टीचभर लांब. रुंद नाहीच. एकच रस्ता. त्यावर काश्मिरी वस्तू, किराणामाल, आणि फोटोग्राफीचे सामान ह्यांची दुकाने. नदी फार मोठी नाही इथे. पण तिचा खळखळत जाणारा पिरोजी दुधी रंगाचा प्रवाह, प्रवाहातले पांढरे-करडे गोटे आणि पलीकडचे डोंगर, लहान-मोठ्या हिरवळी,

देवदाराची अरण्ये, ह्याचा देखावा फार सुंदर दिसतो. आणि मागे, सर्वांच्या मागे, हिमालय आहेच. काश्मीरात आपण कुठेही असलो तरी हिमालय दिसतोच. कुठे तो हाताशी आहेसा वाटतो तर कुठे लांब आटोक्याबाहेर. पण कुठेही असला तरी त्याचे काश्मीरच्या खोऱ्यावर, पार्वतीच्या त्या क्रीडांगणावर लक्ष आहे. त्याच्याकडे नुसते बराच वेळ पाहत राहिले तरी मनाला एक प्रकारची एकतानता येते. शांतता येते. त्याच्याकडे मन ओढ घेते आणि तिथून ते परत फिरायला तयार नसते.

काश्मीरच्या ह्या आठवणींत हिमालयाच्या आठवणी आहेत. चीड-चिनार सफेदा ह्या वृक्षांच्या आठवणी आहेत. तळी आणि कालवे ह्यांच्या आठवणी आहेत. आणि त्यातच शेतात ओणवून काम करणाऱ्या आणि ओझी वाहणाऱ्या काश्मिरी स्त्री-पुरुषांच्या आणि गालिच्यांच्या कारखान्यात यंत्रासारखे धागे मागे-पुढे करीत बसलेल्या कोवळ्या मुलांच्या टपोऱ्या निस्तेज डोळ्यांच्याही आठवणी आहेत. ह्या आठवणी म्हणजे आठवणींचे एक कोलाज आहे.

# वाराणस्यां जननमरणम्

वाराणसीत जन्म आणि मरण मिळणे हे फार पुण्यकारक आहे हे सर्वांना माहीत आहे. आता वाराणसीत जन्माला येणे हे काही आपल्या हाती नसते, पण मरणे असते. हे पुण्य लाभावे म्हणून असंख्य वृद्ध स्त्री-पुरुष वाराणसीत येऊन राहतात. कलकत्ता जवळ असल्यामुळे असेल किंवा धर्मश्रद्धा अधिक असल्यामुळे असेल, पण वाराणसीतल्या मरणेच्छू वृद्धात बगाल्यांची संख्या फार दिसते एवढे खरे. बगाली टोला या नावाचा एक स्वतंत्र मोहल्लाच वाराणसीत आहे. तशी वाराणसीत महाराष्ट्रीयांची, विशेषतः ब्राह्मणांची, संख्याही बरीच आहे. पण ते मुमूर्षू किंवा मुमुक्षू म्हणून तेथे जाऊन राहिलेले नाहीत. त्यातले कोणी अध्ययन-अध्यापन करण्यासाठी राहिलेले आहेत. कोणी व्यापार-व्यवसायात आहेत. कोणी आपापल्या यजमानांचे क्षेत्रोपाध्ये आहेत. कोणी अन्नछत्रे-धर्मशाळांचे व्यवस्थापक आहेत. मी वाराणसीला गेलो तो वाराणसीत मला मृत्यू यावा आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यातून आपण कायमचे सुटावे म्हणून गेलो नव्हतो. आता वाराणसीला गेलो एवढ्यामुळेच मला मोक्ष मिळणार असेल तर गोष्ट वेगळी. मी गेलो होतो ते लक्षावधी लोक शतकानुशतके भक्तिभावाने जिथे जातात ते क्षेत्र आहे कसे ते पाहावे म्हणून.

शिंद्याच्या घाटावर मी गंगेत स्नानासाठी उतरलो होतो आणि समोर पाहत होतो. गंगेच्या घाटावर असल्यामुळे साहजिकच मला पंडितराज जगन्नाथाची आठवण झाली. आणि "इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुंभा। लवंगी कुरंगीदृगंगीकरोतु ॥" ह्या ओळी माझ्या मनात उभ्या राहिल्या. पहिल्या ओळीतल्या कठोर व्यंजनांचा अनुप्रास आणि 'स्त'कारबाहुल्य तसेच दुसऱ्या ओळीतल्या अत्यंत मृदू व्यंजनांचा अनुप्रास, त्या दोहोंमधला विरोध आणि पहिल्या ओळीतल्या शब्दांनी चित्रित झालेली चार घनगोलांची लवंगीची आकृती, तसेच त्या दोन ओळींनी शब्दाचा नाद, त्याचा अर्थ आणि एक चित्र ही तीनही साधणाऱ्या त्या पंडितराजाचे मी मनातल्या मनात कौतुक करीत होतो. संवाद-विरोध-लय ह्यावर आधारलेल्या मर्ढेकरी सौंदर्य-सिद्धांताचा प्रत्यय पाहत होतो. त्याबरोबरच याच जगन्नाथाने 'जल ते जबालं मम जननजालं जरयतु ॥' अशी जंबालमाला सबंध 'गंगा लहरी'त का वापरावी ह्याचे नवल करीत होतो!

त्याच वेळी समोर गंगेच्या पलीकडल्या तीरावर एका अर्धवट जळलेल्या प्रेतावर बसलेले कावळे त्यात चोची खुपसून मासाचे लचके तोडीत होते. गंगाष्टकामधल्या "काकैर्निष्कुषितं श्वभिः कवलितं" ह्या वर्णनाचे ते प्रात्यक्षिकच होते, फक्त ते मी माझे "स्वं वपु." पाहत नव्हतो एवढेच मला समाधान होते.

माझ्या मनातला हा सगळा विचार-कल्पनांचा खेळ मिनिट दोन मिनिटेसुद्धा चालला नसेल. पण तो चालत असतानाच मी एक पाय खाली टाकला तो गंगा एकदम माझ्या छातीशी आली. मी एकदम घाबरलो. मी लवंगीशी लग्न केले नव्हते. केवळ वाराणसीत गंगेच्या घाटावर होतो म्हणून मला जगन्नाथपंडिताची आणि लवंगीची आठवण झाली होती. पण त्यासाठी गंगेने माझ्या गळ्यापर्यंत येऊन मला प्रायश्चित्त देण्याची किंवा पुनीत करण्याची गरज नव्हती. माझ्या बरोबरच्या लोकांनी मला झरकन वर ओढून घेतले नसते तर गंगेने माझा वेगळ्याच प्रकारे उद्धार केला असता. असे झाले होते की शिंद्यांचा हा घाट खचलेला होता आणि खाली एकदम खड्डा होता. मोक्षाच्या वाटेने न जाता संसाराच्या मार्गाला मी परत आलो ह्याचा मला आनंद वाटला.

वाराणसीला सबंध देशातले सर्व पंथांचे लक्षावधी लोक येत असतात, कारण हे विश्वनाथाचे धाम इतके पवित्र आहे की त्याच्या नुसत्या स्मरणाने माणसाला मोक्ष मिळतो. "काश्याम् मरणान्मुक्तिः" म्हणतात पण "काश्याः स्मरणान्मुक्तिः" म्हणायला हरकत नाही. इथले मणिकार्णिकाकुण्ड हे विष्णुचक्रतीर्थ आहे आणि शेजारी विष्णुपादुका आहेत त्यामुळे वाराणसी हे क्षेत्र वैष्णवानाही पूज्य आहे. वाराणसीत एका ब्राह्मणाला एक वर्ष भोजन दिले तर गंगेच्या वाळूत जितके कण आहेत तितकी वर्षे ब्राह्मण-भोजन घातल्याचे पुण्य लाभते. (ब्राह्मण-भोजनाचा महिमा असा अगाध आहे.) राजे-रजवाडे, व्यापारी, शेठ-सावकार ह्यांनी चालू केलेली चारशे अन्नछत्रे वाराणसीत आहेत असे म्हणतात. तेव्हा ज्यांनी ती चालू केली त्यांना किती पुण्य प्राप्त झाले असेल ह्याची कल्पना करता येईल.

आपण वाराणसीला काशी म्हणतो. पण काशी हे पूर्वी एका देशाचे किंवा छोट्याशा राष्ट्राचे नाव होते. आणि वाराणसी ही त्या देशाची राजधानी होती. फार प्राचीन काळापासून हे महादेवाचे धाम आणि प्रसिद्ध नगर आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्धाच्या काळातही हे प्रसिद्ध होते. बहुतेक जातककथांचा आरंभ "पूर्वी वाराणसी नगरीत ब्रह्मदत्त नावाचा राजा राज्य करीत असता" किंवा "एकदा वाराणसी नगरीत" ह्या शब्दांनी होतो. आणि बोधिसत्त्वाने अनेकदा वाराणसी नगरीतच जन्म घेतला होता. त्या वेळीही वाराणसी नगरी व्यापारी पेठ होती. आजही आहे. तलम वस्त्रे, सुगंधी तेले, अत्तरे, तांब्या-पितळेची सुंदर भांडी, सोन्या-चांदीचे दागिने ह्याबद्दल वाराणसीची ख्याती त्या काळी होती तशी आजही आहे. प्राचीन काळी वाराणसीत जसे लबाड व्यापारी होते तसे आजही आहेत. अगदी खऱ्या जरीचे

म्हणून वाराणसीहून आणलेले शालू आणि पीतांबर काही दिवसांनी काळे पडल्याचा अनुभव अनेकांना आला असेल. प्राचीन काळी वाराणसीची ख्याती "वारामाभिरामा" म्हणजे "वारांगनामुळे रमणीय" अशी होती. आणि पाच-पाचशे दासी बाळगण्याइतक्या श्रीमंत वेश्या वाराणसीत असत. आज कदाचित इतक्या दासी ठेवणे त्यांना परवडत नसेल. पण श्रीमंत आणि प्रसिद्ध गाणारणी आजही वाराणसीत आहेत आणि तुमच्याआमच्यासारख्या सामान्य गिऱ्हाइकांचे समाधान करणाऱ्याही आहेत. सर्व प्रकारच्या सर्व यात्रेकरूंच्या सर्व सोयी पाहायला नकोत का? गंगेवर स्नान आणि विश्वनाथाची पूजा झाली म्हणजे तुमचा उपाध्या किंवा त्याचा मनुष्य, "बाईजीका मुजरा सुनना है बाबूजी?" असे विचारतो म्हणतात.

एकदा मलाच त्याचा प्रत्यय आला. कचौडी गल्लीत मिठाई फार चांगली मिळते आणि चौकमध्ये निरनिराळ्या प्रकारचे मुरंबे-लोणची फार चांगली मिळतात. ठठेरी गल्लीत भांडी चांगली मिळतात. मला मिठाई आणि मुरंबे घ्यायचे होते आणि जुन्या पद्धतीची काही भांडी घ्यायची होती. (मुरंब्यावरून आठवण झाली. इथे उसाच्या करव्याचा मुरंबा मिळतो. त्याची खुबी अशी आहे की खाताना त्यात चोथ्याचा कणसुद्धा लागत नाही.) दुपारच्या तीन-चारच्या सुमाराची वेळ होती. उपाध्याचा मनुष्य माझ्याबरोबर होता. वाराणसीच्या त्या अरुंद बोळातून खरेदीसाठी जात असताना कचौडी गल्लीत की ठठेरी गल्लीत तो मनुष्य मला म्हणाला, "बाबुजी, यहाँ बनारसमें बहुत अच्छी गानेवाली रहती हैं. आपकी इच्छा हो तो हम आपको आज रात ले जाएंगे."

मी पहिल्यांदा वाराणसीला गेलो ते उन्हाळ्याचे दिवस होते. उन्ह रणरणत असते. मनस्वी उकडत असते. दुपारी बाहेर पडण्याची सोय नसते. संध्याकाळीच बाहेर पडता येते. मलमलीचे चिकनचे कुर्ते अंगात घातलेले आणि मनगटावर मोतियांचे गजरे बांधलेले रंगेल बनारसी, चौक आणि गोदौलियामधून संध्याकाळच्या वेळी रमत गमत हिंडत असतात. "जलपान" करण्यासाठी उपाहारगृहात जमत आणि गुलाब, वाळा, फालसा ह्यांच्या सरबतांचे किंवा थंडाईचे ग्लास रिकामे करीत असतात. पण मला सगळ्यात पसंत पडली बनारसी लस्सी. उपाहारगृहाचे नोकर उपाहारगृहांबाहेर रस्त्यावर उभे राहून तुम्हाला घरी बोलावल्यासारखे आमंत्रण करतात. "बाबूजी, लस्सी बहुतही बढिया है. आज लस्सी हमारे यहाँ लीजिये." लाहोर, अमृतसर, दिल्ली ह्या ठिकाणी मी लस्सी घेतली आहे, पण बनारसच्या लस्सीची सर त्यांना नाही. तुमच्यासमोर मलईदार दही घुसळतात, त्यात बेताची साखर आणि थोडेसे गुलाबजल टाकतात आणि हातभर लांबीचा ग्लास भरला की त्यात वरून आणखी बचकाभर मलई टाकतात. अंतरात्मा तृप्त होतो.

दुसऱ्यांदा गेलो ते हिवाळ्याचे दिवस होते. जसा उष्म्याचा कडाका तसाच थंडीचा. ह्या दिवसांत लोकांच्या अंगात रजाम्याची बंडी किंवा लोकरीचे लांब

कोट असतात. त्यावर पुन्हा शाल पांघरलेली. कानावर घेऊन. ह्या दिवसात लस्सीच्या ऐवजी गरम दूध आणि जिलेबी ह्याची उपाहारगृहात विक्री असते. भाजी-बाजार पाहण्यासारखा असतो. शेर-दीड शेर वजनाचे एकेक अशी पांढरी शुभ्र वांगी, कवठाएवढाले मोठे पेरू आणि लिंबाएवढाली मोठी बोरे, विपुल आणि स्वस्त. आम्ही धर्मशाळेत उतरलो होतो, तर रोज पहाटे साखर घातलेले लाडवाच्या आकाराचे लोण्याचे गोळे विकायला यायचे. आणि किंमत सहा पैसे, दोन आणे. अशी खाण्याची चैन दुसऱ्या कुठे नसेल. मात्र ही दहापधरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आज काय आहे सांगता येत नाही. किंमत वाढली असेल, पण अजूनही खुराक चालू असेल असे समजतो.

वाराणसीजवळ गंगा उत्तरवाहिनी आहे (म्हणूनच त्या स्थानाला एवढे महत्त्व आहे.) आणि सगळी वस्ती गंगेच्या पश्चिम तीरावर आहे. सकाळी सातआठच्या सुमाराला अस्सी घाटावर नाव घेऊन राजघाटापर्यंत नदीतून गेले की प्रभाती सूर्यस्नान करून लखलखीत झालेल्या वाराणसीचे प्रसन्न दर्शन घडते. अस्सी घाटापासून राजघाटापर्यंतच्या पाच-सहा मैलाच्या विस्तारात लहानमोठे मिळून जवळजवळ ऐंशी-पंचाऐंशी घाट एकमेकाना लागून आहेत. गंगेतून पाहिले म्हणजे उंच उंच चढत गेलेल्या पायऱ्या आणि घाटावर मागल्या बाजूला राजे-रजवाड्यानी, धनाढ्य व्यापाऱ्यानी, शेठ-सावकारानी बांधलेल्या हवेल्या, धर्मशाळा आकाशा-पर्यंत उंच गेल्यासारख्या दिसतात त्यातच मध्येच लहान-मोठ्या मंदिराचे कळस तळपत असतात. सकाळची वेळ असल्यामुळे काश्मीरपासून केरळपर्यंत आणि गुजरातपासून आसाम-मणिपूरपर्यंत देशाच्या चारी कोपऱ्यातून आलेले भाविक स्त्रीपुरुष यात्रेकरू घाट उतरत-चढत असतात. "हर गंगे", "जय गंगे" म्हणून गंगेत बुड्या मारीत असतात. अंगावरल्या वस्त्रासहित गंगेत स्नान करीत असलेल्या किंवा स्नान करून वस्त्रे बदलीत असलेल्या स्त्रियांच्या वस्त्रांचे वेगवेगळे रंग आणि प्रकार, नेसण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, रंग-रूप-अंगलटी ह्यामुळे घाटाना एक चित्र-विचित्र शोभा आलेली असते. जिवंतपणा आलेला असतो. आणि ह्या सर्वांतून अल्प प्रमाणात पण सबंध भारतातल्या हिंदू समाजाचे दर्शन होते. घाटावर बसून कोणी पोथी वाचीत असलेला दिसतो कोणी स्तोत्र म्हणत असतो—महिम्न म्हणत असेल. कोणी नाक धरून प्राणायाम करीत असतो. त्याच्यातूनच वाट काढीत नंगे गोसावी, तसेच गायी आणि पोळ जात-येत असतात.

आम्ही गंगेतून नावेने जात असताना आमच्याबरोबर बनारसचेच एक परिचित गृहस्थ होते. ते म्हणाले, घाटावर काय पाहायचे? "रांड, सांड और सीढी" म्हणजे स्त्रिया, बैल आणि पायऱ्या. हे अगदीच काही खरे नाही. पण खोटेही नाही. एवढेच की ते बनारसचेच असल्यामुळे आमच्यासारखे त्याना इतर विविध दृश्यांचे कौतुक नसेल.

पाच-सहा मैलांच्या ह्या विस्ताराच्या जवळजवळ मध्यावर एका मशिदीचे दोन उंच मनोरे डोळ्यांत भरतात. वाराणसीच्या घाटाच्या कोणत्याही फोटोत किंवा चित्रात बहुधा हे मनोरे असतातच. पूर्वी त्याच ठिकाणी असलेले बिंदुमाधवांचे मंदिर उद्ध्वस्त करून त्या जागी औरंगजेबाने बांधलेल्या मशिदीचे दीडशे फूट उंचीचे ते मनोरे आहेत. आता मनोऱ्यावर चढू देत नाहीत. पण मशिदीच्या गच्चीवर चढून भोवताली पाहिले म्हणजे वाराणसी एखाद्या नकाशासारखी पसरलेली दिसते. एकाला एक लागून असलेल्या घरांची गर्दी, त्यातून गेलेले उभे रस्ते, आणि आडवे-तिडवे, वळणे घेत गेलेले अरुंद बोळ पाहिले म्हणजे शहर किती गच्च गजबजलेले आहे ते दिसते

बिंदुमाधव मशिदीच्या गच्चीवरून खाली वाहत जाणाऱ्या गंगेच्या प्रवाहाकडे पाहिले तर लांब मैल दीड मैलावर काशी स्टेशन दिसेल. त्याच्या शेजारीच मसजिद गंजे शहीदा आहे. तुमच्याबरोबर उपाध्याने दिलेला वाटाड्या हिंदूच असेल. त्याला मशिदीबद्दल विचारले तर तो म्हणेल, "मला ती मशीद कुठे आहे माहीत नाही. आणि त्या मशिदीत काय पाहायचय ?" माझ्या वाटाड्याने मला तसेच सांगितले. पण मी त्याच्या मागेच लागलो. आणि अखेर एका म्हाताऱ्या मुसलमानाला विचारून बरोबर पत्ता काढला आणि तिथे गेलो. ती मशीद प्रसिद्ध नाही आणि खरोखरच तिच्यात पाहण्यासारखे काही नाही. बाहेरच्या बाजूला कोळशाची, किराण्या मालाची, सायकल रिपेअरची दुकाने आहेत. मला मुद्दाम ती मशीद पाहायला आलेला पाहून तिथल्या लोकांनाही आश्चर्य वाटले. आत मोठा चौक आहे. चारी बाजूला ओवऱ्या आहेत. पश्चिमेकडच्या ओवरीत मिंबर आणि मेहराब आहे. छपरावर घुमट आहेत ते मातीची रास केल्यासारखे. त्यांना काही आकार नाही. डौल नाही. आतले दगडी खांब, तुळया वगैरे सर्व साहित्य उद्ध्वस्त केलेल्या मंदिरांचे वापरलेले. मशीद प्रेक्षणीय नाही, पण मशीद आहे हेच महत्त्वाचे आहे. वाराणसीतली ही सगळ्यात जुन्यापैकी आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. बाराव्या शतकाच्या शेवटी वाराणसीच्या हिंदू राजाशी मुसलमानांनी केलेल्या लढाईत जे मुसलमान मरण पावले ते "धर्मासाठी मरण पावल्यामुळे 'शहीद' झाले". त्यांच्या गौरवासाठी ही मशीद बांधलेली आहे. ऐबक कुतबुद्दीनने बनारसच्या राजाचा पराभव करून वाराणसी-वर कबजा केला, हिंदूंची एक हजार मंदिरे उद्ध्वस्त केली, आणि लूट नेली तिला चौदाशे उंट लागले. तिथपासून साडेतीनशे वर्षे वाराणसीवर मुस्लिम सत्तेचे सावट पडले होते. दोन हजारांहून अधिक वर्षे महादेवाचे पवित्र स्थान आणि हिंदू धर्माचे विद्येचे केंद्र असलेल्या ह्या नगरीतली विश्वनाथासकट इतर मंदिरे अनेक वेळा उद्ध्वस्त केली गेली. हिंदूंच्या विद्या-कलांचा लोप झाला. ब्राह्मण तेजोहीन झाले. नंतर सोळाव्या शतकात अकबराच्या कारकीर्दीत परिस्थिती पालटली. हिंदूंवरचा जुलूम कमी झाला. वाराणसीचा चेहरा पुन्हा उजळू लागला. वेदमंत्रांचे घोष पुन्हा ऐकू येऊ लागले. परंतु पूर्वीच्या तीनशे-साडेतीनशे वर्षांत उत्तरेकडल्या ब्राह्मणांत वेदविद्येची

रपरा क्षीण झाली होती. वाराणसीत वेदविद्या पुन्हा बहराला आली ती तैलंगदेशातून आणि महाराष्ट्रातून वाराणसीला गेलेल्या ब्राह्मणामुळे. शिवाजीचे क्षत्रियत्व मान्य करून वेदमंत्रानी त्याला राज्याभिषेक करणारा गागाभट्ट हा पैठणहून वाराणसीला जाऊन स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय ब्राह्मण घराण्याचा होता.

गागाभट्टाचे पणजोबा नारायणभट्ट ह्यानी अकबराच्या कारकिर्दीत राजा तोडरमल्लाच्या मदतीने विश्वनाथाचे मंदिर बांधले होते. तेही पूर्वी मुसलमानांनी उद्ध्वस्त केलेल्या विश्वनाथमंदिराच्या जागीच. पण नारायणभट्टानी बांधलेल्या ह्या मंदिराला पुरती शंभर वर्षेसुद्धा आयुष्य लाभले नाही. बिंदुमाधवाचे मंदिर उद्ध्वस्त करून त्याच्या जागी औरंगजेबाने मशीद बांधली. तसेच नारायणभट्टाने बांधलेले विश्वनाथाचे मंदिर उद्ध्वस्त करून, त्याचेच साहित्य वापरून त्याच जागेवर मशीद बांधली. ती सध्याच्या विश्वनाथमंदिराच्या मागल्या बाजूला तिथून जवळच आहे. तिच्या पटांगणाखाली सोळाव्या शतकात नष्ट करण्यात आलेल्या त्याच्या पूर्वीच्या सभामंडपाचा भाग अजून आहे. तिथेही एक कोळशाची वखार आहे. हा सगळा भाग मुसलमानांच्या ताब्यात आहे. यामुळे तो सभामंडप पाहण्यासाठी आत जाण्याचा मी प्रयत्न केला तेव्हा तिथले मुसलमान जराशा नाराजीने आणि संशयाने माझ्याकडे पाहू लागले. औरंगजेबाने मंदिर उद्ध्वस्त केल्यानंतर पुढल्या शंभर वर्षांत वाराणसीत विश्वनाथाला मंदिर नव्हते. ते अठराव्या शतकाच्या अखेरीला अहिल्याबाई होळकर हिने बांधून दिले. आज ज्या मंदिरात आपण विश्वनाथाचे दर्शन घेतो ते तिने बांधलेले आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुगल सत्तेचा ऱ्हास होत चालला आणि उत्तरेत मराठ्यांचे सामर्थ्य वाढत चालले, हिंदूंचा आत्मविश्वास वाढत चालला. आज वाराणसीत जे घाट आणि जी मंदिरे आहेत ती बहुतेक सतराव्या शतकानंतरची आहेत. आणि त्यातली बरीचशी मराठ्यानी बांधलेली आहेत.

जिथे जुने बिंदुमाधवाचे मंदिर होते त्याच्या जवळच श्रीमंत औंधकरानी बिंदुमाधवाचे मंदिर बांधले आहे. ते एखाद्या दिवाणखान्यासारखे आहे. आसपास मराठी लोकांची वस्ती आहे. पुढे थोड्या अंतरावर राघोबादादाचा दत्तकपुत्र अमृतराव ह्यानी बांधलेले अमृत विनायकाचे मंदिर आहे. त्यातला गणपती चांगला मोठा संपूर्ण पोवळ्याचा आहे. आणि समोर खरोखरच त्याचे वाहन होऊ शकेल इतका मोठा तपकिरी म्हणजे उंदराच्याच रंगाचा उंदीर आहे. इतका खरोखरीसारखा उंदीर मी तरी दुसरीकडे कुठे पाहिला नाही. आणखी एक विशेष म्हणजे गाभाऱ्याच्या द्वाराजवळच उंदराची जोडी जुंपलेला छोटासा संगमरवरी रथ आहे. उत्सवाच्या वेळी गणपतीची उत्सवमूर्ती त्यातून मिरवीत नेतात की तो शोभेचाच रथ आहे हे मात्र कळले नाही. जवळच पहिल्या बाजीराव पेशव्याने बांधलेले अन्नपूर्णेचे मंदिर आहे. त्याच्या सभामंडपाची रचना अबू येथील दिलवाड्याच्या

मंदिरातल्यासारखी आहे. नागपूरकर भोसल्याच्या लक्ष्मीनारायणमंदिराचे मेहरपी कमानीचे एक दालन अगदी वाटावर येते. शिंद्यांनीही एक सुंदर मंदिर आणि घाट बांधला होता. पण पाया कच्चा झाल्यामुळे दोन्ही खचली आहेत. कालभैरवाचे मंदिर सरदार विंचुरकरानी बांधले आहे आणि त्रिलोचनेश्वराचे पुण्याच्या एका सावकारानी. शिवाय मराठे सरदारानी बांधलेले घाट, धर्मशाळा, चालू केलेली अन्नछत्रे वगैरे आहेतच. ह्या सर्वांवरून मराठ्याना शक्य झाल्याबरोबर त्यानी वाराणसीसाठी काय केले हे दिसून येईल.

विश्वनाथाचे मंदिर हे वाराणसीतले मुख्यच मंदिर. पण ते अगदी गल्ली-बोळात आहे. आणि मनात भरण्यासारखे भव्यही नाही. ते बांधले आहे अहिल्याबाईने, त्यावर सोन्याचा कळस चढवला आहे रणजितसिंहाने, आणि त्याला नगारखाना दिला आहे वॉरन हेस्टिंग्जने. आपण मंदिराकडे जाऊ लागलो म्हणजे आपल्यामागून येणाऱ्या गायी आपल्याला ढुशा देऊन आपल्यापुढे निघून जातात. आणि मंदिराच्या सभामंडपातही आपल्या अंगाला अंग घाशीत उभ्या राहतात. तिथे नंदी आहे, तो जागेवर आहे की नाही पाहत असतील

आम्ही गेलो तेव्हा संध्याकाळच्या पूजेची वेळ होती. गाभाऱ्यात एका कोपऱ्यात एका खोलगट हौदात लिंग आहे. त्याची पूजा-अभिषेक चालला होता. नंतर आरती सुरू झाली. वाटेल तो वाटेल तशी घंटा वाजवीत होता. वाटेल त्या सुरात आणि चालीत आरती म्हणत होता. कोणी कसाही, कुठेही उभा होता. संपूर्ण व्यक्ति-स्वातंत्र्य होते.

आपल्या कुठल्याही देवळात असते तसेच सगळे होते.

मंदिरे स्वच्छ असावी, त्यांच्या भोवती मोकळी जागा असावी, तिच्यात व्यवस्थित लावलेली बाग असावी, वातावरण प्रसन्न असावे, देवाला वाहिलेल्या पत्री-फुलानी गाभारा कुबट दर्पाने कोंदाटू नये, अशी मंदिरे बांधण्याला बिर्लांनी सुरुवात केली. असेच एक तुलसीमानसमंदिर दुर्गाकुंडाच्या बाजूला, हिंदू विश्वविद्यालयाच्या वाटेवर सत्यनारायण सुरेका ह्या श्रीमंत गृहस्थानी बांधलेले आहे. आतून-बाहेरून संपूर्ण संगमरवरी आहे. आत चहूकडच्या भिंतीवर तुलसीदासाचे रामचरितमानस कोरून काळ्या रंगाने भरले आहे ते काळ्या शाईने लिहिल्यासारखे दिसते. अर्थात अरबी अक्षराना वेगवेगळी वळणे देऊन जशी नकशी साधली जाते तसे इथे साधलेले नाही. मधले किंचित मोठे आणि दोन बाजूंची दोन लहान अशी एका ओळीत तीन निमुळती शिखरे असलेले हे मंदिर रेखीव, साधे आणि सुंदर आहे. त्याचा नाजुकपणा थोडा स्त्रैण वाटतो. पण भक्तिभावात स्त्रीत्वाचा अंश असतो असे मानले तर ह्या मंदिरात ते उचितच म्हणावे लागेल.

हिंदू विश्वविद्यालयाच्या आवारात एक जुन्या शैलीत बांधलेले भव्य काशीविश्वनाथ-मंदिर आहे. तेही स्वच्छ सुंदर आहे. ह्या नव्या मंदिराना प्राचीन मंदिरांचे माहात्म्य

आणि सोवळे पावित्र्य कदाचित लाभणार नाही. पण जुन्या मंदिरात न आढळणारी प्रसन्नता इथे निश्चितच आढळेल.

वाराणसीतले जुन्या संस्कृत विद्येचे माहात्म्य आता कमी होत चालले आहे. जुन्या विद्वान घराण्याचे वंशज मास्तरकी-कारकुनी करू लागले आहेत. पण नव्या संस्था अध्ययन-अध्यापनाची वाराणसीची परंपरा पुढे चालवीत आहेत. राजघाटाच्या बाजूला थिऑसॉफिकल सोसायटीच्या शिक्षणसंस्था आहेत. हिंदू विश्वविद्यालय, काशी विद्यापीठ, आणि संस्कृत कॉलेज आहेच. नागरी प्रचारिणी सभा आहे. जुने संस्कृत साहित्य आणि युरोपीय पंडिताचे संस्कृत विद्येसंबंधीचे दुर्मिळ संशोधनग्रंथ प्रसिद्ध करणारी प्रकाशनगृहे आहेत. वाराणसीचे शैक्षणिक-सांस्कृतिक महत्त्व आजही पूर्वी-सारखेच आहे. अजूनही लक्षावधी लोकांचे ते यात्रास्थान आहे. भारतीय भाविकांना वाराणसीला जावेसे वाटते तसे परदेशीय हिप्पींनाही तिचे आकर्षण आहे. वाराणसी जिवंत आहे. जागती आहे. वाराणसीत जनन मरण साधले नाही तरी तिचे दर्शन साधणे हेदेखील कमी फलप्रद नाही.

# बिबिंकासाठी

खरे म्हणजे ह्या खेपेला गोव्याला जायची काहीही आवश्यकता नव्हती. एकदा कारवारच्या साहित्य संमेलनाच्या वेळी १९५१ साली आणि दुसऱ्यांदा १९६४ साली मडगावच्या संमेलनाच्या वेळी असा दोनदा गोव्याला गेलो होतो. शांतादुर्गा, रामनाथ, महालक्ष्मी, नागेशी, वेलिंगचा लक्ष्मीनृसिंह, म्हाळसा, मंगेशी आणि जांबावलीचा दामोदर ही सगळी मंदिरे काही एकदा, काही दोनदा पाहिली होती. जुन्या गोव्यातली सगळी चर्चे दोनदा पाहिली होती. मग आता पुन्हा कशाला गोव्याला जायचे?

पण सावंतवाडीपर्यंत गेलो होतो. आणि तिथून पणजी म्हणजे जेमतेम अडीच तासाचा बसचा प्रवास. आणि तसे गोवे कितीही वेळा पाहिले तरी पुन्हा जाऊन पाहण्यासारखे नाही का? शिवाय कारवारहून गेलो तेव्हा काळी, गाळजेबाग, तळपण ह्या प्रत्येक नदीकाठी बस सोडून, बाफोरात बसून नदी ओलांडून पुन्हा बसमधून, असा कारवार ते मडगाव चाळीस मैलांचा प्रवास चौदा तासात करून आलो होतो. त्या वेळी दक्षिणेकडून गोव्यात गेलो होतो. नद्या, समुद्रकिनारे, माडाच्या राया पाहिल्या होत्या. १९६४ च्या संमेलनाच्या वेळी बेळगावहून अनमोड घाटातून, दाट जंगलांतून खांडेपारच्या बाजूने मडगावला गेलो होतो. आता ह्या वेळी गेलो तर बांदे-दोडामार्ग ह्या वाटेने उत्तरेकडून गोव्यात जायला मिळणार होते. मागच्या दोन्ही वेळी मांडवीवर पूल नसल्यामुळे पणजीपर्यंत जाऊन कळंगूटला न जाताच मडगावला परतावे लागले होते. ह्या वेळी पणजीला मुक्काम करून कळंगुटचा सुप्रसिद्ध—हिप्पींमुळे विशेष सुप्रसिद्ध—किनारा पाहता आला असता. आणि मंदिरे नाहीत तरी जुन्या गोव्यातली चर्चे पुन्हा पाहायची इच्छा होती. विशेषतः सेंट फ्रान्सिस ऑफ असीसीचे. त्या चर्चचा आतला भाग आणि खांबा-भिंतींवरची चित्रे पाहिल्यावर विसाव्या शतकात राहून मध्ययुगात गेल्यासारखे वाटले होते. आणि पुन्हा त्या युगात जाण्याची इच्छा होती. १९६४ साली त्याचा जीर्णोद्धार चालला होता. त्यामुळे आत जायला मिळाले नव्हते. आता मिळाले असते. आणि ते पूर्वीसारखेच पुन्हा बांधले आहे की 'मॉडर्नाइझ' केले आहे ते कळले असते.

आणखी एक इच्छा होती. गोव्यातल्या एखाद्या श्रीमंत वरदाज खिश्चन कुटुंबाचा शे-दोनशे वर्षांपूर्वीचा जुना वाडा शक्य तर पाहावा. व्यंग्यचित्रकार 'मारियो' ह्याचा असा वाडा गोव्यात आहे असे वाचले होते. तसेच आणखीही काही असतील. म्हणजे पुन्हा एकदा गोव्याला जायला हरकत नव्हती—आणखी शेवटी गोव्याला गेलोच.

सावंतवाडी ते बांदे-दोडामार्गपर्यंतचा प्रदेश डोंगराळ, त्यामुळे उंच-सखल; आणि झाडीचा असल्यामुळे चहूकडे दृश्य प्रसन्न होते. दोडामार्गपासून गोव्याचा प्रदेश लागला तो मात्र बहुतेक सपाटीचा होता. पण रूक्ष नव्हता. ह्या भागात रस्त्यापासून आत झाडाच्या सावलीत लहानमोठी बंगलेवजा घरे दिसू लागली. काही घरांच्या पायऱ्या चढून आताच ओटीवर दोहोंकडल्या खांबांना टेकून, चुन्यासिमेंटाच्या खुर्चीसारख्या बैठकी—'सोपो'—बांधलेल्या दिसल्या. त्या बहुधा खिस्त्याच्याच घराच्या ओटीवर दिसल्या कारण अशा घराच्या अंगणात बहुधा एखादा क्रूस असे.

गोव्याची ह्या वेळची भेट पूर्वीच्या भेटींपेक्षा थोडीशी वेगळी होती. पूर्वी दोन्ही वेळा साहित्य संमेलनाच्या निमित्ताने गेलो होतो. आणि एखाद्या टूअरिस्टसारखे वरवर उडत उडत गोवे पाहून परतलो होतो. ह्या वेळी तीनचार दिवस पणजीत राहिलो. सभांना वगैरे गेलो होतो. बाजारहाटात हिंडलो होतो. मुंबई-पुण्याच्या बाजारात, दुकानात, मार्केटात, पांढरपेशा बायका दिसतात तशा मला कुठे दिसेनात. मी चौकशी केली तेव्हा कळले की, सभांत वगैरे बायका दिसतात त्या बहुतेक मुंबईहून आलेल्या असतात. स्थानिक पांढरपेशा बायका सभासंमेलनांना किंवा बाजारहाट करायला जात नाहीत. आणि मुंबईहून आलेल्या जातात-येतात त्यांना स्थानिक बायका हसतात. आणि हसल्या नाहीत तर "अशा कशा ह्या बायका हिंडतात?" असे आश्चर्य करीत त्यांच्याकडे पाहतात. माझी कल्पना होती की (तिला आधार काहीच नव्हता), चारशे वर्षांची पोर्तुगीज राजवट, गावोगाव खिश्चन वस्ती, काही गावे तर निव्वळ खिश्चन आणि राज्य टीचभर लांबीरुंदीचे, त्यामुळे यूरपियन संस्कृतीची आधुनिकता गोव्यातल्या हिंदू कुटुंबातही बरीच आली असेल; आणि पुरुषाच्या बरोबरीने नाही, तरी त्यांच्याबरोबर स्त्रिया सार्वजनिक कार्यात भाग घेत असतील. पण तसे मुळीच झालेले दिसले नाही. केरळातदेखील हीच परिस्थिती मला दिसली. सातआठशे श्रोते असलेल्या सभेत सातआठदेखील स्त्रिया नव्हत्या असे मी पाहिले.

ह्या वेळी गोव्यात मला देवळे पाहायची नव्हतीच. जुन्या गोव्यातील चर्चे पाहा-यची होती तीही पाहायला मिळाली नाहीत. पण पणजीतलेच 'अवर लेडी ऑफ इमॅक्युलेट कन्सेप्शन' हे माता मेरीचे पायऱ्यापायऱ्यांनी चढून जायचे भव्य चर्च पाहिले आणि सात इनेस भागात एक महालक्ष्मीचे मंदिर पाहिले. मंगेशी-शांतादुर्गा ह्यांच्या मंदिरांसारखी त्याची … नाही, म्हा…ची म्हाळसा, वेलिंगच

22306

लक्ष्मीनृसिंह, बादिवड्याची महालक्ष्मी ह्यांच्या मंदिरासारखी—गोव्यातल्या जुन्या मंदिराच्या बांधणीसारखी आहे. (जांबावलीचेही असेच होते, पण ते आता 'मॉडर्न' झाले आहे.) मंदिर मोठे आहे. पण बांधकाम, कोरीव काम ह्यात कलाकुसर कुठेही नाही. खांबावरच्या तुळईचे तोंड पुढे आले असले तर त्याच्यावर काय थोडेसे नक्षीकाम असेल तेवढेच. एकंदरीत मंदिर उदास आणि रूक्ष वाटले.

पणजीही आता मॉडर्न होत चालले आहे. मुंबईतल्यासारख्या मोठमोठ्या ठोकळे-वजा इमारती उभ्या राहताहेत. आणि जुन्या—अठराव्या-एकोणिसाव्या शतकातल्या, हिंदुस्थानात असून हिंदुस्थानातल्यासारख्या नसलेल्या—गोव्याला एक वेगळेपण देणाऱ्या लहानलहान इमारती, समोर लाल व्हराडे असलेली कौलारू छपराची दुमजली घरे खुजी आणि जुनाट वाटू लागली आहेत. नव्या-जुन्या इमारतींच्या बाजूने जाताना एक विचित्र विसंगती जाणवते. अशी १९५१ साली जाणवली नव्हती. १९६४ सालीही नव्हती. मुंबईची आणि पणजीची हवा जवळजवळ सारखीच असल्यामुळे आणखी काही वर्षांनी वेगळेपणासाठी म्हणून मुंबईहून पणजीला जायची गरज राहणार नाही. पणजी ही मुंबईची छोटी आवृत्ती होईल. मांडवीला लागून जाणाऱ्या रस्त्यावरच्या काही इमारती अजून जुन्याच आहेत. मांडवीचे पात्र भव्य आहे. आणि अगदी तिच्या काठावर इमारती बांधल्या गेल्या नाहीत म्हणून थोडा मोकळा श्वासोच्छ्वास घ्यायला मिळतो. पण आधुनिकीकरणाच्या झपाट्यात काय होईल कोणी सांगावे!

कळंगूटला साळेगावच्या वाटेने गेलो. साळेगाव जवळ येत चालले तसा दोन्ही बाजूला माडाची झालर असलेला लाल-जांभळ्या रस्त्यांचा गालिचा आमच्यासमोर उलगडत पसरत गेलेला दिसला. नुकताच वेंगुर्ल्याला उभ्या दांड्याकडून सागरेश्वराकडे गेलो होतो तो अशाच रस्त्याने. कारवारहून मडगावकडे येतानाही असाच रस्ता लागला होता. साळेगाव आले तसे एका समृद्ध, सुखवस्तू गावात शिरलो. गर्द झाडी, माडाच्या राया आणि रेखीव बागा ह्यांनी वेढलेली, रस्त्यापासून किंचित आत असलेली, जवळजवळ एकाच नमुन्याची, काही लहान, काही मोठी घरे. रस्ते स्वच्छ आणि वर्दळ जवळजवळ नाहीच. कळंगूट जवळ येत चालले तसे रस्त्याच्या बाजूने मधूनमधून चहाची दुकाने आणि माडाच्या रायातून एकएक, दोनदोन खोल्यांच्या लहान बंगलेवजा झोपड्या दिसू लागल्या. चहाच्या दुकानांत, बंगल्याच्या आसपास दोनदोन, चारचार हिप्पीही दिसू लागले.

हिप्पी दिसू लागले म्हणजे कळंगूट आलेच. टॅक्सीतून उतरल्यावर आपण सरळ जातो ते एकदम किनाऱ्यावरच. मागे माडाच्या रायांचा पट्टा, समोर क्षितिजापर्यंत पसरलेला सागराचा विस्तार आणि मध्ये डावीउजवीकडे कित्येक मैलपर्यंत गेलेला पिंगट-तांबूस वाळूचा किनारा. भरती नुकतीच येऊन गेलेली होती. पाण्याने घट्ट झालेली ओली वाळू अनवाणी पायांना सुखावह वाटत होती. प्रवाशांचा उरूस सुरू झालेला नव्हता.

त्यामुळे गर्दी बेताचीच होती. पण ज्यांच्यासाठी आलो होतो आणि ज्यांनी कळंगूटचा किनारा बदनाम केला होता ते हिप्पी कुठे होते? की हिप्पींना बदनाम करून प्रवाशांना कळंगूटच्या किनाऱ्याकडे खेचायचा तो प्रवासप्रचाराचा डाव असतो? पण नाही. काही हिप्पी तिथे होते. पण सात किलो मीटर लांबीच्या किनाऱ्यावर दहापाच हिप्पी म्हणजे हिप्पींची गर्दी नव्हे. एकजण बरचे सगळे अंग उघडे टाकून, समुद्राकडे पाय करून उताणा पसरला होता. त्याच्या छाती-पोटाला वाळू चिकटली होती. म्हणजे आधी तो उपडा पडला असला पाहिजे. तो आता बहुधा शवासन करीत असावा. चोळीसारखा सैल पांढरा ब्लाउझ आणि पायघोळ पांढरा परकर नेसलेली एक स्त्री-हिप्पी एका देशी माणसाबरोबर येरझारा करीत होती. आणखी चारदोन इकडेतिकडे होते. हरिद्वारच्या बाजाररस्त्यात ह्यापेक्षा कितीतरी अधिक हिप्पी आणि तेही अधिक सतेज आणि अधिक प्रसन्न आणि कडेखांद्यावर मुले घेतलेले पाहिले होते. नंतर मला कळले की, कळंगूटच्या किनाऱ्यावर आमच्यासारख्या बघ्यांचा फार उपद्रव होऊ लागला म्हणून आता हिप्पी-हिप्पिणी अधिक निवांत जागी जाऊन राहू लागल्या आहेत. पण ते जातील त्या जागा किती दिवस निवांत राहतील ह्याचा त्यांनी फारसा विचार केला नसावा. एकंदरीत कळंगूटचा समुद्रकिनारा स्वतंत्रपणेच इतका सुंदर आहे की हिप्पींचे निमित्त करून तिथे जायला नको.

गोव्याला येण्यासाठी 'सहर्ष आमंत्रण' करणारे कोणतेही टुअरिस्ट पॅम्फ्लेट तुम्ही वाचा. त्यात गोव्याच्या नद्या, डोंगर, हिरवळी, समुद्रकिनारे, मंदिरे आणि चर्चे ह्यांच्या सौंदर्याबरोबरच—किंवा त्याहूनही अधिकच—तिथल्या लोकांची आतिथ्यशीलता, तिथल्या वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यपदार्थांची विपुलता—विशेषतः रुचकर मांसाच्या बनलेल्या खाद्यपदार्थांची—आणि देशी-परदेशी मद्यांची सुलभता आणि विविधता ह्यांची तोंड भरून भलावण केलेली आढळेल. पण हॉटेलात आढळणारी ही विपुलता, विविधता आणि सुलभता तुमच्या खिशात हात घालणारी आणि त्यातल्या पैशाच्या पाकिटाचा भरलेपणा चाचपणारी असणार. घरगुती आतिथ्यशीलतेची सर तिला कशी येणार? पण आम्हाला ह्या मुक्कामात सर्वत्र घरगुती आतिथ्यच लाभले आणि टुअरिस्ट पॅम्फ्लेटमधल्या भलावणीचा खरेपणा आणि अल्पोक्ती ह्या दोहोंचा प्रत्यय आला.

पणजीला पोचल्याच्या दुसऱ्याच दिवशी दुपारच्या जेवणाचे आमंत्रण होते. आधी तासभर आलें बियरने घसा ओला करीत गप्पा झाल्या. त्या बियरने चाळीस वर्षांपूर्वी घेतलेल्या परदेशी बियरची आठवण जागी केली, इतकी ती चांगली होती. जेवताना तामोशाचे लुसलुशीत, खमंग तुकडे, प्रॉनची करी, ह्यांना जॉनी वॉकरची सथसंगत होती. जेवण आणि गप्पा ह्यात वेळ कसा गेला ते कळले नाही.

संध्याकाळी मडगावला एक व्याख्यान ऐकायला जायचे होते. त्यानंतर कळंग्याच्या

समुद्रकिनाऱ्यावर रात्रीचे जेवण होते. मडगावला पोचलो तेव्हा व्याख्यानाला तासाभराचा अवधी होता. गावात शिरून विद्यानिकेतनकडे जाताना वाटेत उचावर एक मोठा प्रासाद दिसला होता. कोणातरी श्रीमंत खिश्चन माणसाचा असावा असे वाटले. बरोबर प्रल्हाद वडेर होते. ते म्हणाले, "व्याख्यानाला अवकाश आहे. तोपर्यंत जमल तर आपण तो वाडा पाहून येऊ."

मी तावडतोब होकार दिला आणि ज्या गाडीने मडगावला आलो होतो तीच गाडी घेऊन आम्ही दोघे त्या वाड्यापाशी गेलो. गाडी पायथ्याशी रस्त्यावर उभी केली. रस्त्यापासून वीसपंचवीस प्रशस्त पायऱ्या चढून वर गेलो. एखाद्या किल्ल्याच्या दरवाजासारखा उंच-रुंद, तेलपाणी दिलेला, काळ्या रंगाचा, किंचित भयप्रद असा दरवाजा समोर पंधरावीस पावलांवर दिसला. पण तो बंद होता. अंगणात व्यवस्थित लावलेला रेखीव बगीचा होता. चहूकडे हिरवळ. मध्ये फुलांचे ताटवे. सगळे सुंदर, वैभवदर्शक होते. पण कुठे कोणी माणूस दिसत नव्हते. वरच्या मजल्याला खिडक्या दिसत होत्या पण त्याही बंद होत्या. आत कसे जावे ते कळेना. आपण एखाद्या मध्ययुगीन यूरपियन कासलसमोर (ही अर्थातच नुसती कल्पना) उभे आहोत, दरवाजा बंद आहे, आत जायचे आहे, पण परवलीचा शब्द माहीत नाही, अशी अवस्था होती. दरवाजावर हाताच्या मुठीएवढा मोठा एक पितळी नॉकर दिसला. "ठक्, ठक्, ठक्." तीनदा नॉकरने दरवाजा ठोठावला. कोणी आले नाही. घरात कोणी नाही की काय? आणखी तीनदा ठोठावला. अधिक जोराने. तरी कोणी नाही. 'ऑन द नॉकिंग ॲट द गेट इन मक्बेथ' हा ड क्विन्सीच्या निबंधाची मला आठवण झाली. 'नॉक, ॲंड इट शॅल बी ओपन्ड अटु यू' ह्या खिस्तवचनाचीही आठवण झाली. पण एक दार नाटकातले होते आणि दुसरे (बहुधा) स्वर्गाचे. अखेर हिय्या करून आम्ही दार लोटून पाहिले. बरेच जड होते. पण हलले. उघडले. दाराची फळी तीन इंच तरी जाड असेल. एखाद्या किल्ल्याच्या दरवाजासारखी. आणखी थोडे ढकलून आम्ही आत शिरलो. कोणातरी थोरामोठ्यांच्या घरात असे चोरासारखे शिरताना चमत्कारिक वाटत होते.

आम्ही शिरलो तो एखाद्या गोडाउनसारखा मोठा पण रिकामा आडवा हॉल होता. आणि जेवढे दार उघडले होते त्यातून जेवढा येऊ शकला होता तेवढाच प्रकाश आमच्याबरोबरच आत आला होता. आणि तोही इतका बेताचा की, त्यामुळे हॉलच्या अंधुक भकासपणात भरच पडली. संबंध हॉलमध्ये एकही खुर्ची नाही. विलक्षण ओकेओके वाटत होते. म्हटले, हे घर आहे कुणाचे? एवढ्या मोठ्या वाड्याला कोणी दरवान कसा नाही? घरात कोणी राहते की नाही?

समोरच मधोमध वर जाण्यासाठी दहाबारा लांबरुंद पायऱ्या दिसल्या. त्यांच्यावर सपाट जागा. तिथून उलट दिशेने पुन्हा वर जाण्यासाठी डावी-उजवीकडे आणखी पायऱ्या असाव्यात असे वाटत होते.

एकदा वाटले, त्या मधल्या पायऱ्यानी वर जावे आणि पाहावे. पुन्हा वाटले, घरात कोणीच नसले तर पंचाईत. पण कोणीच नसले तर घराचा पुढचा मोठा दरवाजा उघडा कसा राहील ? आणि ती आजूबाजूची बाग कोणासाठी आणि कशासाठी ? आणि वर कोणी राहत असले आणि आपण पायऱ्या चढून जाऊ लागलो तर आपली चाहूल लागून एखादा 'वदरिंग हाइट्स'मधला किंवा 'हाउंड ऑफ द बॅस्करव्हिल'मधला, एकदम उडी मारून गळ्यावर झेप घेणारा, एखादा राक्षसी कुत्रा वरून धावत, उड्या मारीत आला तर काय करा ! अशी माझ्या मनात शंका आली. वडेराचे मला माहीत नाही. माझ्या मनात लहानपणापासूनच कुत्र्याची भीती बसली आहे. मी कुत्र्याबद्दल बोललो नाही. पण वडेराना म्हटले, "आपण बाहेर जाऊ या. काय आहे काही कळत नाही !" त्यानाही ते पटले. आम्ही बाहेर आलो आणि दरवाजा पुन्हा लावून घेतला

दारात शिरलो पण घरात जाता आले नाही म्हणून हिरमुसले, उदासवाणे होऊन खाली रस्त्याकडे पाहत आम्ही बंद दारासमोर उभे राहिलो. पण तेवढ्यात आमच्या नशिबाचे दार उघडले. रस्त्याकडच्या पायऱ्या चढून मोलकरणीसारखी दिसणारी एक बाई वर येताना दिसली. तिने कोकणीत काहीतरी विचारले. वडेरानी कोकणीत तिला सांगितले की, आम्हाला आत जाऊन घर पाहायचे आहे. तिने घराच्या कोपऱ्यावर जाऊन ओरडून कोणाला तरी काहीतरी सांगितले आणि आम्हाला ती म्हणाली, "जा आत. घरात लोक आहेत." म्हणजे आत जाणे शक्य आहे.

आम्ही पुन्हा तो दरवाजा लोटून आत गेलो. दबकत पायऱ्या चढून वर गेलो आणि वरची उजवीकडील ओवरी आधी दिसली म्हणून वळून उजव्या पायऱ्यानी आणखी वर गेलो. दारे बंद होती. ओवरीकडल्या दारावर विजेच्या घंटेचे बटन दिसले ते दाबले. आणि वाट पाहत उभे राहिलो. कसे स्वागत होणार ? होणार की नाही ? आम्ही अगांतुकच होतो. 'इंट्रूडर्स'. थोड्या वेळाने एक चाळिशीच्या वयाचे, मध्यम उंचीचे, गोरे, रुबाबदार गृहस्थ दार उघडून बाहेर आले डोळ्याना बिनचौकटी चष्मा होता. मुद्रा थंड, निर्विकार, किंचित करडीच होती.

आम्ही त्याना म्हटले, "आम्हाला आपला हा राजवाड्यासारखा वाडा पाहायचा आहे." मग मी माझी आणि वडेराची ओळख करून दिली. अगांतुकपणा केल्याबद्दल क्षमा मागितली आणि म्हटले, "आपला हा मॅन्शन बाहेरून फार शानदार वाटला. गोव्यातला असा एखादा मॅन्शन पाहण्याची फार इच्छा होती. म्हणून हे धारिष्ट केले."

त्यानी आमच्याकडे नीट खालीवर पाहिले. त्यांच्या मुद्रेवरचा करडेपणा निवळला. ती सुसंस्कृत नागरिकाची मृदू, स्वागतशील झाली. बाहेर आल्याबरोबर त्यानी दार ओढून घेतले होते ते पुन्हा उघडले आणि हात पुढे करून आम्हाला आत जाण्याची खूण केली. आम्ही आत गेल्यावर त्यानी दार पुन्हा बंद केले.

आम्ही त्याच्या मागोमाग आत गेलो. ती वरच्या मजल्यावरची तीसचाळीस फूट लांब आणि बाराचौदा फूट रुंद ओवरी होती. आमच्या डावीकडे खाली चौक दिसत होता. त्याच्या मागल्या अंगाला लागून चौकोनी विहीर होती. तिचे काळसर पाणी दिसत होते. विहिरीतून पाणी काढण्यासाठी खालच्या आणि वरच्या दोन्ही मजल्यावर खिराड्या लावल्या होत्या.

ओवरीच्या भिंतीकडच्या बाजूला समोरच कोपऱ्यात एक चिनी मातीचा चकचकीत, हिरवट-पतकिरी रंगाचा मांडीइतका उंच प्रचंड डेरेदार रांजण होता. मडगावला येताना वाटेत बोरीला बा० भ० बोरकरांच्या वाड्यातही तसाच रांजण पाहिला होता. पण हा अधिक चांगल्या स्थितीत होता. त्यावर चिनी ड्रॅगनच्या, गुंतागुंतीची वळणे घेत जाणाऱ्या उठावदार आकृती होत्या. आणि पुढे पाहतो तो सबंध ओवरीत भिंतीला लागून, दर आठदहा फुटावर एक अशी, रांजणांची रांगच होती. अलीबाबाचे साथीदार सहज त्यात लपून बसू शकले असते! आम्ही अगांतुक होतो, पण अलीबाबाचे साथीदार नव्हतो. तरी पण घरात एखादी मार्जियाना असणे शक्य होते. आणि कदाचित एका दारातून बाहेर येऊन दुसऱ्या दाराने ती आत जाईल आणि ओझरती का होईना, दृष्टीस पडेल म्हणून आम्ही बघत होतो. पण दिसली नाही! पण इतर जे दिसले ते अद्‌भुत होते. ओवरीच्या मध्यभागी अंतराअंतरावर उत्तम कोरीव काम केलेली लाकडी टेबले होती. त्यावर चौकटीत बसवलेल्या चिनी मातीच्या चित्रांचे टॉप्स होते. भिंतीवर ठिकठिकाणी निळ्या-काळ्या रंगाची नाजूक रेषाचित्रे काढलेल्या, चिनी मातीच्या, लहानमोठ्या वेगवेगळ्या डिझाइन्सच्या, प्लेटस खिळ्यांच्या आधाराने बसवलेल्या होत्या. छताला तीनचार ठिकाणी लकलकीत झुंबरे टांगलेली होती. आम्ही एखाद्या घरात आहो की काचेच्या, चिनी मातीच्या आणि लाकूडकामाच्या कलाकृतींच्या वस्तुसंग्रहालयात आहो, असा संभ्रम वाटावा इतके सगळे अद्‌भुत, अनपेक्षित, समृद्ध-संपन्न होते. आम्ही मुग्ध होऊन मालकाच्या बरोबर जात होतो. ते सांगत होते ते ऐकत होतो.

मालक सांगत होते,

"ही चित्रं, हे रांजण, ह्या फुलदाण्या, ही पात्रं चीनमधली आहेत. फार जुनी आहेत. चिनी मातीच्या काही वस्तू ड्रेस्डेनच्या आहेत. झुंबर व्हेनीशन आहेत. आम्ही अनोळखी माणसाला सहसा घरात घेत नाही, कारण ह्या सगळ्या वस्तू अतिशय मौल्यवान आणि दुर्मिळ आहेत आणि कोण कोणत्या उद्देशानं येतो हे कसं कळायचं?"

आम्हाला त्यांचे म्हणणे अक्षरशः पटले. ते पुढे म्हणाले,

"पण तुम्ही दोघेही प्रोफेसर्स असल्याचं तुम्ही सांगितलंत आणि तुमच्या एकंदर बोलण्याचालण्यावरून मला ते पटलं म्हणूनच मी तुम्हाला आत घेतलं."

आम्ही त्यांचे त्याबद्दल परोपरीने आभार मानले. मग तेच म्हणाले,

"चला, मी तुम्हाला पुढला मोठा हॉल दाखवतो."

आणि मग ते आम्हाला आम्ही खाली जो मोठा गोडाउनवजा रिकामा हॉल पाहिला होता त्याच्या वरच्या हॉलमध्ये घेऊन गेले. आत गेल्यावर त्यानी रस्त्या-कडल्या खिडक्या उघडल्या. त्या खिडक्यांना तावदाने होती, पण ती काचेची नव्हती. अभ्रकाच्या पत्र्यांसारखे चकचकीत पारदर्शक दिसणारे, मोठ्या तळहाताच्या आकाराचे माशाचे शिंपले समुद्रकिनाऱ्यावर सापडतात, ते कौलासारखे कडेने थोडेसे एकमेकावर चढवून त्यांची तावदाने करून लावली होती. शिंपले अरुंद असल्यामुळे जेमतेम टीचभर रुंदीच्या त्याच्या लांबच लांब पट्ट्या केल्या होत्या. आणि शिशाच्या पट्ट्यांनी जोडल्या होत्या. अशीच तावदाने मी दमणला एका जुन्या घराच्या खिडक्यांना लावलेली पाहिली होती.

हॉलमध्ये भारी आणि भरगच्च कोरीवकाम केलेले लाकडी फर्निचर होते. मालक म्हणाले,

"हे सगळं फर्निचर गोव्यातल्या लाकडाचं, गोव्याच्या कामगारानी, गोव्यात केलेल आहे."

हॉलच्या लांबीच्या अंगच्या भिंतीवर मधोमध सोनेरी चौकटीत एक तैलचित्र टांगलेले होते. तिकडे आमचे लक्ष गेलेले पाहून मालक म्हणाले,

"हा वाडा ह्यानी बांधला. तीनशे वर्षांपूर्वी. ते त्या वेळी गोव्याच्या व्हाइसरॉयच्या अव्वल मददगारासारख्या मोठ्या हुद्द्यावर होते. आमचं आडनाव डि सिल्व्हा. सेंट ॲन ही आमच्या घराण्याची पेट्रन सेंट आहे. म्हणून आम्ही 'सेंट ॲन डि सिल्व्हा' असं आडनाव लावतो. मी त्या घराण्यातला सहावा पुरुष."

हे अर्थात त्यानी सगळे आपण होऊन सांगितले नाही. एकीकडे त्या 'श्रीमंत' वस्तूंनी चकित प्रभावित होत दुसरीकडे आम्ही मधूनमधून त्यांना प्रश्न विचारीत होतो, त्या आमच्या प्रश्नांना उत्तरे म्हणून सांगितले.

"आपण काय करता ?"

आम्ही थोडेसे चाचरत विचारले.

"मी इथे मॅजिस्ट्रेट आहे."

त्यांचे इंग्रजी चांगले होते, पण उच्चारात थोडीशी परकी झाक होती. ते आम्हाला पोचवायला बाहेर आले. आणि अर्ध्या मजल्यावर जिथे सपाट जागा होती तिथे समोरच त्यांचे कौटुंबिक प्रार्थनागृह—चॅपल—आहे ते मुद्दाम दाखवले. ते सेंट ॲनचे चॅपल होते.

ह्या वेळी गोव्यात गेलो तर जे पाहायला मिळावे अशी इच्छा होती ते पाहायला मिळाल्याने खूप आनंद झाला होता. त्या आनंदाने भरलेल्या अंतःकरणाने आम्ही मि० सेंट ॲन डि सिल्व्हाचे आभार मानले. निरोप देण्यापूर्वी ते म्हणाले,

"आम्हाला एका धार्मिक समारंभाला जायचं आहे त्यासाठी बायकामंडळी कपडे

करताहेत, नाहीतर मी तुम्हाला आमच्या घराच्या आतल्या खोल्याही दाखवल्या असत्या."

ह्या त्यांच्या शब्दानी तर आम्ही भारावल्यासारखेच झालो.

खालच्या मोठ्या हॉलमधून आम्ही बाहेर आलो आणि तो प्रचंड दरवाजा ओढून घेतला. वडेरानी उचल केली नसती तर हे काहीही पाहायला मिळाले नसते.

कळंग्याच्या समुद्रकिनाऱ्यावर, माडांच्या राईत एका हॉटेलाशेजारी एक छोटासा शामियाना उभारला होता. आम्ही दहाबारा जण जेवायला होतो. शिरस्त्याप्रमाणे जॉनी वॉकरने सुरुवात झाली दातकोरण्यासारख्या काडीला टोचलेली भज्यासारखी काहीतरी वस्तू त्याच्या सोबतीला होती. जॉनी वॉकर जिभेवर रेंगाळत होती. मेंदूला किंचित तरतरी येत होती. गप्पाना रंग चढत होता. ह्या विषयावरून त्या विषयावर फुलपाखरासारख्या झेपावत होत्या. थोड्याशा रुंजी घालीत होत्या. पुढे जात होत्या. आमची यजमानमंडळी किती शिकलेली होती ते विचारले नाही. पण जगभर हिंडलेली होती. साहित्य, इतिहास, कला, वास्तुसौंदर्य, धर्म अशा अनेक विषयांवर विश्वासाने, जाणतेपणाने बोलत होती. काही नव्या गोष्टी सांगत होती. श्रीमंत होती हे उघडच होते. पण श्रीमतीचा देखावा यत्किंचितही नव्हता. जेवण चालूच होते.

दुसऱ्या की तिसऱ्या वेळी पॅटिससारखे काहीतरी एका डिशमध्ये आले. संपवल्यावर खाली पाहतो तो लांबट पातळ बशीसारखे टणक काहीतरी होते. उपडे करून पाहिले (कदाचित टेबल मॅनर्सच्या विरुद्ध). ती खेकड्याची लांबट-गोल पाठ होती. काळपट हिरवी. आणि मध्येमध्ये गडद तांबडे टपोरे ठिपके आणि त्याच्याभोवती फिकट पिवळ्या रंगाची कड. रंगसंगती फार आकर्षक होती. मनात आले, धुऊनपुसून स्वच्छ करून बरोबर घेऊन यावी आणि आपल्या घरी ठिकठिकाणाहून आणलेल्या चित्रविचित्र वस्तू ठेवलेले काचकपाट आहे त्यात जागा करून ठेवून द्यावी. गोव्याची एक वेगळी आठवण. मी तसे बोलूनही दाखवले. पण तसे करणे गावंढळपणाचे झाले असते (निदान दिसले असते). म्हणून मग मी ती मनातल्या मनात धुऊनपुसून स्वच्छ करून माझ्या मनाच्या पेटीत साठवलेल्या वस्तूतच जागा करून ठेवून दिली. हे अर्थात तिथल्या कुणाला कळले नाही.

जेवताना गोष्टी निघाल्या तेव्हा आम्ही सेंट ॲन डि सिल्व्हाचा प्रासाद पाहिल्याचे सांगितले. आणि मारियोचा वाडा पाहण्याची इच्छा होती हेही मी सांगितले. एक यजमान म्हणाले,

"मारियोचा वाडा लोटलीला आहे. आधी कळवलं असत तर दाखवण्याची सोय केली असती. पण सेंट ॲन डि सिल्व्हाचा वाडाही चांगला आहे. श्रीमंत घरंदाज घराणं आहे." मी मनात म्हटले, दुधाची तहान ताकावर नाही—दुधावरच

भागली. आणि ते दूधही बटर ऑईल घातलेले पाच टक्के स्निग्धांशाचे नव्हते. चांगले सकस, अस्सल होते. खरोखरच आपण भाग्यवान.

जेवणाच्या शेवटी गोड खाद्य आले. पुडिंगच्या कापासारखा मोठा तुकडा. पहिला घास घेतला. फारच रुचकर आणि अगदी वेगळी वस्तू होती. मी चटकन म्हटले,

"काय आहे हे? फारच छान आहे! कशाचं केलं आहे?"

बाहेर कोणाकडे एखादी वस्तू खाल्ली आणि ती खूप आवडली, तरी फार फार तर चांगली आहे म्हणायचे, पण काय आहे, कशाची केली आहे, कशी केली असे प्रश्न विचारायचे नसतात. ते विचारलेले घरच्या माणसांना आवडत नाही. घरची माणसे असलेल्या सगळ्यांचाच हा अनुभव असतो. आणि घरची माणसे तर समोरच बसली होती. त्यामुळे प्रश्न तोंडून बाहेर पडल्याबरोबरच मी जीभ चावली. पण बेतानेच. कारण एकच घास खाल्ला होता आणि आणखी कितीतरी खायचे होते.

यजमान म्हणाले, "ह्याला 'बिबिंका' म्हणतात. हे खास गोव्याचं पक्वान्न आहे. अंडी, मैदा, नारळाचं दूध आणि इतर स्वादिष्ट वस्तू घालून ते करतात."

ह्या शेवटच्या खाद्यपदार्थांबरोबर एक वेगळेच पेय छोट्या पसरट ग्लासात ओतून दिले होते. रंग काळसर-तांबडा दिसत होता. चव किंचित आंबटगोड होती. झणकारा होता-नव्हतासा. त्याचा आस्वाद थेंब-थेंब चाखीत, सावकाश घ्यायचा होता. तसा घेत होतो.

"दिस इज बोर्दो. वन ऑव् द बेस्ट वाइन्ज. तुम्हाला मुंबईत स्मगल केलेली बोर्दो किंवा शांपेन मिळेल. (मी मनात म्हटले, स्मगल केलेली आमच्यापर्यंत कसली पोचतेय!) पण बिबिंका मुंबईत मिळणार नाही. त्यासाठी तुम्हाला गोव्यालाच यावं लागेल!"

पुष्कळच गोष्टींसाठी पुन्हा गोव्याला यावे लागेल. कुडाळयाला मंगेशीच्या आणि केळोशीला शांतादुर्गेच्या मुळच्या मंदिराच्या जागा पाहायच्या आहेत. तांबडी सुर्लेचे कदंबशैलीचे आणि नार्व्याचे सप्तकोटीश्वराचे मंदिर पाहायचे आहे. सेंट फ्रान्सिस ऑफ असीसीचे जुन्या गोव्यातले चर्च पाहू म्हटले होते ते पाहायचे राहिलेच. ह्या सगळ्यासाठी पुन्हा गोव्याला यायला पाहिजे. आणि—

"आणि बिबिंकासाठीही"

"हो, बिबिंकासाठीही."

# मध्यरात्री
# वेगळ्या वाटेने

इथे दिल्लीत लाहोरी दरवाजाकडून अजमेरी दरवाजाकडे जाऊ लागले म्हणजे सडकेच्या डावीकडे, रस्त्यापासून थोडेसे मागे सरकलेल्या, दुमजली-तिमजली घरांची रांग आहे. तळमजल्यावर बहुतेक दुकाने आहेत आणि वरच्या मजल्यावर शरीराचा सौदा करणाऱ्या बायकांची बिऱ्हाडे. ह्या रस्त्याला 'बाज़ारे हुस्न' म्हणजे 'सौंदर्याचा बाजार' म्हणतात. अजमेरी दरवाजातून जामे मसजिदीकडे जाऊ लागले म्हणजे बड शाह बुलापासून मसजिदीपर्यंत चावडी बाजार आहे. तोही 'बाज़ारे' हुस्न'च आहे; पण त्याचे ते प्रचारातले नाव नाही. 'चावडी बाज़ार' म्हटले की लोकांना अर्थ कळतो.

ह्या सौंदर्याच्या बाजाराबद्दल दिल्लीला आल्यापासून बरेच ऐकले होते. आणि वाटत होते की, केव्हातरी एकदा ही सौंदर्याची पेठ रात्रीच्या वेळी—जेव्हा तिथले व्यवहार चालतात त्या वेळी—पाहावी.

युद्धकाळात सुरू झालेल्या नवीन नोकरीच्या निमित्ताने आम्ही बरेच लोक नव्यानेच दिल्लीला आलो होतो. बहुतेक लोक तरुण आणि अविवाहित होते. ज्यांची लग्ने झाली होती त्यांनीही आपली बायकामुले आणलेली नव्हती. त्यामुळे आम्ही सगळे सडेफटिंगच होतो, आणि चार-चार, पाच-पाच जणांचा गट करून एकत्र राहत होतो. ऑफिसचे काम संपले की रिकामेच. त्यामुळे काम नसेल तेव्हा दिल्लीच्या गल्ल्या-कुच्यांतून हिंडायचे हा आमचा दिवसाच्या वेळेचा उद्योग असे. सगळ्यांना एकत्र हिंडण्याला सोयीची वेळ म्हणजे रात्री नऊच्या पुढे, जेवणे झाल्यावर.

अशाच एका रात्री आम्ही दिल्लीच्या वेश्यावस्तीतून फेरफटका करायचे ठरवले, आणि मोरी दरवाजातून बाहेर पडून सदर बाजाराकडे निघालो. सर्व प्रकारच्या मालाच्या घाऊक व्यापाराच्या ह्या बाजारात दिवसा एखाद्या जत्रेसारखी गर्दी, गजबजाट, गोंगाट असतो. पण ह्या वेळी तो बहुतेक ओसरला होता. रस्त्याने अजून थोडीबहुत वर्दळ होती, पण दिवसाच्या मानाने नसल्यासारखीच. त्यामुळे सगळीकडे एक प्रकारची शांतता येत चालली होती. आलीच होती.

सदर बाजार उजवीकडे टाकून रेल्वे रस्त्याच्या बाजूने नवी दिल्ली स्टेशनाकडे जाणाऱ्या रस्त्याला आम्ही लागलो. दोनचार इमारती टाकून उजवीकडे एका गल्लीत शिरलो ते सरळ एका मोठ्या चौकात आलो. चौक ऐसपैस आणि मोकळा होता. तिथे दिवसा नाना वस्तूंचा बाजार भरत असे त्याची चिन्हे जिकडेतिकडे दिसत होती. आता रात्रीच्या वेळी मधले मैदान अगदी रिकामे होते. माणसाची वर्दळही जवळ-जवळ नव्हतीच. मैदानाच्या चारी बाजूंना जोते होते. त्यावर एक दार आणि एक खिडकी अशा ओळीने खोल्या होत्या. काही खोल्यांची दारे बंद होती. ज्यांची उघडी होती त्यांच्यापुढे एक पेटता कंदील टांगलेला होता आणि उघड्या दारात एखादी बाई बसलेली होती. चौकाच्या मध्यभागी एकदोन विजेचे दिवे होते. पण त्यांचा उजेड खोल्यांपर्यंत पोचत नव्हता. फक्त खोल्या आहेत एवढे दाखवीत होता.

इथे वेश्यांची वस्ती आहे हे आमच्यापैकी कोणाला ठाऊक होते ते माहीत नाही. कारण ही वस्ती मुख्य रस्त्यावरून दिसत नाही. मला वाटते, आमच्याबरोबरच खान महंमद नावाचे एक पठाण गृहस्थ होते त्यांना ही माहिती असावी.

आम्ही जोत्याच्या जवळून पण सभ्य आणि मित्रे अंतर ठेवून एकेका दाराकडे पाहत चाललो होतो. बहुतेक बायका उतरलेल्या वयाच्या आणि एक तर काळ्या, करपट, लठ्ठ, फोफशा किंवा पिकुटलेल्या, हडकुळ्या होत्या. केसांना चपचपीत लावलेले तेल चेहऱ्यावर उतरून केसांबरोबरच त्यालाही तेलिया चमक आलेली. काही बायकांचे फाळांसारखे दात तंबाखू खाऊन-खाऊन आणि मशेरी लावून लाल-काळे झालेले होते. साड्या भडक पण मळकट. त्यातच एखादी बेगमेची ऐट आणून दारातच हुक्का ओढीत असलेली. असे एकंदर दृश्य होते. आम्ही त्यांचे गिऱ्हाईक नाही हे जणू त्यांना कळले होते. त्यांची आमच्याबद्दल बेफिकिरी इतकी होता की, त्या आमच्याकडे पाहतच नव्हत्या, किंवा आमच्याकडे पाहून आमच्याच दिशेने, पण बाजूला, तंबाखूच्या पिचकाऱ्या टाकीत होत्या. कदाचित त्यातल्या काही सरळ आमच्या अंगावरच थुंकतील असेही काही वेळा वाटले.

खोल्यांसमोरून जाताना अधूनमधून थोडा वेळ थांबून आम्ही पुढे सरकत असू. लांबच्या एखाद्या खोलीपुढचा कंदील एकदम गायब होई. ह्याचा अर्थ त्या खोलीला गिऱ्हाईक मिळाले होते. अर्धा-एक तास आम्ही इकडून तिकडे, तिकडून इकडे असे हिंडत होतो. कुठेतरी उभे राहून त्यांचा भाव काय ह्याची चौकशी केली पाहिजे, असे आपसात म्हणत होतो. पण पुढे होऊन काही विचारायचा धीर कोणालाच होईना. त्यांच्याकडे पाहून इतकी शिसारी येत होती की, काही विचारण्यासाठी पुढे व्हावेसेही वाटत नव्हते. आणि शिवाय हा प्रश्न विचारायचा कसा, हा प्रश्न होताच. काय "गोभी क्या भाव दे रही हो?", "बैंगन कैसे बेच रही हो?" असे जसे एखाद्या भाजीवालीला विचारतो तसे विचारायचे, की हाताची बोटे पिसारून हस्त-पल्लवीने विचारायचे? पद्धत तरी काय असेल? असे आम्ही काही मनाशी, काही

एकमेकांशी बोलत होतो. खरे म्हणजे आम्हाला धीर होत नव्हता. आम्ही निर्लज्जही होतो आणि लाजतही होतो. इतक्या किळसवाण्या बायकाकडे लोकाना जावबते तरी कसे, असे विचारीत होतो. एवढ्यात आमच्यापैकीच कोणीतरी म्हटले,

"अहो, ह्या बायकाकडे येणारे लोक काय खुषीनं येत असतील? दिल्लीसारख्या शहरात हजारो तरुण-प्रौढ माणसं घरदार सोडून पोटासाठी येतात. वर्षं-वर्षं एकट्यानं राहतात. त्यांना स्त्रीसंगाची इच्छा झाली तर त्यांनी कुठं जावं? आणि ज्या प्रकारचे लोक ह्यांच्याकडे येतात त्यांच्या घरच्या बायका काय मोठ्या पद्मिनी-चित्रिणी असतील?"

"आणि ह्या बायका तरी येईल त्या माणसाला—मग तो रोगी असो, म्हातारा असो, कुरूप असो, दमेकरी असो, घाणेरडा असो—आपलं शरीर खुषीनं देत असतील काय? त्याही नाडलेल्या, टाकलेल्या, नकोशा झालेल्याच असणार!"

आम्ही सुशिक्षित लोक तिथे, त्या तशा वस्तीत, रात्रीच्या वेळी टोळक्याने उभे राहून सामाजिक चर्चा करीत होतो, किळस दाखवीत होतो, सहानुभूती दर्शवीत होतो. पण पुढे होऊन बोलण्याचे धाडस करीत नव्हतो. आम्ही तिथे सर्वस्वी परके होतो. थोडेबहुत अस्वस्थही होतो. पूर्वी कधी गेलो नाही अशा ठिकाणी आलेले होतो. त्यातही विशेष म्हणजे आम्ही कोणीही दिल्लीकर नव्हतो.

थोड्याच वेळात आमच्या लक्षात आले की, आमच्याकडे काही लोकाचे लक्ष गेले आणि ते आमच्याकडे काहीशा संशयाने, काहीशा नाराजीने-रोषाने पाहताहेत. लगोलग दोनचार धटिंगण—म्हणजे आम्हाला ते तसे वाटले—आमच्याजवळ आले आणि त्यानी आम्हाला जवळजवळ जाबच विचारायला आरंभ केला. "आप लोग कौन हैं? क्या चाहते हैं? क्यों इधरउधर टहल रहे हैं?"—वगैरे वगैरे.

आम्ही म्हटले, "खास कुछ नहीं. यौंही. यही पूछना चाहते हैं कि यह—यह —यानी—इनका—इनके दाम—यह कितने पैसे लेती हैं? यानी कि इनका..."

त्यांनी आमचे पाणी ओळखले होते आम्हाला ते माहीतच होते.

"आप लोगों का यहां कोई काम नहीं! आप चले जाइये यहां से! वरना—"

आमचे खरोखरच तिथे काही काम नव्हते. आणि त्या लोकांबरोबर बोलणे वाढवण्यात काही अर्थही नव्हता. तेव्हा आम्ही तिथून काढता पाय घेतला.

परत लाहोरी दरवाज्याकडे वळून 'बाज़ारे हुस्न'मध्ये आलो. मुख्य सडक सोडून तिथल्या त्या घराच्या थोडेसे जवळून जाऊ लागलो. तेवढ्यात बारा-चौदा वर्षांचे दोनचार मुलगे चार दिशांनी आमच्याजवळ आले. प्रत्येकाच्या हातात वेताच्या एका आखूडशा छडीवर सुगंधी फुलांचे हार, गजरे टांगलेले होते. प्रत्येकजण आपला हात पुढे करून, "लीजिये हुजूर, ताजा फूलों की बहार है. खुशबूकी महक है. लीजिये और हसीनों को दीजिये," असे म्हणून गळी पडू लागला. त्याच्या त्या सेल्समनशिपला

आम्ही कसे तरी तोंड देत आहो तेवढ्यात चूडीदार पाजामा, काळी शेरवानी आणि कुरळ्या फरची तिरपी टोपी घातलेला एक मनुष्य आमच्याजवळ आला आणि म्हणाला,

"चलिये हुजूर, मैं आपको बहुत बढ़िया चीज दिखाता हूं. अभीअभी मेरठसे आयी है. जवान लडकी है. हसीन है. शरीफ खानदान की है. और फिर पढी-लिखी भी. आप लोगों की तबियत खुश हो जायेगी."

थेट चांदणी चौकातली भाषा. चादणी चौकात बाहेर रस्त्यावर दुकाने आहेत. मधूनमधून आत बोळकाड्यात कटरे आहेत. त्यात घाऊक व्यापाऱ्याची दुकाने, दुकानाची गुदामे असतात. ह्या दुकानदारांचे दलाल बाहेर फुटपाथवर बोळाच्या तोंडाशी उभे असतात. आपण दुकाने पाहत पाहत फुटपाथवरून चालत असतो. इतक्यात अकस्मात उगवल्यासारखे ते आपल्याला आडवे येतात आणि आपण भानावर येण्यापूर्वीच बोलायला आरंभ करतात.

"अदर चलिये हुजूर, बहुत बढ़िया माल है. आप ऊनी सूटिंग चाहते है? कश्मीरी शाल, पश्मीना? टसर, चिकन, किन्खाब?"

"हम कुछ नहीं चाहते. हमको कुछ खरीदना-बरीदना नहीं है." आपण भानावर येऊन म्हणतो. "हम सिर्फ देखते घूम रहे हैं."

"तो अंदर चलके देख लेते. खरीदना ना खरीदना आपकी मर्जी पर है. देखनेके तो कोई दाम नहीं देने पडते."

ह्या 'बाज़ारे हुस्न'मध्ये तसेच दलाल. तीच भाषा. माल वेगळा म्हणून भलावणीच्या पद्धतीत काय फरक असेल तेवढाच.

"शरीफ खानदानकी भी है, खूबसूरत भी है, और पढी-लिखी भी है, फिर यहा क्यों आयी है?"—आम्ही.

"अजी हुजूर, क्या बतायें. यह सब तक़दीर के खेल हैं. मुसीबतज़दा है. 'मरता क्या न करता'वाली बात हैं. वरना ऐसी लडकी यहा आयेगी? सचमुच शरीफ खानदान की है. आप खुद आज़माइये. देखने में क्या हर्ज है. अगर मेरी बात झूट निकली तो जबान काटके हाथ पर रख दूगा."

दिल्लीकराची असली आर्जवी भाषा आमच्या परिचयाची झालेली होती. त्या माणसाला बाजूला सारून आम्ही पुढे झालो. पण पुढे जो जो भेटला त्याच्या तोंडी तीच भाषा. अगदी शेवटच्या प्रतिज्ञेसकट.

कुठेतरी आम्हाला जायचेच होते आणि कोणीतरी घेऊन जायलाही हवे होते. म्हणून मग एका दलालाच्या मागून एका घराच्या पायऱ्या चढून आम्ही वर गेलो. गच्चीतून एका खोलीत शिरलो. फार मोठी नव्हती, फार लहानही नव्हती. भिंतींना निळा रंग दिलेला होता. खोलीभर पांढरी चादर अंथरलेली होती. बरीच स्वच्छ होती. एका बाजूच्या भिंतीला लागून एक प्रशस्त गालिचा अथरलेला होता. त्याच्याभोवती पांढरे गिलाफ चढवलेले लोड ठेवले होते. बैठकीच्या मधोमध पानसुपारीचे तबक

होते. पितळेचे. बरेचसे चकचकीत. किंचित नाकात भरणारा असा हिन्याच्या अत्तराचा वास हवेत होता. 'हसीनों को इत्रे हिना बेचता हूं'—केव्हातरी ऐकलेली ओळ आठवली.

आमच्याबरोबर आलेल्या दलालाने आम्हाला बसायला सांगितले. आमची चाहूल लागताच आतल्या खोलीतून (ही खरी रस्त्याकडची खोली. तिच्या खिडकीतून रस्त्यावर काय चालले आहे ते दिसत असले पाहिजे.) एक वीस-बावीस वर्षांची तरुण स्त्री पडदा बाजूला सारून बाहेरच्या खोलीत आली. चूडीदार पाजामा, गुडघ्यापर्यंत आलेला सफेद मलमलीचा कुर्ता, वर निळे जाकीट आणि डोक्यावरून घेतलेला मलमलीचाच बुट्टेदार दुपट्टा. मध्यम उंची, सडपातळ बांधा, निमगोरा रंग, लावण्यवती नाही पण नाकीडोळी नीटस आणि रेखीव. ओठ विड्याने रंगलेले, डोळ्यात काजळ घरंदाज असेल किंवा नसेल—नसेलच, पण सदर बाजारातल्यासारखी असभ्य आणि रासवट नव्हती आत आल्याबरोबर तिने आम्हाला लवून अदबीने सलाम केला आणि पुढे येऊन ती मधल्या भिंतीशी लोडासमोर खुरमांडी घालून, अंग आवरून बसली. नंतर थोडी गप्प गप्प अशा प्रसंगी पुढे काय करायचे, काय बोलायचे हे आम्हाला काही माहिती नव्हते. ती मुरब्बी आणि आम्ही अनभ्यस्त—जवळजवळ गावंढळच पण नुसते गप्प तरी किती वेळ बसणार? तेवढ्यात तीच म्हणाली, "फर्माइये, मैं आपकी क्या खिदमत कर सकती हूं?"

मग आम्ही म्हटले, "कुछ गझल वगैरेह हो."

सारंगिये आणि तबलजी होतेच. बाईंनी गळा साफ करून स्वर लावला आणि एक गझल म्हटली आवाज आणि तयारी बेतावेताचीच, पण अगदीच वाईट नव्हती. गझलेतल्या 'फना', 'शमा', 'परवाना' वगैरे शब्दांचे अर्थ कळले. काहींचे कळले नाहीत. पण मुशाएऱ्याच्या रिवाजानुसार "वाह! क्या खूब! कमाल कर दिया! इसे फिरसे दुहराइये", वगैरे उद्‌गारांनी आम्ही दाद देत होतो. नाहीतरी तशी दाद द्यायला सगळ्या शब्दांचे अर्थ कळणे आवश्यक नसतेच. बाईही किंचित उठल्यासारखी होऊन आदाब करून तिचा स्वीकार करीत होती. एक गझल झाल्यानंतर आम्ही आणखी एक गझल म्हणण्याची फर्माइश करणे उचित होते. त्याप्रमाणे आम्ही फर्माइश केली आणि बाईने आणखी एक गझल म्हटली. तिलाही आम्ही दाद दिली. थोड्या वेळाने आम्ही हालचाल करू लागलो. एवढ्या अवधीत मधल्या दारात एक पोक्त बाई येऊन बसल्याचे आमच्या लक्षात आले होते. बाईने आम्हाला विडे करून दिले. बिदागी काय द्यायची, काय द्यावी ह्याबद्दल आम्ही एकमेकांच्या कानात कुजबुजू लागलो. आणि शेवटी एकदाचे पंधरा रुपये द्यायचे ठरवले. (ते अर्थात नंतर आम्ही त्याला देणार होतोच.) पंधरा रुपये म्हणजे फारच फार झाले की फारच कमी झाले, ह्याबद्दल आमचा निर्णय होईना, कारण 'बाजारे हुस्न'च्या व्यवहारात आम्ही पूर्णपणे अनभिज्ञ होतो.

स्वागत करतानाच्या अदबीनेच बाईने आम्हाला निरोप दिला. आणि जिना उतरून आम्ही खाली रस्त्यावर आलो. आपली जीभ कापून आमच्या हातावर ठेवण्याची दलालावर पाळी आली नाही! आणि आली असती तरी तसे करण्यासाठी तो थांबलेला नव्हता. आम्ही खोलीत शिरल्यावरच केव्हातरी तो गायब झाला होता.

सदर बाजारातल्या बायका जर वेश्यामधल्या प्रोलेटेरिअट असतील तर 'बाज़ारे हुस्न'मधल्या बूर्झ्वा म्हणता येतील. (त्यातल्या वरच्या की खालच्या थरातल्या कोण जाणे!) मुळात चावडी बाजार हाच दिल्लीचा 'बाज़ारे हुस्न' होता. पण तिथल्या वेश्याना हुसकून लावायचे दिल्ली म्युनिसिपालिटीने ठरवले होते म्हणून इथे सौंदर्याची नवी पेठ वसली होती. पण चावडी बाजारातल्या सगळ्या वेश्या तिथून निघाल्या नव्हत्या. किंबहुना चावडी बाजार म्हणजे वेश्यांची वस्ती, असाच अर्थ लोकांच्या मनात अजूनही होता. आणि म्हणून आम्हाला तिथेही जायचे होते.

आणि म्हणूनच 'बाज़ारे हुस्न'मधली आणखी एखादी माडी चढायची आमची इच्छा नव्हती. जे एका माडीत तेच दुसऱ्या, थोड्याबहुत फरकाने आणि पुन्हा पैसे काढावे लागले असते ते वेगळेच म्हणून मग आम्ही 'बाज़ारे हुस्न'मधून अजमेरी दरवाजातून चावडी बाजारात गेलो दिवसाच्या वेळचा चावडी बाजार आणि रात्रीच्या वेळचा चावडी बाजार ह्यांची रूपे इतकी वेगळी आहेत की ते एकच ठिकाण आहे हे खरे वाटत नाही. चावडी बाजारात खाली रस्त्यावर दुकाने आहेत. त्यात दिवसाच्या वेळी लोखंडी सामान, तांब्या-पितळेची भांडी, कप-बश्या, काचसामान, सर्व प्रकारचा कागद ह्यांचा घाऊक आणि किरकोळ—मुख्यत. घाऊक—व्यापार चाललेला असतो. विलक्षण गर्दी, गजबज, वाहनांची—हातगाड्यांची—वर्दळ, ट्रॅमचा खडखडाट-घणघणाट, आरडाओरडा असतो. पुष्कळदा त्या गर्दीतून वाट काढणेही मुश्किलीचे असते. दिवसाच्या वेळी चावडी बाजारातून जाताना वरती नजर करून पाहण्याचे कोणाला सुचणारही नाही. आणि कदाचित कोणाची नजर वर गेलीच तर त्याला खिडक्यांवर सोडलेल्या चिकाच्या पडद्याखेरीज काही दिसणारही नाही. वर कोणीतरी राहतात एवढेच त्याला वाटेल. कदाचित खाली ज्यांची दुकाने आहेत, त्यांचीच ती घरे असतील, असे तो म्हणेल.

पण आता रात्रीचे बारा वाजून गेले होते. दुकाने बंद असल्यामुळे खाली रस्त्यात सगळीकडे अंधार होता. रस्ता अगदी मोकळा-रिता आणि स्तब्ध होता. इतका की, दिवसा गर्दीचे आणि ओरडाओरडीचे असते तसे आता रात्रीच्या रितेपणाचे आणि स्तब्धपणाचे दडपण जाणवत होते. तसा रस्त्याचा रितेपणा आणि स्तब्धपणा सदर बाजारापासून चावडी बाजारापर्यंत येतानाच जाणवत होता. सबंध रस्त्याने आम्ही पाच-सातच लोक चालत होतो आणि बोलत होतो. पण का कोण जाणे, इथे चावडी

बाजारात तो विशेष जाणवत होता. कदाचित दिवसाच्या विरोधामुळे असेल किंवा रात्र चढली होती म्हणून असेल.

इथे खाली ह्या वेळी अशी स्तब्धता होती, तर वर जाग होती. वर खिडक्या उघड्या होत्या. दिवसा खाली सोडलेले पडदे आता गुंडाळून वर केलेले होते. त्यामुळे खिडक्यात उजेड दिसत होता. काही खिडक्यांतून बायका बसलेल्या होत्या. तोंडाला पावडर लावलेली, ओठ रंगवलेले, डोळ्यात काजळ घातलेले. रूप यथातथाच.

त्याच्याकडे पाहिल्यावर वाटले की, चावडी बाजारातल्या त्यातल्या त्यात अधिक सुस्थितीतल्या आणि बऱ्यापैकी वेश्या 'बाज़ारे हुस्न'मध्ये गेल्या असाव्यात आणि गाळसाळ इथे मागे राहिला असावा. प्रतवारीच लावायची झाली तर 'बाज़ारे हुस्न', चावडी बाजार आणि सदर बाजार अशी लागली असती.

सदर बाजारात दलाल होते की नाही कोण जाणे. कदाचित आम्हाला ज्यांनी हटकले आणि हाकलले ते दलालच असतील. 'बाज़ारे हुस्न'मध्ये होतेच. इथे चावडी बाजारात दिसले नाहीत बाजार आहे तिथे दलाल असतीलच. आम्हाला फार उशीर झाला होता. गिऱ्हाईक हेरायची आणि गटवायची वेळ होऊन गेली होती. आता ह्या वेळी रस्त्यावर फिरणार म्हणजे चोर आणि पोलिसशिपाई. म्हणूनच असेल कदाचित, पण आम्हाला दलाल दिसले नाहीत खरे.

मोरी दरवाजापासून सदर बाजारापर्यंत आणि सदर बाजारापासून 'बाज़ारे हुस्न'-च्या वाटेने चावडी बाजारापर्यंत अशी पायपीट करून आम्ही कंटाळलो होतो. थोडेसे दमलो होतो. पुन्हा इथून मोरी दरवाजापर्यंत परत चालत जायचे होतेच. आणि आतापर्यंत पण्यांगनादर्शन झाले ते पुरे झाले असे वाटू लागले होते. तरी पण चावडी बाजारात आल्यासारखे एखाद्या तरी कोठ्यावर जायलाच पाहिजे होते. म्हणून त्यातल्या त्यात बऱ्या दिसणाऱ्या एका घराचा जिना चढून आम्ही वर गेलो.

रस्त्याच्या बाजूला रुंदसा व्हराडा होता. मागे दार होते. उघडेच होते. आम्हाला पाहून वीस ते पंचवीसपर्यंतच्या दिसणाऱ्या तीनचार बायका दारात येऊन उभ्या राहिल्या. पावडरीतूनही चिकट तुकतुकीत दिसणारे चेहरे, पिकुटलेली कातडी, त्यातून ठिकठिकाणी वर आलेली मुरुमांची टोके. एकंदरीत दृश्य ओंगळच.

पुन्हा कोणी काय बोलायचे हा प्रश्न आलाच आमचे पख्तून दोस्त खान महंमदच पुढे झाले. त्यांनी काही चौकशी केली. तेव्हा एक म्हणाली, "हम पठान हैं." खान महमदही पठाणच. मध्यम उंचीचा, पण भरलेल्या अंगाचा, लालबुंद. त्या तसल्या खप्पड-फिक्कट-ओशट बायकांच्या तोंडून "हम पठान हैं." हे ऐकून त्याला लाजच वाटली असेल. आम्हाला आश्चर्य वाटले. पठाण बायका आम्ही कधी पाहिल्या नव्हत्या. आमच्या कल्पनेतले पठाण स्त्रीचे चित्र म्हणजे आम्ही लहानपणी ज्या बलुची बायका पाहिल्या होत्या त्यावर आधारलेले होते. भडक रंगाचा घेरदार लेहंगा, लांब बाह्यांचे अंगातले, तांबडा, जांभळा किंवा हिरवा बुंदक्या-बुदक्यांचा

मोठा चौकोनी रेशमी रुमाल डोक्यावर टोपीसारखा आवळून बांधलेला आणि त्याचे एक टोक पाठीवर सोडलेले. तरतरीत उभार नाक, सुरमा घातलेले तिखट-भेदक डोळे आणि लालबुंद गाल. बोलण्यात वाचाळ, किंबहुना भांडखोरच. एखाद्या मजबूत पुरुषाचा हात त्यांनी धरला तर त्याला सहजासहजी सोडवून घेता येणार नाही अशा बळकट—असे आमच्या आठवणीतले चित्र होते.

ती चित्रे आणि ही समोरची पाप्याची पितरे! त्या बायका पठाण हे खरेच वाटेना —आणि त्यांच्याकडे पाहवेनासुद्धा. तिथून निघावेसे वाटू लागले. पण तेवढ्यात दोस्त महमदने पुस्तूतच त्यांना काहीतरी विचारले. बहुधा भावाबद्दलच असावे. कारण, दोन की तीन—असे काही त्यांनी सांगितले. ते केविलवाणे रूप आणि ती स्वरातली लाचारी पाहून आम्ही अधिक न थांबता जिन्याकडे वळलो. त्यांची निराशा झाली की संताप झाला, आम्हाला कळले नाही. आणि कळून घेण्यासाठी आम्ही मागे वळून पाहिलेही नाही. नाहीतरी पुढे काहीही करायचा विचार नसताना उगीचच नुसता भाव विचारणे हा आमचा आगाऊपणाच होता. त्या जर थोड्या अधिक तडफदार असत्या तर कदाचित "खिशात नाहीत पैसे आणि आले भाव विचारायला!" असे म्हणून त्यांनी आम्हाला शिव्याच दिल्या असत्या. उगीच माल हाताळीत किंमतीची चौकशी करणाऱ्याला काही दुकानदार शिव्या देतात तसे.

एव्हाना मध्यरात्र उलटून गेली होती. आमच्यापैकी बऱ्याच जणांना पहाटे उठून ड्यूटीवर जायचे होते. डोळे जड झाले होते. पायदेखील. पायपीट बरीच झाली होती. आणखी घरापर्यंतची व्हायची होती. आणि मुख्य म्हणजे दिल्लीच्या वेश्यावस्तीतून हिंडण्याची आमची इच्छा पुरी झाली होती. कोणीतरी म्हटले, "'बाजारा'त न बसणाऱ्या पण 'धंदा' करणाऱ्या काही 'सभ्य' स्त्रिया दिल्लीत आहेत. त्यांचे पत्ते मिळवून केव्हातरी आपण त्यांच्याकडे जाऊ या." पण ते मग वेश्यावस्तीत फिरणे झाले नसते. आणि आम्हाला तर नुसते फिरण्याखेरीज काहीच करायचे नव्हते. झाला हा फेरफटका आम्हाला पुरेसा होता.

आमची ही निशाचरी दुसऱ्या दिवशी ऑफिसात कळली तेव्हा कोणीतरी म्हटले, "इतक्या ठिकाणी जाऊन तुम्हाला काहीच करायचं नव्हत तर मध्यरात्री भलत्या वाटेने ही पायपीट केलीत कशाला? झक मारायला?"

"तुम्ही चांदणी चौकात आणि कॉर्नॉट प्लेसमध्ये जाता तेव्हा प्रत्येक वेळी काही खरेदी करता काय? की ह्या दुकानात डोकाव, त्या काचेच्या तावदानापाशी उभे राहा असं करीत नुसती पायपीटच करता? तेच आम्ही केलं!"

# मुद्दतु
# ओंब्रिगाद

मागल्या खेपेला जेव्हा गोव्याला गेलो होतो तेव्हा लोटलीतला एका वाडा पाहायचा होता तो पाहायचे राहून गेले होते. म्हणून मी मनाशी ठरविले होते की, पुन्हा जर गोव्याला जायची संधी मिळाली तर लोटलीला जायचे. तशी संधी मिळाली होती. आणि मी लोटलीला जायला निघालो होतो. अर्थात बरोबर गोवेकर मित्र होतेच. कुंडाळे सोडून लोटलीच्या रस्त्याला लागल्यावर थोड्याच वेळाने केळोशी आले. केळोशीला न उतरता तसेच पुढे जाणे अडाणीपणाचेच नाही तर असभ्यपणाचे झाले असते. कारण आता जरी शांतादुर्गा तिथे नसली तरी आधी ती तिथेच होती. नंतर कवळयाला गेली. म्हणजे भक्तांनी तिला नेले. आता ती जशी तिथे नाही तशी तिच्या मंदिराची वास्तूदेखील तिथे नाही. अलिकडेच त्या जागेवर उभारलेले एक वृंदावन मात्र आहे. पण जिथे मंदिर होते त्याच्या समोरच पुरुषभर खोल आणि बुजलेली एक तळी आहे. ती कदाचित त्या वेळची असेल. शिवाय गोव्यातला पहिला मराठी काव्यग्रंथ 'श्रीकृष्ण-चरित्र कथा' कृष्णदास शामा ह्या भक्त कवीने "केळशी ग्राम ब्रह्मपुरी। जेथे शांतादुर्गा परमेश्वरी।" होती त्या ह्या गावीच साडे-चारशे वर्षांपूर्वी म्हणजे एकनाथाच्या भागवताच्याही आधी रचला. तेव्हा केळोशी हे एका परीने गोव्यातले नेवासेच. म्हणूनही तिथे उतरून ते ठिकाण पाहून थोडा वेळ टेकणे उचितच होते. त्याप्रमाणे तिथे थोडा वेळ थांबून पुढे निघालो.

जेव्हा जेव्हा मी गोव्याला गेलो तेव्हा तेव्हा पाहिले आहे की, देशावरल्या किंवा इतर ठिकाणच्या लोकांच्या मानाने गोव्यातल्या सामान्य सुशिक्षित माणसालासुद्धा गोव्यातले देव, देवस्थाने, त्यांचा कारभार आणि व्यवस्था, इतिहास (कारण गोव्याच्या देवस्थानांना इतिहास आहे), पोर्तुगीज राजवटीने गोव्याला दिलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी, गोव्यातल्या वेगवेगळ्या समाजाचे परस्परसंबंध आणि वैशिष्ट्ये, कोंकणी-मराठीचे परस्परसंबंध, मराठी नाटके आणि नाट्यसंगीत ह्यासंबंधी जागती जाण आणि चांगली माहिती असते, आणि तीत ठामपणा असतो. इतकेच काय पण व्यापार-उद्योगात लक्षावधी रुपयांचा व्यवहार करणाऱ्यांपैकी सुद्धा अनेकांना राजकीय, आर्थिक घडामोडींबद्दल नव्हे वाङ्मय, चित्रकला, वास्तुकला ह्याच्याबद्दलही आस्थाच

नव्हे तर चांगली चांगली चिकित्सक अभिरुची असते. त्यामुळे गोवेकर मित्राच्या सगतीत बिअर-व्हिस्कीचा आस्वाद घेत म्हणा, किंवा प्रवास करीत म्हणा, वेळ फार चांगला जातो. कधी कंटाळवाणे होत नाही. एखादा प्रश्न विचारून त्यांना बोलते करावे, आपण नुसते ऐकत राहावे. त्याच्या-त्यांच्यात कधी मतभेद झाला (आणि बहुधा होतोच) तर "हाव सांगता" असे एक जण म्हणेल. आणि असे म्हटले की ओळखावे की आता थोडीशी चकमक होणार आणि संभाषणाला अधिक रंग आणि आवेश चढणार. आणि चकमकीतून उडालेली ठिणगी जसे आपले काम करून विराम पावते तसे वादाला एक झटका देऊन ते शब्द विराम पावतात. मग आपल्याशी मराठीत चाललेले बोलणे थोडा वेळ थांबवून "हाव सांगता" म्हणून ते एकमेकांशी कोकणीतून बोलतील. आणि थोड्या वेळाने पुन्हा मराठीकडे म्हणजे आपल्याकडे वळतील. त्यामुळे आमचा प्रवास अत्यंत मजेत चालला होता. रस्ता आणि वेळ कसा मागे पडत चालला ते कळत नव्हते.

लोटली जवळ येत चालले तसे आमचे मित्र म्हणाले, "लोटलीला जाऊन तुम्हाला जो वाडा पाहायचा आहे तो आपण पाहूच. पण इथे वाटेवरच एक वाडा आहे तो आपण पाहायचा का?"

मी म्हटले, "वा. फारच चांगलं. जरूर पाहू."

हे बोलणे होते आहे तोवर आमची गाडी रस्त्याला लागून असलेल्या एका घरासमोर थांबली. आतून वाडा कसा आणि केवढा मोठा असेल याची बाहेरून काहीच कल्पना येत नव्हती. पण मागल्या वेळी मडगावचा पाहिलेला वाडा जसा उंचावर होता तसा हा नव्हता. तसेच ह्याचा दरवाजा मोठा होता, पण मडगावच्या वाड्याच्यासारखा अवजड आणि मन दडपणारा नव्हता. वाडा पाहून प्रसन्न वाटले. रस्ते आणि वाडा ह्यांच्या मधल्या जागेत टुमदार बाग होती. रस्त्याकडच्या खिडक्या सगळ्या बंद होत्या. पण त्यांची स्वच्छ पुसलेली काचेची तावदाने लखलखत होती. भिंतींच्या, दाराच्या आणि तावदानाच्या लाकडी चौकटींच्या रंगात ताजेपणा होता. श्रीमंती आणि अभिरुची रंगातही दिसत होती.

आमच्याच हातानी फाटक उघडून पाच-सात पायऱ्या होत्या त्या चढून आम्ही वर गेलो. दार बंदच होते. त्याची कडी हलकेच वाजवली दोनतीन मिनिटात दार उघडले गेले. डौलदार मध्यम बांधा, तांबुस-सावळा तेजस्वी रंग, गुडघ्यापर्यंत आलेल्या लुगड्याचा कासोटा काच्यासारखा मागे घेऊन घट्ट खोचलेला व कपाळाकडून मागे घेतलेल्या केसाचा अंबाडा बांधलेला. कमानदार भुवया, रेखीव नाकडोळे आणि हसतमुख चेहरा अशी एक तरतरीत तरुणी आत उभी होती. तिनेच दार उघडले होते.

आमचे मित्र तिच्याशी कोकणीत काही तरी बोलले आणि तिच्या मागोमाग आम्ही एण्ट्रन्स हॉलमधून चालू लागलो ते समोरच्या दारातून एका खूप लांब ओसरीसारख्या दालनात आलो. चांगले वीस फूट रुंद आणि चाळीस फूट किंवा

अधिकच लांब असेल. सगळी जमीन लाकडी तक्तपोशींची तकतकीत होती. डावी-उजवीकडे अंतराअंतरावर खुर्च्या मांडलेल्या होत्या. भिंतींवर चित्रे आणि चिनी मातीच्या लहान-मोठ्या प्लेट्स लावलेल्या होत्या. मधोमध एक बैठे टेबल होते. आमच्या डावीकडे चौक होता तिकडची काचेची दारे बंद होती. पण त्यातून प्रकाश येत होता. आम्ही उभ्याउभ्यानेच भिंतीवरची चित्रे वगैरे बघत होतो, तेवढ्यात समोरच्या बाजूने थोड्याशा अंधाऱ्या भागातून एक सत्तर-पाऊणशे वर्षांची वृद्ध स्त्री काठी टेकीत-टेकीत येताना दिसली. आम्ही तिकडे वळलो. मध्यम उंचीची, सावळ्या रंगाची, दिसायला साधारण बरी (तरुणपणी कदाचित अधिक देखणी, अधिक उजळ असेल), किंचित स्थूल, पांढऱ्या भुईवर फिकट तांबडी, गुलाबी, फुले असलेला पायघोळ झगा घातलेला, डोळे निस्तेज आणि काहीसे ओलसर, केस करडे-काळे. आमच्या-जवळ आल्यावर तिने आम्हाला बसायला सांगितले. पुटपुटत आम्ही बसतो न बसतो तोच त्याच बाजूने दुसरी एक वृद्ध स्त्री आली. साधारणतः तितक्याच वयाची. तशीच काठी टेकीत टेकीत. पण मघाची तरुण मोलकरीण तिला हाताचा आधार देऊन तिच्या बरोबर चालत होती. ह्या स्त्रीच्या अंगावर पांढऱ्या भुईवर फिकट आणि गडद निळ्या रंगाची फुले असलेला पायघोळ झगा होता. ही रंगारूपाने पहिलीच्या अगदी उलट होती. अंगाने सडपातळ. रंग हस्तिदंतासारखा स्वच्छ फिकट गोरा. तिला तो झगा शोभत होता. लांबट गोल चेहरा, अर्धचंद्राकार स्वच्छ कपाळ, कानवळे-मानवळे रुपेरी, पण माथ्यावरचे केस काळे (कदाचित रंगवलेले असतील) उंच सरळ नाक, एके काळी भरलेली आणि वळणदार पण आता तोंडात दात नसल्यामुळे सुरकुतून किंचित आत ओढलेली जिवणी—आणि डोळे! खरे तर आधी लक्ष डोळ्यांकडेच गेले होते. अगदी काळे कुळकुळीत, भुंग्यासारखे आणि मोठे. पण निर्जीव, थिजलेले. ही बाई जेव्हा ऐन पणात असेल तेव्हा आपल्या रंगारूपाने, अंगाबांध्याने आणि डोळ्यांनी प्रत्येक लहान-मोठ्या मेळाव्यात तिने सगळ्यांच्या नजरा आपल्याकडे खेचून घेतल्या असतील. अनेकांच्या झोपा उडवल्या असतील. अनेकांची स्वप्ने रंगविली असतील. आणि आता! आता ती आपल्या पायांनी चालत होती म्हणूनच तिला जिवंत म्हणायचे! तिचे डोळे इतके थंड, इतके स्थिर होते की, त्यांची उघडझाप तरी होते की नाही ह्याची शंका वाटत होती. तिला कदाचित दिसतही नसावे. कारण तिचे डोळे उघडे होते, पण ती आम्हा कोणाकडेच पाहत नव्हती. नव्हे, कशाकडेच पाहत नव्हती.

ती आल्याबरोबर आम्ही सगळे उठून उभे राहिलो. ती वाड्याची मालकीण होती हे दिसतच होते. त्या तरुण मोलकरणीने हाताचा आधार देऊन तिला मधल्या खुर्चीवर बसविले. आपल्या गोवेकर मित्रांनी तिला "बों दिय" म्हणून आदराने अभिवादन केले आणि ते पोर्तुगीज भाषेत तिला आमचा परिचय करून देऊ लागले. निदान मधूनमधून 'प्रोफेसर' ह्या अभिधानाने आमची नावे त्यांच्या बोलण्यात येत

होती त्यावरून मला असे वाटले ते जे काही बोलत होते त्याला उत्तर म्हणून ती, रोझरीवर 'आवे मरीया'चा जप करताना पुटपुटतात तसे, पुटपुटत होती, पण तेवढे त्याना कळत असावे. ते सगळे ऐकताना मला गमत वाटत होती. आपल्या देशात आपली दोन माणसे इग्रजीत बोलली तर ते आपल्याला चमत्कारिक वाटत नाही. पण तीच पोर्तुगीज किंवा फ्रेंच बोलली तर मात्र चमत्कारिक वाटते. क्षणभर खरोखरीच आम्ही पोर्तुगीजांच्या "प्रोव्हीसिया उल्मामारीना"मध्ये आहोत असे मला वाटले. त्या तरुण बाईचा सळसळता जिवंतपणा आणि त्या दोन वृद्ध स्त्रियाचे थिजत चाललेले जगणे ह्याची त्याच्याकडे पाहत मनातल्या मनात तुलना करीत होतो. तेवढ्यात आमचे मित्र आमच्याकडे वळले. आम्हाला वाडा पाहायची परवानगी मिळाली होती.

तिथून एका दाराने आम्ही अगणाकडे आलो. अगणात सगळीकडे कुंड्यातून वेगवेगळ्या आकार-प्रकाराची झाडे लावली होती. कासोळे अळू रगीत पानाचे वेगवेगळ्या प्रकारचे क्रोटेन्स, फर्न्स, निरनिराळी फुलझाडे, ह्यामुळे सगळे अंगण म्हणजे एक प्रफुल्ल ताटवाच दिसत होता. चारी अगाना कौलारे होती त्याच्या वळचणींचे पाणी व्यवस्थितपणे एकाच ठिकाणी पडावे म्हणून पन्हळे लावली होती. सगळे स्वच्छ आणि नीटनेटके होते.

आम्ही एका हॉलमध्ये आलो. ठिकठिकाणी मोठमोठे चिनीमातीचे राजण ठेवले होते. मध्ये मध्ये कोरीव काम केलेली मोठी लाकडी टेबले आणि खुर्च्या होत्या. भिंतीवर घरातल्या दिवगत स्त्री-पुरुषाची रगीत चित्रे होती. चिनी मातीच्या प्लेटसही होत्या. ते सर्व पाहत पाहत त्या हॉलला काटकोनात असलेल्या, आणि आम्ही पहिल्यादा ज्या ओसरीवजा दालनात होतो त्याला समातर असलेल्या हॉलमध्ये आलो. आणि मी स्तिमित होऊन क्षणभर थबकलो. जवळजवळ वीसपचवीस फूट रुंद आणि पन्नास फूट लाब असा हॉल होता. तिथले सगळे फर्निचर, शोभिवंत वस्तू, वगैरे पाहता एखाद्या राजवाड्याच्या हॉलसारखा दिसत होता तो. मधोमध दोन लांबरुंद डायनिंग टेबल्स होती. भिंतीला लागून मधूनमधून बैठी टेबले होती. त्यावर चिनी मातीची, काचेची नाना प्रकारची चित्रे होती. निरनिराळ्या आकाराच्या आकृती, ड्रॅगन्स, बुटकी-ढेरपोटी माणसे, पाने, फुले, ह्याची चित्रे असलेल्या चिनी मातीच्या प्लेट्स भिंतीवर टागलेल्या होत्या. हॉलच्या लांबीच्या बाजूच्या भिंतीवर मधोमध चिनी मातीच्या दोन गोल प्लेट्स लावलेल्या होत्या. तिकडे माझे लक्ष वेधले. त्यावर अरबी लिपीत पण फारसी भाषेत "खुश आमदीद" (सुस्वागतम्) असे शब्द लिहिलेले होते. पण प्रेट्स उलट्या म्हणजे खालची बाजू वर करून लावल्या होत्या. प्रेट्सवर काहीतरी लिहिलेले आहे ह्याची त्या लावणाऱ्याना मुळीच जाणीव नसावी. त्याच्या दृष्टीने ती नुसती एक प्रकारची नक्षी होती. ठराविक अंतरावर भिंतीच्या बाजूला दोनतीन मोठे लाकडी पेटारे होते. चांगले पाच फूट लांब,

दोन-अडीच फूट रुंद आणि तितकेच उंच. झाकणे घोड्याच्या पाठीसारखी अर्ध-गोलाकार. कड्या-बिजागऱ्या पितळेच्या, पॉलिश केलेल्या, आणि पेटाऱ्याचे पाय सिंहाच्या पंजासारखे लाकडातच कोरलेले. जमीन लाकडी तक्तपोशीची. सगळ्या लाकूडकामाचा रंग बदामी-तपकिरी. टेबले, पेटारे, तक्तपोशीसकट सगळे सामान स्वच्छ चकचकीत पॉलिश केलेले होते. काही शिष्ट श्रीमंत बायका आपल्यापेक्षा कमी श्रीमंत लोकांकडे गेल्यावर एखाद्या शोभेच्या वस्तूवरून बोट फिरवून तिच्यावर धूळ आहे की काय हे पाहतात. बहुधा धूळ असते. आणि तशी ती बोटाला लागली म्हणजे काही तरी कमीपणा हुडकून काढल्याचा दुष्ट आनंद त्यांना वाटतो. माझ्याही मनात तसाच थोडा दुष्ट हेतू आला. इतक्या सगळ्या वस्तू रोजच्या रोज इतक्या स्वच्छ चकचकीत ठेवणे खरेच शक्य होत असेल का? म्हणून मी हळूच मोलकरणीची नजर चुकवून (तीच आम्हाला सारे दाखवायला आली होती.) एका पेटीवरून तर्जनीचे टोक फिरविले. माझ्या हाताला तर धूळ लागली नाहीच, उलट मी ओशाळलो आणि माझ्या बोटाचाच मळ कदाचित त्या पेटीला लागला असेल असे वाटून मी हळूच माझ्या रुमालाने ती जागा पुसून टाकली.

ही सगळी स्वच्छता आणि सज्जता पाहिल्यावर मी सहज म्हटले, "आज संध्याकाळी जरी इथे जेवणाचा किंवा नृत्याचा कार्यक्रम करायचं ठरलं तरी वेगळी घासपूस किंवा झाडाझाड करावी लागणार नाही. इतकी सगळी तयारी आहे." तेव्हा मला कळले की एका वेळी तीनशे माणसांना पुरतील इतक्या सोन्याच्या प्लेट्स आणि इतर वाडगे वगैरे ह्या घरात एके काळी होत्या. कारण वाड्याचे मूळ मालक फार मोठे सरकारी अधिकारी होते.

श्रीमंतीचे वैभव म्हणजे काय आणि कलासक्तपणे, सुसंस्कृतपणे ते उपभोगणे म्हणजे काय ह्याची कल्पना तो वाडा पाहून झाली. सगळे उत्कृष्ट होते. रंगसंगती होती. कुठेही अभिरुचिहीनता नव्हती. पण त्याबरोबरच असेही वाटले की, इथे त्याच त्याच प्रकारच्या वस्तूंची गर्दी झाली आहे. त्या थोड्या कमी असत्या तर त्यांची आणि हॉलचीही शोभा वाढली असती.

सगळे पाहून तृप्तता पावल्यावर आम्ही परत पूर्वीच्या दालनात आलो. त्या दोघी वृद्ध स्त्रिया तिथे बसलेल्याच होत्या. आमच्या मित्रांनी "मुइतु ओब्रिगाद, आदेउश" असे म्हणून त्यांचा निरोप घेतला. आम्हीही "मेनी थँक्स" म्हटले.

बाहेर पडताना मनात आले, त्या दोघीही इतक्या निर्जीव आहेत की त्या फर्निचरच्या भागच झाल्या आहेत. आणखी काही दिवसांनी त्या दोघी कापराच्या बाहुल्यासारख्या नाहीशा होतील आणि तिथे नुसते फर्निचरच राहील. वाडा प्रसन्न होता, पण मन मात्र विषण्ण होते.

आदल्याच दिवशी मी दुसऱ्या एका ठिकाणी असाच एक मोठा वाडा पाहिला होता. तिथे प्रकार अगदी उलटा होता. लहान-मोठ्या वयाच्या बायकापुरुषांची

बद्दल होती. गप्पागोष्टी होत्या. पण एके काळी वैभवशाली असलेल्या त्या वाड्याला अगदी अवकळा आली होती. जमीन उखीरवाखीर होती. ठिकठिकाणी भिंतीचा गिलावा निघाला होता. कित्येक वर्षांत त्याना रंगरंगोटी झाली नसावी. लाकडी खांब, तुळया, बहाले रंगरोगण न दिल्यामुळे राकट, रखरखीत दिसत होती. हंड्या, ग्लासे, टेबले, खुर्च्या वगैरे जुन्या वैभवाचे जे काही थोडेसे अवशिष्ट होते त्यावर धुळीचे अभ्रे चढले होते. त्या वाड्याचा तो प्रकार, ह्या वाड्याचा हा.

आम्ही बाहेर पडून गाडीत बसलो. मित्र म्हणाले,

"लोटलीला तुम्हाला वाडा पाहायचा आहे तो पाहून आपण थोडे पुढे जाऊ. गाडीने फक्त दहा मिनिटे लागतील. अबोज्यात आम्ही तुम्हाला हिंदू वाड्याचा पर्फेक्ट नमुना दाखवू. राजांगण, चौक्या, ओसरी, देवघर, स्वयंपाकघर—आणि आमची विहीर. आमची विहीर आम्ही अशा जागी ठेवतो की स्वयपाकघरातून बायकाना पाणी काढता येते, आणि मागल्या बाजूने बाहेरून इतराना. तुम्ही पाहाच—"

पण मला त्या वेळी तरी आणखी वाडे पाहायची इच्छा राहिली नव्हती. लोटलीचा जो वाडा पाहायला निघालो होतो तोदेखील त्या वेळी पाहावासा वाटत नव्हते. मनाची अवस्था एकाच वेळी तृप्त आणि अस्वस्थ अशी काही विचित्र झाली होती.

मी म्हटले, "आता दुपार होत आली आहे. संध्याकाळी मला आणखी एके ठिकाणी जायचं आहे. आपण आता पणजीलाच परत जाऊ. लोटलीचा वाडा पाहायचा आहेच. आणि तुम्ही म्हणता तोही पाहायचा आहे. पण पुन्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा पाहू. मात्र हा वाडा तुम्ही बरोबर होतात म्हणूनच पाहायला मिळाला. तेव्हा त्याबद्दल तुमच्याच तोंडून आता ऐकलेले शब्द वापरून म्हणतो, मुइतु ओब्रिगाद."

# एक आठवण
# आडबाजूची

मागच्या वेळी लोटलीचा वाडा पाहायचा राहिला तो राहिलाच. म्हणून ह्या खेपेला जेव्हा गोव्याला जायचे ठरले, तेव्हा लोटलीला जाऊन तो एवढा नावाजलेला वाडा पाहायचाच, काही झाले तरी चुकवायचे नाही, असे मी मनाशी योजले होते.

पण गोव्याला गेल्यावरसुद्धा लोटलीला जाणे तसे सोपे नाही. कारण पणजी-मडगाव किंवा पणजी-वास्को ह्यापैकी कोणत्याच रस्त्यावर लोटली नाही. त्यासाठी नेहमीचा मुख्य रस्ता सोडून थोडेसे आत जावे लागते. पण 'गोयकाराची गोयाभायली वागणूक' जशी गोड अगत्यशील असते तशीच, किंबहुना त्याहूनही अधिक अगत्यशील 'गोयाभितुरली वागणूक' असते असा माझा अनुभव आहे. त्याचा मला ह्याही वेळी प्रत्यय आला. त्यानी माझी लोटलीला जायची सोय तर केलीच आणि वर दोन पोक्त आणि जाणते गोंयकार माझ्याबरोबर लोटलीला यायला तयार झाले. आणि ते चांगलेच झाले. कारण अजून ज्याच्या आठवणींवरचा पोर्तुगीज अमल उतरला नाही अशा लोकांशी बोलायला मला पोर्तुगीज भाषा येत नाही. आणि मुडकाराशी बोलायला गोव्याची जनभाषा कोकणीही येत नाही त्यामुळे मी एकटा गेलो असतो तर मला सगळा व्यवहार हातवाऱ्यावर सोपवावा लागला असता.

गाडी लोटलीकडे चालली होती आणि मी कल्पनेचे लगाम मोकळे सोडले होते. आपण जो वाडा पाहायला जातो आहोत, तो कसा असेल ? मी आतापर्यंत जे वाडे पाहिले होते, त्यापेक्षा निश्चितच अधिक भव्य असेल. त्यातले हॉल अधिक लांब-रुंद असतील. टेबले, खुर्च्या, कोच, पेटारे ह्यांच्यावर अधिक भरगच्च आणि अधिक बारीक कोरीवकाम असेल. त्यात सोनेरी रंग भरलेला असेल. हंड्या, झुंबरे, वॉलशेड्स ह्यांच्या काचा आणि भिंगे नुसतीच चकचकीत, पारदर्शक नसतील तर निळी, तांबडी, पिवळी अशी वेगवेगळ्या रंगांची असतील. चिनी मातीची तबके, ताटल्या, बाउगे, सुरया, चित्रे अधिक विविध प्रकारांची आणि आकारांची असतील. भिंतींवर घराण्याच्या पूर्वजांची आणि देखाव्यांची चित्रे तर असतीलच. पण शिवाय सबंध माणूस ज्यात दिसेल, असे मोठे बिलोरी आरसे ठिकठिकाणी लावलेले असतील. आणि मकावचे रांजण! ते तर असतीलच. कारण त्याखेरीज

गोव्यातल्या वाड्याला, मग तो हिंदूचा असो की किरिस्ताबाचा, वाडेपण येत नाही.

बहुधा लोटली आले. आमची गाडी थांबली. माझ्या मनात चालू असलेला चित्रपटही तुटला. आम्ही गाडीतून उतरलो. समोर डाव्या बाजूला भव्य चर्च होते. त्याच्या समोरची आणि आजूबाजूची मैदानासारखी प्रशस्त जागा अगदी मोकळी होती. जवळच्या चहाच्या दुकानातली चारदोन माणसे सोडली, तर सगळे अगदी निर्मनुष्य आणि शांत, निःशब्द होते. इतके की, माझ्यासारख्या मुंबईकराला वाटले, तिथेच थोडा वेळ रेंगाळावे आणि ती शांतता पोटभर प्यावी आणि उंटासारखी पोटात साठवून ठेवावी. मुंबईला परत गेल्यावर काही दिवस तरी पुरेल. अशी शांतता मुंबईत अलीकडे कुठेच लाभणे शक्य नाही.

पण वाडा पाहायचा होता. अधिक उशीर करून चालण्यासारखे नव्हते. रस्ता सोडून आम्ही आंब्याची, फणसाची, माडाची अशा झाडामधून जाऊ लागलो. गार वाटले. थोडेसे पुढे चालून गेल्यावर, त्या झाडाच्या गर्दीतच एक मातट पिवळसर रंगाचे, शेवाळलेल्या भिंतीचे मोठे घर दिसले.

हाच तो नावाजलेल्या चित्रकाराचा नावाजलेला वाडा! गाडीत बसल्या-बसल्या, मनातल्या मनात, मी जो भव्य वैभवशाली वाडा उभा केला होता, त्याच्याशी हा कुठेच जुळत नव्हता. तेव्हा तो उतरवून बाजूला ठेवला आणि त्या समोरच्या वास्तूकडे मोकळ्या मनाने पाहू लागलो.

वाड्याला स्वतःचे एक वेगळेपण होते. वाडा उंचावर नव्हता. जमिनीसरसा होता. पुढच्या बाजूला एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत व्हराडा नव्हता. भिंतीला ज्या खिडक्या होत्या, त्याना लकाकणारी काचेची तावदाने नव्हती आणि त्या बंद होत्या. वाड्याचे प्रवेशद्वार मधोमध नव्हते आणि त्याला बल्काव नव्हते आणि अर्थात सोपेही नव्हते. एक जुनाट उदासपणाची कळा सगळ्या वाड्यावर पसरली होती.

आणि त्याला साजेसाच एक वयस्कर नोकर दारात उभा होता. किरकोळ अंगाचा, उतरलेल्या, सुरकुतलेल्या चेहऱ्याचा. चट्टेरीपट्टेरी चड्डी आणि अर्ध्या बाह्याचा गजी-फ्रॉक अंगात घातलेला. गंजीफ्रॉकच्या व्हीशेप गळ्यामधून मळक्या दोरीत ओवलेला एक चांदीचा क्रूस दिसत होता योगायोग म्हणजे आमच्या दोन्ही गोंयकार मित्रांचा तो जुन्या ओळखीचा निघाला. इतकेच नाही, तर ह्या वाड्यात ते दोघेही लहानपणी अनेकदा आलेले होते. आणि तेव्हापासून तो तिथे होता. म्हणजे वाड्याला खानदानीपणा होता आणि त्या खानदानीचा तो नोकर लहानपणापासून एक भाग होता. वाडा पाहण्याचे आमचे काम सोपे झाले. आमच्या मित्राचे आणि त्याचे कोकणीत काहीतरी बोलणे झाले आणि आमचे मित्र म्हणाले, "चला."

तो राखणदार पुढे आणि आम्ही मागे, असे वाड्यात शिरलो आणि वाडा पाहत चाललो. आधी त्याने आम्हाला एका मोठ्या दिवाणखान्यात नेले. तो वाड्याच्या पुढच्या भागात होता. अगदी रिकामा होता. जमीन सारखी नव्हती. भिंतींचा

रंग विटलेला होता. हॉलमध्ये खुर्च्या, टेबल, कोच, पेटारे, कपाटे ह्यासारखे काहीही सामान, कुठेही नव्हते. इतकेच काय, पण गोव्यातल्या कोणत्याही वाड्यात हटकून दिसणारा मकावचा राजणदेखील नव्हता. हॉलमध्ये जो काही उजेड होता, तो मागल्या अंगणाकडल्या मिटलेल्या खिडक्यांतून दबत दबत येत होता. तोही येता येता गढूळ झाला होता. दिवसाची वेळ नसती किंवा त्या वेळी दिवसासुद्धा मी एकटाच आलो असतो, तर मला भीतीच वाटली असती, असा भकास रितेपणा होता. तुलूज लोत्रेक, देगा, सेझान, मोने, ह्यांच्या काही चित्रांचे रंगीत प्रिंट्स अंतराअंतराने भिंतींवर लावलेले होते. पण भिंतींच्या मानाने ते आकाराने इतके लहान होते आणि उजेड इतका अपुरा होता की, त्यामुळे हॉलचा भकास उदास रितेपणा अधिकच जाणवत होता. शिवाय ती चित्रे परिचित आणि इतरत्र अनेक वेळा पाहिलेली असल्यामुळे त्यांचे विशेष आकर्षणही वाटत नव्हते.

एकदोन पायऱ्या चढत, एकदोन पायऱ्या उतरत, ह्या खोलीतून त्या खोलीत जात आम्ही घराच्या मागल्या बाजूला आलो. सगळ्या खोल्या रिकाम्या होत्या. सगळ्यांना जुनाट मळकटपणाची कळा होती. सगळीकडे प्रकाश गढूळ होता. त्यामुळे उदासपणा अधिकच अंगावर येत होता. आणि सारखे मनात येत होते, हेच पाहण्यासाठी एवढा अट्टाहास केला होता का? वाड्यातून हिंडताना मला पैठणच्या धोंडीबाबांच्या आणि मेणवलीच्या नाना फडणिसाच्या वाड्याची आठवण येत होती. तोच उदासपणा, रितेपणा, मातट कळाहीनपणा. फरक एवढाच की, धोंडीबाबांच्या आणि नाना फडणिसाच्या वाड्याचा काही भाग पडला होता आणि काही पडू लागला होता, आणि वाड्यात केरसुणीसुद्धा फिरत नसे. तसे इथे नव्हते. कारण मधूनमधून का होईना, मालक मुंबईहून येऊन काही दिवस राहत असतात.

फिरवता फिरवता राखणदाराने आम्हाला मधल्या चौकाशी आणले. तिथे लख्ख प्रकाश होता. दुपारचे ऊनच होते. बाग होती. बाग म्हणजे दहा-वीस फुलझाडे आणि पाच-चार फुलवेली होत्या. ती घराच्या चौकात होती म्हणून तिला बाग म्हणायचे, एरव्ही जंगलच होते. लोटलीच्या वाटेवरच्या वाड्याच्या चौकात पाहिली तशी ह्यांच्या झाडावेलींत निवड नव्हती, योजलेली विविधता नव्हती की व्यवस्था नव्हती. हिरवी चकाकणारी पाने आणि तांबडी, पांढरी, पिवळी फुले ह्यांनी वाड्याच्या त्या भागाला टवटवी आणि थोडा जिवंतपणा दिला होता एवढेच.

तसाच थोडासा जिवंतपणा मालक आले म्हणजे वाड्याच्या ज्या भागात राहत असत त्या भागात होता. तिथे माणसाचा वावर असल्याची चिन्हे होती. स्वयंपाकाची भांडी होती. कपबश्या, प्लेट्स, काटे-चमचे, सुऱ्या होत्या. पाण्याचे जग्ज आणि ग्लासेस होते. टॉवेल-हॉर्सवर टॉवेल-नॅपकिन्स होते. एका खोलीत लिहिण्याचे साहित्य होते. आणि शेल्फात काही डिटेक्टिव्ह कादंबऱ्या आणि नॅशनल जिऑग्रॅफिक, प्ले-बॉय, मर्कोल्स, फॉर्च्यून, वगैरेंचे अंक होते. कोणी नुकतेच येऊन गेले असले

म्हणजे जागेला जे एक व्यवस्थित अव्यवस्थितपणाचे स्वरूप येते, तसे तिथे होते.

शेवटी राखणदाराने आम्हाला मालकाच्या शेजघरात नेले. हा अनुभव मात्र एरवी न मिळणारा आणि न मिळण्यासारखा म्हणून अपूर्व होता. नाना फडणिसाचा वाडा दाखवणारा माणूस तुम्हाला त्याची निजण्याची खोली आग्रह करून दाखवतो. त्याचे कारण त्या खोलीच्या भिंतीवर काही 'तसली' खास चित्रे रंगवलेली आहेत, ती तुम्ही पाहावी आणि ती दाखवल्याबद्दल तुम्ही त्याला खास बक्षीस द्यावे अशी त्याची इच्छा असते. नाहीतर आपण कोणाचा वाडा पाहायला गेलो तर, "आता तुमची निजायची खोली दाखवा" असे म्हणत नाही. किंवा वाड्याचा मालकही म्हणणार नाही की, "चला, आता मी तुम्हाला आमची 'बेडरूम' दाखवतो." मडगावला आणि लोटलीच्या वाटेवर जे उत्तम श्रीमती ख्रिस्ती वाडे पाहिले होते, त्याचीही स्वयंपाकघरे आणि शेजघरे आम्हाला पाहायला मिळाली नव्हती. तेव्हा एका घरदाज ख्रिस्ती कुटुंबाचे शेजघर पाहायला मिळते म्हणजे विशेषच म्हटले पाहिजे.

आणि ते होतेही पाहण्यासारखे. चौरस आकाराचे, खूप प्रशस्त. एका भिंतीला मधोमध टेकून एक मोठा 'फोर पोस्टर' म्हणजे छप्पर-पलंग होता. अठराव्या-एकोणिसाव्या शतकातल्या इंग्रजी कादंबऱ्यात आपण वर्णने वाचतो तसा. होताही 'पीरिअड पीस'च. चांगला सात-आठ फूट लांब-रुंद असेल. भक्कम लाकडी, मोहागनी रंगाचा आणि चकचकीत पॉलिश केलेला. कातीव पाय आणि तसेच वर निमुळत होत गेलेले दांडे. वर पांढरा शुभ्र चादवा. त्याच्या भोवती वीत-दीड वीत रुंद चुणीदार झालर लावलेली. पलंगावर गाद्या, गिर्द्या, उशा, स्वच्छ पलंगपोस सगळे होते. मालक केव्हाही आले तरी शय्या सज्ज. वीतभर उंचीची गादी होती. बहुतेक खाली स्प्रिंगा आणि वर फोम रबर असेल. हाताने दाबून पाहावे असा क्षणभर मोह झाला. पण बाजूला सारला. म्हटले, बरे नव्हे. तो अधिकार फक्त मालक-मालकिणींचा आणि बिछाना तयार करणाऱ्या नोकराचा.

माझे वर खोलीच्या छताकडे लक्ष गेले. चारी भिंतींकडून चौपाखी छत वर निमुळते होत गेले होते रंग काळसर तांबडा आणि त्यावर अंतराअंतरावर चौकोन साधून हस्तिदंती रंगाचे तळहाताएवढे लाकडी चौफुले बसवलेले होते. रात्रीच्या वेळी मेणबत्तीच्या प्रकाशात वर छताकडे पाहिले, तर अमावास्येच्या रात्री नक्षत्रांकित आकाशाकडे पाहिल्यासारखे वाटत असेल आणि चहूकडच्या चार भिंतींचा विसर पडत असेल.

वाड्यात प्रवेश केल्यावर त्यातून हिंडत असताना मनावर जे उदासभकासपणाचे दडपण पडले होते, आणि उगीचच ह्या आडबाजूला येण्याचा अट्टाहास केला असे वाटू लागले होते, ते ही खोली पाहिल्यावर बरेचसे कमी झाले आणि उलट, बरे झाले आलो ते, नाही तर हे अंतर्गृहातले खानदानी वैभव आपल्याला कसे पाहायला मिळाले असते, असे वाटले.

शेजघरातली ती श्रीमंत पण संयमशील आणि अभिरुचिदर्शक सजावट पाहिल्यावर मनात आले, जेव्हा सगळाच वाडा असा उजळलेला, सजवलेला असेल, तेव्हा खरेच तो फार पाहण्यासारखा असेल. इतर काही वाड्यासारखा त्यात रेखीव नेटकेपणा नसेल, पण एक रोमँटिक वेगळेपणा असेल. तो कदाचित त्याचा खरा गोवेपणा असेल. मालक-मालकिणींची, नोकराचाकराची वर्दळ असेल. पै-पाहुण्याची ये-जा असेल. तेव्हा डौलात चालणाऱ्या स्त्रियांच्या उंच टाचांच्या बुटाची टक्‌टक्‌ होत असेल. जेव्हा तो असा असेल, तेव्हा कसा दिसत असेल ? ह्याची चित्रे मी मनात रंगवीत होतो. लोटलीकडे येताना जी चित्रे मी मनात रंगवली होती, त्यापेक्षा ही वेगळी होती; पण वेधक होती.

माझ्या मनात ही चित्रे उमटत असतानाच राखणदार म्हणाला, "वाड्यातलं सगळं सजावट-सामान घेऊन मालकाचा भाऊ परदेशात गेला आणि वाडा तेवढा मालकाला ठेवला."

म्हणून वाडा भकास-रिता आहे तर!

बोलत बोलत आम्ही वाड्याच्या बाहेर पडलो आणि झाडाच्या सावळ्या सावल्यांतून चर्चसमोरच्या प्रशस्त जागेत नितळ प्रसन्न प्रकाशात आलो. इतिहासाच्या भुयारातून वर्तमानाच्या मैदानात आल्यासारखे वाटले. पण वाड्याच्या उदासपणाची छटा मनाला थोडीशी चिकटली. ती अजून चिकटलीच आहे. पण उगीचच आडबाजूला जाण्याचा अट्टहास केला असे मात्र वाटत नाही. हीही एक गोव्याची जपण्यासारखी आठवण.

# मातापुरा बीजें केलें

सृष्टी निर्माण करण्याचे काम जरी ब्रह्मदेवाकडे दिलेले असले तरी ती निर्माण कशी करावी ह्याचे आधी त्याला शिक्षण मिळत नसावे, किंवा तो विसराळू विद्यार्थी असावा, असे दिसते. त्यामुळे असे झाले की, भगवान विष्णूने ब्रह्मदेवाला सृष्टी निर्माण करायला सांगितले पण ती कशी निर्माण करावी हे त्याला कळेना. तेव्हा सर्व सृष्टीचा नमुना म्हणून स्वतः विष्णूने हे क्षेत्र सृष्टिनिर्माणापूर्वी निर्माण केले आणि मग ह्या क्षेत्राच्या नमुन्यावरहुकूम ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली. ते क्षेत्र म्हणजे आता मी जिथे उभा आहे ते माहूर क्षेत्र. म्हणजे माहूर क्षेत्र ही आदिसृष्टी आहे. सात कोस लांब आणि सात कोस रुंद असे हे क्षेत्र आहे आणि त्यात नऊ कोटी पाचशे अडुसष्ट तीर्थे आहेत. तेव्हा याहून अधिक सोडाच पण ह्याच्या इतक्याही योग्यतेचे दुसरे क्षेत्र नाही हे उघड आहे.

रेणुकेचा इथे निवास आहे म्हणून हे मातापुर आहे आणि ते मातापुर आहे त्यामुळे या क्षेत्राचे माहात्म्य आहे हे तर खरेच, पण रेणुका इथे आली त्याला मूळ कारण, आधीच हे क्षेत्र फार पवित्र होते.

गंगेच्या काठावर जमदग्नी ऋषींच्या आश्रमात जाऊन सहस्रार्जुनाने आततायीपणाने त्याचा वध केला आणि रेणुका मध्ये पडली असता तिच्या अंगावर शस्त्राचे एकवीस घाव घातले, तेव्हा ती आक्रोश करून परशुरामाला हाका मारू लागली. कैलास पर्वतावर शंकराजवळ शस्त्रप्राप्तीसाठी तपश्चर्या करीत असलेल्या त्याला तिचा आक्रोश ऐकू आला आणि तो ताबडतोब आश्रमात आला. जमदग्नीबरोबर सती जाण्याचा रेणुकेने निश्चय केला. परंतु तिने परशुरामाला सांगितले, "एक कावड घे, तिच्या एका पारड्यात तुझ्या पित्याचा देह ठेव आणि दुसऱ्या पारड्यात मला बसव आणि पृथ्वीवर संचार कर. पित्याच्या और्ध्वदेहिकासाठी आणि मला सती जाण्यासाठी कोरी—म्हणजे अभुक्त—भूमी पाहिजे. जिथे आकाशवाणी होईल, तीच कोरी भूमी समज आणि तिथे कावड ठेवून सर्व क्रियाकर्म कर."

त्याप्रमाणे परशुराम कान्यकुब्जाहून संचार करीत निघाला आणि सह्याद्रीच्या डोंगर-साखळीतल्या याच शिखरावर आला, तेव्हा आकाशवाणी झाली. हीच कोरी

भूमी असे ओळखून परशुरामाने तिथे कावड ठेवली आणि पित्याचे अंत्यसंस्कार कोणाकडून करवावेत म्हणून कोणी ब्राह्मण मिळतो की काय, हे पाहण्यासाठी इकडे-तिकडे हिंडू लागला. तिथून दत्तात्रेयाचा आश्रम जवळच होता. तो आश्रमात जातो तो सर्व अंगाला भस्म फासलेले, डोक्यावर जटा गुंडाळलेल्या, शरीर संपूर्ण नागवे, दोन हातात पानपात्रे, आणि पद्मासन घातलेले असे ते दत्तात्रेयाचे रूप पाहून त्याला फार आश्चर्य वाटले. परशुराम त्याच्याकडे पाहतो तोच एका क्षणात दत्तात्रेयाने आपले स्वतःचे रूप लपवले, आणि ब्राह्मणाचे रूप धारण केले. त्याचे योगलाघव पाहून तो परमपुरुष आहे हे परशुरामाने ओळखले. दत्तात्रेयाची आणि परशुरामाची भेट झाली. दत्तात्रेयाने सर्व संस्कार करण्याचे मान्य केले. त्यासाठी पाणी पाहिजे म्हणून जवळच पृथ्वीत बाण मारून परशुरामाने पृथ्वीवरली सर्व तीर्थे तिथे आणली. ते सर्वतीर्थ अजून तिथे आहे.

चिता सिद्ध झाली जमदग्नीचा देह चितेवर ठेवण्यात आला. रेणुकामाता चितेवर चढली आणि चिता पेटवण्यात आली. तेव्हा परशुरामाला अतिशय दुःख झाले आणि तो आक्रोश करू लागला. रेणुका म्हणाली, "बाळा, हे सगळ नाटक आहे. आमचा नाश कुणीही करू शकत नाही. सर्व विधी व्यवस्थित करून वाट पाहा. आम्ही महिन्याभराने परत जिवंत होऊ." परतु बाराव्या-तेराव्या दिवसाची क्रिया झाल्यावर परशुरामाला राहवेना. तो आई-वडिलाना हाका मारू लागला. तेव्हा जमदग्नी जिवत होऊन चितेतून बाहेर आले, परतु रेणुका गळ्यापर्यंतच वर आली, त्यामुळे तिचा फक्त मुखवटा तेवढाच इथे आहे. रेणुका इथे राहिली म्हणून हे मातापुर झाले. तिचे देऊळ इथे माझ्यासमोरच आहे.

पुढे पित्याचा वध करणाऱ्या आणि आईच्या देहावर एकवीस घाव घालणाऱ्या सहस्रार्जुनाचा वध करून परशुरामाने त्याच्या रक्ताच्या घागरी भरून आणल्या आणि त्या रक्ताने रेणुकेला स्नान घातले. तेव्हा तिला फार आनद वाटला.

दत्तात्रेय तरी माहुरात कसे प्रकट झाले? गुणवती नावाची एक पतिव्रता स्त्री आपल्या कुष्ठरोगी, वेश्यागमनी, जुगारी नवऱ्याला पाळण्यात घालून पाळणा डोक्यावर घेऊन रोज रात्री जुगाराच्या अड्ड्यावर नेत असे आणि परत आणीत असे. एके रात्री परत येत असता तिच्या डोक्यावरच्या पाळण्याचा वाटेत जमिनीत रोवलेल्या एका सुळाला धक्का लागला. त्यावर माडव्य ऋषींना सुळावर दिलेले होते. त्यांना धक्का लागून यातना झाल्या तेव्हा त्यानी संतापून शाप दिला, "सूर्योदय होताच तुझा पती मरण पावेल व तू विधवा होशील." गुणवतीला मोठी चिंता पडली. पण ती थोर पतिव्रता होती. तिने सकाळी सूर्याला उगवूच दिले नाही. अशी देवाची हजारो वर्षे गेली. सगळीकडे हाहाकार झाला. सूर्य नाही म्हणजे पाऊस-पाणी नाही. पिके नाहीत. यज्ञ-याग नाहीत. देवाची उपासमार होऊ लागली तेव्हा त्यानी विचार केला की, एखाद्या पतिव्रतेची प्रार्थना केली तरच काही

उपाय सापडेल. म्हणून सगळे देव ह्या पर्वताच्या एका शिखरावर असलेल्या अत्रि-ऋषींच्या आश्रमात आले आणि त्यानी काहीतरी उपाय काढण्यासाठी अनसूयेची प्रार्थना केली. सूर्योदय घडावा म्हणून अनसूयेने गुणवतीचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गुणवती म्हणाली, "मी विधवा होईन त्याच काय?" अनसूयेने तिला आश्वासन दिले, "तू चिंता करू नको. सूर्योदय होऊ दे. तुझा पती मरण पावताच मी त्याला जिवंत करीन."

त्याप्रमाणे सूर्योदय होताच गुणवतीचा पती मरण पावला, पण लगेच अनसूयेने त्याला जिवंत केले. त्याला रोगरहित आणि रूपसपन्न करून एक हजार वर्षांचे आयुष्य दिले. गुणवतीचेच दुसरे नाव सयामाय आहे. सयामायचा डोंगर अत्रि-ऋषींच्या आश्रमाच्या शेजारीच आहे.

देवाचे काम झाल्यामुळे ते प्रसन्न झाले. आणि "वर माग" असे अनसूयेला म्हणाले. तेव्हा ती म्हणाली, "ब्रह्मा, विष्णू आणि महेश ह्यानी माझ्या उदरी यावे." "तथास्तु" देव म्हणाले, आणि तिन्ही देव तिच्या उदरी आले. तेच दत्तात्रेय. अशा रीतीने हे दत्ताचे स्थान झाले.

ह्या सगळ्या 'अत्यद्‌भुत' कथा मी तुम्हाला अशासाठी सांगतो आहे की, तुम्ही कधी माहूरला जाणार असला तर केवढ्या विलक्षण 'थोर' क्षेत्राच्या ठिकाणी आपण जात आहो ह्याची तुम्हाला आधीच कल्पना असावी. मी माहूरला आलो तो मात्र त्याचे हे माहात्म्य मला आधी माहीत होते म्हणून नाही. कारण माहूरचे हे माहात्म्य माहूरला आल्यानंतरच मला कळले. मला माहूरला यायचे होते ते केवळ कुतूहल म्हणून. माहूर हे अनेकाची कुलदेवता असलेल्या रेणुकेचे स्थान आहे; दत्ताचे जन्मस्थान आणि आता निद्रास्थान आहे, फलटण येथे कऱ्हाडे ब्राह्मणाच्या घरी जन्म घेतलेल्या. चक्रपाणींनी एका क्षणी विरक्त होऊन ज्या "मातापुरा बीजें केलें" आणि जिथे दत्तात्रेयाने वाघाच्या रूपाने दर्शन देऊन त्याच्या "श्रीमुगुटी" चवडा ठेवला ते हे ठिकाण आहे म्हणून.

आणि माहूरला जायचे जायचे असे म्हणत म्हणत अखेर एकदा मनाचा धडा करून मी माहूरला गेलो. पोचे तो संध्याकाळ झाली होती. क्षेत्रोपाध्ये म्हणाले,

"देवदेवसरीला जाता का? आरतीची वेळ आहे. पाहा जात असाल तर. हे लोक जाऊन राहिलेत."

सात तासाचा बसचा प्रवास सपवून, क्षेत्रोपाध्याच्या घराच्या ओटीवर खाद्या-वरली बॅग आणि हातातली पिशवी टेकल्याला दहा मिनिटेसुद्धा झाली नव्हती. अग आंबटले होते. देवदेवसरी म्हणजे काय? आणि आरती कुणाची हे विचारायची-देखील सवड नव्हती. कारण अधार पडला होता. आणि ज्याच्याबरोबर जायचे होते ती मडळी पुढे चालूही लागली होती. म्हणून अधिक वेळ न घालवता मी लगेच निघालो. पाच-सात मिनिटे रस्ता चालत, चढ चढत गेल्यावर एका उच

जोत्यावरच्या भव्य देवळाजवळ पोचलो. अंगणातून पायऱ्या चढून वर सभामंडपात गेलो. सगळा मंडप आरतीच्या धूपाने आणि त्याच्या सुगंधाने दाटला होता. मध्ये वाट मोकळी सोडून दोन्ही अंगांना बायकापुरुष ओळीने उभे होते. आत गाभाऱ्यात धुपाची, त्याच्या सुगंधाची आणि माणसाची अधिकच दाटी होती. एक मनुष्य आरती करीत होता. झांजा आणि ताल एकमेळाने सम लयीत वाजत होते. गंभीर स्वरात तालावर आरती म्हटली जात होती. त्या धुरातून गाभाऱ्याच्या मधोमध एक पितळी मुखवटा चकाकत होता. त्याच्याच शेजारी त्याच्या डाव्या अंगाला तसाच दुसरा एक मुखवटा तितकाच चमकत होता.

ती शिस्त आणि गंभीरता लक्षात राहण्यासारखी होती. मीच एकटा मध्ये मध्ये वाकून मान पुढे करून गाभाऱ्यात काय चालले आहे ते पाहत होतो. कोणी काहीही बोलले नाही, पण मग मलाच संकोचल्यासारखे झाले.

आरती संपली. वाद्ये थांबली. भगवे गुलाबी धोतर, अंगात तशाच रंगाचा सदरा आणि डोक्याला तशाच रंगाचा रुमाल चापूनचोपून बांधलेला, अशा एका माणसाने दोन्ही मुखवट्यांना तीनदा साष्टांग नमस्कार केला. त्यानंतर आणखी काही लोकांनी. त्यानंतर सभामंडपातले लोक आत जाऊ लागले. मीही गेलो दोन्ही मुखवटे पाहिले. प्रसन्न होते.

आम्ही सभामंडपातून खाली अंगणात आलो. वरडीला लागून ओटे होते त्यावर थोडा वेळ बसलो. अंगणात देवळासमोर बायकापुरुष मिळून दहाबारा माणसे टाळ-चिपळ्यांच्या तालावर आरती म्हणत होती. अगदी एकस्वराने तालसुरांत. आपल्या देवळांतून इतका एकमेळ सहसा आढळत नाही. दोनचार बायकांच्या अंगात आले होते. त्या घुमत होत्या. पडत होत्या. पडल्या-पडल्या घुमत होत्या. मी ज्यांच्याबरोबर आलो होतो त्यांना विचारले, "हेच देवदेवसरी का? देवदेवसरी म्हणजे काय?"

ते म्हणाले, "हे देवदेवसरी नाही. हे दत्ताचं निद्रास्थान आहे. देवदेवसरी म्हणजे देवदेवेश्वर. तो तिकडं मागं आहे. तिकडं तिकडं जायचं आहे आपल्याला."

"दत्तात्रेय एका तोंडाचा कसा? आणि शेजारी कोणाचा मुखवटा आहे?"

"ते आपल्याला ठाऊक नाही. हे आपलं स्थान नाही. मानभावाचं आहे. दत्ताचं म्हणून आपलं आम्ही येतो तिकडे महंत आहेत त्यांचे, त्यांना विचारू. ते सांगतील."

"मग देवदेवेश्वर हे काय आहे?"

"त्याची कथा आहे. एकदा रेणुका आणि दत्तात्रेय गप्पा मारीत बसले होते. त्यांनी ब्रह्मदेवाला सांगितलं, 'क्षीरसमुद्रातून विष्णूला इथं घेऊन या. त्याप्रमाणे विष्णू आले. येताना त्यांनी कृष्ण आमलीचं झाड आणलं म्हणून या गावाला कृष्णामली-ग्राम असंही म्हणतात. विष्णू आले तेच देवदेवेश्वर. त्यांचं दर्शन घेऊन ब्रह्मदेव

मुक्त झाले. असे बहात्तर ब्रह्मदेव देवदेवेश्वराचं दर्शन घेऊन मुक्त झाले. म्हणून देवदेवेश्वराच्या दर्शनाचं पुण्य फार आहे. दत्तात्रेयांनाही देवदेवेश्वराजवळ राहावसं वाटलं म्हणून ते निद्रा करायला इथं येतात. 'निद्रा करी माहुरा गडावरी' असं म्हटलंच आहे. तुम्ही ऐकलं असेल."

"होय." मी म्हणालो.

देवदेवेश्वराचे दर्शन घेऊन महंताना भेटलो. ते म्हणाले, "दुसरा बाजूला मुखवटा तो चक्रपाणीचा. ते आमच्या चक्रधरस्वामीचं पूर्वाश्रमीचं नाव."

मी विचारले, "चक्रपाणींना दत्तात्रेय व्याघ्ररूपाने भेटले ते स्थान कुठे आहे?"

महतानी सांगितले, "ते स्थान दत्तशिखराच्या पलीकडे, झाडीत तीसचाळीस पावलावर आहे."

देवदेवेश्वर हे स्थान 'आपलं' नाही, म्हणून ते साधले तर साधले, नाही तर नाही, अशातलाच प्रकार आहे. लोक माहुराला येतात ते मुख्यत: रेणुकेचे पूजा-दर्शन करण्यासाठी. कारण त्याची ती कुलदेवता असते.

दत्तशिखर आणि अत्रिऋषींचा आश्रम पाहण्याची, बहुतेकाना तीव्र अशी इच्छा नसते. रेणुकेच्या पूजादर्शनासाठी जायचे म्हणजे लोक पहाटे पाच साडेपाच वाजताच उठून चालू लागतात आणि वाटेने मातृतीर्थावर स्नान करून नऊशे पायऱ्या चढून मंदिराच्या मागच्या बाजूने गडावर येतात. ते येतात तोपर्यंत पूजेचे साहित्य घेऊन उपाध्येदेखील गडावर येऊन पोहोचतात. देवीच्या पूजेचा एक महत्त्वाचा भाग तिला त्रयोदशगुणी विडा देणे हा असतो. हा विडा पन्नासपासून पाचशे पानांचा असतो. तो पुन्हा विड्याचे सर्व साहित्य कुटून द्यायचा असतो. त्यासाठी कुटणारे लोक मंदिराच्या आवारात बसलेलेच असतात. तिथेही 'क्यू' लावावा लागतो.

मी ज्याच्याबरोबर आलो होतो, त्यानीही विड्यासाठी क्यू लावला होता. त्याचा विडा कुटून होईपर्यंत मी गडावर मंदिरासमोरच भिंतीला टेकून उभा होतो. आणि माहूरचे माहात्म्य मनात घोळवीत होतो.

गडावर उभे राहिले म्हणजे माहूर हे स्थान किती रमणीय आहे, याची कल्पना येते. दिवस फेब्रुवारीचे होते. तरी सगळीकडे डोंगर वृक्षाच्छादित होते. आम्ही ज्या रस्त्याने आलो त्याच्याही दुतर्फा झाडी होती. आता हिरव्या पानावर पिकलेल्या आणि सुकलेल्या पानाची पिवळी तपकिरी छटा मिसळली होती. पण पावसाळ्याच्या दिवसात हेच दृश्य कितीतरी भव्य आणि भरगच दिसत असेल! भोवताली कित्येक कोसपर्यंत मैदान पसरलेले दिसते. रेणुकेच्या गडाचा डोंगर सुटा आहे. त्याच्या एका अंगाला खिंडीच्या पलीकडे डोंगरावर मोठा किल्ला आहे. आणि त्याचा रस्त्याच्या बाजूचा तट कडेकडेने लांबवर गेलेला आहे. त्याच डोंगराच्या बाजूबाजूने दत्त-शिखराकडे आणि पलीकडे अत्रिऋषींच्या आश्रमाकडे रस्ता गेला आहे. मी उभा होतो तिथे जवळच एक क्षेत्रोपाध्ये काही काम नसलेले मला दिसले. त्याना मी

सहज विचारले, "त्या किल्ल्यात वस्ती आहे काय?"

तेव्हा ते म्हणाले, "आता कुठली वस्ती? आता सगळं जंगल भरलं आहे. परंतु तिथं एक महाकालीचं मंदिर आहे. ही महाकाली कोल्हापूरची. तिचा मुलगा झंपटनाथ हा मोठा खोडकर होता. एकदा ती त्याच्यावर फार रागावली तेव्हा तो तिथून पळून माहुरला आला. त्याच्या मागोमाग तीही आली. आणि इथं किल्ल्यात राहिली. झंपटनाथला रेणुकेनं माहुरचा कोतवाल नेमलं आहे. महाकाली फार जागृत दैवत आहे. एकदा एक बाई तिच्या दर्शनाला गेली तेव्हा तिचं मूल देवीनं खाऊन टाकलं. बाई म्हणाली, 'तू माझं मूल परत देशील तरच मी इथून हटेन. तोपर्यंत हटणार नाही.' तेव्हा देवीनं मूल ओकून बाहेर काढलं, पण त्याच्या पायातल्या तोरड्यातला एक घुंगरू तिच्या तोंडात अडकून राहिला तो अजून तिच्या दातामध्ये दिसतो. कोल्हापूरची महालक्ष्मी आणि तुळजापूरची तुकाई इथं रेणुका गडावरच आहे." असे म्हणून त्याने बोट करून शेजारीच आवारात असलेली ती मंदिरे दाखविली.

माझ्या मनात किल्ल्यासंबंधीच विचार चालू होता. ती महाकाली आणि तिच्या दातात अडकलेला तो घुंगरू पाहावा अशी मला तीव्र इच्छा झाली. अर्थात ती पुरी होणे शक्य नव्हते. एक तर तितका वेळ नव्हता आणि कोणी दाखवायलाही आले नसते. वर्षातून एकदाच तिला नैवेद्य दाखवण्यासाठी जातात, असे त्या भटजीने सांगितले.

किल्ल्यासंबंधीच्या काही घटनाही आठवल्या. जहांगीर बादशाह विरुद्ध बंड करून पराभव पावून पळत निघालेला त्याचा मुलगा शहाजादा खुर्रम् (शहाजहान) दक्षिणेच्या वाटेने तेलंगणातून बंगालकडे जात असताना इथे ह्या किल्ल्यात मुक्काम करून होता. पुढे जाताना त्याने बेगम मुमताज महल, जडजवाहिर आणि अवजड सामान काही दिवसांकरिता इथे मागे ठेवले होते.

मोंगलांच्या सैन्याबरोबर आपले पथक घेऊन दोनतीन प्रसंगी शिवाजीविरुद्ध लढण्यासाठी गेलेली रायबागन ही माहूरच्या राजे उदाराम देशमुखाची सून. अहिल्याबाई होळकर, आनंदीबाई पेशवे, झाशीची लक्ष्मीबाई यांच्याही पूर्वीच्या काळातली स्त्री. राजकारणी आणि लढाऊ महाराष्ट्रीय स्त्रियांची परंपरा किती जुनी आहे!

भटजींचे आणि माझे हे बोलणे होत आहे तो आमच्या मंडळींचा विडा कुटून झाला होता. ती मंडळी पूजेसाठी मंदिरात जायला निघाली होती. मीही त्यांच्या मागोमाग मंदिरात गेलो. मंदिर फार मोठे नाही आणि प्रेक्षणीयही नाही. मी सभा-मंडपात जाऊन एका बाजूला उभा राहून देवीच्या मुखवट्याकडे पाहू लागलो. मुखवटा म्हणजे शेंदराची पुटावर पुटे चढलेला एक मोठा कुंगीर गोलाकार आहे. चांदीचे डोळे बसवलेले आहेत. कपाळावर मळवट आहे. नाक म्हणून जे आहे तिथे

एक मोठी नथ अडकवलेली आहे. आणि थोडेसे आश्चर्य म्हणजे एवढ्या मोठ्या गोलाकारावरची नाकाखालची जिवणी सस्मित आहे. तसा मुखवटा रूपहीनच आहे. पण त्या स्मितामुळे तसा जाणवत नाही. शेंदराच्या पुटाचे हे कवच गळून पडले—मधूनमधून ते गळून पडतेच—तर आत घडीव दगडाचा रेणुकेचा मुखवटा आहे की थोडाबहुत मुखवट्यासारखा स्वयभू दगड आहे, कोण जाणे. ते उपाध्याना किंवा कोणाला विचारण्याचा मला धीर झाला नाही. न जाणो त्याच्या भावना दुखावल्या तर! सभामंडपात चाळीसपन्नास बायकापुरुष बसले होते. कोणाची पूजा चालली होती, कोणी वाट पाहत होते. माझ्या शेजारी दोनतीन बायका हलक्या आवाजात गाणे म्हणत होत्या. त्याच्या काही ओळी माझ्या कानावर पडत होत्या.

"खणा नारळाचीच ग, खणा नारळाची ग, तुला ओटी ॥
भक्त येती दर्शनाला ॥
माहूर गडावरी, माहूर गडावरी ग, तुझा वास ॥"

हजारो ब्राह्मण कुटुंबाच्या ह्या कुलदेवतेला ब्राह्मणाचा नैवेद्य पुरणपोळीचा असतो. पण ही देवी स्वतः शुद्ध शाकाहारी नाही. देवीच्या नवरात्रात सप्तमी-अष्टमीला तिच्यापुढे बोकडांचा बळी दिला जातो. मदिराच्या बाहेर, परतु देवीच्या समोर येईल अशा रीतीने त्यासाठी एक होमकुंडच बाधलेले आहे. मघाशी भटजीशी बोलत होतो तेव्हा कळले, देवीचे पुजारी ब्राह्मण आहेत तसेच मराठेही आहेत. आणि मराठ्याचा हिस्सा चार आण्याचा तर ब्राह्मणाचा बारा आण्याचा आहे. त्यावरून मी तर्क केला की, देवी मूळची बहुधा मराठ्याचीच असावी. नाहीतर ब्राह्मणांनी त्याना चार आण्याचाही हिस्सा दिला नसता. शिवाय त्यानी मला हळूच असेही सांगितले की गावात अजून विधिपूर्वक शक्ति-उपासना करणारे आठ-चार लोक आहेत. म्हणजे त्यात 'म'कारही आले.

रेणुकेची पूजा झाल्यानतर आम्ही सर्व मडळी ज्या बैलगाडीने आलो होतो त्याच बैलगाडीने पुढे किल्ल्याच्या बाजूबाजूने दत्तशिखराकडे निघालो. सर्वतीर्थाला जायचे तर दत्तशिखराच्या अलीकडे मुख्य रस्ता सोडून आत आडरस्त्याने जावे लागते हा रस्ता दगडगोट्यानी इतका भरलेला आहे की, नेरळच्या फडक्यानी आपल्या प्रवासलेखात माहूरच्या रस्त्याचे जे वर्णन केले आहे त्याचा शभर टक्के प्रत्यय आला. गाडी सोडून पायी चालणे अधिक सुखाचे वाटले.

अत्रि ऋषींचा आश्रम या डोंगररांगेच्या शेवटल्या टोकावर आहे. तिथूनही चारीकडचा देखावा फारच सुदर दिसतो. अत्रि-आश्रमाच्या दोन मैल अलीकडे दत्तशिखर लागते. आईवडिलांचा आश्रम सोडून दत्तात्रेय इथे राहायला आले. दत्तशिखराकडून अत्रिऋषींच्या आश्रमाकडे जाताना वाटेत ठिकठिकाणी रस्त्याच्या

दोन्ही बाजूंना लहान लहान चपटे दगड एकमेकांवर लगोऱ्यासारखे रचलेले दिसले. त्या भागातलेच काही यात्रेकरू भेटले. त्याना विचारल्यावर त्यानी सांगितले, "आपण किती वेळा आलो ते कळाव म्हणून लोक ही उतरड रचतात."

"आपलीच उतरड कोणती, हे त्याना तसं कळत?"

"ज्याची त्याची खूण असते, त्यावरून त्यांना कळते."

"कुणी उधळून टाकीत नाही का?"

"कोण कशाला उधळून टाकील? ज्याचा त्याचा भक्तिभाव असतो तो."

खरे आहे. आता रस्ते चागले झाले आहेत. प्रवासाची सोय आहे. वरपर्यंत बसदेखील आहे. पण पूर्वी रस्ते नव्हते. होते ते अगदी वाईट होते. खडकाळ होते. ठिकाण अगदी एका बाजूला. तरी तेव्हासुद्धा कोणी बैलगाडीने तर कोणी पायी कष्ट सोसून, दिवस मोडून, माहुराला येतच होते, ते त्याचा दत्तावर म्हणा, देवीवर म्हणा, भक्तिभाव होता म्हणूनच.

माहूरची प्रवासवर्णने वाचून आणि ऐकून माझी समजूत झाली होती की, माहूर हे अगदी रूक्ष खडकाळ ठिकाण आहे. तिथे रमणीयता बिलकूल नाही. तरी पण माहूरला आपण गेलेच पाहिजे असा अनेक वर्षे मी बेत करीत होतो. आणि गेलो तेव्हा तिथले विविधरूप निसर्गसौंदर्य आणि भोवतालचा विशाल भूविस्तार पाहून मला प्रसन्न वाटले. आता इतराना सांगेन, "थोडा त्रास सोसण्याची तयारी ठेवा आणि मातापुरा 'बीजें' करा. विविधरूपी आणि रमणीय अशा निसर्गदृश्यांबरोबरच अत्यंत अद्‌भुत अशा अनेक पुराण-कथा, तुमचा विश्वास असो नसो, तुमच्या डोळ्यासमोर उभ्या राहतील आणि विष्णूने ब्रह्मदेवासाठी निर्माण केलेल्या ह्या 'आदिसृष्टी'चे दर्शन घेऊन तुम्हीही प्रसन्न व्हाल."

# अंधारातून अंधारात

धामणगावाहून बाभुळगाव किती लांब असेल ?

हा प्रश्न माहिती मिळवण्यासाठी विचारलेला नाही. उगीच प्रवासाआधी प्रस्थान ठेवण्यासाठी विचारला आहे. नागपुराहून निघण्यापूर्वीच कळले होते की, असेल पधरा-सोळा मैल. म्हणजे नागपुराहून दुपारी हावडा एक्स्प्रेसने निघाले तर संध्याकाळी अंधार पडण्यापूर्वी बाभुळगावाला सहज पोचता येईल. जूनचा महिना होता, दिवस मोठे होते आणि शिवाय धामणगावापासून बाभुळगावाला जायला अर्ध्या-अर्ध्या तासाने बसेस आहेत. म्हणजे बाभुळगावाला जाणे अगदी सोयीचे होते.

बाभुळगावला माझा मावसभाऊ गुराचा डॉक्टर होता मावशीला बऱ्याच वर्षांत भेटलो नव्हतो. आता नागपुराला आलोच आहो तर बाभुळगावाला जाऊन मावशीला भेटून यावे असा विचार होत होता तो पक्का केला. इतका चांगला विचार आणि इतकी चांगली संधी पुन्हा येणे शक्य नव्हते. एक रात्र तर काढायची. तेव्हा सामान फार घ्यायचीही जरूर नव्हती.

हावडा एक्स्प्रेस पकडण्यासाठी साडेअकरालाच नागपूरच्या स्टेशनावर जाऊन बसलो. मी आणि माझी बायको. गाडी बारा वाजता येऊन पाऊण वाजता सुटायची. पण त्या दिवशी काय झाले कोण जाणे. बारा वाजले, पाऊण वाजला, एक वाजला तरी गाडी नाही. अखेर गाडी दीड वाजता आली आणि सव्वादोन वाजता सुटली. आणि आम्ही सव्वातीन वाजता धामणगावला पोहचायचे ते पाच वाजता पोहोचलो. नागपूर आणि धामणगाव ह्यांच्या मधले अंतर वाढले नाही, पण प्रवासाचा वेळ वाढला. अजूनही जर तावडतोब बस मिळाली तर आम्ही अंधार पडण्यापूर्वी बाभुळगावाला पोचू शकू अशी आशा वाटत होती. आम्ही जवळजवळ धावतच बसस्टँडकडे गेलो. आणि बाभुळगावाकडे जाणारी बस केव्हा येईल ह्याची माहिती काढण्यासाठी चौकशी ऑफिसात पोचलो, पण तिथे कोणीही नव्हते.

आम्ही चडफडत आणि बसवाहतुकीला—किंबहुना एकूणच वाहतूकव्यवस्थेला—शिव्या देत छपराखालच्या बाकावर बसून राहिलो. भजी, चिवडा, शेवगाठ्या खाऊन टाकलेले कागदाचे तुकडे ठिकठिकाणी पडले होते. खाल्लेल्या वस्तूंचे उष्टेही जिकडेतिकडे

विखुरलेले होतेच! त्यावर माश्या बसत होत्या. काही माणसे त्यातच बेफिकिरपणे बसत, तसल्याच वस्तू विकत घेऊन खात. कागदांवरून माश्या आमच्या तोंडावर, अंगावर येत त्याना हाकायचे आणि चणे-दाणे, चिवडा, पेपरमिंट विकणारे पोऱ्ये 'माश्या'सारखेच पुनःपुन्हा येत, त्यानाही हाकायचे, हा आमचा मुख्य उद्योग होता. चौकशी-खिडकीत कोणी आले आहे की काय, ते पाहायला मधूनमधून जाणे, हा दुसरा उद्योग होता. पण कोणीही आलेले नव्हते. असा बराच वेळ गेल्यावर शेजारी बसलेल्या एका म्हातारेबुवाना मी सहज विचारले, "बाभुळगावाची बस केव्हा येते?" त्याच्याकडून काहीतरी माहिती मिळेल अशी आशा होती अन् नव्हतीही! पुष्कळदा आपण ज्याला माहिती विचारतो तो आपल्यासारखाच नवखा असतो आणि त्या भागातला असला तरी त्याला माहिती असतेच असे नाही. हे आपल्यालाही ठाऊक असते. तरी आपण विचारतोच. न जाणो, असलीच त्याला माहिती तर!

ते म्हणाले, "तुम्ही कुठले?"

"मुंबईचे."

"कोनच्या गाडीनं आले? आता तं मबईची कोनी गाडी आली नाही."

"आम्ही मुबईचे आहो, पण आता नागपुराहून आलो."

"बाभुळगावाले काह्याले चालले? कोनी तठी हाय काय तुमचं?"

"माझा भाऊ आहे."

"थो काय करते तठी?"

"सरकारी नोकर आहे."

"मग त चांगलच आहे लेक."

"बाभुळगावाची बस केव्हा येईल?"

"मले काय मालूम बाप्पा. तिकिटबाबूले इचारा."

"तिकिटबाबू जागेवर नाहीत."

"येते आत्ताच."

वाट पाहणाऱ्याचा वेळ गोगलगायीच्या गतीने सरकतो. तसेच चालले होते. पाचाचे साडेपाच झाले. साडेपाचाचे पावणेसहा झाले. पावणेसहाचे सहा ..वेळ सरकत होता सेकंदासेकंदाने. मी सोयीसाठी पधरा मिनिटाचे युनिट घेतले होते. इतक्यात सोसाट्याचा वारा सुटला. इतका की, अगदी वादळच आल्यासारखे वाटले. धुळीचे लोट उठले. त्याच्याबरोबर कडब्याची पाती, सुकलेला पालापाचोळा, उष्टे कागद गिरक्या घेत, हेलकावत सगळीकडे उडू लागले. छपरालालचे उडून बाहेर मैदानात गेले आणि मैदानातले छपराखाली आश्रयाला आल्यासारखे आले.

दिवस जूनच्या अखेरीचे होते. पावसाची वाट होती. उन्हाळा-उकाडा वऱ्हाडात जसा असतो तसा—असावा तसा—होता. पण पाऊस पडलेला नव्हता. इतक्यात आभाळ सरसरून भरून आले. काळेभोर झाले. विजा चमकल्या, कडाडल्या आणि

तड्तड्तड करीत पावसाचे टपोरे थेंब पडू लागले. थेंबांच्या धारा झाल्या. कोसळू लागल्या. आणि लगेच मैदानात पाण्याचे लहान-मोठे ओहोळ नागमोडी वळणे घेत, पाचोळा ओढीत धावू लागले. उघड्यावर बसलेल्या गुराची, कुत्र्याची, माणसांची तारांबळ उडाली. निवाऱ्यासाठी धावपळ करीत कुणी छपराखाली आली, कुणी दुकानात शिरली. एकच गोंधळ उडाला.

तेवढ्यात एक बस आली. चौकशी-बाबूही आले होते. आम्ही धावलो. पण बस आमची नव्हती. काही प्रवासी त्या बसने गेले. आम्ही पुन्हा जागेवर जाऊन बसलो. दहापधरा मिनिटे गेली. उठलो. पुन्हा चौकशी-बाबूंकडे गेलो. त्यांना पुन्हा विचारले. चौकशी करणारे लोक गरजू, उतावीळ आणि अडाणी असतात ही चौकशी-बाबूंची ठाम समजूत असते.

ते म्हणाले, "मी काय सागू? गाड्या टायमावर येतेत काय? येईन आता."

आणखी एक बस आली. तीही आमची नव्हती. साडेसहाच्या सुमाराला एक बस आली. आम्ही पुन्हा धावलो.

"तुमचीच बस. लवकर जाऊन बसा. बसा लवकर. गाडी थकल नाही तऽ."

खांद्यावरच्या पिशवीखेरीज सामान नव्हते, ते किती बरे होते! 'प्रवासात कमी सामान घ्या—ट्रॅव्हल लाइट' हा युद्धकाळातला मंत्र आम्ही अजून जपत होतो. बसच्या दाराशी गेलो. वरून पाऊस कोसळत होता. आम्ही भिजत होतो. सगळे एकदम आत चढत होते. दारात, वरती आतल्या बाजूला कंडक्टर होतासे वाटत होते.

"बाभुळगावची गाडी काय?"—मी

"तुम्हाले कोठ जायाच?"

"बाभुळगावाला."

"मग चढा ना हो लवकर, आत्ता गाडी थकते." असे म्हणून त्याने घंटेची दोरी ओढली.

"थांबा, थांबा." करीत आम्ही कसेबसे बसमध्ये शिरलो. लोक दारात दाटी करीत होते, पण बसमध्ये दाटी नव्हती. जागा मिळाली. दोघेही बसलो.

बाहेर पाऊस पडतच होता. कपडे भिजले होतेच. त्यात आणखी बसमध्ये बसल्यावर छतातून अंगावर पाणी ठिबकू लागले. वर पाहिले. छताला अनेक ठिकाणी पाण्याचे थेंब लटकलेले होते. तेच अंगावर ठिबकत होते. सगळे दिवे पेटलेले होते. त्याच्या खालची टोपणे अर्धी पाण्याने भरलेली होती. आणि बसला हादरे-हिसके बसले—आणि ते सारखे बसतच होते—की ते पाणी हिंदकळायचे. आम्हाला ती एक करमणूकच झाली. पण त्याबरोबरच काय ही बसची व्यवस्था-अवस्था म्हणून वाहतूक मडळावर संतापायला निमित्तही मिळाले. ते बहुधा मिळतेच. धामणगाव सोडले की, साधारण पाऊण एक तासात बाभुळगाव येणार. तेवढी कळ काढायची मनाची तयारी होतीच.

धामणगावी बस-स्टँडवर छपराखाली बसल्यापासूनच वाटत होते . गाड्यांचा आणि बसेसचा हा अनियमितपणा, संध्याकाळ तिन्हीसांजेकडे कलू लागलेली, हा भाग आपल्याला अपरिचित, तेव्हा बाभुळगावाला जाण्याचा विचार सोडावा आणि परत नागपुराला जावे. पण मावशीला भेटायला हवे होते. त्या दीड-दोन वर्षे अंथरुणाला खिळलेल्या होत्या. बऱ्याच वर्षांत भेट झाली नव्हती. एकदा बाभुळगावाला पोचलो म्हणजे झाले.

"एवढंस गाव आहे. कोणालाही विचारलं तरी घर दाखवतील." असे आम्हाला सांगितलेले होते. म्हणून आम्ही थोडेसे नेटाने, थोडेसे हट्टाने बसून राहिलो होतो. धामणगाव मागे टाकून जेमतेम दोनतीन मैल बस आली असेल. तिथे पावसाचा मागमूससुद्धा नव्हता. उन्हाळ्यात जसे असावे तसे सगळे कोरडे ठणठणीत होते. त्याचा एक फायदा असा झाला की, अंगावरले कपडे वाळले. काळोख हळूहळू वाढत होता, पण अजून थोडेथोडे दिसत होते.

एका स्टॉपवर बस थांबली.

"बाभुळगाववाले उतरा."

आम्ही उतरलो. आणखी एकदोघे उतरले. कंडक्टरची घंटा वाजली. फर-फर-फर्रर्र करीत बस निघून गेली. गावात जायचा रस्ता कोणता ते विचारावे म्हणून इकडेतिकडे पाहू लागलो. एव्हाना साडेसात वाजले होते. आमच्याबरोबर उतरलेले कुठे दिसेनासे झाले होते जवळच एका बैठ्या छपरीत चहाचे दुकान होते.

आम्ही विचारले, "गावात जायची वाट कोणती ?"

"कोनत्या गावात ?"

"बाभुळगावात."

"बाभुळगाव येथून दोन कोस आहे."

"मग हा स्टॉप कोणता ?"

"बाभुळगाव फाट्याचा."

"मग बाभुळगावाला कसं जायचं ? बस आहे का ?"

"आता कुठली बस ? बाभुळगावाची बस केव्हाच गेली." आम्हाला पाठीवर गुद्दा मारल्यासारखे झाले. हबकलोच. आता बाभुळगावाला जायचे कसे ? आम्हाला वाटले होते, बस थेट बाभुळगावाला जाते, आणि हेच बाभुळगाव असेल. एव्हाना चांगलाच अंधार पडला होता. आणि रात्र कृष्णपक्षातली होती. अमावास्या जवळ आली होती.

"आमच्याबरोबर कोणी सोबत येईल का ? आम्ही नवखी माणसं आहोत."

हे मी बोललो आणि मूर्खपणा केल्याबद्दल लगेच जीभ चावली अंधाऱ्या रात्री, अनोळखी ठिकाणी, भलत्याच माणसाला वाटाड्या म्हणून घ्यायचे यापेक्षा अधिक मूर्खपणा तो कोणता ? म्हणजे, "ये रे बाबा, लूट मला." म्हणून आमंत्रण देणेच

होते. त्यात आणखी तिथे दोघेचौघे बसलेले होते. म्हणजे सगळ्यानाच कळले की, आम्ही नवखे. नशीब आमचे की, हॉटेलवाला आणि आणखी कोणी तरी म्हणाले, "आता कोन येनार ह्या येळी ?"

आता काय करावे ? त्या छपरीखाली रात्र काढतो म्हणावे तरी पचाईत. बस स्टॉपवरच निजावे म्हटले तर तिथे चिट्पाखरूसुद्धा नाही. बायको तर चिडलेली, अस्वस्थ झालेलीच होती. म्हणाली, "कसलं बाभुळगाव काढलंत हे ? काहीतरी मनात घेता—"

मी तरी काय बोलणार ? मीही गांगरलोच होतो. "झक् मारली आणि बाभुळगावाला जायचं ठरवलं."—असे मनाशी म्हटले. अशी भाषा मी सहसा वापरीत नाही. बहुधा कोणीच वापरीत नाही. पण असा प्रसंग आला म्हणजे मनाची चीड आणि दडपण दूर करायला अशी भाषाच पुढे येते.

जवळच एक बैलगाडी दिसली. गाडीवालाही होता. त्याला विचारले. तो म्हणाला, "येत नाही."

जाता येत नाही, थांबता येत नाही, परतता येत नाही, अशा खोड्यात पडलो होतो.

मी बायकोला धीर देण्याचा प्रयत्न करीत होतो. पण मलाच कोणीतरी धीर द्यावा, वाट दाखवावी, असे वाटत होते. बाभुळगावाची वाट कोणती ते कळले होते. अखेर हिय्या केला आणि काय होईल ते होवो, असे म्हणून बाभुळगावाच्या वाटेने चालू लागलो. "भीमरूपी महारुद्रा" पाठ येते तेवढे म्हणावे, असाही विचार मनात येऊन गेला आणि हसूही आले. कोणी भेटलाच चोर-लुटारू तर फार तर आमच्या-जवळ जे काय पाचपंचवीस रुपये असतील ते घेईल. जीव तर घेणार नाही ?

आता आठ वाजायला आले होते. अंधार चांगलाच पडला होता. उन्हाळ्यात दिवस लांब होतो खरा, पण आपली मर्यादा सोडून आमच्या सोयीसाठी अधिक लांब थोडाच होणार होता ? रस्त्यावरच्या पांढुरक्या चाकोऱ्या दिसाव्या इतपत उजेड होता, त्याच्या अंदाजाने चालतो होतो. रस्त्याच्या दोहो बाजूला बाभळीची-हिवराची झाडे होती, त्यांच्या वेड्यावाकड्या काळ्या आकृती आणि हवेत हात पसरल्यासारख्या फांद्या भेवडावीत होत्या. पलीकडे शेते आणि मधूनमधून झाडे होती, ती अधिकच काळी दिसत होती. आजूबाजूला कुठे 'खस्फस्' झाले की, धडकी भरत असे. साप किंवा दुसरे एखादे जनावर तर नसेल !

असेच चालता चालता आम्ही दोनचार फर्लांग गेलो असू. मागून पावलांची चाहूल लागली. आमचे काळीज अधिकच धडधडू लागले. मागे वळून पाहिले. एक अठरावीस वर्षांचा मुलगा झपाझप पावले टाकीत येत होता. लांब शर्ट, पायजमा, डोक्यावर गांधीटोपी असा त्याचा पोषाख होता.

आम्हाला वाटले, तो आम्हालाच धरायला किंवा हटकायला येत असावा, पण आम्ही पळून जाऊ म्हटले तरी कुठे जाणार होतो ? आणि त्याच्या पकडीतून कसे

सुटणार होतो? आम्ही चालतच राहिलो. तो आमच्या मागून येऊन अंगावरून पुढे जाऊ लागला. म्हणजे तो आम्हाला धरायला आला नव्हता. आम्हाला जरा धीर आला. त्याला थांबायला सांगितले. तो थांबला. जवळ आल्यावर आम्हाला तो विद्यार्थ्यासारखा वाटला. आम्ही विचारले, "कुठे चाललात?"

"बाभुळगावाला."

"नाव काय?"

"मुकिंदा."

"मग जरा आमच्यावर मेहेरबानी करा. आमच्यासाठी थोडे सावकाश चाला. आम्हालाही बाभुळगावालाच जायचं आहे. गुराच्या डॉक्टराकडे. आम्ही नवखे आहोत. तुमची सोबत होईल."

त्याने बिचाऱ्याने ऐकले. आमच्याबरोबर चालू लागला. बोलता बोलता कळले, तो आठवीपर्यंत शिकला होता. जातीचा न्हावी होता. गावात केस कापायचे दुकान होते. धंदा चांगला चालला होता.

अर्धीमुर्धी वाट चालून आलो होतो. रस्ता उताराला लागला. झाडी दाट झाली. वाटेत पावसाळी ओढ्याचे, दगडगोट्यांनी भरलेले, पात्र आडवे आले ते दिसत होते.

मुकिंदा म्हणत होता, "आपण जिकडून आलो तिकडं मागं दोन दिवसापूर्वी एका व्यापाऱ्याला चोरांनी धोंडे मारून घोड्यावरून खाली पाडले आणि त्याने बाहेर-गावाहून माल आणला होता तो घेऊन ते जंगलात पळाले."

"सापडले का?"

तेवढ्यात समोरच्या ओढ्यापलीकडच्या रस्त्याच्या उतारावरून एक मोटर आली. तिच्या दिव्यांचा प्रकाश आमच्या डोळ्यात घुसला, म्हणून आम्ही डोळ्यांवर हात आडवा धरून रस्त्याच्या कडेला उभे राहिलो. खडखडत-फरफरत एक जीप अंगा-वरून गेली. आम्ही पुन्हा चालू लागलो.

मुकिंदा पुढे सांगू लागला. "अजून नाही सापडले. पण आता रोज पोलिसची जीप गस्त घालते. आत्ता जीपच गेली."

ओढा ओलांडून आम्ही रस्ता चढू लागलो. मनात म्हटले, "समजा, आम्ही दोन दिवस आधी आलो असतो किंवा चोर आज आले असते, आम्हाला तो मुलगा भेटलाच नसता, तर मार तर नक्कीच बसला असता."

तेवढ्यात आमच्यापुढे जात असलेला आणखी एक माणूस दिसला. असेल चाळीस पंचेचाळीस वर्षांचा. पोटऱ्यापर्यंत धोतर, लांब सदरा आणि डोक्याला रुमाल बांधलेला. मुकिंदा आणि तो मनुष्य बोलत चालले. गावातले दिवे दिसू लागले. थोड्या वेळाने गाव आले. मुकिंदाने आम्हाला त्या माणसाच्या हवाली केले. म्हणाला, "मला या डावीकडल्या वाटेनं जायचं आहे. हे तुम्हाला डॉक्टरसाहेबांचं

घर दाखवतील."

तो मनुष्य फारसा उत्सुक दिसला नाही. त्याला गावात बाजारपेठेत काही काम होते. पण बाबा-पुता केल्यावर तयार झाला. तो ह्या दुकानात-त्या दुकानात मधून-मधून शिरायचा. तो परत येईपर्यंत आम्ही रस्त्यात थांबायचे. एखाद्या दुकानातून प्रकाशाचा झगझगीत झोत रस्त्यावर पडायचा तर त्याच्या अलीकडेपलीकडे किट्ट काळोख असायचा. त्यामुळे डोळे दिपत. रस्ता खडबडीत. चालताना भीती वाटायची —कुठे ठेचाळू, पडू की काय !

तसेच सबंध गाव ओलांडून आम्ही पलीकडे गेलो. वस्ती विरळ होत चालली. एका सरकारी क्वार्टरसमोर थांबून त्याने हाक मारली.

"डॉक्टरसाहेब !"

दार उघडले. आतल्या दिव्याच्या प्रकाशाची तिरीप अंगावर आली.

बाबूने मिनिटभर आतून आमच्याकडे निरखून पाहिले.

"भाऊ का ? वहिनीही आहेत वाटत ?" असे म्हणत तो बाहेर आला. आम्हाला पोचवायला आलेला माणूस थोडासा घोटाळत होता. त्याच्या हातावर मी रुपया ठेवला. तो जरा नाखुशीनेच परत गेला. त्याला आणखी पैसे हवे होते, पण मागण्याचा धीर झाला नाही. खरे म्हणजे आम्हाला वाटेने विश्वासू सोबत मिळाली आणि आम्ही सुखरूप घरी पोहचलो हे आमचे नशीबच. त्यासाठी कितीही पैसे दिले तरी अपुरेच झाले असते. तेवढ्यात बाबू म्हणाला, "किती दिले ? रुपाया ना ? खूप झाला. आणि असे कसे एकदम आला ? पत्र नाही पाठवलं. आम्ही बाभुळगाव फाट्यावर घ्यायला आलो असतो."

"नागपूरला आलो होतो. बाभुळगावाला यायच एकदम ठरलं. पत्र पाठवायला वेळ नव्हता. पण आलो ना ? आम्हाला वाटेन दोघे भेटले म्हणून बर झाल. नाही तर आमचा धीर खचला होता." मी म्हटले आणि सगळी हकिगत सांगितली.

"तसा रस्ता चांगला आहे. काही धोका नाही. माणसं सारखी कोणी ना कोणी येत जात असतात," वगैरे वगैरे बाबू सांगत होता. आम्ही वाटेने ऐकलेल्या दोन दिवसापूर्वीच्या प्रसंगाबद्दल बोललो तेव्हा बाबू म्हणाला, "यंदा पीक-पाणी चांगल झाल नाही. त्यातून हा भाग तसा दुष्काळीच आहे, त्यामुळ कधी-कधी असे प्रकार होतात."

जणू फारसे काही होत नाही, असा त्याचा सूर होता. तेवढयात वहिनी म्हणाल्या, "कधी कधी काय ? नेहमीच होतात. तुमचं नशीब, म्हणून तुम्हाला काही झालं नाही, आणि तुम्ही सुखरूप आलात. तो परवाचा मनुष्य अजून इथे दवाखान्यात पडलेला आहे. हे खूप धीट आहेत म्हणून याना त्याचं काही वाटत नाही. तुम्ही मुंबईचे लोक. तुम्हाला असल्या ह्याची सवय नाही."

खरेच, आम्हाला असे अनुभव कधी येत नाहीत. आम्ही योगायोगाने सुखरूप आलो होतो. मूर्खपणाच केला होता, पण फळ भोगावे लागले नाही, एवढेच.

मावशीची भेट झाली. बाबू आणि त्याची बायको-मुले ह्यांचीही भेट झाली. आमचे काम सपले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाबूने आम्हाला आसपास हिंडवले. जिकडेतिकडे उजाडच दिसत होते. बहुतेक झाडे बाभळीची आणि कडुलिंबाची होती. काही आंब्याचीही होती. पण कसल्या तरी रोगामुळे प्रत्येक झाड अर्धे करपून गेले होते. एकंदरीत त्या गावाला 'बाभुळगाव' हे नाव अगदी सार्थ होते.

लौकर जेवण उरकून परतायचे होते. बाबू आणि त्याचा मुलगा आमच्याबरोबर फाट्यापर्यंत येणार होते. कोणती तरी एक बस गावाशेजारून जाणार होती. ती आम्हाला फाट्यापर्यंत जायला मिळणार होती. पण जेवण उरकून, निरोप घेऊन, बसकरिता म्हणून आम्ही रस्त्याकडे येतो तो बस आमच्यासमोरून निघून गेली.

म्हणजे फाट्यापर्यंत पुन्हा पायी जाणे आले. पण आता दिवस होता. बाबू आणि त्याचा मुलगा बरोबर होते. बोलता बोलता वाट लवकर संपली. त्या वाटमारीच्या जागेवर आल्यावर बाबूने जागा दाखवीत झालेला प्रकार पुन्हा तपशीलवार सांगितला. पुन्हा आम्ही नशीबाचे आभार मानले.

फाट्यावर पोचतो तोच धामणगावाकडे जाणारी बस निघण्याच्या बेतात होती. ती चुकली असती म्हणजे झालेच! बाबूने मुलाला धावत पुढे पाठवले म्हणून बस आमच्यासाठी थोडा वेळ थांबली. आणि आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. आदल्या दिवशी बसची वाट पाहतापाहता कंटाळलो होतो आणि आज आता बस पकडण्यासाठी धावावे लागले होते.

हा सकाळचा प्रवास प्रकाशातून प्रकाशात झाला. पण लक्षात राहिला तो आदल्या रात्री अंधारातून अंधारात केलेला. आमच्या वऱ्हाडात.

22300

REFBK-0022307

## ललित
## लेखन

---

किमया : माधव आचवल : पाच रुपये ※ डोह : श्रीनिवास विनायक कुलकर्णी : अकरा रुपये ※ सोन्याचा पिंपळ : श्रीनिवास विनायक कुलकर्णी : एकोणीस रुपये ※ पांढरे केस हिरवी मने : वि० द० घाटे : सहा रुपये ※ मनोगते : वि० द० घाटे : सहा रुपये ※ विचारविलसिते : वि० द० घाटे : पधरा रुपये ※ वाटचाल : रा० भि० जोशी : साडेचार रुपये ※ मजल दरमजल : रा० भि० जोशी : पाच रुपये ※ सहवास : कु० द० दीक्षित : अठरा रुपये ※ बटाट्याची चाळ : पु० ल० देशपांडे : दहा रुपये ※ ऊन आणि गारठा : शशिकांत पुनर्वसु : चार रुपये ※ भावमुद्रा : दुर्गा भागवत : बारा रुपये ※ व्यासपर्व : दुर्गा भागवत : नऊ रुपये ※ पैस : दुर्गा भागवत : साडेसहा रुपये ※ शतपावली : मधुकर : पाच रुपये ※ पालखी : दि० बा० मोकाशी : पाच रुपये ※ अठरा लक्ष पावलं : दि० बा० मोकाशी : [illegible] ※ ग्वर्डेघाशी : म० वि० राजाध्यक्ष :

---